# पानशेत प्रलय

समस्या व पुनर्वसनाचे प्रयत्न'

# पानशेत प्रलय

## समस्या व पुनर्वसनाचे प्रयत्न

सुलभा ब्रह्मे
प्रकाश गोळे

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे

गोखले अर्थशास्त्र संस्था, मराठी प्रकाशन १३ वे

© गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४
१९६८

किंमत सहा रुपये

Y:4355:13.23156.N74
K7
122810

प्रकाशक : वि. म. दांडेकर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४.
मुद्रक : द. वा. आंबेकर, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणे ४.

# प्राक्कथन

१२ जुलै १९६१ रोजी पानशेतचे धरण फुटल्यामुळे पुण्यावर जी आपत्ती कोसळली आणि त्यानंतर त्यातून आपद्-साहाय्याचे व पुनर्वसनाचे जे प्रश्न निर्माण झाले त्याची माहिती संस्थेच्या या प्रकाशनामध्ये देण्यात आलेली आहे. पहिल्या प्रकरणात या आपत्तीचे वर्णन संक्षेपाने करण्यात आले आहे. या आपत्तीत ७५० घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आणि १६५० घरांची खूपच नासधूस झाली. सुमारे १०,००० कुटुंबे बेघर झाली आणि २६,००० हून अधिक कुटुंबांच्या घरगुती मालमत्तेचे नुकसान झाले. सुमारे ३६०० दुकानातील वस्तूंचे साठे नष्ट किंवा खराब झाल्यामुळे त्यांचे अपरिमित नुकसान झाले. अनेक सार्वजनिक व खासगी संस्थांना पूर्णतः किंवा अंशतः फटका बसला. पुणे महानगरपालिका, राज्य-सरकारची काही कार्यालये, काही बँका व इतर संस्था यांची महत्त्वाची दप्तरे व इतर कागदपत्र नष्ट झाले. कोठारांतून ठेवलेले अन्नधान्य सडून गेले. नदीवरील पूल व शहरातील रस्ते उद्ध्वस्त झाले. टेलिफोनच्या व विजेच्या तारा नष्ट झाल्या; आणि शहराला पाणीपुरवठा करणारी व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली. एकूण नुकसान सुमारे १७,५०,००,००० रुपयांचे झाले असावे असा अंदाज आहे. त्याचा तपशील तिसऱ्या प्रकरणात देण्यात आला आहे.

सर्वात पहिला व साहजिकच अत्यंत निकडीचा प्रश्न पाणीपुरवठ्याची व्यवस्था चालू करण्याचा होता. त्यानंतर पूरग्रस्तांना ताबडतोब मदत देणे निकडीचे होते. या आपत्तीचा तडाखा कित्येक हजार लोकांना बसलेला होता आणि त्यांना दिली गेलेली मदत सुमारे ७५,००,००० रुपयांची होती. तात्कालिक मदतीची व्यवस्था लागल्यानंतर विस्कळित झालेले आर्थिक जीवन पूर्ववत सुरळीत कसे करता येईल याकडे लक्ष पुरवावे लागले. त्याकरिता मुख्यतः कर्जे देण्यात आली आणि त्याबरोबर काही रोख अनुदाने व आर्थिक मदतही दिली गेली. त्यासाठी आणखी ७५,००,००० रुपये लागले. या उपाययोजनांची माहिती चवथ्या प्रकरणात देण्यात आली आहे.

यापेक्षा अधिक अवघड प्रश्न सुमारे १४,००० बेघर कुटुंबांना राहण्याची सोय उपलब्ध करून देण्याचा होता. यांपैकी सुमारे एकतृतीयांश लोक त्यांच्या पूर्वीच्या घरांची डागडुजी करून तेथे पुनः राहण्यास गेले. उरलेल्या लोकांच्या निवाऱ्याची सोय करण्यास साहजिकच काही काळ लागला. मार्च १९६५ अखेरपर्यंत म्हणजे पानशेत आपत्ती कोसळल्यानंतर चार वर्षांच्या

काळात सुमारे ६००० कुटुंबांना सरकारी व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्यामार्फत सुरू करण्यात आलेल्या वेगवेगळ्या योजनांच्या द्वारे कायमची घरे मिळवून देण्यात आली. वेगवेगळ्या गृह-निर्माण योजनांची तपशीलवार माहिती पाचव्या प्रकरणात आलेली आहे. उरलेली ३–४ हजार कुटुंबे बहुधा अजूनही तात्पुरत्या निवासस्थानांतूनच राहात असावीत. यांच्यापैकी अनेकांना बहुधा कायमची घरे पूर्वीही नव्हती. ते झोपडपट्ट्यांत राहात होते. ते आपल्या पूर्वस्थितीस पुन: परतले असून पूर्वीच्या जागी तशाच झोपडपट्ट्या तयार झाल्या आहेत.

पानशेतच्या धरणफुटीमुळे बेघर झालेल्या कुटुंबांच्या घरांच्या व पुनर्वसनाच्या प्रश्नाने पुण्या-तील घरांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. शहराच्या योजनाविहीन व भरमसाट वाढीमुळे हा प्रश्न दिवसेदिवस अधिकाधिक गंभीर बनत चालला आहे. शेवटच्या प्रकरणात या प्रश्नाची चर्चा केलेली आहे. त्यातील काही ठोकळ गोष्टीही चिंताजनक आहेत. उदाहरणार्थ १९५४ सालचे कौटुंबिक उत्पन्न, खर्च आणि बाजारभाव यांचा विचार करता असे आढळून येते की पुण्यात राहणाऱ्या कुटुंबांपैकी सुमारे एकतृतीयांश कुटुंबांना १०० चौरस फूट राहण्याच्या जागेचेही वाजवी भाडे देणे परवडत नाही. आणखी एकतृतीयांश कुटुंबे एक खोली व एक स्वयंपाकघर यांचे वाजवी भाडे देऊ शकतात; परंतु त्यांना वाजवी भाड्यात एवढी जागाही मिळत नाही. तात्पर्य, शहरात नव्याने येणारे लोक सामान्यत: सध्या विद्यमान असलेल्या लोकांच्या एवढीच आर्थिक प्राप्ती असणारे अस-तील असे गृहीत धरले तर त्याचा अर्थ असा होतो की नव्याने येणाऱ्या कुटुंबांपैकी फक्त सुमारे एकतृतीयांश कुटुंबेच सध्याच्या बाजारभावाने घरभाडी देऊ शकतात. उरलेली मंडळी एकतर सध्याच्या घरांतच दाटीवाटीने राहतात किंवा नव्या झोपडपट्ट्या निर्माण करतात. हा प्रश्न अधिक गंभीर होऊन हाताबाहेर जाण्यापूर्वीच महानगरपालिका त्याकडे निकडीने लक्ष पुरवील अशी आशा आहे.

गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणे ४
१५ ऑगस्ट १९६७

वि. म. दांडेकर

# प्रस्तावना

पुण्याच्या नैऋत्येस १० मैल अंतरावर खडकवासला येथे मुठा नदीवर बांधलेल्या धरणातून पुणे शहरास पाणीपुरवठा होत असे. पुणे शहराच्या वाढत्या गरजांमुळे हा पुरवठा अपुरा पडू लागला. त्यात वाढ करण्यासाठी निरनिराळ्या योजनांचा अनेक वर्षे विचार चालू होता. अखेर मुठा नदीच्या उपनद्या अंबी व मोशी यांवर अनुक्रमे पानशेत व वरसगांव येथे मातीची धरणे बांधण्याची योजना १९५७ साली मुक्रर करण्यात आली. पानशेत धरणाच्या बांधकामास १९५७ साली सुरुवात होऊन धरणाचे काम १९६२ साली पुरे करण्याची योजना होती. परंतु १९६० साली ही योजना बदलून धरण १९६१ सालीच पुरे करण्याचे ठरविले गेले. बरेच काम मोठ्या घाईगडबडीने शेवटच्या वर्षी पुरे करण्यात आले व काही काम अपुरेच राहिले. तरीहि १९६१ च्या पावसाळ्यामध्ये धरणात पाणी अडविण्याचे ठरले. जूनच्या मध्यापासून सतत जोराचा पाऊस सुरू झाला आणि तीन आठवड्यात धरण तुडुंब भरले. पाण्याची वाढती पातळी व लाटांचा मारा यामुळे धोक्याची परिस्थिती निर्माण झाली. परंतु धरण भरण्याचा निर्णय एकदा घेतल्यानंतर प्राप्त संकटाचा स्वीकार करण्याविना गत्यंतर उरले नाही. १० जुलैपासून पानशेत येथील परिस्थिती गंभीर होत गेली आणि १२ जुलैला सकाळी पानशेतचे मातीचे धरण फुटले. दोन दिवस धोक्याची पूर्वसूचना मिळाली असूनही आपत्तीस तोंड देण्याची पूर्वतयारी करण्यात आली नाही. पाणी कोठवर पोहोचेल याचा अंदाज बांधण्यात आला नाही. १२ जुलैला धरण फुटल्यानंतर सुमारे तीन तासांनी पाण्याचे लोंढे पुणे शहरात घुसले. तत्पूर्वी पूर्वसूचना देऊन जीवितहानी टाळणे, तसेच लोकांची मालमत्ता, दुर्मिळ वा किमती सामान वाचविण यासाठी प्रयत्न केला गेला नाही. या सर्व हलगर्जीपणामुळे पानशेत आपत्तीत पुणे-करांचे अपरिमित नुकसान झाले. नागरिकांपुढे असंख्य गंभीर समस्या उभ्या राहिल्या. पानशेत धरणा-बरोबर खडकवासल्याचे धरणही फुटल्यामुळे पुण्याचा पाणीपुरवठा बंद पडला. पाण्याच्या लोंढ्याच्या आघाताने शहरातील बहुविध सुविधा उद्ध्वस्त झाल्या, हजारो नागरिक आपल्या घरादारास मुकले, अनेक सहस्रांची मालमत्ता धुळीस मिळाली.

पानशेत आपत्तीत झालेल्या हानीची व्याप्ती केवढी होती, त्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे काय स्वरूप होते, पाणीपुरवठा, सुविधांची दुरुस्ती, निर्वासितांचे पुनर्वसन, इत्यादी बिकट समस्या सोडविण्यासाठी शासकांनी कोणत्या उपाय-योजना आखल्या, त्यामध्ये दूरदृष्टी होती, की तात्पुरते

उपाय एवढेच त्या योजनांचे स्वरूप होते, नागरिकांनी या अकल्पित आघातास कशा रीतीने तोंड दिले, या सर्व प्रश्नांचा ऊहापोह करण्याच्या हेतूने प्रस्तुत अभ्यास आपत्तीनंतर लगेच हाती घेण्यात आला. आपत्तीनंतरच्या काळातील प्रश्न व त्यांवरील उपाय-योजना एवढाच मर्यादित विषय येथे अभ्यासिला आहे. आपत्तीमुळे आपद्ग्रस्त कुटुंबे, संस्था, उद्योग यांवर कोणते दूरगामी परिणाम झाले याचा विचार येथे प्रस्तुत नाही. कारण असा अभ्यास करण्यासाठी आपत्तीनंतर काही कालाने स्वतंत्र अशी पाहणी करणे आवश्यक झाले असते.

या संशोधन कार्यासाठी अनेक सरकारी व निमसरकारी खाती, इतर संघटना व संस्था यांजकडून माहिती मिळविणे आवश्यक होते. या सर्वांच्या हार्दिक सहकार्याशिवाय हा अभ्यास पूर्ण करणे शक्य झाले नसते. निरनिराळी सरकारी कार्यालये, विशेषत: जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयातील पूर विभाग व पुरवठा विभाग, उद्योग खाते, बांधकाम खाते, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळ, सहकार खाते यांमधील कर्मचाऱ्यांनी आम्हास आवश्यक ती माहिती पुरविली व वेळोवेळी बहुमोल साहाय्य केले त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोत. मुख्यमंत्रि-निधी, पुणे महानगरपालिकेतील विविध खाती, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीज, सहकारी व इतर अधिकोष, सामाजिक, शैक्षणिक व इतर संस्था, विभागीय समित्या, या सर्वांतील अधिकारी व कार्यकर्ते यांनी आम्हास जरूर त्या नोंदी दाखवून आवश्यक ती सर्व मदत दिली. तसेच अनेक व्यापारी व व्यावसायिक यांनीही आम्हास माहिती पुरविली. या सर्वांच्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. घरांची नुकसानी व निर्वासितांचा प्रश्न अभ्यासण्यासाठी आपद्ग्रस्त घरांची पाहणी करण्यात आली. त्या पाहणीत आवश्यक ती माहिती घरमालक व इतर रहिवासी यांनी तत्परतेने पुरविली याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

सदर संशोधनकार्यात प्रा. ध. रा. गाडगीळ यांनी आम्हास बहुमोल मार्गदर्शन केले, याबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. स्थापत्यविशारद श्री. द्वा. आ. गडकरी व श्री. म. ल. घाफेकर यांनी खडकवासला प्रकल्पाच्या तांत्रिक बाजूंबद्दल आम्हास आवश्यक ती माहिती दिली. श्री. द. पां. आपटे व श्री. य. कृ. सोवनी यांनी इतिवृत्त वाचून महत्त्वाच्या सूचना केल्या. तसेच गोखले अर्थशास्त्र संस्थेतील इतर अनेक सहकाऱ्यांनी प्रस्तुत संशोधनात मदत केली. या सर्वांच्या साहाय्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोत.

या इतिवृत्तासाठी आवश्यक ती माहिती १९६२ जुलैपर्यंत गोळा केली आणि कच्चा अहवाल १९६२ अखेर तयार झाला होता. परंतु काही अपरिहार्य अडचणींमुळे अहवालाच्या प्रकाशनास फार उशीर झाला. त्यामुळे इतिवृत्तात दिलेली बहुतेक आकडेवारी जुलै १९६२ मधील आहे. फक्त आवश्यक त्या ठिकाणी १९६५ ची परिस्थिती दिलेली आहे.

१२ जुलै १९६६

सुलभा ब्रह्मे
प्रकाश गोळे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्राक्कथन | पाच |
| | प्रस्तावना | सात |
| | सारणींचा अनुक्रम | दहा |
| | नकाशांचा अनुक्रम | बारा |
| १ | १२ जुलै १९६१ | १ |
| २ | पाणीपुरवठ्याची समस्या | ६ |
| ३ | आपत्तीतील हानीचे अंदाज | १५ |
| ४ | तात्कालिक उपाय आणि साहाय्य | ३९ |
| ५ | आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन | ६७ |
| ६ | सिंहावलोकन | ८३ |
| ७ | पुण्यातील गृहनिर्मितीची समस्या | ९४ |
| परिशिष्ट अ | आपद्ग्रस्त कुटुंबांच्या नोंदीसंबंधीचे टिपण | १११ |
| परिशिष्ट आ | सर्वेक्षणासाठी वापरलेल्या प्रश्नपत्रिका | ११३ |
| परिशिष्ट इ | पारिभाषिक शब्दसूची | ११६ |

# सारणींचा अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| ३.१ | राज्य-सरकारच्या मालमत्तेच्या नुकसानीचे अंदाज | १७ |
| ३.२ | महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या हानीचा तपशील | १९ |
| ३.३ | उत्पादनाचा प्रकार व एकूण हानी यानुसार आपदग्रस्त कारखान्यांच्या संख्येचे विभाजन व माध्य हानी | २० |
| ३.४ | धंद्याचा प्रकार व एकूण हानी यानुसार आपद्ग्रस्त दुकानांचे विभाजन | २२ |
| ३.५ | आपद्ग्रस्त दुकानांची संख्या व सरासरी हानी | २३ |
| ३.६ | आपद्ग्रस्त कारागिरांची संख्या आणि सरासरी हानी | २६ |
| ३.७ | व्यापार व उद्योग यांची एकूण हानी | २७ |
| ३.८ | आपद्ग्रस्त देवालयांच्या संख्येचे हानीच्या रकमेनुसार विभाजन | २९ |
| ३.९ | संस्था व धर्ममंदिरे यांची एकूण हानी | ३० |
| ३.१० | उपहृत घरे आणि खोल्या यांची संख्या व स्थिती | ३१ |
| ३.११ | उपहृत घरांच्या स्थितीनुसार त्यांमधील खोल्यांच्या हानीचे अंदाज | ३२ |
| ३.१२ | आपद्ग्रस्त कुटुंबांची पेठवार संख्या व सरासरी हानी | ३४ |
| ३.१३ | सार्वजनिक व खाजगी मालमत्तेच्या नुकसानीचा अंदाज | ३५ |
| ३.१४ | आपत्तीत नष्ट झालेले पिकांखालील क्षेत्र व हानीचा अंदाज | ३६ |
| ३.१५ | पानशेत आपत्तीतील एकूण हानीचा अंदाज | ३७ |
| ४.१ | आश्रयस्थान आणि मूळच्या राहत्या घरांची स्थिती यानुसार आपद्ग्रस्त कुटुंबांचे प्रतिशतता विभाजन | ४३ |
| ४.२ | मदत-केंद्रांवर व मदत-केंद्रांबाहेर आश्रय घेतलेल्या आपद्ग्रस्त कुटुंबांचे उत्पन्नानुसार प्रतिशतता विभाजन | ४३ |

| | | |
|---|---|---|
| ४.३ | मदत-केंद्रांवर वापरलेल्या एकूण वस्तूंवरील खर्चाचे प्रतिशतता विभाजन | ४७ |
| ४.४ | मदत-केंद्रांवर दरमाणशी केलेल्या खर्चाचे वस्तूनुसार विभाजन | ४८ |
| ४.५ | मदत मिळालेल्या संस्थांची संख्या व मदतीची रक्कम | ५५ |
| ४.६ | निरनिराळ्या संस्थांनी दिलेल्या साहाय्याचे स्वरूप व रक्कम | ५७ |
| ४.७ | शासकीय व अशासकीय यंत्रणांद्वारे देण्यात आलेल्या मदतीचे स्वरूपानुसार विभाजन | ५९ |
| ४.८ | सहकारी अधिकोषांमार्फत दिलेल्या कर्जांचा तपशील | ६२ |
| ४.९ | वाणिज्य अधिकोषामार्फत दिलेल्या कर्जांचा तपशील | ६३ |
| ५.१ | घरांची स्थिती व स्थान यांनुसार उपहृत घरांतील खोल्यांचे विभाजन | ६९ |
| ५.२ | उपहृत घरांमधील दुरुस्त केलेल्या खोल्यांची आणि त्यांतील कुटुंबांची पेठवार संख्या | ७३ |
| ५.३ | राज्य-सरकारच्या घरबांधणी योजनांद्वारे ऑगस्ट १९६२ पर्यंत बेघर कुटुंबांना मिळालेली जागा | ७७ |
| ५.४ | आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी बांधलेल्या घरांची सवलतीची भाडी | ७९ |
| ७.१ | पुण्यातील न्यादर्श कुटुंबांचे उत्पन्नानुसार विभाजन (१९५४) | ९९ |
| ७.२ | नवीन बांधलेल्या घरांचे क्षेत्रफळ, उपलब्ध सोयी आणि खर्च | १०२ |
| ७.३ | नवीन गृहयोजना – आयुर्मान आणि खर्च | १०३ |
| ७.४ | नवीन गृहयोजनांद्वारा उपलब्ध झालेली जागा आणि जमिनीचा वापर | १०४ |
| ७.५ | इमारतीतील गाळ्यांच्या संख्येनुरूप गाळ्यागणिक भिंतीची लांबी | १०६ |

## नकाशांचा अनुक्रम


१ पुणे शहर आणि परिसर

२ पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्र

३ पुणे शहरातील आपद्ग्रस्त विभाग


नकाशा २


# पुणे शहरातील आपद्ग्रस्त विभाग



नकाशा २

## पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्र






नकाशा १

पुणे शहर आणि परिसर

# १२ जुलै १९६१

पानशेत धरणास असलेला धोका टळल्याची बातमी १२ जुलैला स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली. अतिवृष्टीमुळे पानशेत येथील तलाव तुडुंब भरला आहे, परंतु धरणास काही धोका पोहोचू नये म्हणून योग्य ती काळजी घेतली जात आहे, अशा बातम्या तत्पूर्वी दोन दिवस येत होत्या. परंतु पानशेत येथे परिस्थिती गंभीर झाल्याची कोणाला कल्पना नव्हती. त्यामुळे धरण फुटले तर काय होईल असा प्रश्न उपस्थित होण्याचे कारण नव्हते.

१२ जुलैला सकाळी शहरातील सारे व्यवहार अगदी सुरळीतपणे चालू होते. कारखाने व कचेऱ्या सुरू झाल्या, दुकाने उघडली, रस्ते गजबजले. ज्या संकटास पुण्याच्या नागरिकांना लवकरच तोंड द्यावे लागणार होते, त्याची पुसटशी जाणीवही कोठे दिसत नव्हती.

गेले काही दिवस मुसळधार पर्जन्यवृष्टी चालू असल्याने मुठा नदीला पूर येणे स्वाभाविक होते. पूर आला, की पाणी पाहावयास नेहमीच गर्दी जमते. त्याप्रमाणे १२ जुलैला सकाळी नदीच्या आसपास लोक पाणी पाहण्यासाठी रेंगाळत होते. आज पाण्याच्या धारेला इतका वेग का, हे मात्र कोणास कळेना. पाण्याची पातळी विलक्षण वेगाने वाढत आहे हे थोडयाच वेळात जाणाऱ्यायेणाऱ्याच्या लक्षात येऊ लागले. ज्या भागात पुराचे पाणी पोहोचते अशा भागांना सकाळी १० च्या सुमारास पाणी थडकू लागले, आणि लवकरच नदीलगतचा भाग जलमय झाला. प्रचंड लाटा पुलांच्या कमानींना आणि नदीतीरावरील घरांना धडका देऊ लागल्या. सुमारे दीड तासाच्या अवधीत पाण्याची पातळी कल्पनातीत वाढली.

पाण्याच्या महाकाय लोंढयाखाली साडेअकराच्या सुमारास संभाजी पूल गडप झाला आणि पुलाच्या आसपासच्या भागातून तो लोंढा पसरला. पूल पाण्याखाली गेल्यानंतरही पाणी चढतच राहिले आणि शहराच्या गल्ली-बोळांतून, घराघरांतून, चौकांना वेढा घालत पाणी भराभर शहरात शिरत गेले. पाणी किती चढणार आणि शहराचा इतर कोणकोणता भाग गिळंकृत करणार हे कोणासही सांगता येत नव्हते. दुपारी एक वाजेपर्यंत पाणी इतके चढले, की सर्वांत उंच अशा शिवाजी पुलावरूनही पाणी वाहू लागले.

दुपारी सव्वादोनच्या सुमारास खडकवासला धरणास भगदाड पडले. जवळजवळ अर्ध्या तासात तो विस्तृत जलाशय रिकामा होऊन, पाण्याचा दुसरा प्रचंड लोंढा पुण्यावर चालून आला. नदीच्या दोन्ही तीरांवर सुमारे दोन ते तीन फर्लांग अंतरापर्यंत आता पाणी पसरले होते, आणि शहराच्या

मध्यभागास खवळलेल्या जलाशयाचे स्वरूप आले होते. पाण्याने ज्या वेळी कमाल उंची गाठली, तेव्हा शिवाजी पुलापाशी पाण्याच्या स्तंभाची उंची नदीच्या पात्रापासून ५४ फूट होती. ओंकारेश्वर देवळापाशी रस्त्याच्या पातळीपेक्षा २२.५ फूट, कॉंग्रेस भवनाजवळ २३.५ फूट, संभाजी पुलाजवळ केळकर रस्त्यावर २५.५ फूट आणि हिंदविजय चित्रपटगृहाजवळ २२.५ फूट इतक्या उंचीपर्यंत पाणी चढले होते.

दुपारी चार वाजल्यानंतर मात्र पाणी ओसरू लागले आणि संध्याकाळी ७ च्या सुमारास शहराच्या बहुतेक भागांतून पाणी मागे हटले. याप्रमाणे १२ जुलै १९६१ रोजी नदीतीरानजीकचा विस्तृत प्रदेश सात-आठ तास पाण्याखाली होता. नदीकाठालगतच्या सर्व पेठांतून पाणी शिरले होते. संपूर्ण मंगळवार पेठ व शनिवार, नारायण, सोमवार, कसबा, या पेठांतील पुष्कळसा भाग पाण्याखाली गेला होता. सदाशिव, बुधवार, एरंडवणे, शिवाजीनगर, या पेठांनाही पाण्याचा तडाखा सहन करावा लागला. मुठेच्या पाण्याने मुळेच्या पाण्याला मागे रेटले आणि ते पाणी संगमवाडी, वैतागवाडी व खडकीचा भाग यांमधून पसरले. नागझरी आणि माणिक नाल्यांमधून पाणी शहरात घुसले आणि नाना, रविवार, नागेश, गणेश या पेठांचा काही भाग जलमय झाला.

पुण्याच्या नागरिकांवर हा घाला अचानक पडला. त्यांना संकटाची कोणतीही पूर्वसूचना मिळाली नव्हती. जेव्हा पाणी चढावयास लागले, तेव्हा नुकत्याच झालेल्या भरपूर पावसामुळे नदीस मोठा पूर येणार असे नागरिकांस वाटत होते. महापूर आला म्हणजे नदीलगतच्या घरांतून नेहमीच पाणी शिरते तेव्हा ती गोष्टही विशेष भयसूचक वाटली नाही. आपत्तीच्या भयानकतेची पूर्ण कल्पना येण्यापूर्वीच अनेकांची घरेदारे पाण्याने वेढली गेली. नदीचे पाणी किती पसरणार याचा काहीच अंदाज नसल्यामुळे अंतर्भागातील लोकही बेसावध होते. बहुतेकांना स्वतःचा जीव वाचविण्यासाठी कसेबसे घराबाहेर पडता आले. परंतु घरातील सामानसुमान मात्र लोंढ्याच्या तडाख्यात सापडले.

चहुकडून पाणी वेगाने पुढे येत होते, त्याच्या आघातामुळे जागोजाग इमारती कोसळत होत्या. त्यामुळे जीव बचावून सुरक्षित स्थळी जाणेही कठीण झाले होते. काहींना घरांच्या छपरांवर तर काहींना उंच झाडांवर जीव मुठीत धरून बसावे लागले. कित्येक ठिकाणी अडकलेल्या लोकांना तरुण मंडळींनी स्वतःचा जीव धोक्यात घालून सोडविले. लहान मुले, महिला, म्हातारे, अपंग अशा अनेकांना धाडसी तरुणांची बहुमोल मदत झाली. संकटाच्या गांभीर्याची कल्पना नसल्याने किंवा भीतीने, कित्येक लोक घराबाहेर पडण्यास तयार नव्हते. अशांना घर सोडण्यास भाग पाडावे लागले. आपद्ग्रस्तांना वाचविण्याचे काम तरुणांनी स्वेच्छेने व अंतःस्फूर्तीने शिरावर घेतले आणि हे काम योग्य वेळी पार पाडल्यामुळे अधिक लोक मृत्युमुखी पडले नाहीत. एकूण २९ माणसे मरण पावल्याचे अधिकृत रीत्या सांगण्यात आले. मात्र सामानसुमान व इतर जंगम मालमत्ता वाचविणे शक्य झाले नाही. हजारो नागरिकांचे अपरिमित नुकसान झाले. पुणे शहरावर अवकळा पसरली. धरण रात्री फुटले नाही एवढीच समाधानाची गोष्ट, नाहीतर हजारो नागरिकांना पाण्याच्या तडाख्यातून सुटणे अशक्य झाले असते.

दुसरा दिवस उजाडला मात्र, लोकांचे लोंढेच्या लोंढे आपद्ग्रस्त विभागांकडे येऊ लागले. त्यांमध्ये स्वतःच्या घराची व सामानाची परिस्थिती पाहण्यासाठी व सामान सुरक्षित स्थळी नेण्यासाठी येणारे आपद्ग्रस्त होते आणि नुकसान कितपत झाले आहे हे नजरेखालून घालण्याची उत्सुकता असलेले असंख्य प्रेक्षकही येत होते. आपद्ग्रस्त विभागांत त्यामुळे इतकी गर्दी उसळली, की पोलीसांचा बंदोबस्त अपुरा पडला आणि परिस्थिती गोंधळाची झाली.

अशा गोंधळात कोठूनतरी एकदम 'पुन्हा पाणी येणार' अशी आवइ उठली. आपल्या सामानाचा शोध करण्यात गुंतलेले लोक व आपद्ग्रस्त भागांत हिंडणारे प्रेक्षक यांच्यात कोलाहल माजला. पुराची सर्वांनी इतकी विलक्षण दहशत घेतली होती, की शक्याशक्यतेचा कोणताही विचार न करता नागरिक सुरक्षित भागाकडे जाण्यासाठी धडपडू लागले. सर्वांचा धीर पूर्णपणे खचला होता. अत्यंत अगतिक अशा मन:स्थितीत जीव बचाविण्यासाठी लहानथोर सैरावैरा धावू लागले. या कोलाहलाचा फायदा घेऊन मिळेल त्या सामानावर हात मारण्यास काही समाजकंटकांनी मागे-पुढे पाहिले नाही.

१० जुलैपासून पानशेतला परिस्थिती गंभीर झालेली होती. परंतु परिस्थितीच्या गांभीर्याची मुलकी अधिकाऱ्यांना जाणीव नव्हती असे दिसते. ११ जुलैला संध्याकाळी एक तातडीची सभा विभागीय अधिकाऱ्यांनी बोलाविली. पण फक्त नदीलगतच्या भागांत इशारे देण्यात यावे, सुमारे ६५०० माणसांना हलविण्याची व्यवस्था करावी व त्यासाठी १५ वाहने तयार ठेवावी, एवढीच खबरदारी घेण्याचे त्यांनी ठरविले. सरकारी अभियंत्यांनीही पानशेत धरण फुटल्यास पाणी किती चढेल याविषयी निश्चित आराखडे तयार केले नव्हते. पानशेत धरण फुटले, ही बातमी कळविली गेल्यानंतरही मुलकी अधिकाऱ्यांनी पाऊल उचलले नाही. "लष्कराकडून होडचा मागविण्यात आल्या नव्हत्या, लष्करी मदत मागविण्यात आली नव्हती किंवा घेण्यात आली नव्हती; अग्निशामक पथकाला सावध करण्यात आले नव्हते आणि होमगार्डांनाही सावध करण्यात आले नव्हते."[1] शहरात अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यानंतर शासनाधिकारी गोंधळून गेले व त्यांस कोणताही निर्णय चटकन घेता आला नाही, असे यावरून दिसून येते. संरक्षणात्मक जे काय उपाय योजले गेले ते वैयक्तिकरीत्या योजले गेले. जे सहकार्य वा संघटित कार्य झाले, ते नागरिकांनी उत्स्फूर्तपणे केले.

पानशेत आपत्तीची सांगता अशी : आपद्ग्रस्त भागांतील ७५० घरे पूर्णपणे कोसळली; १६५० घरे राहण्यास अयोग्य बनली, सुमारे १०,००० कुटुंबांचा आसरा गेला आणि २६,००० हून अधिक कुटुंबांचे सामानसुमान वाहून गेले. ३६०० दुकानांतील मालाची नासधूस झाली, यांपैकी काही दुकाने नष्ट झाली. अनेक खाजगी व सार्वजनिक संस्थांचे अतोनात नुकसान झाले. सरकारची व महानगरपालिकेची कार्यालये व इतर कचेऱ्या यांतील दप्तर व कागदपत्रे भिजून गेली. शिवाजीनगर येथील धान्यगुदामांतील सुमारे ४२,००० पोती धान्य कुजून गेले. शहराचा पाणीपुरवठा संपूर्णतया नष्ट झाला. वीज व दूरध्वनी बंद पडले. पूल व रस्ते नादुरुस्त झाल्याने दळणवळण खुंटले.

पानशेत आपत्तीमुळे अत्यंत कठीण अशा समस्या पुणेकरांसमोर उभ्या ठाकल्या. जे पूर्ण निराधार झाले होते, त्यांच्यासाठी निवारा व अन्न-पाणी यांची सोय करणे आवश्यक होते. पाणीपुरवठ्याची सोय तातडीने व्हावयास हवी होती. शहरात जिकडे तिकडे साचलेली घाण, चिखल व माती हलवून, रस्ते व बोळ साफ करून रहदारी पुन्हा चालू करणे आवश्यक होते. नादुरुस्त झालेले प्रमुख पूल त्वरित दुरुस्त करून दळणवळणाचा प्रश्न सोडविणे अगत्याचे होते. वीज व दूरध्वनी या सुविधा पुन्हा कार्यवाहीत आणणे प्राप्त होते. हे सारे तातडीने व्हावयास हवे होते. आपद्ग्रस्त कुटुंबांचे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या पुनर्वसन करणे हे कार्य मात्र अल्पावधीत होणे शक्य नव्हते. नगरविकासाच्या व्यापक दृष्टिकोणातून विचारपूर्वक नियोजन करून ते पार पाडणे जरुरीचे होते.

---

१. पानशेत आणि खडकवासला धरणफुटीच्या चौकशीकरिता नेमलेल्या चौकशी कमिशनचा अहवाल, भाग २, महाराष्ट्र शासन, १९६३, पान ४६८.

शहरातील अनेक गलिच्छ वस्त्या वाहून गेल्या ही इष्टापत्तीच मानली तरी त्यांचा प्रादुर्भाव पुन्हा होऊ न देण्यासाठी उपाययोजना आखणे आवश्यक होते. नदीलगतच्या भागांचे पुरापासून रक्षण करण्याच्या दृष्टीने योग्य तो विकास करण्याची संधीही अनायासे चालून आलेली होती. तिचा फायदा घेणे अगत्याचे होते.

### सर्वेक्षणाची रूपरेषा

ऑगस्ट १९६१ च्या सुरुवातीपासून गोखले अर्थशास्त्र संस्थेने सदर संशोधनकार्यास सुरुवात केली. आपद्ग्रस्त कुटुंबांबद्दल प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी संस्थेतील संशोधकांनी सर्व मदत-केंद्रांस भेट देऊन आपद्ग्रस्त कुटुंबांची नावे, पूर्वीचे पत्ते, कुटुंबांतील माणसांची संख्या, नुकसान वगैरेबाबत माहिती मिळविली. याप्रमाणे ६००० कुटुंबांची नोंद करण्यात आली. याशिवाय भोजन-केंद्रांवर जेवण घेणाऱ्या २००० कुटुंबांचीही नोंद करण्यात आली. आपद्ग्रस्त कुटुंबांनी निरनिराळ्या प्रकारच्या मदतीसाठी जे अर्ज केले होते, त्यांवरील माहितीही उतरवून घेण्यात आली. कुटुंबातील माणसांची संख्या व त्यांची नावे, वये, कुटुंब-प्रमुखाचा व्यवसाय, एकूण उत्पन्न, नुकसानीचा तपशील, मिळालेल्या मदतीचा तपशील, घरांची आपत्त्युत्तर परिस्थिती, आश्रयस्थान इत्यादीसंबंधी माहिती या अर्जांवरून मिळाली. निरनिराळ्या साधनांद्वारे मिळालेली माहिती एकत्रित करून तिचा योग्य मेळ घालून प्रत्येक आपद्ग्रस्त कुटुंबासाठी एक माहितीपत्रक तयार करण्यात आले. आपद्ग्रस्त कुटुंबांची एकूण संख्या किती, वैयक्तिक नुकसान किती झाले, कोणकोणत्या प्रकारचे नुकसान झाले, किती कुटुंबांना मदत मिळाली, कोणकोणत्या स्वरूपात किती मदत वाटण्यात आली आणि आपत्तीनंतर कुटुंबांनी कोठे आश्रय घेतला, हे पाहण्यासाठी वरील माहिती उपयुक्त ठरली.

शहरातील व्यावसायिक, व्यापारी व कारखानदार यांना कोणत्या प्रकारचे व किती नुकसान सोसावे लागले याबाबतही माहिती मिळविण्यात आली. व्यावसायिक, व्यापारी व कारखानदार यांनी कर्जासाठी केलेल्या अर्जांवरील माहिती त्यादृष्टीने उपयुक्त ठरली. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज या संस्थेकडून कारखानदारीच्या नुकसानीबाबत उपयुक्त माहिती मिळाली. आपद्ग्रस्त व्यावसायिक व दुकाने यांची संख्या ठरविण्यासाठी महानगरपालिकेकडील नोंदीचा उपयोग करण्यात आला.

आपद्ग्रस्त घरांची संख्या व हानी यांचा अंदाज बांधण्यासाठी स्वतंत्र पाहणी करणे जरुरीचे वाटले. या पाहणीस डिसेंबर १९६१ मध्ये सुरुवात करण्यात आली व मे १९६२ मध्ये पाहणी पूर्ण झाली. प्रत्येक घराचे कोणत्या प्रकारचे नुकसान झाले, किती खोल्या निकामी झाल्या, किती कुटुंबांना आपत्तीची झळ पोहोचली, घराची दुरुस्ती केली काय इत्यादी माहिती या पाहणीद्वारे मिळविण्यात आली.

केंद्र-सरकार, राज्य-सरकार व महानगरपालिका यांच्या मालकीच्या मालमत्तेस जे नुकसान पोहोचले त्याची माहिती संबंधित खात्यांकडून घेण्यात आली. शाळा, महाविद्यालये, इतर सार्व-जनिक संस्था, देवळे व मशिदी, रुग्णालये यांच्या हानीची माहिती मुख्यमंत्रि-निधीच्या सहकार्याने मिळाली.

राज्य-सरकार, मुख्यमंत्रि-निधी, अनेक सार्वजनिक व खाजगी संस्था आणि राजकीय पक्ष यांच्यातर्फे आपद्ग्रस्तांस मदत वाटण्यात आली होती. या सर्व संस्थांकडून किती मदत देण्यात आली, मदतीचे

वाटप कसे करण्यात आले व किती कुटुंबांना फायदा मिळाला इत्यादी माहिती गोळा करण्यात आली. मदत-केंद्रांच्या संचालनाबाबतही तपशीलवार माहिती मदत-केंद्रांच्या संचालकांकडून मिळविण्यात आली. मदत-केंद्रांवरील लोकांची संख्या, तेथील जेवण्या-खाण्याची व्यवस्था व त्यावरील खर्च, मदत-केंद्र चालविताना चालकांना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागले, इत्यादीसंबंधी माहिती घेण्यात आली. पाणीपुरवठयाच्या निरनिराळ्या योजना, पुनर्वसन व घरबांधणीच्या योजना यांबाबतची माहिती विविध सरकारी विभागांकडून मिळविण्यात आली.

वरील सर्व प्रकारची माहिती संकलित करून प्रस्तुतचे इतिवृत्त तयार करण्यात आले आहे. पानशेत आपत्तीनंतर पुण्यामध्ये जी स्थित्यंतरे घडून आली त्यांचे धावते वर्णन हा या इतिवृत्ताचा एक भाग होय. दुसरा आणि कदाचित जास्त महत्त्वाचा भाग म्हणजे आपद्ग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन ज्या पद्धतीने केले गेले, त्याबाबतची चिकित्सा आणि आपत्तीनंतर निर्माण झालेल्या राहत्या जागेच्या उग्र टंचाईच्या समस्येचे विश्लेषण हा होय.

# पाणीपुरवठ्याची समस्या

## पुणे शहराचा विकास

सतराव्या शतकाच्या प्रारंभीचे पुणे म्हणजे एक गढीवजा वाडा आणि त्याच्या आजूबाजूस पसरलेल्या छोटया वसाहती. मुठा नदीकाठच्या या छोटया गावास कसबे पुणे[1] असे नाव होते. हल्लीची कसबा पेठ हा पुण्याचा सर्वात जुना भाग. हा भाग सोडल्यास इतर तीन वसाहती पुण्याचे भाग म्हणून गणल्या जात होत्या. या वसाहती म्हणजे कसबा पेठेच्या पूर्वेकडील शहापूर,[2] त्याला लागूनच असलेले अष्टापूर,[3] आणि मुठा नदीच्या काठालगतच पण पश्चिमेकडील मुर्तजाबाद.[4] शहापूर व अष्टापूर (अस्पृश्य लोकांची वसाहत) या वसाहती नागझरीपलीकडे वसल्या होत्या. सतराव्या शतकात मलकापूर[5] आणि बुधवार या दोन नवीन वसाहती निर्माण झाल्या. जुन्या शहराच्या विस्तारास येथपासून सुरुवात झाली असे मानता येईल. त्यानंतर नागझरी व अमृतेश्वर[6] ओढा यांच्या दरम्यान बुधवार पेठेच्या दक्षिणेस शुक्रवार पेठ, व नागझरी आणि जुन्या पेठा यांमधील प्रदेशात वेताळ, गणेश व गंज या पेठा वसल्या. या काळात शहराचा विस्तार पूर्वेस नागझरी आणि पश्चिमेस अमृतेश्वराचा ओढा यांमध्ये मर्यादित राहिला होता. अठराव्या शतकाच्या सुरुवातीस सोमवार पेठेच्या दक्षिणेस नागझरीच्या काठाने निहाल पेठ वसली. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात वरील मर्यादांचे उल्लंघन झाले आणि नागझरीच्या पलीकडे भवानी आणि अमृतेश्वर ओढ्यापलीकडे नारायण व सदाशिव या पेठा अस्तित्वात आल्या. त्यानंतर पूर्व बाजूस, जुन्या पेठांच्या दक्षिणेस नाना, रास्ता आणि घोरपडे पेठा पसरल्या. यामुळे शहराची पूर्वसीमा नागझरी न राहता ती माणिक नाल्यास भिडली. पश्चिमेकडे नदीकाठाने वस्ती होऊन पश्चिम सीमा हल्लीच्या संभाजी पुलापर्यंत येऊन थडकली.

---

१. म्हणजे 'पुणे गाव'. हल्लीची कसबा पेठ म्हणजे मूळचे 'कसबे पुणे' असे ढोबळपणे म्हणता येईल.

२. हल्लीची सोमवार पेठ.

३. हल्लीच्या मंगळवार पेठेचा भाग.

४. हल्लीच्या शनिवार पेठेचा पूर्वेकडील भाग.

५. हल्लीची रविवार पेठ.

६. सध्याच्या सदाशिव व शुक्रवार या पेठांच्या सीमेवरून पूर्वी एक ओढा जात असून तो अमृतेश्वराच्या देवळाजवळ नदीस मिळत असे. पेशवाईच्या काळात हा ओढा वळवून आंबील ओढ्यास जोडण्यात आला.

१८१८ नंतर पेशवाईचा अस्त झाल्यामुळे पुणे शहराचे महत्त्व एकदम कमी झाले. त्यानंतर ब्रिटिशांनी आपले सैन्य ज्या भागात ठेवले होते, त्या लष्कर भागाची तेवढी पुणे शहरात भर पडली.

१८५६–५७ मध्ये पुणे नगरपालिकेची स्थापना झाली. नगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रात वर उल्लेखिलेल्या १७ पेठा येत होत्या आणि यांशिवाय नदीच्या उत्तर तीरावरील भांबुर्डा व भवानी पेठेच्या दक्षिणेचा गुलटेकडी हे भाग समाविष्ट केले होते. १९२१ पर्यंत नगरपालिकेच्या अखत्यारीत एवढाच प्रदेश होता.

पहिल्या महायुद्धानंतर शहराची वाढ वायव्य दिशेस झपाट्याने सुरू झाली. शिवाजी पूल बांधल्यामुळे मुख्य गावाशी भांबुर्डा विभाग जोडला गेला. १९३० नंतर पहिली नगर-रचना योजना कार्यवाहीत आली. या योजनेत भांबुर्डा आणि एरंडवणे हे भाग समाविष्ट होते. यामुळे मुठा नदीच्या पश्चिमेस शहराची वाढ झाली. त्याचप्रमाणे सदाशिव, शुक्रवार, भवानी आणि गुलटेकडी या भागांतही वस्ती वाढली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात संरक्षणसामग्रीचे कारखाने पुण्याच्या आसपास उभारले गेले आणि त्यामुळे पुण्याच्या वाढीस विशेष चालना मिळाली. १९४१–५१ या काळात शहराची लोकसंख्या ७० टक्के वाढली. आतापर्यंत विरळ लोकवस्ती असलेल्या भागातील वस्ती वाढली आणि शहराच्या सीमा विस्तारल्या. पुणे महानगरपालिकेची १९५० साली स्थापना झाली त्या वेळी महानगर पालिकेच्या हद्दीत पुण्याच्या आसपासची १७ खेडी पूर्णतः किंवा अंशतः समाविष्ट केल्याने शहराच्या क्षेत्रफळात बरीच वाढ झाली.

## पुण्याचा पाणीपुरवठा

इ. स. १७०० पूर्वी पुणे हे एक छोटेखानी गाव असल्याने मुठा नदी, नागझरीसारखे गावाजवळील ओढे आणि थोरा-मोठ्यांच्या घरांतील विहिरी, यांपासून होणारा पाणीपुरवठा गावच्या लोकवस्तीस पुरेसा होता. १७२० नंतर पुणे हे मराठी साम्राज्याचे केंद्रस्थान झाले आणि पुण्याच्या उत्कर्षास खरीखुरी सुरुवात झाली. राजधानीच्या वाढत्या गरजा पुरविण्यासाठी तिसरे पेशवे नानासाहेब यांनी १७५० च्या सुमारास शहराच्या दक्षिणेकडील कात्रज डोंगराच्या दरीत एकाखाली एक असे दोन दगडी बंधारे बांधून तलाव निर्माण केला. जमिनीखालील जिवंत झरे आणि पावसाळ्यात साठणारे पाणी यांपासून तलावास पाणीपुरवठा होत असे. शहराकडे पाणी नेण्यासाठी २॥ फूट रुंद आणि ६ फूट उंच असा भूमिगत जलसंक्रम बांधण्यात आला. जलसंक्रमात दर तीनशे फुटांवर जमिनीखाली ४ ते १० फूट खोल असे ७० उच्छ्वास खणण्यात आले. या उच्छ्वासांमुळे हवेचा मार्ग खुला राही आणि पाण्यातून वाहून येणारी घाण उच्छ्वासांच्या तळाशी साचून स्वच्छ पाणी जलसंक्रमातून पुढे जाई. दर चौथ्या किंवा पाचव्या उच्छ्वासाचा जलसंक्रमाशी असलेला सांधा दगडाने बंद करून पाणी ३ ते ६ इंच व्यासाच्या भोकातून जलसंक्रमात सोडले जाई. जलसंक्रमातून येणारे हे पाणी शहराच्या निरनिराळ्या भागांत बांधलेल्या हौदात सोडले जाई. बुधवार, रविवार, शुक्रवार या पेठांतून अजूनही हे हौद दिसतात. कात्रज तलावातून दररोज ६,५०,००० गॅलन[७] पाणीपुरवठा होत असे.

---

७. *Gazetteer of the Bombay Presidency*, Vol. XVIII, Part III, Poona, 1885, pp. 327-28.

कात्रज जलसंक्रमाच्या धर्तीवर इतर तीन जलसंक्रम पुण्यातील प्रमुख सरदारांनी १७९० च्या सुमारास बांधले. यांपैकी नाना फडणीसांनी बांधलेला जलसंक्रम पुण्याच्या दक्षिणेस ६ मैलांवर असलेल्या नऱ्हेआंबेगाव या गावातील जिवंत झऱ्यापासून काढलेला होता. या जलसंक्रमातून आणलेले पाणी सदाशिव पेठेतील आणि विश्रामबाग वाड्यातील हौदांत येत असे व त्यापासून दररोज एक लाख गॅलन पाणीपुरवठा होई. सरदार रास्ते आणि सरदार चौधरी यांनी बांधलेल्या जलसंक्रमात पुण्याच्या दक्षिणेकडील कोंढवे गावातील झऱ्याचे पाणी घेतलेले होते व ते रास्ता पेठेतील रास्त्यांच्या वाड्यात आणि गंज-वेताळ पेठेतील चौधरींच्या वाड्यात आणले होते. या दोन्ही जलसंक्रमामधून प्रत्येकी ५०,००० गॅलन पाणी शहरास मिळत असे. याव्यतिरिक्त नदीचे आणि ओढ्याचे पाणीही जरुरीनुसार वापरले जाई.

पर्वती देवस्थानच्या वाढत्या महत्त्वामुळे तिकडे लोकांची जा-ये विशेष चालू झाली. तेव्हा त्या भागास पाणी पुरविण्यासाठी दुसरे बाजीराव यांनी १८१० मध्ये एक योजना आखली. ही योजना प्रत्यक्षात मात्र उतरली नाही. १८१८ साली पेशवाईचा अस्त झाल्यानंतर पुण्याच्या विकासास खीळ बसली.

इंग्रजी राज्याच्या प्रस्थापनेनंतर मुंबई इलाख्याची पावसाळी राजधानी म्हणून पुण्याचे महत्त्व वाढू लागले. तसेच १८६० नंतर पुणे-मुंबई लोहमार्ग सुरू झाल्यामुळे पुण्याच्या भरभराटीस पुन्हा सुरुवात झाली. पुण्याच्या वाढीबरोबर पूर्वापार चालत आलेल्या पाणीपुरवठ्याच्या सोयी अपुऱ्या पडू लागल्या. पुणे व खडकी यांस पाणीपुरवठा करण्याची योजना सुचविण्यासाठी आणि आसमंतातील शेतीस पाणी देण्याच्या व्यवस्थेसंबंधीही शिफारशी करण्यासाठी सरकारने ले. क. फाईफ यांची नेमणूक केली. खडकवासला गावाजवळ मुठा नदीस धरण बांधून पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी अशी योजना त्यांनी सुचविली. खडकवासला धरण योजनेचे काम १८६९ मध्ये हाती घेण्यात आले. या योजनेनुसार मुठा नदीवर ४८२७ फूट लांब व १०७ फूट उंच असा दगडी बंधारा बांधण्याचे काम सुरू झाले आणि हे काम १८७९ मध्ये पूर्ण झाले.[८] खडकवासला तलावातील (साठा ३००० दशलक्ष घनफूट) पाणी उजव्या तीराचा व डाव्या तीराचा अशा दोन कालव्यांतून शहराकडे नेण्यात आले. शेती आणि घरगुती पाणीपुरवठा या दोन्ही गरजांसाठी उजव्या तीराच्या कालव्यातून पाणी पुरविण्यात येऊ लागले. या कालव्याची लांबी ७० मैल होती. परंतु बारमाही सिंचनासाठी २४ मैलांपर्यंतच यातील पाण्याचा उपयोग केला जाई. डाव्या तीराचा कालवा फक्त १८ मैल लांब असून त्यातील पाण्याचा उपयोग मुख्यत: सिंचनासाठी केला जाई.

### पाण्याचे वाटप

१८८४ साली पुण्यात ११५० घरांमध्ये म्हणजे एकूण १५ टक्के घरांतून नळाचे पाणी घेण्यात आले होते.[९] खडकवासला तलावातून दररोज ६,५०,००० गॅलन पाणी घेतले जात असे व ते नळांतून शहरास पुरविले जाई. त्याशिवाय पेशवाईकालीन कात्रज तलावातून येणारे पाणी वापरले जात होतेच. या दोन्ही मार्गांनी मिळणारे पाणी जमेत धरल्यास दर माणशी दररोज १५ गॅलन पाणी उपलब्ध होत

---

८. *Gazetteer of Bombay State*, ( Revised Edition ), District Series, Vol. XX, Poona District, 1954, p. 639.

९. *Gazetteer of Bombay Presidency, op. cit.*, p. 326.

होते. याशिवाय शहरात खाजगी व सार्वजनिक मिळून १२९० विहिरी होत्या.[१०] ओढे, कालवे, विहिरी आणि धरणापासून मिळणारे पाणी यांमुळे शहरातील जनतेच्या सर्व प्रकारच्या पाण्याच्या गरजा भागविल्या जात होत्या.

नळाचे पाणी उपलब्ध असलेल्या घरांच्या संख्येत उत्तरोत्तर वाढ होत गेली. १८९६-९७ पर्यंत एकूण २१०४ घरांतून नळ बसविले होते. १९११–१२ पर्यंत एकूण २७२३ घरांतून नळाचे पाणी आलेले होते. म्हणजे शहरातील ३० टक्के घरांतून नळाचे पाणी वापरले जात होते. १९१७-१८ पर्यंत ही संख्या आणखी वाढून ३२५० च्या घरात गेली. याप्रमाणे १८८० ते १९१८ या कालावधीत नळाचे पाणी उपलब्ध असलेल्या घरांच्या संख्येत दरवर्षी सरासरी ७० या प्रमाणे वाढ होत गेली.

१९२३-२४ च्या सुमारास शहरात भूमिगत मलोत्सारण पद्धतीची सोय करण्याची योजना नगरपालिकेने हाती घेतली. त्यामुळे पाण्याची गरज बरीच वाढणे अपरिहार्य होते. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या दशकांत नळाचे पाणी वापरणाऱ्यांच्या संख्येतही झपाट्याने वाढ झाली. शहरातील जुन्या भागात आतापर्यंत ज्यांनी नळ बसविलेले नव्हते अशांनी ते घेतले, आणि नवीन वस्ती झालेल्या भागातही अनेक घरांत नळ बसविले गेले. नळ बसविलेल्या घरांची संख्या १९२० साली ४०७१ होती, ती १९२५ साली ५३३९ झाली, १९३० साली तीत आणखी भर पडून एकूण ६७५५ घरांत नळ आले, १९३६ साली ही संख्या ८७६५ वर गेली. याप्रमाणे १९१९ ते १९३७ या कालखंडात दरवर्षी सरासरी ३०० घरांत नवीन नळ बसविले गेले. आधीच्या कालखंडापेक्षा हे प्रमाण कितीतरी जास्त आहे हे दिसून येईल. १९३७ साली गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे पुणे शहराची जी पाहणी[११] करण्यात आली, त्या पाहणीमध्ये शहरातील एकूण घरांपैकी ७० टक्के घरात नळाचे पाणी उपलब्ध होते असे आढळले. २५ वर्षांच्या कालावधीत नळाच्या पाण्याची सोय असलेल्या घरांचे प्रमाण ३० वरून ७० टक्क्यावर गेले. १९४० नंतरही नळाच्या पाण्याच्या वापरात झपाट्याने वाढ होत राहिली. १९५४ मध्ये पूर्वीच्या पुणे नगरपालिकेच्या हद्दीतील घरांपैकी ९१ टक्के घरांमध्ये नळाचे पाणी घेतलेले होते असे आढळून आले.[१२]

नळाचे पाणी वापरणाऱ्यांच्या संख्येत उत्तरोत्तर वाढ होत गेल्यामुळे धरणातून घेतल्या जाणाऱ्या पाण्याचे प्रमाणही वाढत गेले. १९१५-१६ मध्ये धरणातून दररोज २० लक्ष गॅलन पाणी घेतले जात असे. १९२०-२१ मध्ये २४ लक्ष गॅलन पाणी घेतले जात असे. भूमिगत मलोत्सारणाची सोय झाल्यावर तर पाण्याच्या वापरात फार मोठी वाढ झाली. १९२४-२५ मध्ये ५० लक्ष गॅलन पाणी वापरले जाऊ लागले. १९२८-२९ मध्ये हे प्रमाण ६० लक्ष गॅलनवर गेले. १९२२ पर्यंत दररोज दरमाणशी २३ गॅलन पाणी वापरले जात असे. १९२८-२९ मध्ये हे प्रमाण ३८ गॅलन झाले. शहराच्या विकासाबरोबर पाण्याच्या वापरातही वाढ होत गेली. १९३८-३९ मध्ये ९० लक्ष गॅलन पाणी घेतले जाऊ लागले आणि दररोज दरमाणशी ४० गॅलन पाणी वापरले जात होते.

---

१०. तत्रैव, पान ३२९.

११. Gadgil, D. R.; *Poona : A Socio-Economic Survey*, Part II, Gokhale Institute of Politics and Economics, Poona, 1952, p. 138.

१२. Sovani N. V. *et al*; *Poona : A Re-Survey*, Gokhale Institute of Politics and Economics, Poona, 1956, p. 368.

१९४२ नंतर मात्र परिस्थिती बदलत गेली. पुण्याच्या लोकसंख्येची झपाट्याने वाढ झाल्यामुळे दरमाणशी पाण्याची उपलब्धता कमीकमी होत गेली. १९४३-४४ साली दररोज दरमाणशी ३६ गॅलन, १९४४-४५ मध्ये ३३ गॅलन आणि १९४६ मध्ये दररोज ३० गॅलनपेक्षा कमी पाणी मिळू लागले. पाण्याची उपलब्धता १९४६ नंतर ३० गॅलनहून कमीच राहिली तरी धरणातून घेतल्या जाणाऱ्या पाण्याच्या प्रमाणात मात्र वाढ होत राहिली. १९५०-५४ मध्ये १२० लक्ष गॅलन आणि १९५४ नंतर तर १५० ते १६० लक्ष गॅलन पाणी दररोज धरणातून घेतले जात होते.

१९४६ पासून खडकवासला धरणातून पुरविले जाणारे पाणी पुण्यास अपुरे पडू लागले असे म्हणण्यास हरकत नाही. एप्रिल-मे या महिन्यांत टंचाई विशेष जाणवे, कारण पाण्याची गरज वाढलेली असे आणि धरणातला साठा मात्र कमी झालेला असे. पाणीपुरवठ्यात वाढ करणे नगरपालिकेच्या आवाक्याबाहेरचे होते. तेव्हा उंचीवरील प्रदेशात पाणी मिळावे म्हणून उंच पातळीवर पाण्याच्या टाक्या बांधणे, पाणी वाहून नेण्यासाठी अधिक रुंद व्यासाचे नळ टाकणे अशांसारखे तात्कालिक स्वरूपाचे उपाय नगरपालिकेतर्फे योजण्यात आले. पाणीपुरवठ्यात वाढ करण्यासाठी नवीन योजना हाती घेण्याची नगरपालिकेने सरकारला अनेक वेळा विनंती केली. तसेच उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करता यावा म्हणूनही काही उपाय सुचविण्यात आले. उदा. झिरपणीमुळे होणारी घट थांबविण्यासाठी पाणी लोखंडी नळांतून शहरापर्यंत आणणे, उंच पातळीवर टाकी बांधून पाण्याचा दाब वाढविणे वगैरे.

पुणे शहरातील लोकसंख्या भरमसाट वाढल्यामुळे धरणातील पाणी मुख्यतः पुण्यातील नागरिकांच्या गरजा भागविण्यासाठी दिले जात होते. त्यामुळे सिंचनासाठी दिल्या जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण क्रमशः कमी होत गेले. शिवाय खडकवासला येथे राष्ट्रीय प्रतिरक्षा विद्यालय स्थापन झाल्यामुळे धरणातील पाणी तेथेही वापरले जात होते. त्यामुळे शहराची गरज भागूनही सिंचनास भरपूर पाणी मिळेल अशी योजना कार्यवाहीत आणणे आवश्यक झाले.

### खडकवासला–पानशेत प्रकल्प

पुणे शहर व आसपासचा प्रदेश यांस पिण्यासाठी व सिंचनासाठी लागणाऱ्या पाणीपुरवठ्यात वाढ करण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या योजनांचा १९०७ पासून सरकारीरीत्या अनेक वेळा विचार झाला. पाणीपुरवठ्यात वाढ करण्याच्या दृष्टीने सरकारपुढे तीन पर्याय होते, ते असे :—

(१) खडकवासला धरणाच्या अनुस्रोत बाजूला एक नवीन धरण बांधून १५,००० दशलक्ष घनफूट जलसंचय निर्माण करणे.

(२) खडकवासला धरणाची उंची वाढवून अधिक पाणी साठविण्याची सोय करणे.

(३) पानशेत व वरसगाव येथे दोन नवीन चिरेबंदी धरणे बांधणे.

यांपैकी दुसरा पर्याय अधिक योग्य आहे असा निर्णय १९५५ साली घेण्यात आला होता. परंतु जल तथा शक्ती आयोगाच्या तज्ज्ञांनी पानशेत व वरसगाव येथे मातीची धरणे बांधावीत अशी नवीनच योजना पुढे मांडली. चिरेबंदी धरणापेक्षा मातीच्या धरणांस खर्च कमी येतो म्हणून मातीची धरणे बांधणेच योग्य असे त्यांचे मत पडले. ऑगस्ट १९५८ मध्ये डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनतर्फे सरकारला एक निवेदन सादर करण्यात आले. चिरेबंदी धरणे बांधणेच अधिक सयुक्तिक होय असे

त्यात प्रतिपादन करण्यात आले. या मताच्या पुष्टयर्थ तीन कारणे देण्यात आली. चिरेबंदी धरण बांधण्यास लागणारा कच्चा माल जागेवरच उपलब्ध होण्याची शक्यता, अवजड यंत्रसामग्रीची अनावश्यकता, आणि सतत व मोठ्या प्रमाणावर लोकांस रोजगार मिळण्याची शक्यता.

जल तथा शक्ती आयोगाने सुचविलेली योजना सरकारने स्वीकारली व पुण्यापासून पश्चिमेस सुमारे २४ मैलांवर पानशेत व वरसगाव येथे मातीची धरणे बांधावीत असा निर्णय घेतला. सरकारने ही योजना मुक्रर करण्याची कारणे म्हणजे एक तर मातीच्या धरणास खर्च कमी येणार होता व दुसरे म्हणजे ही धरणे लवकर बांधून होण्याची शक्यता होती. खडकवासला येथे १५,००० दशलक्ष घनफूट जलसंचय करण्यासाठी नवीन धरण बांधण्यापेक्षा ही दोन धरणे बांधली, तर सुमारे एक कोटी रुपयांची बचत होईल असा अंदाज करण्यात आला. अशा रीतीने पानशेत येथे मातीचे धरण बांधावे ही योजना मुक्रर केली गेली.

पानशेत-वरसगाव प्रकल्पात खालील गोष्टी अंतर्भूत करण्यात आल्या :—

(१) पानशेत येथे ७५४३ दशलक्ष घनफूट साठवणीचे मातीचे धरण.

(२) वरसगाव येथे ७५५५ दशलक्ष घनफूट साठवणीचे मातीचे धरण.

(३) खडकवासला धरणास मजबुती आणणे.

(४) उजव्या तीराच्या कालव्याची लांबी १०० मैलांपर्यंत वाढविणे व ६९ व्या मैलापर्यंत त्याची पुनर्रचना करणे.[१३]

वरील संपूर्ण योजनेस खडकवासला प्रकल्प असे नाव देण्यात येऊन, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत त्यासाठी ४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. यांपैकी पानशेत धरणास २ कोटी ७५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज होता. मुठा खोऱ्यातील जलसंपत्तीचा यथायोग्य वापर व्हावयाचा असेल, तर पानशेत व वरसगाव येथील जलसंचयात वाढ करावयास हवी असे मत केंद्रीय जल तथा शक्ती अन्वेषण केंद्राने मांडले. त्याचप्रमाणे डेक्कन अॅग्रिकल्चरल असोसिएशनने उजव्या तीराचा कालवा इंदापूर या दुष्काळी तालुक्यापर्यंत वाढवावा असे सुचविले. वरील सूचना विचारात घेऊन सरकारने पानशेत येथील जलसंचय ११,००० दशलक्ष घनफुटांपर्यंत व वरसगाव येथील संचय १३,००० दशलक्ष घनफुटांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला. खडकवासला प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये पूर्ण करावा असे ठरविण्यात आले. यांपैकी पहिला टप्पा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस पूर्ण व्हावयाचा होता व त्यात पुढील बांधकाम पार पडावयाचे होते :—

(१) पानशेत येथे ११,००० दशलक्ष घनफूट साठवणीचे मातीचे धरण बांधणे.

(२) खडकवासला धरणास मजबुती आणणे.

(३) बृहत पुण्याच्या सीमेपर्यंत उजव्या तीराच्या कालव्यास अस्तर टाकणे.

(४) ७९ व्या मैलापर्यंत कालव्याचे बांधकाम पूर्ण करणे[१४].

---

१३. पानशेत आणि खडकवासला धरणफुटीच्या चौकशीकरिता नेमलेल्या चौकशी कमिशनचा अहवाल, भाग १, महाराष्ट्र शासन, १९६३, पान १९.

१४. तत्रैव, पान २०.

## पानशेत धरणाचे बांधकाम

पानशेत धरणाचे बांधकाम पाच वर्षांत म्हणजे जून १९६२ पर्यंत पूर्ण करण्याची योजना तयार करण्यात आली. मातीच्या बंधाऱ्याचे काम हा धरणाच्या बांधकामातील प्रमुख भाग होता. धरणाची भिंत विवक्षित उंचीपर्यंत पोचल्यावर आनुषंगिक बांधकामे हाती घेण्यात यावयाची होती. एकूण ९४ दशलक्ष घनफूट मातीचे बांधकाम करावयाचे होते. पहिल्या वर्षी म्हणजे १९५७-५८ साली धरणाचे ६.९४ दशलक्ष घनफूट काम पूर्ण झाले आणि तात्पुरत्या ओसांड बंधाऱ्याचे काम सुरू करण्यात आले. मातीच्या बांधकामासाठी साधीच यंत्रे वापरात असल्यामुळे हे काम मंदगतीने चालू होते. बरीचशी माती एकदम हलविण्याचे काम सुलभतेने व झटपट करण्याच्या दृष्टीने खास यंत्रसामग्री मिळविण्याचे प्रयत्न १९५८ मध्ये करण्यात आले. गंगापूर आणि काक्रापारा येथे पूर्वी वापरलेली यंत्रे पानशेत येथे आणण्यात आली. परंतु ही यंत्रे जुनी असल्यामुळे त्यांची सतत दुरुस्ती करावी लागे आणि त्यापायी खर्चही बराच येई. त्यामुळे या यंत्रसामग्रीचा विशेष उपयोग होऊ शकला नाही. १९५८-५९ साली एकूण २२.८४ दशलक्ष घनफूट इतके मातीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.

केंद्रीय जल तथा शक्ती आयोगाच्या तज्ज्ञ अभियंत्यांनी फेब्रुवारी १९५९ मध्ये पानशेतला भेट दिली आणि संकल्पित कालावधीपेक्षा कमी वेळात काम पूर्ण करण्याची शक्यता ध्वनित केली. एक वर्ष आधी काम पूर्ण करणे शक्य आहे का, या गोष्टीचा सरकारतर्फे विचार करण्यात आला. तीन हंगामांऐवजी दोन हंगामांत काम पूर्ण व्हावयाचे म्हणजे कालवा बांधून तयार ठेवणे, बंधाऱ्याचे काम त्वरित करण्यासाठी माती हलविण्याची यंत्रे मिळविणे आणि मनोरा व संनाल इत्यादी आनुषंगिक कामे तातडीने हाती घेणे आवश्यक होते. मनोरा, संनाल यांची संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत तयार करण्यात येत होती. ती मे १९५९ पर्यंत तयार झालेली नव्हती. आनुषंगिक बांधकामे ऑगस्ट-सप्टेंबर १९५९ पर्यंत ठेकेदाराकडे देण्यात आली आणि यंत्र-सामग्री ऑक्टोबर १९६० पर्यंत उपलब्ध झाली तरच धरणाचे बांधकाम दोन हंगामांत पूर्ण होणे शक्य आहे असे मत प्रकट करण्यात आले. धरणाच्या बांधकामासाठी जादा यंत्रसामग्री किती लागेल याचा अंदाज घेण्यात येऊन ऑक्टोबर १९५९ मध्ये कोणती यंत्रे आयात करावी लागतील याची यादी तयार केली गेली आणि त्यासाठी परदेशी हुंडणावळ (रु. ६९ लाख) मिळावी म्हणून केंद्र सरकारकडे अर्ज करण्यात आला. परदेशी हुंडणावळीस मंजुरी मिळाली ती मुळात फेब्रुवारी १९६० मध्ये. त्यानंतर परदेशातील भारतीय पुरवठा प्रतिनिधिमंडळामार्फत यंत्रसामग्री विकत घेण्यासाठी हालचाल केली गेली.

१९५९-६० च्या हंगामात फक्त २०.२२ दशलक्ष घनफूट मातीचे बांधकाम पूर्ण झाले. याचा अर्थ असा, की ४४ दशलक्ष घनफूट मातीचे बांधकाम शिल्लक राहिले होते. शिवाय मनोरा, संनाल यांचे काम व्हावयाचे होते. केवळ एका हंगामात एवढे सर्व काम पूर्ण करणे आवश्यक होते.

ऑक्टोबर १९६० ऐवजी जानेवारी १९६१ मध्ये नवीन यंत्रसामग्री कामावर लावणे शक्य झाले. म्हणजे जे बांधकाम पूर्ण करण्यास आठ महिन्यांचा तरी अवधी हवा होता, ते केवळ पाच महिन्यांत पूर्ण करणे आवश्यक झाले. आनुषंगिक बांधकामे वास्तविक १९५९ मध्ये मंजूर होणे जरुरीचे होते, परंतु ती १९६० साली मंजूर करण्यात आली. या दिरंगाईमुळे एप्रिल १९६१ पर्यंत ८० दशलक्ष घनफूट

इतकेच एकूण बांधकाम पूर्ण झाले आणि १४ दशलक्ष घनफूट शिल्लक उरले. आनुषंगिक कामांची प्रगती असमाधानकारक आढळून आल्यामुळे त्यांपैकी काही कामे ठेकेदाराकडून काढून घेण्यात येऊन खात्यातर्फे करण्यात आली. संनालाचे काम २८ मार्च रोजी पूर्ण व्हावयास पाहिजे होते, ते २४ एप्रिलपर्यंत साधारणपणे पूर्ण झाले. मनोऱ्याचे बांधकामही रेंगाळत होते पण त्यासाठी एका नवीन तंत्राचा उपयोग करण्यात येऊन कामाचा वेग वाढविण्यात आला. मात्र मनोऱ्यावर जाण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या पुलाचे बांधकाम पूर्ण झाले नाही. त्यामुळे पाणी भरल्यानंतर मनोऱ्यात जाऊन अपुरी राहिलेली कामे उरकणे अशक्य झाले. पाणी सोडण्याची दारे बसविण्याचे काम होऊ शकले नाही व तळाशी दोन फूट अंतर ठेवून दारे नुसती लोंबकळत ठेवण्यात आली. आपात-द्वारे बसविण्याचे कामही पुरे झाले नाही. याशिवाय संनालाचा तळ काँक्रिटचा करण्याचे दुसरे अत्यंत महत्त्वाचे काम करावयाचे राहिले. काही भागात धरणाची उंची आवश्यक तेवढी पुरी झाली नाही. धरणाच्या उतरणीवरील निकुट्टनाचे काम अर्धवट राहिले.[१५] अशी अनेक लहान-मोठी कामे अपुरी राहिली. जादा यंत्रे व जादा माणसे कामावर लावून, जे काम दोन हंगामांत पुरे व्हावयाचे ते एका हंगामात पूर्ण करण्याचा आग्रह धरला खरा, पण त्यामुळे शेवटच्या हंगामात झालेल्या बांधकामास पुरेसे स्थैर्य प्राप्त होण्यास अवधी मिळाला नाही, आणि आनुषंगिक बांधकामही अतिशय गडबडीने केल्याने अपुरे राहिले. तसेच या कामाच्या संकल्पचित्रात वेळोवेळी बदल करण्यात आल्यामुळे गोंधळात भरच पडली.

कालव्याचे नूतनीकरण धरणाच्या कामाबरोबरच पूर्ण होणार होते. पण ते काम रेंगाळले. खडकवासला धरण अधिक बळकट बनविण्यासाठी कोणती तांत्रिक पद्धत वापरावी याबाबत तज्ज्ञ मंडळीत मतभेद होते. एप्रिल १९६१ पर्यंत याबाबत निश्चित निर्णय घेतला गेला नव्हता आणि मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमध्ये त्यावर अजूनही विचार चालला होता. साध्य एवढेच झाले होते, की दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी पानशेत धरण बांधण्याचे ध्येय कसे तरी गाठले गेले.

एप्रिल १९६१ मध्ये संनालाच्या बाजूकडील धरणाच्या भागात निकुट्टनाचे काम सुरु झाले व पाणी अडवून तलाव भरण्याचा निर्णय घेण्यात आला. १५ मे पर्यंत निकुट्टनाचे काम पूर्ण होत आले व यानंतर तलाव भरण्याचा निर्णय फिरविणे कठीण होते. काही महत्त्वाची कामे अपुरी असताना वरील निर्णय घेणे योग्य होते काय, यासंबंधीचे डॉ. के. एल. राव यांचे मत विचारात घेण्याजोगे आहे. "करावयाचे काम धरणाच्या सुरक्षिततेसाठी इतके महत्त्वाचे व आवश्यक आहे, की काम चालू ठेवणे निश्चितपणे उचित होणार नाही. विचारपूर्वक धोका पत्करावा अशा तऱ्हेचे हे काम नाही. मे अखेर सर्व काम पुरे करणे शक्य नव्हते तर बांधकामाचा कार्यक्रम बदलणे निश्चितपणे आवश्यक होते."[१६]

जून महिना उजाडला तरीही पाणी सोडावयाची दारे बसविली गेली नव्हती. २० जूनपर्यंत हे काम पूर्ण होईल अशी अधिकाऱ्यांची अपेक्षा होती. योग्य वेळी दारे वर उचलण्याची तरतूद करण्याचे काम संपेल या आशेने ६ जून रोजी दारे खाली सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. दारे पूर्णपणे खाली न सोडता तळापासून दोन फूट अंतर ठेवून ती लोंबकळत ठेवण्यात आली. १४ जूनला दारे वर उचलण्याची तरतूद होऊ शकत नाही हे उघड झाले. दारे लोंबकळत ठेवणे कितपत योग्य आहे याबाबत १४ जून रोजी अधिकाऱ्यांत चर्चा झाली, व तो निर्णय कायम केला गेला. धरणात फार वेगाने पाणी

१५. तत्रैव, पान १३३.

१६. तत्रैव, पान ११५.

भरू नये व पावसाळ्यानंतर राहिलेली कामे पुरी करण्यासाठी ते मोकळे करता यावे या दृष्टीने दारे पूर्ण बंद केली नाहीत.

जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पावसास सुरुवात झाली. २० जूनपासून १२ जुलैपर्यंत पानशेत भागात सतत जोरदार पर्जन्यवृष्टी होत राहिली आणि या तीन आठवड्यात पानशेत धरणाच्या जलग्रह क्षेत्रात एकण ७० इंच पाऊस पडला. तलावातील पाण्याची पातळी सतत वाढतच गेली. त्या शिवाय तुफान वाऱ्यामुळे उसळणाऱ्या लाटांचे प्रचंड आघात धरणाच्या भिंतीवर होऊ लागले.

लाटांच्या माऱ्यापासून धरणास अपाय होऊ नये म्हणून खबरदारी घेणे आवश्यक झाले. लाटांचा तडाखा ज्या भागांत विशेष होता त्या भागांत पत्रे व मुरुमाने भरलेली पोती बसविण्याचे काम १० जुलै रोजी प्रथम हाती घेण्यात आले. धरणाच्या अनुस्त्रोत बाजूस संनालाच्या वरच्या भागातून पाणी बाहेर येत आहे ही गोष्ट १० जुलै रोजी संध्याकाळी ७ च्या सुमारास प्रथम नजरेस आली. १० जुलै रोजी रात्री संनालाच्या वरचा सुमारे ३० फुटांचा भाग बराच खचला. त्यामुळे धरणाची भित पाण्याच्या पातळीपासून एक-दोन फूटच वर राहिली. खचलेल्या भागावर वाळूची पोती टाकण्याचे काम ११ जुलैला पहाटे ५-३० वाजल्यापासून सुरू करण्यात आले. त्यानंतर सकाळी संनालाच्या वरच्या भागात अनुस्त्रोत बाजूला आडव्या चिरा पडल्याचे आढळून आले. दुपारपर्यंत धरणाचे बांधकाम जेथे पक्के झाले होते, अशा भागातही भेगा पडल्या. संध्याकाळी धरणाच्या वरच्या बाजूसही असे तडे गेल्याचे आढळून आले.

खचलेल्या भागावर मुरूम व वाळूची पोती टाकण्याचे काम चालूच होते. आजूबाजूच्या भागातील लोक या कामावर लावण्यात आले होते. ११ जुलै रोजी दुपारी धरणाच्या कामावरील अधिकाऱ्यांची बैठक भरून धरण वाचविण्यासाठी इतर कोणते उपाय योजावे व धरण फुटलेच तर काय घडेल यावर चर्चा झाली. लष्कराची मदत घ्यावी काय यावर चर्चा झाली. लष्कराला मदतीस पाचारण करण्यात आले. लष्कराचे जवान ११ जुलैला सायंकाळी ७ पर्यंत येऊन दाखल झाले, आणि पोती टाकण्याचे काम लगेच त्यांच्याकडे देण्यात आले. संपूर्ण रात्रभर जवान या कामावर खपत होते. पण परिस्थिती हळूहळू चिघळतच गेली. १२ जुलैला पहाटे सहाच्या सुमारास परिस्थिती आटोक्याबाहेर गेल्याचे निदर्शनास आले व लष्कराने काम थांबविले. धरण वाचविणे आता शक्य नव्हते. त्यानंतर लवकरच म्हणजे सुमारे ६॥ वाजता पाण्याने धरणाच्या भिंतीवरून उसळी मारली. पाण्याच्या प्रचंड रेट्याखाली धरणाचा मनोऱ्याकडील भाग भराभर ढासळत गेला. पाण्याच्या लोंढ्याने पाडलेल्या भगदाडाची रुंदी सतत वाढत गेली व सुमारे १२०० फूट लांबीची भित पूर्णपणे वाहून गेली. संनालाची कमान निखळून पडली, अनुस्त्रोत भागाकडील काही इमारती कोसळल्या. कामावर लावलेली प्रचंड यंत्रे कोलमडली आणि लोंढ्याबरोबर रेटली गेली. खडकवासला तलावाकडे या लोंढ्याने धाव घेतली.

सकाळी ८ वाजून गेल्यानंतर खडकवासला तलावातील पाण्याची पातळी वेगाने वाढत गेली. सव्वादहाच्या सुमारास धरणाच्या भिंतीवरून पाणी वाहू लागले. पाण्याचा दाब सतत वाढत गेला. दुपारी सव्वाच्या सुमारास पाणी सोडण्याची दारे ज्या भागात बसविली होती, तो भाग मुख्य धरणापासून विलग झाला व तुटून पडला. त्यानंतर दुपारी सव्वादोनच्या सुमारास धरणाच्या मध्यभागास खिंडार पडले. त्या भिंतीचा एक प्रचंड स्तंभ पाण्याच्या रेट्यामुळे अलग झाला व खाली कोसळला. खडकवासला धरणही फुटले.

# आपत्तीतील हानींचे अंदाज

पानशेत व खडकवासला येथील धरणे फुटल्यामुळे मुठा नदीकाठच्या भागातील लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. नदीच्या काठाकाठाने वसलेली लहान मोठी खेडी जलग्रस्त झाली. पुणे शहरात तर कमालीचा हाहा:कार उडाला. हजारो लोकांची आयुष्याची कमाई आणि मालमत्ता पाण्यात गेली. कित्येक लोक बेघर झाले. केवळ वस्त्रानिशी घराबाहेर पडलेल्या लोकांना अन्नवस्त्रासाठी आणि निवाऱ्यासाठी याचक बनावे लागले. पानशेत आणि खडकवासला येथील धरणे फुटल्यामुळे पुणे शहराचा पाणीपुरवठा संपूर्णपणे तुटला. शहरातील वीज आणि दूरध्वनी बंद पडले. केंद्र-सरकार, राज्य-सरकार व पुणे महानगरपालिका यांच्या स्थावर आणि जंगम मालमत्तेची जबरदस्त हानी झाली. नदीवरील पुलांची मोडतोड झाली. नदीकाठचे रस्ते आणि उद्याने उद्ध्वस्त झाली. शाळा, दवाखाने, दुकाने, कारखाने व कार्यालये यांचे अपरिमित नुकसान झाले.

या भयानक आपत्तीनंतर पुण्याला भेट देणाऱ्या सगळ्यांचीच मने पुणे शहरावर पसरलेली अवकळा पाहून विदीर्ण झाली. प्रत्यक्ष हानी किती झाली याबाबत निरनिराळे अंदाज केले गेले. प्रस्तुत प्रकरणात पानशेत आपत्तीमुळे एकूण किती हानी झाली याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासाठी अनेक संबंधित संस्थांकडून व व्यक्तींकडून माहिती जमा करण्यात आली. निरनिराळ्या संस्थांनी हानीचा अंदाज करण्यासाठी अवलंबिलेल्या पद्धतीत काहीसा फरक होता. परंतु एकूण हानीच्या स्वरूपाची कल्पना येण्यास हे अंदाज उपयुक्त ठरू शकतील.

### पानशेत धरण

पानशेत धरणाची लांबी सुमारे २४०० फूट होती. या धरणाच्या भिंतीचा जो भाग शेवटच्या मोसमात बांधून पूर्ण झाला होता, तो समूळ उद्ध्वस्त झाला. त्याची लांबी सुमारे १२०० फूट होती. धरणाचा बाकीचा भाग जरी कोसळला नाही तरी त्याला मोठाले तडे गेले. पाणी सोडण्यासाठी बांधलेला संनाल आणि आनुषंगिक बांधकाम नष्ट झाले. धरणाच्या परिसरातील इमारती जमीनदोस्त झाल्या. अवजड यंत्रे आणि इतर यंत्रसामग्री यांची हानी झाली.

पानशेत धरणफुटीमुळे झालेल्या हानीचा अंदाज घेताना धरणाच्या पुनर्बांधणीस किती खर्च येईल हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. उरलेल्या धरणाच्या भिंतीची दुरुस्ती व उद्ध्वस्त भागांचे मुख्यत: मातीत व अंशत: दगडकामात बांधकाम करण्यास ३·५० कोटी रुपये खर्च येईल, व धरणाच्या चिरेबंदी बांधकामास ५·४४ कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. शिवाय पानशेत येथील यंत्रसामग्रीच्या

मोडतोडीमुळे सुमारे २,२५,००० रुपये आणि इमारती व इतर सामग्री यांच्या नुकसानीमुळे सुमारे १५,२०० रुपये हानी झाली ती वेगळीच.

### खडकवासला धरण

इ. स. १८६९-७९ च्या दरम्यान खडकवासल्याचे चिरेबंदी धरण बांधण्यात आले व त्यासाठी एकूण ३९ लक्ष रुपये खर्च आला होता. पानशेत प्रलयामुळे खडकवासला धरणाच्या मध्यभागी जवळ-जवळ २०० फुटांचे खिंडार पडले. त्याचप्रमाणे धरणाच्या उत्तर सीमेजवळील १०० दरवाज्यांपैकी बरेचसे नष्ट झाले. हल्लीच्या धरणाच्या डागडुजीसाठी आणि त्यास मजबुती आणण्यासाठी १·५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. खडकवासला येथे १५०० दशलक्ष घनफूट पाण्याच्या साठ्याचे नवीन धरण बांधावयाचे झाल्यास ४·२६ कोटी रुपये खर्च येईल. थोडक्यात, पुणे शहराचा पाणीपुरवठा पुनः सुरळीत चालू करावयाचा म्हणजे त्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करणे आवश्यक आहे, हे वर दिलेल्या आकड्यांवरून लक्षात येईल.

### केंद्र-सरकारच्या मालमत्तेची हानी

खडकवासला धरणाजवळ केंद्र-सरकारचे मध्यवर्ती जल तथा शक्ती अन्वेषण स्थान आहे. या संशोधन केंद्राच्या काही इमारती धरणाच्या नजीक होत्या त्या उद्‌ध्वस्त झाल्या. त्याचप्रमाणे प्रात्यक्षिकांसाठी केलेल्या काही प्रतिकृती आणि यंत्रशाळा वाहून गेल्या. त्यामुळे सुमारे एक लक्ष रुपयांची हानी झाली.

आपद्‌ग्रस्त विभागांतील दूरध्वनीचे व तारेचे खांब, तारा, आणि इतर साधनसामग्री यांची फार मोठी हानी झाली. त्यामुळे अंदाजे २,३५,००० रुपयांची नुकसानी झाली. डेक्कन जिमखाना, शनिवार, नारायण आणि मंगळवार या भागांतील टपाल खात्याची कार्यालये पूर्णपणे पाण्याखाली गेली. परंतु इमारतीचे व मालमत्तेचे फारसे नुकसान झाले नाही.

संगम पुलाजवळील रेल्वे कामगारांच्या वस्तीत पाणी शिरल्यामुळे घरांची पडझड होऊन अंदाजे २०,००० रुपयांची हानी झाली.

### राज्य-सरकारच्या मालमत्तेची हानी

जुना तोफखाना व शिवाजीनगर या भागांतील सरकारी मालकीची धान्याची कोठारे पाण्याखाली बुडाली. पाण्याच्या प्रचंड दाबाखाली कोठारांच्या भिंती ढासळल्या आणि छपरे मोडून गेली. या कोठारांतून साठवलेले सगळे धान्य कुजून गेले. जवळजवळ ४२ हजारांपेक्षा जास्त पोती धान्य वाया गले आणि त्यात सरकारला १५,६४,८०० रुपयांची नुकसानी सोसावी लागली.

बारणे रस्ता, मुंबई-पुणे रस्ता, जुन्या रेल्वे-पुलाजवळचा रस्ता व आसपासच्या ठिकाणच्या सरकारी गुदामांत पाणी शिरले. बांधकाम खात्याचा बराच माल या ठिकाणी ठेवलेला होता. गुदामांतील सिमेंट, पत्रे, इमारती लाकूड हा माल खराब तरी झाला अथवा पाण्याबरोबर वाहून गेला. याशिवाय आरोग्य खाते, शेतकी खाते, गृह खाते इत्यादी खात्यांच्या मालमत्तेची हानी झाली. सारणी क्र. ३·१ मध्ये राज्य-सरकारच्या हानीचा तपशील दिला आहे.

राज्य-सरकारच्या एकंदर नुकसानीचा आकडा ४५,३५,००० रुपये होतो. याशिवाय मुंबई-पुणे रस्त्यावरील राज्य-सरकारच्या अधिकारकक्षेखाली येणाऱ्या संगम पुलाच्या दोन कमानी कोसळल्या, त्याची नुकसानी अंदाजे ४,००,००० रुपये झाली.

सारणी क्र. ३.१ : राज्य-सरकारच्या मालमत्तेच्या नुकसानीचे अंदाज

| सरकारी खाते | मालमत्तेचा प्रकार इमारती (रु.) | गुदामे (रु.) | सामग्री (रु.) | सुविधा (रु.) |
|---|---|---|---|---|
| जिल्हाधिकारी कार्यालय | — | १५,६४,८०७ | — | — |
| सार्वजनिक बांधकाम | — | ६,०८,७४६ | २२,०४,५५५ | २०,९०० |
| गृह | — | — | ३,८८५ | — |
| शेती आणि भूसंरक्षण | २३,६६६ | ३,३६० | ३९,५३३ | ६,००० |
| सार्वजनिक आरोग्य | — | — | ३२,००० | — |
| पशुपालन | ११,००० | — | १६,६०० | — |
| | ३४,६६६ | २१,७६,९१३ | २२,९६,५७३ | २६,९०० |

### पुणे महानगरपालिकेच्या मालमत्तेची हानी

पुणे महानगरपालिकेच्या मालमत्तेची स्वाभाविकपणे मोठ्या प्रमाणात हानी झाली. मलवाहिनी, पाण्याचे नळ, पूल, रस्ते यांसारख्या सुविधा, व शाळा, कचेऱ्या यांच्या इमारती यांना बरीच हानी पोहोचली.

मुठा नदीच्या दक्षिण तीरावर ओंकारेश्वर देवळापासून शिवाजी पूल आणि त्यापलीकडील भागांतील मलवाहिन्या वाहून गेल्यामुळे २०,००० रुपयांची हानी झाली. इतर आपद्ग्रस्त विभागांतील मलवाहिन्या व आनुषंगिक सामग्री वाहून गेल्यामुळे ९४०० रुपयांचे नुकसान झाले.

शिवाजीनगरकडे पाणी वाहून नेणारे १४ इंच व्यासाचे नळ वाहून गेल्यामुळे ३०,००० रुपये नुकसान झाले. तसेच पूरग्रस्त भागातील ३ इंच व ४ इंच व्यासाच्या नळांचीही मोडतोड होऊन सुमारे ३५,७०० रुपयांचे नुकसान झाले. पूरग्रस्त भागांतील तोटयांची ३००० रुपयांची नुकसानी झाली. याशिवाय शिवाजीनगर, मंगळवार, कसबा पेठ व तानाजीवाडी या ठिकाणी जलकर्षण स्थानकांमध्ये बसवलेली यंत्रसामग्री निकामी झाली. त्यामुळे २७,००० रुपयांचे नुकसान झाले.

पूरग्रस्त लोकांच्या नवीन वसाहतींना पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याचे नवीन नळ टाकावे लागले, त्यासाठी ८,९५,३५० रुपये खर्च आला. विहिरी, तलाव यांवर जलकर्षक बसवण्याची सोय केली, त्यासाठी १३,४०० रुपये खर्च आला व पाणी स्वच्छ करण्याची व्यवस्था करण्यासाठी ९५०० रुपये खर्च आला.

कमी उत्पन्नाच्या व मागासलेल्या वर्गाच्या कुटुंबीयांसाठी महानगरपालिकेने घरे बांधलेली होती त्यांची आपत्तीत फार मोठी हानी झाली. शिवाजीनगर भागातील मांग वसाहत संपूर्ण नष्ट झाली. येथे ७२ बिऱ्हाडांची सोय होती. कसबा पेठेत एकमजली १४ चाळी होत्या व त्यांमध्ये १५३ बिऱ्हाडांची सोय होती. त्यांपैकी दहा चाळी जमिनदोस्त झाल्या व चार चाळींची पडझड झाली. मंगळवार पेठेतील वसाहतीत ७३ बिऱ्हाडांसाठी जागा होती. या वसाहतीचेही बरेच नुकसान झाले. मांग वसाहत आणि कसबा पेठतील वसाहतीचा काही भाग हा पूररेषेच्या आत येत असल्यामुळे पुन्हा बांधला गेला नाही. कसबा पेठेत ७६ बिऱ्हाडांची जागा व मंगळवार पेठेतील संपूर्ण वसाहत दुरुस्त करण्यात आली. कसबा

पेठ, शिवाजीनगर आणि मंगळवार पेठ येथील वसाहतींच्या हानीमुळे महानगरपालिकेस अंदाजे अनुक्रमे २,५०,००० रुपये, ७५,००० रुपये व २५,००० रुपये नुकसान सोसावे लागले.

शिवाजी पुलाजवळील महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्येही पुराचे पाणी शिरले व तळमजला संपूर्णतया पाण्याखाली गेला. कार्यालयाच्या खोल्या, फर्निचर, नोंदवह्या, लेखनसामग्री व इतर सामान-सुमान यांचे फार मोठे नुकसान झाले. या नुकसानीचा अंदाज ७५,००० रुपये करण्यात आला. विशेषत: कागदपत्रांची जी नुकसानी झाली, ती भरून काढणे कठीण आहे. करआकारणी, जन्म-मृत्यू यांसारख्या महत्त्वाच्या नोंदी नष्ट झाल्यामुळे शासनव्यवस्थेत व न्यायदान यंत्रणेत अडचणी निर्माण झाल्यास नागरिकांना कालापव्यय सहन करावा लागण्याचा संभव आहे.

महानगरपालिकेच्या तीन प्राथमिक शाळांच्या इमारतींचे व आतील साधनसामग्रीचे अंदाजे १५,००० रुपयांचे नुकसान झाले. शिवाजी उद्यानात उद्यान अधीक्षकासाठी बांधलेले घर समूळ नष्ट झाले व अंदाजे २०,००० रुपयांचे नुकसान झाले. शिवाय महानगरपालिकेने चालविलेला एक दवाखाना, एक मोफत वाचनालय,दोन कोंडवाडे,दोन रखवालदारांच्या खोल्या यांचे २९,३०० रुपयांचे नुकसान झाले.

कॉंग्रेस भवन रस्त्यावरील शिवाजी उद्यान व पोहण्याचा तलाव पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्यामुळे २५,६०० रुपयांचे नुकसान झाले. उद्यानाशेजारील खुले नाटयगृह व कुस्तीचा आखाडाही उद्ध्वस्त होऊन ४२,५०० रुपयांचे नुकसान झाले. संभाजी उद्यानातील मत्स्यालय, काही पुतळे, झाडेझुडपे, कुंडया यांना पाण्याचा जबर तडाखा बसून एकूण नुकसानी ४९,४०० रुपयांची झाली.

संभाजी पूल व जुना रेल्वे पूल यांच्या कठडयांच्या भिंती व पादचारी मार्ग उद्ध्वस्त झाले व १,००,००० रुपयांचे नुकसान झाले. शिवाय या दोन्ही पुलांच्या रस्त्यांचा पृष्ठभाग समूळ उखडून निघाल्याने २,५०,००० रुपयांचे नुकसान झाले. त्या मानाने शिवाजी पुलाला कमी नुकसान पोहोचले; कठडयाच्या भिंती व पादचारी मार्ग यांचेच प्रामुख्याने नुकसान झाले परंतु रस्त्याची फारशी नुकसानी झाली नाही. शिवाजी पूल आणि शिवाजी पुलाचा फाटा (पुरंदरे पूल) यांचे एकूण सुमारे ५०,००० रुपयांचे नुकसान झाले. याशिवाय ओंकारेश्वराजवळील सांडवा उद्ध्वस्त झाला व इतरही सांडव्यांची थोडीफार पडझड झाली त्यामुळे जवळजवळ २०,००० रुपयांची हानी झाली.

केळकर रस्ता, कॉंग्रेस भवन रस्ता, शिवाजी रस्ता यांचा काही भाग आणि टिळक व संभाजी चौक येथील रस्त्यांची बरीच हानी झाली. त्यामुळे अंदाजे २,७०,००० रुपयांची नुकसानी झाली. पावसाचे पाणी जाण्यासाठी बांधलेल्या जलवाहिन्यांची ३५,००० रुपयांची हानी झाली.

पूरग्रस्त भागांतील काही छपऱ्या, संडास, तीन भाजी आणि मासळी बाजार, स्मशानभूमी यांचे बरेच नुकसान झाले. त्याचप्रमाणे रस्त्यावरचे दिवे, पाटया, केराच्या पेटया इत्यादींचेही नुकसान झाले. या सर्वांच्या नुकसानीचा अंदाज १,०५,७०० रुपये करण्यात आला.

महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या हानीचा तपशील सारणी क्र. ३.२ मध्ये दिला आहे. महानगर-पालिकेचे एकूण १५,६२,६०० रुपयांचे नुकसान झाले.

## पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीच्या मालमत्तेची हानी

पानशेत आपत्तीत संगम आणि रेल्वे पूल यांवरून जाणाऱ्या वीजपुरवठयाच्या मुख्य तारा तुटल्या. पाणी घुसलेल्या भागांतील विजेचे खांब काही ठिकाणी वाकले तर काही ठिकाणी अजिबात उखडून निघाले. तारांची मोठाली भेंडोळी चिखलमातीत गाडली गेली. यामुळे पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीला जवळजवळ ३.५० लाख रुपयांचे नुकसान सोसावे लागले.

सारणी क्र. ३.२ : महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या हानीचा तपशील

| मालमत्तेचा प्रकार | एकूण हानी (रु.) | प्रतिशतता हानी |
|---|---|---|
| मलवाहिनी | २९,४०० | १.९ |
| पाण्याचे नळ | ६८,७०० | ४.४ |
| जलकर्षण स्थानके | २७,००० | १.७ |
| वसाहती | ३,५०,००० | २२.४ |
| शाळा व कचेऱ्या | १,३९,३०० | ८.९ |
| खुले नाट्यगृह व उद्याने | १,१७,५०० | ७.५ |
| पूल | ४,२०,००० | २६.९ |
| रस्ते व नाले | ३,०५,००० | १९.५ |
| इतर | १,०५,७०० | ६.८ |
| एकूण | १५,६२,६०० | १००.० |

## कारखाने आणि यंत्रशाळा यांची हानी

आपद्ग्रस्त विभागांतील छोटे कारखाने, यंत्रशाळा व दुकाने यांची आपत्तीत जबर हानी झाली. उद्योगधंद्यांच्या हानीसंबंधीची माहिती मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीज, व्यापारी संघटना, अधिकोष, मुख्यमंत्रि-निधी अशा निरनिराळ्या संस्थांकडून गोळा करण्यात आली. आवश्यक तेथे दुकानदार व कारखानदार यांना वैयक्तिकरीत्या भेटूनही माहिती घेण्यात आली.

१. रसायने, औषधे, धातुसामान, सुटे भाग, विजेची उपकरणे व वस्तू, चामड्याच्या वस्तू, विडी, उदबत्ती, चुना इत्यादी तयार करणाऱ्या कारखान्यांना आपत्तीमुळे झळ पोहोचली. यांतील अनेक कारखाने संगम पूल, शिवाजी पूल यांचे नजीक आणि एरंडवणे भागात, नदीच्या आसमंतात असल्याने त्यांचे अधिक नुकसान झाले. कच्चा व तयार माल, यंत्रे व उपकरणे, इमारती आणि त्यांतील सामान नष्ट तरी झाले किंवा चिखलामुळे खराब होऊन गेले.

आपद्ग्रस्त उद्योगधंद्यास मदत मिळवून देण्याच्या दृष्टीने मराठा चेंबरतर्फे हानीबद्दलची माहिती जमविण्यात आली होती. त्या माहितीचा येथे उपयोग केला आहे. ज्या ठिकाणी ही माहिती अपुरी वाटली, तेथे प्रत्यक्ष चौकशी करून माहिती पुरी करून घेण्यात आली. उत्पादनाचा प्रकार आणि हानीची रक्कम यानुसार आपद्ग्रस्त कारखान्यांचे विभाजन सारणी क्र. ३.३ मध्ये दाखविले आहे. एकूण ११५ कारखान्यांना पानशेत आपत्तीत नुकसान सोसावे लागले. सर्वांत मोठा वर्ग (३० कारखाने) धातू उद्योग आणि अभियांत्रिक उद्योग यांचा आहे. लाकूडसामान (१४), शास्त्रीय उपकरणे (१०), आणि रसायने व औषधे (७) तयार करण्याचे कारखाने हे इतर प्रमुख वर्ग होत. याशिवाय साबण, वेतकाम, चामड्याच्या वस्तू, विडी, उदबत्ती इत्यादी तयार करणाऱ्या प्रत्येकी दोन ते पाच कारखान्यांची हानी झाली. सर्व कारखान्यांची एकूण अंदाजे हानी ४०,७४,७०० रुपये झाली. यातील जवळजवळ निम्मे नुकसान सहा मोठ्या कारखान्यांचे आहे. सर्व कारखान्यांची

सारणी क्र. ३.३ : उत्पादनाचा प्रकार व एकूण हानी यानुसार आपद्ग्रस्त कारखान्यांच्या संख्येचे विभाजन व माध्य हानी

| उत्पादनाचा प्रकार | एकूण हानी (रु.) | | | | | | एकूण | माध्य हानी (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १००१–५००० | ५००१–१०,००० | १०,००१–२०,००० | २०,००१–५०,००० | ५०,००१–१००,००० | १००,००१ व अधिक | | |
| धातुसामान | १० | ५ | ७ | २ | ३ | ३ | ३० | ४२४७० |
| विद्युत्सामान | – | – | ३ | १ | १ | – | ५ | ३१५६२ |
| शास्त्रीय उपकरणे | २ | ४ | १ | ३ | – | – | १० | १२५२२ |
| रसायने | – | ३ | ३ | १ | – | – | ७ | १५८२१ |
| औषधे | १ | २ | – | – | १ | १ | ५ | १३७८८० |
| साबण | – | – | – | २ | – | – | २ | २७०८१ |
| गाद्या व विणलेले कपडे | – | १ | – | ४ | १ | १ | ७ | ८८०७१ |
| लेखनसामग्री | – | – | १ | १ | – | – | २ | १७२७५ |
| लाकूडसामान | ७ | १ | ३ | – | ३ | – | १४ | २०३१७ |
| चामड्याच्या वस्तू | – | – | – | १ | १ | – | २ | ५०६२८ |
| विडी व उदबत्ती | १ | १ | १ | – | १ | १ | ५ | ६९२२१ |
| बांधकामाचे सामान | – | १ | २ | १ | १ | – | ५ | ३५४०० |
| इतर | १३ | ६ | २ | – | – | – | २१ | ४९२४ |
| एकूण | ३४ | २४ | २३ | १६ | १२ | ६ | ११५ | ३५४३२ |

सरासरी हानी सुमारे ३५,००० रुपये झाली, पण वरील सहा कारखाने वगळल्यास सरासरी हानी १८,००० रुपये आढळली.

उद्योगधंद्यांच्या एकूण हानीमध्ये कच्च्या मालाचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे जवळजवळ ७० टक्के होते. यंत्रसामग्री व इमारती यांच्या हानीचे प्रमाण अनुक्रमे १८.५ आणि १२.५ टक्के आढळले. साबण आणि लाकूडसामान तयार करणाऱ्या कारखान्यांच्या बाबतीत इमारतींची बरीच हानी झालेली आढळली. कारण यांतील बहुतेक कारखाने तात्पुरत्या स्वरुपाच्या लाकडाच्या किंवा पत्र्याच्या छपऱ्यांमध्ये होते व या छपऱ्या साहजिकच नष्ट झाल्या. शास्त्रीय उपकरणांच्या कारखान्यांच्या एकूण हानीमध्ये यंत्रसामग्रीच्या हानीचे प्रमाण सर्वात जास्त होते. रसायने, काचसामान, विडी, चुना आणि उदबत्तीच्या कारखान्यांची कच्च्या व तयार मालाची जास्त हानी झाली.

२. छापखान्यांमधील यंत्रसामग्री आणि कागदाचे साठे यांना मोठ्या प्रमाणात नुकसान पोहोचले. काही छापखान्यांच्या इमारतींचीही पडझड झाली. एकूण ३१ मुद्रक व प्रकाशकांना हानी सोसावी लागली. ही हानी एकूण अंदाजे ११,०९,५०० रुपये भरली.

याशिवाय ४४ मुद्रक व प्रकाशक यांचे अप्रत्यक्ष नुकसान झाले. या व्यावसायिकांच्या मालकीचा कागद आपद्ग्रस्त छापखान्यांत असल्यामुळे त्यांनाही नुकसान सोसावे लागले. हानी झालेल्या सामानाची अंदाजे किंमत ५,३६,००० रुपये आढळली. याप्रमाणे छपाई व प्रकाशन व्यवसायाचे एकूण अंदाजे नुकसान १६,४५,५०० रुपये झाले.

३. आपद्ग्रस्त भागात पसरलेल्या पिठाच्या ८८ गिरण्यांना नुकसान सोसावे लागले. बहुसंख्य गिरण्या लहान असल्यामुळे वैयक्तिक हानी मात्र १००० ते ३००० रुपये इतकीच झाली. दोन मोठ्या गिरण्यांचे नुकसान मात्र प्रत्येकी ४०,००० रुपयांहून अधिक झाले. गिरण्यांचे एकूण नुकसान २,००,६०० रुपये झाले.

## दुकानदार आणि व्यापारी यांचे नुकसान

आपद्ग्रस्त विभागांतील निरनिराळ्या प्रकारची दुकाने आणि इतर व्यापारी पेठा यांनाही मोठे नुकसान सोसावे लागले. डेक्कन जिमखाना, संभाजी पुलाची दक्षिण व उत्तर टोके, जंगली महाराज रस्ता, शिवाजी पुलाचे उत्तर टोक, या भागांत पाण्याचा जोर विशेष असल्याने येथील दुकानांना जबर हानी सोसावी लागली. शहराच्या निरनिराळ्या भागांतील ३६०० दुकानांचे नुकसान झाले असा अंदाज आहे. सुदैवाने शहरातील प्रमुख बाजार व व्यापारी पेठा नदीपासून दूर असल्यामुळे त्यांना धोका पोहोचला नाही.

मराठा चेंबर, अधिकोष, व किराणा, लेखनसामग्री आदी व्यापाऱ्यांच्या संघटना, आणि विभागीय समित्या यांच्यातर्फे, व्यापाऱ्यांना मदत मिळवून देण्याच्या दृष्टीने नुकसानीची तपशीलवार माहिती गोळा करण्यात आली होती. परंतु ही माहिती विशिष्ट व्यापारी वर्गापुरती मर्यादित होती. त्यामुळे आपद्ग्रस्त व्यापाऱ्यांच्या एकूण संख्येचा अंदाज करण्याच्या दृष्टीने ही माहिती अपुरी होती. म्हणून पुणे महानगरपालिकेकडील दुकानांच्या नोंदीचा उपयोग करण्यात आला. या नोंदीवरून प्रत्येक आपद्ग्रस्त घरात जी जी दुकाने होती त्या सर्वांची तपशीलवार माहिती उदा. दुकानाचा पत्ता, धंद्याचा प्रकार, पगारी नोकरांची संख्या इत्यादी घेण्यात आली. ही माहिती पडताळून पाहण्यासाठी पाच टक्के दुकानांच्या बाबतीत प्रत्यक्ष जागेवर जाऊन चौकशी करण्यात आली.

एकूण ३५८६ दुकानांना पानशेत आपत्तीत कमीअधिक नुकसान सोसावे लागले. त्यापैकी २६९८ दुकाने लहान आणि ८८८ मोठी होती.[1] कसबा पेठेमध्ये सर्वांत जास्त (शेकडा२०) आपद्ग्रस्त दुकाने होती व मंगळवार, सोमवार, नारायण या पेठांत प्रत्येकी १० ते १२ टक्के आपद्ग्रस्त दुकाने होती.

दुकानदार व व्यापारी यांच्या हानीचा अंदाज बांधण्यासाठी व्यापारी संघटना, विभागीय समित्या व अधिकोष यांच्याकडून मिळालेल्या माहितीचा उपयोग केला आहे. व्यापारी संघटनांकडून १९३ किराणा मालाची दुकाने, ११६ खानावळी, उपाहारगृहे आणि मिठाईची दुकाने, १८ लेखनसामग्री आणि चाकूसुऱ्यांची दुकाने आणि चार औषध भांडारे यांच्या हानीची तपशीलवार माहिती मिळाली. डेक्कन जिमखाना विभागीय समितीकडून २१७ आणि मराठा चेंबरकडून १४७ व्यापाऱ्यांच्या हानीची माहिती मिळाली. याशिवाय अधिकोषांकडून सुमारे ७०० आपद्ग्रस्त दुकानांच्या हानीचे अंदाज उपलब्ध झाले. या सर्व माहितीची छाननी करून व द्विरुक्ती आढळल्यास ती काढून हानीचा अंदाज बांधण्यात आला. सारणी क्र. ३ . ४ मध्ये हानीच्या प्रमाणानुसार आपद्ग्रस्त दुकानांच्या संख्येचे विभाजन दाखविले आहे. एकूण दुकानांची सहा वर्गात विभागणी केली आहे. पहिल्या वर्गात किराणा मालाची दुकाने, दुसऱ्यामध्ये कापड, कपडे, लेखनसामग्री, शोभेच्या वस्तू, घड्याळे, व अन्य टिकाऊ वस्तू विकणारी

सारणी क्र. ३ . ४ : धंद्याचा प्रकार व एकूण हानी यानुसार आपद्ग्रस्त दुकानांचे विभाजन

| एकूण हानी (रु.) | धंद्याचा प्रकार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | किराणा माल | टिकाऊ वस्तू | खाद्य-पदार्थ | सेवा | जळाऊ सामान | इतर |
| २००– १,००० | ३८.६ | ४२.१ | ४९.६ | ३६.१ | २९.५ | ५४.१ |
| १,००१– २,००० | १८.८ | ८.३ | १६.२ | २४.५ | ३२.६ | २२.६ |
| २,००१– ४,००० | १४.९ | २२.८ | २४.१ | २१.४ | २३.९ | १३.७ |
| ४,००१– ६,००० | १४.९ | १५.९ | ३.५ | १३.५ | ४.५ | २.० |
| ६,००१–१०,००० | ६.६ | ४.१ | ३.१ | २.५ | ४.३ | ३.८ |
| १०,००१–२०,००० | ३.१ | २.७ | २.३ | १.३ | २.५ | १.९ |
| २०,००१–३०,००० | २.४ | २.१ | ०.७ | ०.७ | १.५ | १.० |
| ३०,००१–५०,००० | ०.५ | १.६ | ०.५ | — | १.२ | ०.९ |
| ५०,००१ व अधिक | ०.२ | ०.४ | — | — | — | — |
| एकूण | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० |

दुकाने समाविष्ट केली आहेत. खाद्यपदार्थ, फळे, मिठाई, उपाहारगृहे, पान-तंबाखूची दुकाने यांचा तिसरा वर्ग केला आहे. न्हावी, धोबी, शिंपी यांची दुकाने चौथ्या वर्गात मोडतात तर जळाऊ लाकूड आणि कोळशाच्या वखारी पाचव्या वर्गात येतात. इतर किरकोळ दुकाने शेवटच्या वर्गात अंतर्भूत

१. दुकानांतील नोकरवर्गाच्या संख्येनुसार दुकानांचे दोन वर्ग करण्यात आले. ज्या दुकानांमध्ये एकाहून अधिक पगारी नोकर आढळले त्या दुकानांचा वर्ग मोठी दुकाने व इतरांचा वर्ग लहान दुकाने असा केला आहे.

केली आहेत. निरनिराळ्या प्रकारच्या दुकानांच्या एकूण हानीमध्ये बरीच तफावत दिसून आली. हानीचा कमीतकमी आकडा २०० रुपये तर जास्तीत जास्त ५०,००० रुपये आढळला. सुमारे ४० टक्के दुकानांची प्रत्येकी हानी १००० रुपयांहून कमी होती.

दुकानांच्या प्रकारानुसार आपद्ग्रस्त दुकानांची संख्या आणि सरासरी हानी सारणी क्र. ३.५ मध्ये दाखविली आहे. लहान दुकानांमध्ये लेखनसामग्री व फर्निचर या दुकानांची हानी सर्वात जास्त (सरासरी सुमारे २८०० रुपये) झाली तर भाजीपाला, पान-तंबाखू, यांची सरासरी हानी ५०० रुपयांच्या आसपास आढळली. मोठ्या दुकानांमध्ये रेडिओ आणि घड्याळांच्या दुकानांची हानी सर्वात जास्त (सरासरी १५,००० रुपये) झाली. इतर मोठ्या दुकानांची सरासरी हानी ७००० रुपयांच्या आसपास होती. मोठ्या आणि लहान दुकानांच्या सरासरी हानीमध्ये बरीच तफावत दिसून येते. सर्व प्रकारच्या दुकानांचा एकत्र विचार करता लहान दुकानांची सरासरी हानी १४८० रुपये आणि मोठ्या दुकानांची ७३५१ रुपये आढळली. सर्व दुकानांची मिळून एकूण सुमारे एक कोटी रुपयांची हानी झाली.

सारणी क्र. ३.५ : आपद्ग्रस्त दुकानांची संख्या व सरासरी हानी

| दुकानाचा प्रकार | लहान दुकाने | | मोठी दुकाने | | सर्व दुकाने | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | सरासरी हानी (रु.) | संख्या | सरासरी हानी (रु.) | संख्या | सरासरी हानी (रु.) |
| किराणा | ४३९ | १७४० | २०३ | ७३८५ | ६४२ | ३५२५ |
| कापड, कपडे | १२० | २००० | २१ | ११९५० | १४१ | ३४८२ |
| लेखनसामग्री | ७६ | २७८० | १५ | ६५४० | ९१ | ३४०० |
| दुचाकी | १७१ | १८७० | ५८ | ७१२५ | २२९ | ३२०१ |
| रेडिओ,घड्याळे | ११८ | १४६० | ५१ | १५१३० | १६९ | ५५८५ |
| उपाहारगृह | ८० | १९४० | ११९ | ९०५५ | १९९ | ६१९५ |
| पाव, मिठाई | १०६ | १५०० | ३३ | ५२८५ | १३९ | २३९९ |
| भाजीपाला, फळे | १९८ | ४४० | ४१ | ४३७५ | २३९ | १११५ |
| पान-तंबाखू | २६३ | ७०० | ५० | ४२०५ | ३१३ | १२६० |
| दूध व दुधाचे पदार्थ | २६६ | ६०० | ३५ | ४६८० | ३०१ | १०७४ |
| केशकर्तनालय | १०७ | १६३० | ४८ | ३०६० | १५५ | २०७३ |
| धुलाई केंद्र | ९७ | २०७५ | ३७ | ७००० | १३४ | ३४३५ |
| शिलाई केंद्र | २३० | १६८० | ५४ | ८२०० | २८४ | २९२० |
| कातड्याच्या वस्तू | ३४ | ५०० | १२ | ६५१० | ४६ | २०६७ |
| सोनेचांदीच्या वस्तू | ३९ | २००० | ८ | ४७९० | ४७ | २४७५ |
| फर्निचर | ११ | २८०० | ६ | ७२१५ | १७ | ४३५८ |
| जळाऊ सामान | २१३ | २००० | ८६ | ७४०० | २९९ | ३५५३ |
| इतर | १३० | १७४६ | ११ | ४०६६ | १४१ | १९२७ |
| सर्व दुकाने | २६९८ | १४८० | ८८८ | ७३५१ | ३५८६ | २९३४ |

एकूण हानीची तीन वर्गांमध्ये विभागणी करता येते : दुकानाची जागा, आतील सामान व माल, आणि उधारी बुडून सोसावे लागलेले नुकसान. (अनेक दुकानांच्या खतावण्या व इतर दप्तर खराब झाल्यामुळे उधारीच्या नोंदी नष्ट होऊन वसुली करणे कठीण झाले.)

किराणा मालाच्या दुकानादारांपैकी ३० दुकानदारांची दुकानाची जागाच नष्ट झाली. मालाचा साठा सर्वांचाच खराब झाला. तसेच बहुतेक सर्व किराणा दुकानदारांनी अप्राप्य ऋण म्हणून काही नुकसान दाखविलेले आहे. किराणा दुकानदारांनी दाखविलेल्या हानीमध्ये मालाची हानी ६६ टक्के आहे; २४ टक्के अप्राप्य ऋण आणि १० टक्के जागा इत्यादींची हानी आहे. कापड, लेखनसामग्री शोभेच्या वस्तू या दुकानांच्या बाबतीत एकूण नुकसानीत मालाच्या नुकसानीचे प्रमाण सर्वांत जास्त म्हणजे ८५ टक्के आढळले. १० टक्के हानी दुकानांतील कपाटे, विद्युत्-व्यवस्था यांची झाली आणि हानीतील पाच टक्के अप्राप्य ऋण म्हणून दाखविले आहे. उपाहारगृहांच्या बाबतीत सर्वांत जास्त हानी (४० टक्के) कपबशा व इतर काचसामान आणि फर्निचर यांच्या मोडतोडीमुळे झाली. कोळसा व लाकडाच्या वखारींच्या हानीमध्ये मालाचे नुकसान हीच प्रमुख बाब होती. अनेक वखारी तात्पुरत्या स्वरुपाच्या छपऱ्यांमध्ये असल्यामुळे त्यांच्या जागाही नष्ट झाल्या.

## इतर व्यवसायांचे नुकसान

चित्रपटगृहे, अधिकोष, पेट्रोल पंप वगैरे व्यवसायांमध्ये आपद्ग्रस्त व्यावसायिकांची संख्या कमी असल्यामुळे प्रत्यक्ष भेट घेऊन हानीबद्दलची माहिती मिळविणे शक्य झाले. इतर व्यवसायांच्या बाबतीत मात्र आपद्ग्रस्त दुकानदारांच्या संख्येचा अंदाज बांधण्यासाठी जी पद्धत वापरली तीच पद्धत अवलंबिण्यात आली.

पानशेत आपत्तीत पुण्यातील एकूण सहा चित्रपटगृहांचे नुकसान झाले. यांपैकी पाच चित्रपटगृहे नदीलगतच्या भागात म्हणजे डेक्कन जिमखाना (तीन) आणि नारायण पेठ (दोन) या भागांत आहेत. एक शहराच्या अंतर्भागात पण नागझरी नाल्याजवळ आहे. चित्रपटगृहांच्या इमारती पक्क्या स्वरुपाच्या असल्यामुळे त्यांची फारशी पडझड झाली नाही. पण आतील सजावट, खुर्च्या, विद्युत्-व्यवस्था, पंखे, काचेची तावदाने आणि चित्रपटदर्शनाची यंत्रसामग्री यांस नुकसान पोहोचले. चित्रपटगृहांची अंदाजे हानी एकूण ६,३१,००० रुपये झाली आणि सरासरी हानी १,०५,००० रुपये झाली. चार चित्रपटगृहांच्या बाबतीत हानीची तपशीलवार माहिती मिळू शकली. एकूण हानीपैकी १६ टक्के हानी इमारत व आवार यांचे नुकसान झाल्याने, ४२ टक्के हानी फर्निचरच्या खराबीमुळे व अनुक्रमे २४ टक्के व १८ टक्के हानी विद्युत्-व्यवस्था व चित्रपटगृहातील सजावट यांच्या नुकसानीमुळे झालेली आढळली.

अधिकोषांची बहुतेक कार्यालये शहराच्या व्यापारी पेठांमध्ये असल्यामुळे त्यांस नुकसान पोहोचले नाही. डेक्कन जिमखाना भागात अधिकोषांच्या तीन शाखा आहेत त्यांना मात्र हानी सोसावी लागली. या अधिकोषांची एकूण हानी ३९,२०० रुपये झाली. एकूण हानीचे पदशः प्रतिशतता विभाजन पुढीलप्रमाणे आढळले : फर्निचर ४७ टक्के, लेखनसामग्री २९ टक्के, दप्तर १७ टक्के व इतर ७ टक्के.

डेक्कन जिमखाना भागातील दोन आणि शिवाजी पुलाजवळील एक अशा तीन पेट्रोल पंपांचे नुकसान झाले. त्यांची एकूण हानी ६५०० रुपयांची झाली. तसेच चार मोटार दुरुस्तीच्या स्थानकांचेही नुकसान झाले. त्यांची एकूण हानी १,३१,८०० रुपये आढळली. त्याचा तपशील असा : आवार १४.८ टक्के, यंत्रसामग्री ५९.६ टक्के, वाहने २०.८ टक्के, इंधन ४.८ टक्के.

अनेक खाजगी रुग्णालये व सूतिकागृहे यांचे पानशेत आपत्तीत मोठे नुकसान झाले. ही मुख्यतः जंगली महाराज रस्ता, टिळक रस्ता व लक्ष्मी रस्ता या रस्त्यांवर होती. शस्त्रक्रियेची उपकरणे व यंत्रे, औषधे, विद्युत्-सामग्री, फर्निचर, गाद्यागिरद्या वगैरे वस्तूंची बरीच मोठी हानी झाली. दहा प्रमुख रुग्णालयांपैकी सात रुग्णालयांकडून हानीबद्दलची माहिती तपशीलवार मिळू शकली. या सात रुग्णालयांची सरासरी हानी १८,३०० रुपये झाली. यावरून दहा रुग्णालयांचे अंदाजे नुकसान १,८३,००० रुपये झाले असे म्हणावयास हरकत नाही. रुग्णालयांच्या एकूण नुकसानीपैकी २६ टक्के हानी इमारतीच्या खराबीमुळे, अनुक्रमे १२ टक्के व ११ टक्के हानी यंत्रसामग्री व उपकरणे यांच्या मोडतोडीमुळे, ४३ टक्के हानी औषधाचा मोठा साठा वाया गेल्याने व ८ टक्के हानी गाद्या, फर्निचर इत्यादी खराब झाल्यामुळे झाली.

छोटया व्यावसायिकांपैकी किती व्यवसायांचे आपत्तीमुळे नुकसान झाले याचा अंदाज घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडील दुकाने व व्यवसाय यांच्या नोंदीचा उपयोग करण्यात आला. एकूण नुकसानीचा अंदाज बांधण्यासाठी अधिकोष, विभागीय समिती आणि मराठा चेंबर यांजकडून मिळालेल्या माहितीचा उपयोग केला आहे.

आपद्ग्रस्त व्यावसायिकांमध्ये सर्वांत जास्त संख्या (१२९) दवाखान्यांची आहे. दवाखान्यांमधील औषधे, उपकरणे आणि इतर सामान यांना नुकसान पोहोचले व सरासरी हानी २८०० रुपये झाली. औषधे, प्रसाधने, तेले, विद्युत व इतर उपकरणे इत्यादी वस्तूंच्या ३३ विक्रेत्यांजवळील साठ्याची हानी झाली. त्यांची सरासरी हानी २६०० रुपये आढळली. वकील (७८) आणि सावकार (२८) यांच्याजवळील कागदपत्रे व दस्तऐवज खराब होऊन सरासरी हानी १२०० रुपये झाली. अठ्ठावीस ठेकेदारांजवळील मालाचे साठे, उदा. सिमेंटची पोती, लाकूड, आणि इतर सामान भिजल्यामुळे निरुपयोगी झाले. ठेकेदारांची सरासरी हानी ९६०० रुपये आढळली. २१ वसतिगृहे आणि १५ मंगल-कार्यालये यांच्या इमारती, सामान वगैरेची खराबी झाली. त्यांचे एकूण नुकसान ८६,४०० रुपये व सरासरी नुकसान २४०० रुपये झाले.

वरीलपैकी काही व्यावसायिक व दुकानदार उदा. पुस्तके व औषधे, विजेची उपकरणे, विद्युत्-सामान, शिवण्याची यंत्रे इत्यादी विकणारे, यांच्या बाबतीत नुकसानीची पूर्णतः किंवा अंशतः जबाबदारी घेण्याचे संबंधित उत्पादकांनी मान्य केले. खराब झालेला माल व्यावसायिक व दुकानदार यांनी उत्पादकांकडे पाठविल्यास त्याबदली नवीन माल पाठविण्याची जबाबदारी उत्पादकांनी घेतली. त्यामुळे काही दुकानदारांच्या नुकसानीचा भार हलका झाला.

## कारागिरांचे नुकसान

आपद्ग्रस्त कारागिरांनी मदतीसाठी मुख्यमंत्रि-निधीकडे अर्ज सादर केले होते. त्यांवरून त्यांच्या उद्योगधंद्यांच्या हानीविषयी माहिती मिळाली. अनेक कारागीर नदीकाठच्या झोपडपट्टी अथवा अन्य वसाहती यांमधून राहात असत. आपद्ग्रस्त कारागिरांपैकी बहुसंख्य दोर वळणारे शिवाजीनगरमधील मांग वसाहतीमध्ये राहात होते. झाडू आणि केरसुण्या करणारे व पत्र्याचे काम करणारे जुना तोफखाना भागात राहात होते. मंगळवार पेठेत पुष्कळसे गवंडी राहात आणि तांबे व पितळ घडविणाऱ्यांची मुख्य वस्ती कसबा पेठेत होती. याउलट आपद्ग्रस्त सुतार, न्हावी, धोबी, चांभार आणि शिंपी हे एका विशिष्ट भागांत राहात नसून सर्व पेठांत पसरलेले होते. बहुसंख्य कारागिरांची कामाची जागा व राहते घर एकाच ठिकाणी होते.

आपद्ग्रस्त कारागिरांच्या व्यवसायानुसार त्यांची संख्या आणि सरासरी हानी सारणी क्र. ३.६ मध्ये दिली आहे. आपद्ग्रस्त कारागिरांमध्ये केरसुण्या करणारे, सुतार, चांभार व शिपी यांची संख्या बरीच म्हणजे प्रत्येकी सुमारे तीनशे ते चारशे आढळली. दोर वळणारे व लोहार यांची संख्या २०० हून अधिक व धोबी, परीट व न्हावी यांची संख्या प्रत्येकी १५० च्या आसपास होती. सर्वात कमी नुकसान केरसुणी तयार करणाऱ्यांचे (४९ रुपये) आणि सर्वात जास्त नुकसान परटांचे (३२१ रुपये) आढळले. एकूण कारागिरांची सरासरी हानी १४७ रुपये झाली. सरासरी हानीचा हा अंदाज ३३२९ कारागिरांकडून मिळालेल्या माहितीवर आधारित आहे. एकूण ३५४० कारागिरांना आपत्तीची झळ पोहोचली. वरील सरासरी हानीचे प्रमाण सर्व कारागिरांना लावता एकूण हानीचा अंदाज ५,१९,००० रुपये होतो. यापैकी ६३ टक्के हानी हत्यारे नष्ट झाल्यामुळे आणि ३७ टक्के कच्च्या व तयार मालाची खराबी झाल्यामुळे झाली.

वीस रिक्षा आणि टांगेवाल्यांना नुकसान सोसावे लागले. यांतील अनेक टांगेवाल्यांची घरे, तबेले आणि दाणा-वैरण साठविण्याच्या पत्र्याच्या छपऱ्या कसबा पेठेत नदीलगत होत्या. या छपऱ्या पडल्या आणि दाणा-वैरण वाहून गेली. टांग्यांचीही मोडतोड झाली. रिक्षावाल्यांच्या रिक्षांची मोडतोड झाली. रिक्षा आणि टांगेवाल्यांची एकूण हानी अंदाजे ४८,००० रुपये झाली.

सारणी क्र. ३·६ : आपद्ग्रस्त कारागिरांची संख्या आणि सरासरी हानी

| कामाचा प्रकार | कारागिरांची संख्या | सरासरी हानी (रु.) |
|---|---|---|
| केरसुण्या बनविणे | ४५६ | ४९ |
| दोर वळणे | २५६ | १२६ |
| कोळ्याची जाळी विणणे | १०० | २१९ |
| गवंडीकाम | २१९ | ७८ |
| वीजकाम, रंगकाम इ. | ९५ | १४० |
| सुतारकाम | ३४३ | १४७ |
| कुंभारकाम | ७८ | १४६ |
| लोहारकाम | १८६ | १०४ |
| केस कापणे | १५३ | १३४ |
| धोबीकाम | १४१ | ३२१ |
| चांभारकाम | ३४० | ११३ |
| शिपीकाम | ३६८ | १७३ |
| तांबे, पितळ घडविणे | १०५ | ९७ |
| दुग्ध-व्यवसाय | ८७ | २६८ |
| खाद्यपदार्थ करणे | २४ | २९३ |
| दुरुस्तीकाम | २७८ | २९४ |
| इतर | १०० | १०१ |
| सर्व कारागीर | ३३२९ | १४७ |

फळे, भाजीपाला, खाद्यपदार्थ, कचकड्याची खेळणी, बांगड्या इत्यादी विकणाऱ्या ७८ फेरीवाल्यांचे नुकसान झाले. त्यांचे अंदाजे एकूण नुकसान ७५,५०० रुपये असून सरासरी हानी ७७० रुपये होते.

निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगधंद्यांना व व्यावसायिकांना आपत्तीमुळे जी हानी सोसावी लागली त्याबद्दलची एकत्रित माहिती सारणी क्र. ३.७ मध्ये दिली आहे. आपद्ग्रस्त धंदेवाईक व व्यावसायिक यांच्या एकूण संख्येमध्ये दुकानदार व कारागीर यांची संख्या प्रत्येकी ४५ टक्के आहे. एकूण हानीमध्ये दुकानदारांच्या हानीचे प्रमाण ५५.३५ टक्के पडते तर कारागिरांच्या हानीचे प्रमाण एकूण हानीच्या फक्त २.७३ टक्के होते. आपद्ग्रस्तांमध्ये कारखान्यांची संख्या फक्त १.४६ टक्के असली, तरी त्यांची हानी मात्र एकूण हानीच्या २१.४३ टक्के आढळली.

सारणी क्र. ३.७ : व्यापार व उद्योग यांची एकूण हानी

| उद्योगधंद्याचे स्वरूप | एकूण संख्या | एकूण हानी (रु.) | उद्योगधंद्यांची प्रतिशतता | प्रतिशतता हानी |
|---|---|---|---|---|
| कारखाने | ११५ | ४०,७४,७०० | १.४६ | २१.४३ |
| छापखाने | ७५ | १६,४५,५०० | ०.९५ | ८.६६ |
| पिठाच्या गिरण्या | ८८ | २,००,६०० | १.१२ | १.०६ |
| दुकाने | ३,५८६ | १,०५,२०,००० | ४५.६२ | ५५.३५ |
| चित्रपटगृहे | ६ | ६३१,००० | ०.०८ | ३.३२ |
| अधिकोष | ३ | ३९,२०० | ०.०४ | ०.२१ |
| पेट्रोल पंप | ६ | १,३८,३०० | ०.०८ | ०.७३ |
| रुग्णालये | १० | १,८३,००० | ०.१३ | ०.९६ |
| दवाखाने | १२९ | ३,६१,२०० | १.६४ | १.९० |
| विक्रेते | ३४ | ८८,४०० | ०.४३ | ०.४७ |
| ठेकेदार | २८ | २,६८,८०० | ०.३६ | १.४१ |
| वकील, सावकार | १०६ | १,२७,२०० | १.३५ | ०.६७ |
| कार्यालये व वसतिगृहे | ३६ | ८६,४०० | ०.४६ | ०.४५ |
| कारागीर | ३,५४० | ५,१९,००० | ४५.०४ | २.७३ |
| फेरीवाले | ७८ | ७५,५०० | ०.९९ | ०.४० |
| रिक्षा व टांगेवाले | २० | ४८,००० | ०.२५ | ०.२५ |
| एकूण | ७,८६० | १,९०,०६,८०० | १००.०० | १००.०० |

आपत्तीनंतर जवळजवळ महिनाभर अनेक व्यावसायिकांना आपला धंदा बंद ठेवावा लागला. त्यामुळे जे नुकसान झाले त्याचा वरील हानीच्या अंदाजामध्ये समावेश केलेला नाही. इमारतींची डागडुजी, यंत्रसामग्री व विद्युत्-व्यवस्था यांची दुरुस्ती, सुटे भाग व कच्चा माल पुन्हा मिळविणे यांसाठी अनेकांना तर अधिक अवधी लागला. ज्या लोकांची जागा पूररेषेत गेली त्यांस नवीन जागा शोधून तेथे स्वतःचा जम बसविणे अवश्य झाले. धंदा बंद असला तरी वरचा खर्च उदा. जागेचे भाडे,

नोकरांचा पगार इत्यादी करणे भागच होते. या सर्व बाबींमुळे अप्रत्यक्ष नुकसान किती सोसावे लागले याचा अंदाज घेणे मात्र आवश्यक माहितीअभावी शक्य झाले नाही.

## शैक्षणिक व इतर संस्थांचे नुकसान

आपद्ग्रस्त संस्थांमध्ये महाविद्यालये, संशोधन संस्था, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, शाळा, धर्मादाय रुग्णालये, अनाथालये, ग्रंथालये, कला-विद्यालये, शारीरिक शिक्षण संस्था, तालमी, खाजगी वर्ग, बालकमंदिरे इत्यादी विविध प्रकारच्या संस्थांचा समावेश होतो. आपद्ग्रस्त संस्थांनी मुख्यमंत्रि-निधीकडे मदतीसाठी अर्ज केले होते त्यांवरून त्यांच्या हानीची माहिती घेण्यात आली. आपद्ग्रस्त संस्थांच्या संख्येचा अंदाज घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडील स्थावर मिळकतीच्या नोंदीचा उपयोग करण्यात आला.

आपद्ग्रस्त भागातील नऊ माध्यमिक शाळा व एक महाविद्यालय यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शाळांच्या इमारतीतील फर्निचर, लेखनसामग्री, प्रयोगशाळेतील उपकरणे, ग्रंथालयातील पुस्तके, इत्यादी सामानाची हानी झाली. एकूण आपद्ग्रस्त शाळांपैकी पाच शाळांचे नुकसान ५ ते २५ हजार रुपयांपर्यंत होते. तीन शाळांचे २५ ते ५० हजार रुपये व एका शाळेचे ५० हजार रुपयांहून अधिक नुकसान झाले. महाविद्यालयाचे नुकसान दीड लाख रुपयांहून जास्त झाले. या दहा शिक्षण संस्थांचे एकूण नुकसान ४,१४,९०० रुपये आढळले. यांतील चार मोठ्या शाळांच्या हानीचा तपशील उपलब्ध झाला तो पुढीलप्रमाणे आढळला : आवार ११ टक्के, इमारत १९ टक्के, फर्निचर ८ टक्के, उपकरणे २१ टक्के व लेखनसामग्री ११ टक्के, पुस्तके ३० टक्के.

याशिवाय काही सुप्रसिद्ध शैक्षणिक व संशोधन संस्थांना बरेच नुकसान सोसावे लागले. दोन शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांतील ग्रंथसंग्रह, दुर्मिळ कागदपत्रे आणि प्रकाशने नामशेष झाली. दोन ग्रंथालये, एक संशोधन संस्था आणि एक तांत्रिक शाळा यांसही अशाच प्रकारे नुकसान सोसावे लागले. वरील सहा संस्थांचे प्रत्येकी नुकसान एक लाख रुपयांपेक्षा जास्त आढळले. या संस्थांचे एकूण नुकसान ६,३३,७०० रुपये झाले. यापैकी ८० टक्के हानी कागदपत्रे व ग्रंथसंग्रह यांच्या नुकसानीमुळे झाली व उरलेली २० टक्के उपकरणे, सामग्री इत्यादींच्या खराबीमुळे झाली.

इतर संस्थांमध्ये एक अपंगांचे अनाथालय व स्त्रिया आणि मुले यांसाठी काढलेली दोन अनाथालये अशा तीन संस्थांचे एकूण ४५,३०० रुपये नुकसान झाले. मंगळवार पेठेतील धर्मादाय रुग्णालयाचे एक लाख रुपयांहून अधिक नुकसान झाले. याशिवाय अनेक खाजगी शिकवणी वर्ग व बालकमंदिरे यांना पानशेत आपत्तीची झळ पोहोचली. परंतु या संस्था लहान असल्याने प्रत्येकी हानी ५०० ते १००० रुपयांच्या दरम्यान आढळली व फक्त पाच संस्थांची प्रत्येकी हानी २००० रुपयांपेक्षा जास्त झाली. या प्रकारच्या एकूण ८७ संस्थांना आपत्तीची झळ पोहोचली आणि त्यांची एकूण हानी ७६,००० रुपये झाली.

तालमी, क्रीडा-मंडळे, अशा संस्थांची हानी प्रत्येकी २०० ते ५०० रुपयांच्या दरम्यान आढळली व सरासरी हानी ३३० रुपये झाली. पाच प्रमुख क्रीडा-मंडळांची हानी प्रत्येकी ३००० रुपयांहून अधिक आढळली. एकूण ५० क्रीडा-मंडळांचे नुकसान होऊन त्यांची एकूण हानी ३४,३०० रुपये झाली.

याशिवाय सहा नाटक आणि संगीत मंडळांची एकूण हानी १२,००० रुपये, चार तंत्रशाळांची १३,८०० रुपये, एका प्रमुख शारीरिक शिक्षण संस्थेची १२,००० रुपये आणि एका राजकीय पक्षाच्या

कार्यालयाची ९००० रुपये हानी झाली. इतर सात संस्थांची ७४,४०० रुपये हानी झाली. वरील १९ संस्थांची एकूण हानी १,२१,२०० रुपये आढळली.

याप्रमाणे शाळा, रुग्णालये, अनाथालये, ग्रंथालये इत्यादी सर्व प्रकारच्या एकूण १७८ आपद्ग्रस्त संस्थांची अंदाजे हानी १४,२८,४०० रुपये झाली.

### देवळे आणि मशिदी यांची हानी

मुठा नदीच्या तीरावर पुणे शहरातील अनेक सुप्रसिद्ध देवालये व काही प्रसिद्ध मशिदी होत्या. १२ जुलैच्या महाप्रलयात संभाजी पुलानजीक नदीच्या उत्तर तीरावर असलेल्या विठ्ठल मंदिराची जबर हानी झाली. इ. स. १७४० ते १७६० या कालावधीत बांधलेले ओंकारेश्वर देवालय हे पुण्यातील फार मोठे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. या देवळाभोवतालच्या प्रशस्त ओवऱ्या, भव्य दीपस्तंभ व प्रचंड दगडी नंदी पाण्याच्या आघाताने कोसळले. या देवालयाच्या हानीचा अंदाज ४०,००० रुपयांपेक्षाही जास्त आहे. नदीच्या उत्तर तीरावरील सिद्धेश्वर व वृद्धेश्वर देवालयांचीही बरीच पडझड झाली. याव्यतिरिक्त नदीच्या दक्षिण तीरावरील विठ्ठल मंदिर, अमृतेश्वराचे मंदिर यांचीही थोडीफार हानी झाली. संगम पुलाजवळील देवालयांच्या समूहाची मोठ्या प्रमाणात हानी होऊन अंदाजे ६६,००० रुपयांचे नुकसान झाले. याशिवाय आपद्ग्रस्त भागातील सुमारे ७० लहान देवळांचे-ही बरेच नुकसान झाले. हानीच्या अंदाजानुसार आपद्ग्रस्त देवालयांच्या संख्येचे विभाजन सारणी क्र. ३.८ मध्ये दिले आहे. सर्व देवालयांचे एकूण नुकसान ८,१२,००० रुपये झाले.

सारणी क्र. ३.८ : आपद्ग्रस्त देवालयांच्या संख्येचे हानीच्या रकमेनुसार विभाजन

| हानी (रु.) | देवालयांची संख्या | एकूण हानी (रु.) |
|---|---|---|
| ०– १,००० | १५ | ११,४०० |
| १,००१– २,००० | १० | १४,६०० |
| २,००१– ३,००० | ५ | १३,५०० |
| ३,००१– ५,००० | १२ | ४५,५०० |
| ५,००१–१०,००० | १६ | ७७,८०० |
| १०,००१–१५,००० | ४ | ५७,५०० |
| १५,००१–२०,००० | ५ | ८६,७०० |
| २०,००१–३०,००० | ५ | १३०,००० |
| ३०,००१–५०,००० | ४ | १७५,००० |
| ५०,००१–आणि अधिक | २ | २००,००० |
| एकूण | ७८ | ८,१२,००० |

पाण्याच्या आघाताने इतिहासप्रसिद्ध शनिवारवाड्याच्या पश्चिम व दक्षिण तटबंदीचा काही भाग कोसळला. या भिंती पूर्ववत करण्यास बरीच दुरुस्ती करावी लागली.

थोरला शेखसल्ला दर्गा व इतर लहान मोठे दर्गे व मशिदी (एकूण १३) यांचे एकूण ३,१७,३०० रुपयांचे नुकसान झाले.

आपद्ग्रस्त देवळे, मशिदी आणि संस्था यांची एकूण हानी २५,५७,७०० रुपये झाली. सारणी क्र. ३.९ मध्ये निरनिराळ्या आपद्ग्रस्त संस्था व धर्ममंदिरे यांची संख्या व हानीचे अंदाज दिले आहेत.

सारणी क्र. ३.९ : संस्था व धर्ममंदिरे यांची एकूण हानी

| संस्था | एकूण संख्या | एकूण हानी (रु.) | संस्थांची प्रतिशतता | प्रतिशतता हानी |
|---|---|---|---|---|
| शाळा व महाविद्यालये | १० | ४,१४,९०० | ३.७२ | १६.२२ |
| ग्रंथालये व संशोधन संस्था | ६ | ६,३३,७०० | २.२३ | २४.७७ |
| अनाथालये | ५ | ४५,३०० | १.८६ | १.७७ |
| रुग्णालये | १ | १,०३,००० | ०.३७ | ४.०३ |
| खाजगी वर्ग व बालकमंदिरे | ८७ | ७६,००० | ३२.३४ | २.९७ |
| क्रीडा-मंडळे व तालमी | ५० | ३४,३०० | १८.५९ | १.३४ |
| इतर संस्था | १९ | १,२१,२०० | ७.०६ | ४.७४ |
| देवळे | ७८ | ८,१२,००० | २९.०० | ३१.७५ |
| मशिदी | १३ | ३,१७,३०० | ४.८३ | १२.४१ |
| एकूण | २६९ | २५,५७,७०० | १००.०० | १००.०० |

## वैयक्तिक मालमत्तेचे नुकसान

पुणे शहरातील लोकवस्ती थेट मुठा नदीच्या काठापर्यंत थडकलेली होती. एवढेच नव्हे तर काही ठिकाणी या वसाहतींनी नदीच्या पात्रातही अतिक्रमण केलेले होते. नदीकाठची पुष्कळशी घरे जुनी होती. पुलाची वाडी, तोफखाना, कसबा पेठ, मंगळवार पेठ या भागांतील तर बरीच घरे मातीची होती. तसेच अनेक झोपड्याही या भागात आढळत. पाण्याच्या तडाख्याने नदीकाठची अनेक घरे व झोपड्या जमिनदोस्त झाल्या. नदीतीरापासून दीड-दोन फर्लांगापर्यंतच्या परिसरातील अनेक कच्च्या इमारतींची मोठ्या प्रमाणात पडझड झाली. आधुनिक पद्धतीच्या पक्क्या इमारती कोसळल्या नाहीत; परंतु पाण्याच्या माऱ्याने त्यांचे कमी अधिक प्रमाणात नुकसान झाले.

नदीकाठालगतच्या इमारतींमधून राहणाऱ्या कुटुंबांना साहजिकच फार मोठी हानी सोसावी लागली. निमिषार्धात त्यांची घरे पाण्याने वेढली गेली आणि सामानसुमान घरांतून काढून सुरक्षित जागी नेण्यास त्यांस अवधी मिळाला नाही. शिवाय पाणी किती चढणार याचा काहीच अंदाज नसल्यामुळे, सामान सुरक्षित जागी म्हणजे कोठे ठेवायचे याविषयीचे लोकांचे अंदाज साफ चुकले आणि सुरक्षित जागी म्हणून ठेवलेले सामानही वाहून गेले. त्यामुळे कुटुंबांची स्थावर व जंगम अशा दोन्ही मालमत्तेची मोठी हानी झाली. या वैयक्तिक मालमत्तेच्या हानीचा अंदाज करण्यासाठी आपद्ग्रस्त कुटुंबांनी मदतीसाठी सादर केलेल्या अर्जांवरील माहितीचा उपयोग करण्यात आला.

## स्थावर मालमत्तेच्या हानीचा अंदाज

स्थावर मालमत्तेच्या हानीचा अंदाज दोन अप्रत्यक्ष पद्धतींनी घेण्यात आला आहे. पहिली पद्धत म्हणजे आपद्ग्रस्त घरांच्या पुनर्बांधणीस जो खर्च येईल त्यावरून हानी किती झाली, हे काढणे

आणि दुसरी पद्धत म्हणजे आपद्‌ग्रस्त मिळकतीची करआकारणीसाठी जी किंमत लावण्यात येत असेल तिचा उपयोग करणे. उपहत घरांच्या पाहणीमध्ये घरातील खोल्यांची संख्या व आपत्तीमुळे किती खोल्यांची पडझड झाली याचा तपशील नोंदविला होता. या माहितीनुसार आपद्‌ग्रस्त घरांचे तीन वर्ग करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे : (१) पूर्णतः पडलेली घरे, (२) अंशतः पडलेली घरे, (३) पडझड झालेली घरे. याप्रमाणे उपहत घरांची तसेच त्यामधील खोल्यांची स्थिती सारणी क्र. ३.१० मध्ये दाखविली आहे. एकूण २३९१ घरांतील २१,४५४ खोल्यांची पडझड झाली. यांपैकी निम्म्या खोल्या पूर्ण पडल्या व उरलेल्या खोल्यांची कमीअधिक प्रमाणात हानी झाली.

सारणी क्र. ३.१० : उपहत घरे आणि खोल्या यांची संख्या व स्थिती

| उपहत घरांची स्थिती | घरांची संख्या | खोल्यांची माध्य संख्या | एकूण खोल्या | एकूण खोल्यांपैकी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्ण पडलेल्या | अंशतः पडलेल्या | विशेष दुरुस्ती-योग्य | किरकोळ दुरुस्ती-योग्य | एकूण खोल्या |
| पूर्णतः पडलेली | ७४२ | ७.२२ | ५३६२ | ५११७ | २२८ | १७ | — | ५३६२ |
| अंशतः पडलेली | ६९० | १०.७५ | ७४२४ | ४७१५ | ७४० | १४०९ | ५६० | ७४२४ |
| किरकोळ पडझड झालेली | ९५९ | १०.९५ | १०४०१ | ११६६ | ५५९ | ४६७३ | २२७० | ८६६८ |
| एकूण | २३९१ | ९.७० | २३१८७ | १०९९८ | १५२७ | ६०९९ | २८३० | २१४५४ |

खोलीच्या पडझडीच्या प्रमाणानुसार नुकसानीचा अंदाज बांधण्यात आला. यासाठी खोलीचा सरासरी आकार १०० चौ. फूट धरला आहे. मोठे दिवाणखाने असल्यास त्यांचा आकार दोन खोल्यां-एवढा धरला आहे. १९६१ मधील बाजारभावाप्रमाणे पक्क्या विटांची, पत्र्याचे छप्पर असलेली १०० चौ. फू. ची खोली बांधण्यास १५०० रुपये खर्च आला असता. हा अंदाज करताना घरांतील जाण्या-येण्याचे मार्ग व संडास-मोऱ्या यांसाठी जी जागा लागते ती जमेत धरलेली आहे. पूर्ण पडलेल्या खोल्यांची हानी पुनर्बांधणीच्या खर्चाएवढी म्हणजे १५०० रुपये धरली आहे. अर्धवट पडलेल्या खोल्यांचे उदा. छप्पर आणि काही भिंती पडलेल्या खोलीची हानी १००० रुपये धरण्यात आली. अर्थात अर्धवट पडलेल्या प्रत्येक खोलीचे नुकसान सारख्याच प्रमाणात झाले असेल असे नाही, तरी ठोकळ-मानाने वरील अंदाज बरोबर ठरेल असे मानण्यास हरकत नाही. ज्या खोल्यांस मोठ्या दुरुस्तीची आवश्यकता होती, त्यांच्याबाबतीत प्रत्येक खोलीची हानी ७५० रुपये झाली असे गृहीत धरले आहे; आणि ज्यांस किरकोळ दुरुस्तीची आवश्यकता होती उदा. जेथे भिंतीचा गिलावा पडला, फरशा उखडल्या, खिडक्यांची तावदाने फुटली किंवा विद्युत्-सामग्री खराब झाली, अशा खोल्यांची हानी अंदाजे २०० रुपये धरण्यात आली आहे. यावरून एकूण उपहत घरांसाठी हानीचे अंदाज तयार करण्यात आले आहेत.

दुसऱ्या पद्धतीमध्ये पुणे महानगरपालिकेकडे असलेल्या प्रत्येक घराच्या निर्धारित किंमतीचा उपयोग करण्यात आला. पूर्ण पडलेल्या घरांची हानी त्यांच्या निर्धारित किंमतीच्या १६ पट धरण्यात आली. अंशतः पडलेल्या घरांच्याबाबतीत व पडझड झालेल्या घरांच्याबाबतीत निर्धारित किंमतीच्या

अनुक्रमे १२ पट व ५ पट हानी झाली असे धरण्यात आले. या दोन अंदाजांशिवाय उपहत घरांच्या पाहणीच्या वेळी घरमालकांनी स्वत:च्या घरांच्या हानीचे जे अंदाज सादर केले होते, त्यांवरून एकूण हानीचा आणखी एक तिसरा अंदाज बांधण्यात आला. स्थावर मिळकतीच्या हानीचे हे सर्व अंदाज सारणी क्र. ३.११ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र. ३.११ : उपहत घरांच्या स्थितीनुसार त्यांमधील खोल्यांच्या हानीचे अंदाज

| उपहत घरांची स्थिती | पुनर्बांधणीच्या खर्चावर आधारित | | निर्धारित किंमतीवर आधारित | | घरमालकांचा अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण हानी (रु.) | सरासरी हानी (रु.) | एकूण हानी (रु.) | सरासरी हानी (रु.) | सरासरी हानी (रु.) |
| पूर्णत: पडलेली | ७९१६२५० | १०६६९ | ५४८६०६० | ७३९३ | २०१८२ |
| अंशत: पडलेली | ८९८१२५० | १३०१६ | ५९०३७७० | ८५५६ | १८६९० |
| पडझड झालेली | ६२६६७५० | ६५३५ | ३९२०७०० | ४०८८ | ७५९० |
| माध्य हानी | — | ९६८८ | — | ६४०३ | १४६९० |
| एकूण हानी | २३१६४२५० | — | १५३१०५३० | — | — |

पुनर्बांधणीचा खर्च विचारात घेता घरांच्या सरासरी हानीचा अंदाज ९६८८ रुपये आढळला व एकूण हानी सुमारे २,३१,६४,२५० रुपये झाली.

पानशेत आपत्तीत पूर्णपणे उद्ध्वस्त झालेल्या व अंशत: पडझड झालेल्या घरांच्या संख्येइतक्याच घरांची पाणी शिरल्यामुळे खराबी होऊन अंदाजे १६,५६० खोल्या भिजल्या. या खोल्यांस रंग देणे किंवा त्यांची किरकोळ दुरुस्ती करणे, यासाठी प्रत्येक भिजलेल्या खोलीमागे ५० रुपये खर्च धरला, तर एकूण भिजलेल्या खोल्यांचे नुकसान ८,२८,००० रुपये होते. याव्यतिरिक्त राहण्याशिवाय इतर उपयोगांसाठी ज्या इमारती वापरल्या जात होत्या त्यांचीही हानी झाली. अशा प्रकारच्या अंदाजे ६८२ इमारती पाण्याच्या तडाख्यात सापडल्या आणि १०२३ खोल्यांचे नुकसान झाले. या इमारतींच्या पुनर्बांधणीस १०,२३,००० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

पानशेत आपत्तीत सुमारे २००० झोपड्या आणि इतर तात्कालिक स्वरुपाच्या छपऱ्या उद्ध्वस्त झाल्या. प्रत्येक झोपडीचा पुनर्बांधणीचा खर्च २०० रुपये मानला, तर एकूण हानी ४,००,००० रुपये होईल. इमारतींच्या हानीच्या अंदाजात ही हानी मिळविली असता स्थावर मिळकतीची एकूण हानी अंदाजे २,५४,१५,२५० रुपये होते.

सरकारतर्फे स्थावर मिळकतीच्या हानीचा अंदाज २,५७,५९,८०० रुपये करण्यात आला होता. यामध्ये औद्योगिक इमारती, मोठ्या संस्था, देवळे वगैरेंच्या इमारतींची हानी अंतर्भूत आहे. वरील अंदाजातून या इमारतींच्या हानीचा अंदाज वगळला तर सरकारी अंदाज आणि पुनर्बांधणीच्या खर्चा-वर आधारित अंदाज यांमध्ये फारशी तफावत पडत नाही.

**जंगम मिळकतींची हानी**

जंगम मिळकतीच्या हानीचा अंदाज काढण्यासाठी आपद्ग्रस्त कुटुंबांची एकूण संख्या प्रथम निश्चित करणे आवश्यक आहे. उपहत घरांच्या पाहणीमध्ये त्या त्या घरांतून राहणाऱ्या कुटुंबांची माहिती मिळविली होती. याशिवाय आपद्ग्रस्त कुटुंबांनी मदतीसाठी जे अर्ज केले होते त्यावरूनही कुटुंबांची माहिती घेतली होती. या माहितीची तुलना करून जेथे तफावत आढळली त्या कुटुंबांच्या बाबतीत माहिती पडताळून पाहण्यात आली. पाहणीमध्ये ज्या घरांतून पाणी शिरले होते, पण ज्यांची पडझड झाली नव्हती, अशी घरे अंतर्भूत केलेली नव्हती. तेव्हा महानगरपालिकेने तयार केलेली यादी, मदत-अर्जावरील माहिती व प्रत्यक्ष पाहणी यांचा उपयोग करून पाणी शिरलेल्या पण पडझड न झालेल्या घरांची यादी तयार करण्यात आली. या घरांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांची माहिती महानगरपालिकेकडील जिंदगी तपासणी पुस्तकातून घेतली. ही माहिती मदत-अर्ज आणि प्रत्यक्ष निरीक्षण यांच्या साहाय्याने पडताळून पाहिली. जिंदगी तपासणी पुस्तकात पोटभाडेकरूंचा समावेश होत नसल्याने उपहत घरांमध्ये भाडेकरू व पोटभाडेकरू यांचे जे प्रमाण आढळले त्याचा उपयोग करून पोटभाडेकरूंची संख्या काढली. तट्ट्याच्या व पत्र्याच्या झोपड्यांतून राहणाऱ्या लोकांची संख्या ठरविण्यासाठी त्या त्या जागांना भेट दिली व महानगरपालिकेकडील नोंदींचाही उपयोग केला. झोपड्यांची संख्या बरीचशी निश्चित रीतीने कळू शकली तरी त्यामध्ये राहणाऱ्या कुटुंबांची संख्या हा ढोबळ अंदाजच म्हटला पाहिजे. वरील माहितीच्या आधारे निरनिराळ्या पेठांतील आपद्ग्रस्त कुटुंबांच्या संख्येचा अंदाज बांधला. एकूण अंदाजे २६,६२५ कुटुंबांना पानशेत आपत्तीत नुकसानी सोसावी लागली. आपद्ग्रस्त कुटुंबांपैकी ६० टक्के कुटुंबे, शिवाजीनगर, कसबा, शनिवार व नारायण या चार पेठांमधील होती.

आपद्ग्रस्त कुटुंबांचे सामानसुमान उदा. फर्निचर, भांडी, कपडे, मौल्यवान वस्तू आणि महत्त्वाचे कागदपत्र पाण्याच्या लोंढ्याबरोबर वाहून गेले अथवा घराच्या अवशेषांखाली गाडले गेले व मातीमोल झाले. घरांतील धान्ये व इतर पदार्थ कुजून गेले. रेडिओ, घड्याळे, शिवणयंत्रे इत्यादी किंमतवान वस्तू नादुरुस्त झाल्या. असंख्य कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले, पिढ्यान्‌पिढ्या बचत करून जमा केलेली चीजवस्तू धुळीस मिळाली. अशा वैयक्तिक मालमत्तेच्या हानीचा अंदाज घेण्यासाठी मदत-अर्जावरील माहितीचा उपयोग केला आहे. ही माहिती आपद्ग्रस्त कुटुंबांतील सुमारे ५० टक्के कुटुंबांकडून मिळाली होती. या माहितीच्या आधारे एकूण कुटुंबांच्या हानीची स्थूलमानाने कल्पना येऊ शकेल. आपद्ग्रस्त कुटुंबांनी दिलेल्या हानीचे अंदाज आत्मनिष्ठ असण्याचा संभव असल्याने हे अंदाज वैयक्तिक जंगम हानीची कमाल मर्यादा दर्शवितील. सारणी क्र. ३.१२ मध्ये जंगम मालमत्तेच्या सरासरी हानीचे अंदाज निरनिराळ्या पेठांनुसार दाखविले आहेत. सर्व कुटुंबांची मिळून सरासरी हानी ११४६ रुपये झाली.

आपद्ग्रस्त कुटुंबांच्या मासिक उत्पन्नानुसार सरासरी हानी पाहता असे आढळते की, ४८ टक्के कुटुंबांच्या बाबतीत (मासिक उत्पन्न ०–१०० रुपये) सरासरी हानी ६०० रुपये होती. मासिक उत्पन्न १०१–२०० रुपये असलेल्या कुटुंबांची (४० टक्के कुटुंबे) सरासरी हानी ११२७ रुपये, २०१ ते ३०० रुपये उत्पन्न असलेल्या कुटुंबांची (९ टक्के कुटुंबे) १९५३ रुपये व उरलेल्या कुटुंबांची सरासरी हानी ३९३१ रुपये आढळली.

सारणी क्र. ३.१२ : आपद्ग्रस्त कुटुंबांची पेठवार संख्या व सरासरी हानी

| निवासस्थान | कुटुंबांची संख्या | कुटुंबांची प्रतिशतता | कुटुंबांची सरासरी हानी (रु.) |
|---|---|---|---|
| मंगळवार | २३४५ | ८.८ | ९३९ |
| सोमवार | १८२० | ६.८ | ६३५ |
| कसबा | ४१२२ | १५.५ | १०१० |
| पूर्वेकडील इतर पेठा | १२२५ | ४.६ | ६३५ |
| शनिवार | ३८१७ | १४.३ | १५३० |
| नारायण | ३३०७ | १२.४ | १३६८ |
| सदाशिव | १२१२ | ४.६ | ५०३ |
| शिवाजीनगर | ४५१६ | १७.० | १६१५ |
| एरंडवणे | ६८८ | २.६ | ७३५ |
| उपनगरीय क्षेत्र | ९५३ | ३.६ | ४७६ |
| झोपडपट्टी | २६२० | ९.८ | ३४४ |
| एकूण | २६६२५ | १००.० | ११४६ |

प्रत्येक उत्पन्न-वर्गात सरासरी हानी उत्पन्नाच्या साधारणपणे सहा पट आढळली. प्रत्येक पेठेतील आपद्ग्रस्त कुटुंबांच्या सरासरी हानीच्या रकमेला त्या त्या पेठेतील एकूण आपद्ग्रस्त कुटुंबांच्या संख्येने गुणून जंगम मालमत्तेच्या एकूण हानीचा अंदाज काढण्यात आला. याप्रमाणे एकूण हानी ३,०५,१२,२५० रुपये झाली.

पानशेत आपत्तीमुळे झालेल्या एकूण हानीचे आकडे सारणी क्र. ३.१३ मध्ये दाखविले आहेत. या सारणीवरून असे दिसते, की आपत्तीमुळे झालेली प्रत्यक्ष हानी तेरा कोटी रुपयांहून अधिक होती. यापैकी ४२ टक्के हानी सरकारी मालमत्तेची आणि उरलेली ५८ टक्के हानी खाजगी मालमत्तेची होती.

### अप्रत्यक्ष नुकसान

पानशेत आपत्तीमुळे काही खास बाबींवर बराच खर्च करावा लागला. उदा. रस्त्यांतील चिखल व गाळ खरडून काढणे, मातीचे व राडेरोड्यांचे ढिगारे हलविणे, भिजलेले धान्य व सडलेले पदार्थ हलवून निर्जन्तुक करणे, आपद्ग्रस्त विभागांत कीटकनाशक औषधे टाकणे, पटकी, विषमज्वर प्रतिबंधक लस टोचण्याची व्यवस्था करणे, जलवाहकांमार्फत पाणी पोहोचविणे इत्यादी. पानशेत आपत्तीमुळे जे नुकसान झाले, त्यामध्ये या खर्चाचा समावेश केला पाहिजे. यासाठी महानगरपालिकेने एकूण ३,३५,००० रुपये खर्च केले. याशिवाय या कामांत सरकारी खाती व सैनिक यांनी मदत केली. सरकारमार्फत सुमारे ३,३०,००० रुपये खर्च करण्यात आले.

पुणे शहरासाठी तात्पुरता पाणीपुरवठा चालू करण्याच्या ज्या योजना पार पाडण्यात आल्या त्यावरील खर्चही विचारात घेणे आवश्यक आहे. आपत्तीनंतर लगेच शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी जवळपासचे ओढे वळवून मुठा नदीच्या उजव्या कालव्यास जोडण्यात आले. हे काम लष्कराने केले.

सारणी क्र. ३.१३ : सार्वजनिक व खाजगी मालमत्तेच्या नुकसानीचा अंदाज

| | एकूण हानी (रु.) | प्रतिशतता हानी |
|---|---|---|
| **सार्वजनिक** | | |
| *राज्य-सरकार* | | |
| खडकवासला धरण | १,५०,००,००० | ११.१० |
| पानशेत धरण | ३,५०,००,००० | २५.९२ |
| इतर मालमत्ता | ५३,१२,००० | ३.९३ |
| *केंद्र-सरकार* | ३,५५,००० | ०.२६ |
| *पुणे महानगरपालिका* | १५,६२,६०० | १.१६ |
| **खाजगी** | | |
| पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी | ३,५०,००० | ०.२६ |
| उद्योगधंदे | १,९०,०६,८०० | १४.०७ |
| संस्था | २५,५७,७०० | १.८९ |
| वैयक्तिक मालमत्ता | | |
| स्थावर | २,५४,१५,२५० | १८.८१ |
| जंगम | ३,०५,१२,२५० | २२.६० |
| एकूण | १३,५०,७१,६०० | १००.०० |

पण यासाठी किती खर्च आला यासंबंधीची माहिती मिळू शकली नाही. मुळशी योजनेसाठी ११७ लाख रुपये भांडवली खर्च आला. यापैकी ४५ लाख रुपये हे मुळशी योजनेत वापरलेल्या नळांचे नाशरक्षण मूल्य म्हणून वजा घालविता उरलेले ७२ लाख हा या योजनेचा भांडवली खर्च होतो. योजनेच्या चालू खर्चामध्ये घसारा, भांडवलावरील व्याज, विठ्ठलवाडीजवळील, मुळशी येथील आणि औंधजवळील जलकर्षक चालविण्याचा खर्च यांचा समावेश होतो. यासाठी वार्षिक खर्च सुमारे २० लाख रुपये येतो, म्हणजे १९६१-६५ या चार वर्षांचा खर्च ८० लाख रुपये होतो. टाटा पॉवर कंपनीला दर परिमाणामागे ३ पैसे मोबदला द्यावा असे ठरले होते. त्याचा वार्षिक खर्च ९ लाख रुपये येतो. परंतु कंपनीने अजून मोबदला प्रत्यक्ष घेतलेला नाही. तात्पुरत्या पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेचा एकूण खर्च म्हणजे भांडवली खर्च व चालू खर्च मिळून १५२ लाख रुपये झाला. पानशेत आपत्तीमुळे राज्य-सरकारला हा खर्च करावा लागला असल्याने त्याचा समावेश नुकसान या सदरात करणे आवश्यक आहे.

## ग्रामीण भागात झालेले नुकसान

मुठा नदीच्या दोन्ही तीरावर वसलेल्या खेडेगावांना पानशेत आपत्तीत मोठे नुकसान सोसावे लागले. कुरण, मालखेड, कोंढवेधावडे, शिवणे, नांदेड, खराडी, कोळवडी, इत्यादी सुमारे तीस खेडी पाण्याच्या लोंढ्यात सापडली. कुरण, कोंढवेधावडे, शिवणे, नांदेड वगैरे खेड्यांतील अंदाजे ४०० घरे नष्ट झाली. प्रत्येक घराची पुनर्बांधणीची किंमत १००० रुपये धरल्यास ग्रामीण भागातील स्थावर मिळकतीच्या हानीचा अंदाज सुमारे ४,००,००० रुपये होतो. अंदाजे १३०० ग्रामीण कुटुंबांना

आपत्तीची झळ पोचली. जंगम मालमत्तेचे प्रत्येकी सरासरी नुकसान ५०० रुपये धरले तर एकूण नुकसान ६,५०,००० रुपये होईल.

याव्यतिरिक्त शेतजमीन आणि पिके यांचेही बरेच नुकसान झाले. भात, ऊस यांसारखी उभी पिके वाहून गेली. भाजीपाला आणि फळे यांच्या मळ्यांची अतोनात हानी झाली. कित्येक एकर जमीन लागवडीस अयोग्य बनली.

शेतजमीन आणि पिके यांची हानी काढण्यासाठी १९६१ साली निरनिराळ्या पिकांखाली किती एकर जमीन होती याचे आकडे सरकारी दप्तरातून घेण्यात आले. प्रत्येक पिकाच्या सरासरी वार्षिक नक्त उत्पन्नावरून दर एकरी किती नुकसान झाले हे काढण्यात आले. निरनिराळ्या पिकांखालील जमीन व पिकांच्या नुकसानीचा अंदाज सारणी क्र. ३.१४ मध्ये दिले आहेत.

सारणी क्र. ३.१४ : आपत्तीत नष्ट झालेले पिकांखालील क्षेत्र व हानीचा अंदाज

| पीक | पिकाखालील क्षेत्र (एकर) | दर एकरी नुकसान (रु.) | एकूण नुकसान (रु.) |
|---|---|---|---|
| भात | ९०० | ८० | ७२,००० |
| भाजीपाला | १५०० | १०० | १,५०,००० |
| फळे | ६५० | ५०० | ३,२५,००० |
| एकूण | ३०५० | | ५,४७,००० |

याप्रमाणे उभ्या पिकांच्या हानीचा अंदाज जवळजवळ साडेपाच लाख रुपये होतो. शेतजमीन पुन्हा लागवडीयोग्य करण्यासाठी जो भांडवली खर्च आला तो यामध्ये धरलेला नाही.

नदीकाठची शेतजमीन धूप झाल्याने व चिखल साचल्यामुळे लागवडीस अयोग्य बनली. याप्रमाणे नुकसान पोहोचलेली जमीन तसेच शेतावरील नादुरुस्त अवजारांची संख्या पुढे दिली आहे.

| | |
|---|---|
| पूर्णपणे धुपून गेलेली जमीन | २०४ एकर |
| पुन्हा लागवडीयोग्य होण्यासारखी जमीन | ७३५ एकर |
| गाळाने भरून गेलेल्या विहिरींची संख्या | ५२ |
| नादुरुस्त झालेल्या जलकर्षकांची संख्या | ३४ |

जमिनीच्या हानीचा अंदाज सुमारे ४,८३,००० रुपये होतो. विहिरी व जलकर्षक निकामी किंवा नादुरुस्त झाल्यामुळे किती नुकसान झाले याबद्दल निश्चित माहिती मिळू शकली नाही.

शेतीची कामे तसेच मुठा नदीच्या उजव्या तीरावरील कालव्याचे बांधकाम बंद पडल्याने बरेच मजूर बेकार झाले. अनेक महिने त्यांचे काम बंद राहिल्याने त्यांना मोठे नुकसान सोसावे लागले. अशा तऱ्हेने कितीजण बेकार झाले, त्यांतील किती जणांना इतर काम मिळाले वगैरे माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

पानशेत आपत्तीमुळे कृषिजीवनावर जसे तात्कालिक तसे दूरगामीही परिणाम घडून आले. विशेषतः कालव्याच्या पाण्यावर जी पिके अवलंबून होती त्यांच्या मळावरच घाव घातला गेला

मुठा नदीच्या कालव्यावर एकूण सुमारे १३,५०० एकर जमीन भिजत होती. यापैकी ७० टक्के एकर जमिनीत गहू, ज्वारी, बाजरी इत्यादी अन्नधान्ये काढली जात. १८५० एकर जमिनीत भाजीपाला लावला जात असे. ७०० एकरांत फळे, ८५० एकरांत चारा व सुमारे ४५० एकरांत भुईमूग, कापूस, मिरची ही पिके निघत. कालव्याच्या पाण्यावर दरवर्षी सुमारे ५० लाख रुपये किंमतीची पिके निघत असत. सिंचनाचे पाणी बंद पडल्यामुळे या जमिनीवर फक्त हंगामी जिराईत पिकेच निघणे शक्य झाले. हंगामी जिराईत पिके घेतल्यास या जमिनीपासून सुमारे १३ लाख रुपयांचा माल दरवर्षी हाती येईल. त्यामुळे दरवर्षी ३७ लाख रुपयांचे अंदाजे नुकसान झाले. १९६१–६५ या चार वर्षांत हे नुकसान एकूण एक कोटी अठ्ठेचाळीस लाख रुपये झाले.

वरील पिकांशिवाय उसाच्या पिकाचेही बरेच नुकसान झाले. या भागात बहुतेक ऊस विहिरीच्या पाण्यावर काढला जात असे. कालव्यांच्या पाझरणीवर सभोवतालच्या विहिरींचा पाणीपुरवठा काही अंशी अवलंबून असल्याने कालव्यातून येणारे पाणी बंद झाल्यावर विहिरींमधील पाण्याच्या साठ्यातही घट झाली. मुठा कालव्याच्या आसपास असलेल्या खेडेगावांमध्ये १९६०-६१ साली उसाखाली सुमारे ३४०० एकर जमीन असल्याचे गाव-दप्तरांमधील नोंदीवरून समजले. १९६३-६४ मध्ये हे क्षेत्र फक्त २०५० एकर होते. म्हणजे उसाखालील जमिनीत क्रमशः १३५० एकरांची घट झाली. उसाच्या लागवडीपासून दरएकरी दरवर्षी २५०० रुपये एकूण उत्पन्न धरल्यास उसाच्या लागवडीत घट झाल्यामुळे चार वर्षांत सुमारे सत्तर लाख रुपये नुकसान होते.

सारणी क्र. ३.१५ मध्ये स्थावर व जंगम मिळकतीची हानी तसेच शहराचे आरोग्य व पाणीपुरवठा यांवर झालेला खर्च आणि शेतीची हानी सारांशरूपाने दिलेली आहे.

सारणी क्र. ३.१५ : पानशेत आपत्तीतील एकूण हानीचा अंदाज

| हानीचे स्वरूप | एकूण हानी (रु.) |
|---|---|
| सार्वजनिक मालमत्ता | ५,७२,२९,६०० |
| पुण्यातील खाजगी मालमत्ता | ७,७८,४२,००० |
| ग्रामीण भागातील खाजगी मालमत्ता | २,३८,८०,००० |
| पाणीपुरवठा योजनेवरील खर्च | १,५२,००,००० |
| स्वच्छता व आरोग्य यांवरील खर्च | ६,६५,००० |
| एकूण हानी | १७,४८,१६,६०० |

पानशेत आपत्तीमुळे झालेल्या एकूण हानीचा अंदाज सतरा कोटी रुपयांहून अधिक होतो. या हानीमध्ये १९६५–६६ पर्यंतचे प्रतिवर्षी चालू राहणाऱ्या खर्चाचे अंदाज अंतर्भूत केले आहेत. जोपर्यंत मुळशी धरणातून होणारा पाणीपुरवठा चालू राहणार व जोपर्यंत शेतजमिनींना पूर्वीसारखे सिंचनाचे पाणी मिळणार नाही तोपर्यंत हा एकूण हानीचा आकडा वाढत जाईल.

उद्योगधंदा बंद ठेवावा लागल्यामुळे किंवा रोजगार बुडाल्यामुळे जी व्यावसायिक व वैयक्तिक हानी झाली ती वरील अंदाजात अंतर्भूत नाही. नित्याचे जीवन विस्कळित झाल्यामुळे असंख्य कुटुंबांना

ज्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या त्याचे मूल्यमापन रुपयांत करणे शक्य नाही. आपद्ग्रस्त कुटुंबांना आपत्तीपूर्वीची सांपत्तिक स्थिती व मानसिक स्वास्थ्य प्राप्त होईपर्यंत पानशेत आपत्तीचे दुष्परिणाम भोगावे लागणारच. अनेकांना आपली संकल्पित कार्ये करणे अशक्य झाले अथवा ती पुढे ढकलावी लागली. स्वतःच्या मुलाबाळांबद्दलच्या जबाबदाऱ्या विशेषतः त्यांचे शिक्षण करणेही जर अशक्य झाले असेल, तर त्याचे परिणाम दूरगामी होतील यात शंका नाही. तीच गोष्ट शेतकऱ्यांची. पाणीपुरवठा बंद पडल्यामुळे त्यांची सांपत्तिक स्थिती खालावत जाऊन त्याचे परिणाम मुठा नदीच्या परिसरातील आर्थिक जीवन व उत्पादन यांवर झाल्याशिवाय राहणार नाहीत.

# तात्कालिक उपाय आणि साहाय्य

पानशेत प्रलयामुळे पुण्यातील नागरिकांचे जीवन पूर्णतया विस्कळित झाले आणि अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले. आपत्तीनंतर निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी ज्या उपाययोजना अमलात आणण्यात आल्या त्याचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

## शहराची साफसफाई

पानशेत आपत्तीत जलमय झालेल्या विभागांत जागोजागी दगडविटांचे ढिगारे जमले होते व चिखलाचे थर साचले होते. रस्त्यांतील अडथळे दूर करून रस्ते साफ करण्याबाबत १४ जुलैपर्यंत कोणतीच पद्धतशीर उपाययोजना केली गेली नव्हती. या कामी लष्कराची मदत घ्यावी असा निर्णय १४ जुलै रोजी घेण्यात आला. लष्कराने कामाचा ताबा घेतल्यावर साफसफाईचे काम वेगाने सुरू झाले. रस्त्यांतील अडथळे दूर करून रस्ते साफ करणे, धोकादायक इमारती पाडणे, वगैरे कामांवर सुमारे ५,००० सैनिकांची योजना करण्यात आली व या कामासाठी यंत्रांची योजना करण्यात आली. त्यामुळे काम वेगाने होऊ लागले. २० जुलैपर्यंत हमरस्ते व प्रमुख चौक यांमधील अडथळे दूर करण्यात आले. नदीकाठच्या भागातील अरुंद रस्ते व गल्लीबोळ येथील अडथळे दूर होण्यास मात्र जास्त कालावधी लागला. २७ जुलैला स्वच्छतेच्या कामावरून लष्कर काढून घेण्यात आले. त्यानंतर शहरातील घाण हलविण्याचे काम महानगरपालिकेच्या संबंधित विभागांनी पूर्ण केले. घरे, दुकाने, कार्यालये वगैरे स्वच्छ करण्याचे काम बहुश: वैयक्तिकरीत्या केले गेले. काही ठिकाणी या कामात सामाजिक संघटनांच्या स्वयंसेवकांनी आपद्ग्रस्त कुटुंबांना हातभार लावला.

## आरोग्य

आपद्ग्रस्त विभागांत कुजलेले अन्नधान्य, केरकचरा इत्यादी साचले होते. विशेषत: जुना तोफखाना भागातील सरकारी गुदामांतील हजारो पोती धान्य कुजून गेल्यामुळे वातावरण दुर्गंधीमय झाले होते. परिणामी शहरामध्ये माश्यांचा फार मोठा प्रादुर्भाव झाला होता. यामुळे साथीचे रोग पसरण्याचा धोका निर्माण झाला. नागरिकांच्या आरोग्यास असलेला हा धोका लक्षात घेऊन शहरात सुमारे ७० ठिकाणी विषमज्वर व पटकी प्रतिबंधक लस टोचण्याची व्यवस्था करण्यात आली. खाजगी डॉक्टरांकडेही लस टोचण्याची व्यवस्था केली गेली. आपत्तीनंतर पंधरा दिवसांतच सुमारे तीन लाख लोकांनी लस टोचून घेतल्याचे सांगण्यात आले. या तत्परतेमुळे रोगराईचा धोका टळला व कोणतीही साथ उद्‌भवली नाही.

## पुलांची दुरुस्ती

संभाजी पूल आणि जुना रेल्वे पूल या दोन्ही पुलांवरील रस्ते, कठडे, दिवे वगैरे सर्व वाहून गेले होते, व फक्त कमानी शिल्लक राहिल्या होत्या. संगम पुलाच्या तर दोन कमानीच कोसळल्या होत्या. त्यामुळे शहराच्या दोन भागांमधील रहदारी एकट्या शिवाजी पुलावरून होत होती.

संभाजी पूल व जुना रेल्वे पूल यांच्या दुरुस्तीचे काम लष्कर, महाराष्ट्र सरकारचे बांधकाम खाते आणि पुणे महानगरपालिका यांनी पार पाडले. १५ जुलै रोजी या कामास सुरुवात झाली आणि एका आठवड्यात पुलावर कच्चे रस्ते तयार करण्यात आले. त्यामुळे पुलांवरून पादचाऱ्यांची रहदारी सुरू झाली. ऑगस्टच्या सुरुवातीपर्यंत पुलांवर खडीचे रस्ते तयार होऊन हलक्या वाहनांना पूल खुले करण्यात आले. डांबरी रस्ते तयार होण्यास मात्र सहा महिने लागले. संगम पुलाच्या दोन कमानी नवीन बांधाव्या लागल्यामुळे तो पूल दुरुस्त होऊन वाहतुकीस खुला होण्यास जवळजवळ दीड वर्षाचा कालावधी लागला.

## वीज आणि दूरध्वनी

पाण्याच्या लोंढ्यामुळे रस्त्यावरील विजेचे खांब, तारा, दिवे यांची बरीच मोडतोड झाली होती. काही ठिकाणी विद्युत्-उपकेंद्रांतून पाणी शिरल्यामुळे आतील यंत्रसामग्रीस धोका पोचला होता. दूरध्वनीचे खांब व तारा तुटल्या होत्या. संभाजी व संगम पुलांवरून जाणाऱ्या विजेच्या व संदेशवाहक ताराही नष्ट झाल्या होत्या.

१४ जुलैपासून दुरुस्तीचे काम सुरू झाले. जुन्या रेल्वे पुलावर नवीन विद्युत्-वाहक तारा टाकण्यात आल्या. जुलै अखेरपर्यंत प्रत्यक्ष आपद्ग्रस्त विभाग वगळून इतर सर्व भागांत वीजपुरवठा होऊ लागला. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात आपद्ग्रस्त विभागांतील रस्त्यांवरील दिवे बसवून झाले. आपद्ग्रस्त विभागांत घरांतून वीजपुरवठा सुरू होण्यास आणखी एक आठवडा लागला. जुलै अखेरीस दूरध्वनी यंत्रणाही सुरळीतपणे सुरू झाली.

## पाणीपुरवठा

खडकवासल्याचा तलाव पूर्णतः रिकामा झाल्यामुळे शहराचा पाणीपुरवठा बंद पडला. शहरास पाणीपुरवठा करणारी यंत्रणा निकामी झाल्यामुळे जुनी पेशवेकालीन पाणीपुरवठा व्यवस्था व काही जुन्या विहिरी यांतूनच फक्त पाणी मिळणे शक्य होते. त्यामुळे हौदांवर व विहिरींवर लोकांची झुंबड उडाली असल्यास नवल नाही. बादलीभर पाणी मिळविण्यासाठी अनेकांना लांब रांगा लावून तासन्‌-तास तिष्ठत राहावे लागे. शहरातील अनेक विभागांत हौद व विहिरींचा अभाव असल्याने तेथील लोकांची परिस्थिती तर फारच बिकट झाली होती. तात्पुरता उपाय म्हणून महानगरपालिकेने कात्रज तलावातून पाणी पुरविण्याचे ठरविले आणि यासाठी ४१ जलवाहकांची योजना केली. पण शहराच्या निरनिराळ्या भागांत पाणीपुरवठा करण्यासाठी ही संख्या अत्यंत अपुरी पडली. आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी जी मदत-केंद्रे उघडण्यात आली होती तेथे तर पाण्याची टंचाई अधिकच जाणवली. पाण्याच्या या भयानक टंचाईमुळे शहरातील आरोग्य बिघडण्याचा धोका निर्माण झाला. तसेच घरे व आवारे स्वच्छ करणेही फार जिकिरीचे झाले. १५ जुलैपर्यंत दररोज शहरास फक्त ४० लाख गॅलन पाणी-

पुरवठा होत होता. धरण फुटण्यापूर्वी शहराचा रोजचा पुरवठा सुमारे तीन कोटी गॅलन होता हे लक्षात घेतले म्हणजे पाण्याच्या टंचाईचे स्वरूप स्पष्ट होईल.

१६ जुलै रोजी आंबील ओढ्यावर जलकर्षक बसवून ओढ्यातील पाणी मुठा नदीच्या उजव्या तीराच्या कालव्यात सोडण्यात आले. या जादा पुरवठ्यामुळे एकूण ६० लाख गॅलन पाणी पुरविणे शक्य झाले. पावसाळा असल्याने इतर ओढ्यांनाही पाणी होते, तेव्हा आसपासच्या काही ओढ्यांचे पाणी वळवून मुठेच्या उजव्या तीराच्या कालव्यात सोडावे अशा सूचना तज्ज्ञ मंडळींकडून पुढे आल्या. याप्रमाणे खडकवासल्याजवळील किरकटवाडी नाल्याचे पाणी वळविण्याचे काम १८ जुलैपर्यंत पूर्ण झाले. हे पाणी उपलब्ध झाल्यामुळे एकूण पुरवठा ७० लाख गॅलनवर गेला. लष्कराच्या मदतीने वडगाव नाल्याचे पाणीही वळविण्यात येऊन हा नाला मुठेच्या उजव्या तीराच्या कालव्यास जोडण्यात आला. २१ जुलैपासून या नाल्याचे पाणी मिळू लागल्यामुळे एकूण पाणीपुरवठा दररोज ९० लाख गॅलनवर गेला. कात्रज तलावातून ६० लाख गॅलन व दोन्ही नाल्यांतून सुमारे ३० लाख गॅलन पाणी उपलब्ध होत होते. याशिवाय शहराच्या निरनिराळ्या भागांतील सुमारे ३५० विहिरी चालू करण्यात आल्या आणि त्यांपैकी काहींवर जलकर्षक बसविण्यात आले.

शिवाजीनगर आणि एरंडवणे भागाकडे पाणी वाहून नेणारे नळ उद्ध्वस्त झाल्याने या भागास नळाचे पाणी पुरविणे अशक्य झाले होते. मदत-केंद्रांवर व शहरातील उंच पातळीवरील भागांत पाण्याचा तुटवडा अतिशयच जाणवे. अशा भागांना जलवाहकांद्वारे पाणीपुरवठा चालू होता.

या सर्व योजना फारच तात्कालिक स्वरूपाच्या होत्या. पावसाचा जोर कमी झाल्याबरोबर ओढे आटून त्यांपासून मिळणारे पाणी बंद झाले असते. यामुळे दुसरी काही उपाययोजना त्वरित हातात घेणे आवश्यक होते. म्हणून मुठा नदीवर पाणी खेचण्याची व्यवस्था करून नदीच्या पात्रातून पाणी घ्यावे असे ठरविण्यात आले. विठ्ठलवाडीजवळ मुठा नदीवर जलकर्षक बसवून पाणी उजव्या तीराच्या कालव्यात सोडण्यात आले. याप्रमाणे २ सप्टेंबरपासून नदीतील पाणी मिळू लागले व एकूण पुरवठा दररोज १ कोटी गॅलनवर गेला. नदीतून पाणी उपलब्ध झाल्यावर कात्रज तलावातून जलवाहकांद्वारे पुरविण्यात येणारे पाणी २१ सप्टेंबरपासून बंद करण्यात आले. नदीच्या पात्रातील पाणी वरच्या पातळीत ठेवण्यासाठी ऑक्टोबरमध्ये विठ्ठलवाडीजवळ पात्रात एक बंधारा बांधण्यात आला.

पावसाळा संपल्यावर नदी आटणार आणि बंधाऱ्याजवळील पात्रातील पाण्याची पातळी खाली जाणार हे उघड होते. म्हणजे जानेवारी ते जून या महिन्यांत पाणीपुरवठ्याचा प्रश्न अतिशयच बिकट होणार होता. तेव्हा या महिन्यात पाण्याची तरतूद व्हावी या दृष्टीने मुळशी योजना सुचविण्यात आली. पुण्याच्या पश्चिमेस २६ मैलांवर बांधलेल्या मुळशी तलावातून पुण्यापर्यंत पाणी आणणे शक्य आहे असे दिसून आले. मुळशी धरणातून पाणी मिळविण्यासाठी टाटा पॉवर कंपनीची परवानगी मिळणे आवश्यक होते. २६ जुलै रोजी कंपनीने अनुमती दिल्याचे वृत्त आले.

ऑगस्ट १९६१ मध्ये मुळशी योजनेच्या कामास सुरुवात होऊन डिसेंबरमध्ये या योजनेचे काम पूर्ण झाले. मुळशी तलावातून पाणी घेण्यासाठी पुढीलप्रमाणे योजना केली गेली. प्रथम मुळशी तलावातून पाणी खेचून ते मुळा नदीत सोडले. मुळा नदीचा प्रवाह औंध येथे बंधारा बांधून अडविला व तेथे नदीच्या पात्रातून पाणी खेचण्याची व्यवस्था केली. खेचलेले पाणी मोठ्या नळांतून औंधला राजभवनाजवळ आणून तेथे शुद्ध केले व तेथून चतुःशृंगी टेकडीच्या पायथ्याशी बांधलेल्या

एका मोठ्या हौदात (संचयशक्ती १० लाख गॅलन) साठविले आणि चतु:श्रृंगीपासून २७ इंच व्यासाच्या नळांच्या साहाय्याने पुणे शहर व लष्कर विभागाकडे पाणी नेण्याची व्यवस्था करण्यात आली. मुळशी तलावातून दररोज सुमारे दोन कोटी पन्नास लाख गॅलन पाणी पुण्यास मिळण्याची व्यवस्था झाली. हा पुरवठा शहर विभाग आणि लष्कर व खडकी भाग यांमध्ये जवळजवळ सारख्या प्रमाणात विभागण्यात आला. खडकवासल्याचे धरण फुटण्यापूर्वी पुणे शहरास जितके पाणी मिळत होते त्याच्या सुमारे तीनचतुर्थांश पाणीपुरवठा होण्याची सोय झाली. डिसेंबर ते जून या महिन्यांत पाण्याचा पुरवठा मुळशी धरणातून व्हावा व पावसाळ्याचे चार महिने नदीतून व ओढ्यातून मिळणारे पाणी वापरावे असे ठरविण्यात आले. धरणे पुन्हा बांधून पुरी होईपर्यंत हीच व्यवस्था चालू ठेवणे अपरिहार्य होते.

## निवाऱ्याच्या शोधात

१२ जुलैला संध्याकाळी शहरातून पाणी मागे हटण्यास सुरुवात झाल्याबरोबर घरेदारे सोडून बाहेर पडलेले नागरिक आपापल्या घराकडे परत फिरू लागले. परंतु अनेकांना आपल्या संसाराची धूळदाण झाल्याचेच दृश्य दिसले. घरादाराची अक्षरशः माती झाल्यामुळे अन्यत्र निवारा शोधण्याशिवाय त्यांना तरणोपायच उरला नव्हता. निवाऱ्याची सोय नव्हती आणि कोठे जावे याबद्दल काही सूचनाही नव्हती. म्हणून शाळा, महाविद्यालये आणि इतर खाजगी व सार्वजनिक संस्था यांच्या इमारतीत आपद्ग्रस्तांनी आश्रय घेतला. अशा रीतीने तात्पुरत्या निवाऱ्याची सोय करण्याचा प्रश्न आपोआपच सोडविला गेला असे म्हणण्यास हरकत नाही. या संस्थांच्या इमारतीतच मदत-केंद्रे सुरू करण्यात आली. याशिवाय अनेक आपद्ग्रस्तांनी आपले स्नेही अथवा नातेवाईक यांच्याकडे आपली निवाऱ्याची सोय केली.

ज्या कुटुंबांनी मदत-केंद्रांचा आश्रय घेतला होता, त्यांच्या संबंधीची माहिती मदत-केंद्रांवर ठेवलेल्या नोंदीवरून मिळाली. ज्यांनी इतरत्र आश्रय घेतला होता त्यांची माहिती उपहत घरांच्या पाहणीतून उपलब्ध झाली.शिवाय आपद्ग्रस्त कुटुंबांनी केलेल्या मदत-अर्जांच्या साहाय्यानेही आपद्ग्रस्त कुटुंबांच्या आश्रयस्थानासंबंधी माहिती मिळू शकली.

बेघर कुटुंबांच्या मूळच्या घरांची स्थिती आणि त्यांचे आश्रयस्थान याबद्दलची माहिती सारणी क्र. ४·१ मध्ये दिली आहे. उपहत घरांच्या स्थितीप्रमाणे घरांचे चार विभाग पाडण्यात आले ते असे : (१) पूर्णत: पडलेली घरे (२) अंशत: पडलेली घरे (३) राहण्यायोग्य होण्यासाठी विशेष दुरुस्तीची आवश्यकता आहे अशी घरे आणि (४) किरकोळ दुरुस्ती करून वापरता येण्याजोगी घरे. एकूण आपद्ग्रस्त कुटुंबांपैकी सुमारे २३ टक्के कुटुंबांना आपल्या मूळच्या जागेत परत जाणे शक्य झाले. सुमारे २६ टक्के कुटुंबांनी मदत-केंद्रांचा आश्रय घेतला व उरलेली कुटुंबे मुख्यत: आपले नातेवाईक व मित्रमंडळी यांजकडे राहण्यास गेली. मदत-केंद्रांचा आश्रय घेतलेल्या कुटुंबांचे प्रमाण शहराच्या पूर्व विभागात अधिक आढळले. मंगळवार पेठेतील आपद्ग्रस्तांपैकी पन्नास टक्के कुटुंबांनी मदत-केंद्रांचा आश्रय घेतला. कारण तेथील आपद्ग्रस्तांमध्ये झोपड्यांतून राहणाऱ्या कुटुंबांची संख्या ५० टक्के होती व त्यांपैकी ७५ टक्के कुटुंबांनी मदत-केंद्रांचा आश्रय घेतला. झोपड्यांत राहणाऱ्या कुटुंबांची आर्थिक स्थिती लक्षात घेता खाजगीरीत्या त्यांना आश्रय मिळविणे कठीण होते त्यामुळे त्यांना मदत-केंद्रांवर जावे लागले.

सारणी क्र. ४·१ : आश्रयस्थान आणि मूळच्या राहत्या घरांची स्थिती यानुसार आपद्ग्रस्त कुटुंबांचे प्रतिशतता विभाजन

| आश्रयस्थान | मूळच्या राहत्या घरांची स्थिती | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पूर्णतः पडलेल्या घरांतील कुटुंबे | अंशतः पडलेल्या घरांतील कुटुंबे | विशेष दुरुस्तीयोग्य घरांतील कुटुंबे | किरकोळ दुरुस्तीयोग्य घरांतील कुटुंबे | एकूण आपद्ग्रस्त कुटुंबे |
| मदत-केंद्रे | ३८·६ | १८·४ | २०·४ | ५·४ | २५·९ |
| मित्र व नातेवाईक | ४६·९ | ५४·६ | ३७·३ | २६·७ | ४२·२ |
| पूर्वीचे राहते घर | ५·९ | १७·७ | ३१·४ | ५८·५ | २२·७ |
| माहीत नाही | ८·६ | ९·३ | १०·९ | ९·४ | ९·२ |
| एकूण | १००·० | १००·० | १००·० | १००·० | १००·० |

आपद्ग्रस्त कुटुंबांचे उत्पन्न आणि त्यांचे आश्रयस्थान यांसंबंधीची माहिती सारणी क्र. ४·२ मध्ये ग्रथित केली आहे. मदत-केंद्रांचा आश्रय घेतलेल्या कुटुंबांपैकी दोनतृतीयांशाहून अधिक कुटुंबांचे उत्पन्न महिना १०० रुपयांपेक्षा कमी होते. ज्यांचे उत्पन्न महिना २०० रुपयांहून अधिक आहे अशांचे प्रमाण केवळ सहा टक्केच आढळले. याउलट मित्र-नातेवाईक यांच्याकडे राहिलेल्या कुटुंबांमध्ये जवळजवळ २० टक्के कुटुंबांचे उत्पन्न २०० रुपयांहून अधिक होते.

सारणी क्र. ४·२ : मदत-केंद्रांवर व मदत-केंद्रांबाहेर आश्रय घेतलेल्या आपद्ग्रस्त कुटुंबांचे उत्पन्नानुसार प्रतिशतता विभाजन

| कुटुंबांचे मासिक उत्पन्न (रु.) | मदत-केंद्रावरील कुटुंबे (प्रतिशतता) | मदत-केंद्राबाहेरील कुटुंबे (प्रतिशतता) |
|---|---|---|
| उत्पन्न नसलेले | ५·४५ | – |
| ५० पर्यंत | १६·९४ | ६·१७ |
| ५१–१०० | ४४·९२ | ३५·६१ |
| १०१–१५० | १८·०९ | २१·१८ |
| १५१–२०० | ८·१९ | १८·१९ |
| २०१–२५० | ३·४५ | ११·७० |
| २५१–३५० | २·९६ | ४·२३ |
| ३५० हून अधिक | – | २·९२ |
| एकूण | १००·०० | १००·०० |

### आश्रयस्थान

मित्र व नातेवाईक यांच्याकडे गेलेल्या कुटुंबांचे पूर्वीचे राहते घर आणि ते कोसळल्यानंतर त्यांनी स्वीकारलेले आश्रयस्थान यांसंबंधीची माहिती पाहता असे आढळले की बहुसंख्य कुटुंबांना मित्र आणि नातेवाईक यांचा आश्रय पुण्यातच मिळाला. फक्त चार टक्के कुटुंबे पुणे सोडून बाहेरगावी गेली. सर्व पेठांतील आपद्‌ग्रस्त कुटुंबांनी सर्वसाधारणपणे जवळपासच्या पेठांमध्येच आश्रय घेतलेला आढळला.

मदत-केंद्रांवर राहणारी कुटुंबे आपत्तीपूर्वी कोठे राहात होती हे पाहता असे आढळले की बहुतेक मदत-केंद्रांवरील कुटुंबे जवळपासच्या आपद्‌ग्रस्त भागांतूनच आलेली होती. उदाहरणार्थ, शिवाजीनगर, नारायण पेठ व सदाशिव पेठ या भागांतील केंद्रांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांपैकी ८० ते ९० टक्के कुटुंबे त्याच पेठांमधील आपद्‌ग्रस्त विभागांतून आली होती.

बहुतेक मदत-केंद्रे आपद्‌ग्रस्त विभागाच्या आसपासच होती. रास्ता पेठेत सात, शुक्रवार, बुधवार आणि शनिवार या पेठांत प्रत्येकी पाच, रविवार व नाना या पेठांत प्रत्येकी चार आणि कसबा, सोमवार, नारायण, गणेश, इत्यादी पेठांत प्रत्येकी दोन किंवा तीन मदत-केंद्रे होती. सदाशिव पेठेत ११, शिवाजीनगरमध्ये १२ आणि उपनगरीय विभागात नऊ मदत-केंद्रे होती.

१५ जुलै १९६१ रोजी ५२ केंद्रांना सरकारी मान्यता मिळाली. २० जुलैपर्यंत त्यांत आणखी आठ केंद्रांची भर पडली व २१ ते ३० जुलै या कालात आणखी १८ केंद्रांना मान्यता देण्यात आली. म्हणजे जुलैअखेर मदतकेंद्रांची एकूण संख्या ७८ झाली. केंद्रांवर राहणाऱ्या कुटुंबांच्या संख्येत आपत्तीनंतर साधारणपणे पहिले दहा दिवस चढउतार होत होती. काही कुटुंबे परगावी गेली, काही आपली घरे स्वच्छ झाल्यावर केंद्र सोडून गेली आणि नवीन कुटुंबे केंद्रांवर व्यवस्थित मदत मिळते हे ऐकून तेथे आश्रयार्थ आली. जुलै महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात केंद्रांवर राहणाऱ्या कुटुंबांची एकूण संख्या ७००० असावी. २३ जुलैनंतर मात्र या संख्येत हळूहळू घट होत गेली. ऑगस्टच्या सुरुवातीस, जेव्हा गोखले अर्थशास्त्र संस्थेमधील संशोधकांनी केंद्रांची पाहणी केली आणि केंद्र-चालकांनी ठेवलेल्या नोंदी पाहिल्या, तेव्हा मदत-केंद्रांवर एकूण सुमारे ६००० कुटुंबे असल्याचे आढळून आले.[1]

एकूण ७८ मदत-केंद्रांपैकी ३२ केंद्रे महानगरपालिकेच्या शाळांत, ३१ इतर खाजगी शाळांत, ८ महाविद्यालयांत आणि उरलेली ७ इतर संस्थांच्या आवारात उघडण्यात आली होती. मदत-केंद्रांवरील कुटुंबांची संख्या केंद्रावर उपलब्ध होणाऱ्या जागेवर साहजिकच अवलंबून होती. महाविद्यालयांतील केंद्रांत माणसांची संख्या ६०० ते १००० पर्यंत होती. खाजगी शाळांमध्ये प्रत्येकी २०० ते ५०० माणसांची सोय करण्यात आली होती आणि महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सरासरी २६० माणसांना आश्रय देण्यात आला होता.

बहुसंख्य मदत-केंद्रे शाळा व महाविद्यालये यांमध्ये उघडण्यात आल्याने या शैक्षणिक संस्था बंद ठेवण्यात आल्या होत्या. या संस्था फार काल बंद ठेवल्यास विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले असते. यासाठी आपद्‌ग्रस्त कुटुंबांना दुसरीकडे हलवून संस्था शक्य तेवढ्या लवकर मोकळ्या कराव्या

---

१. गोखले अर्थशास्त्र संस्थेतील संशोधकांनी ५ ऑगस्ट १९६१ पासून सर्व मदत-केंद्रांना भेट देऊन केंद्र-चालकांनी ठेवलेल्या नोंदीच्या साहाय्याने आपद्‌ग्रस्त कुटुंबांसंबंधीची माहिती घेतली.

अशी आग्रहाची मागणी संस्था-चालकांनी सरकारकडे केली. महाविद्यालयांतील मदत-केंद्रे प्रथम बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात आठही महाविद्यालयांतील व इतर दोन केंद्रांतील कुटुंबांना हलविण्यात आले आणि १६ ऑगस्टपासून महाविद्यालयांचे काम पूर्ववत सुरू झाले. तेथे राहणाऱ्या कुटुंबांची सोय करण्याकरिता ३२ नवीन केंद्रे उघडण्यात आली. यांपैकी २२ महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये, एक खाजगी शाळेत आणि पाच इतर संस्थांच्या इमारतींमधून चालू करण्यात आली. १५ ऑगस्टनंतर १० वीचे व ११ वीचे वर्ग चालू करण्याचा शाळांनी निर्णय घेतला. त्यामुळे शाळांच्या एका भागात नेहमीप्रमाणे वर्ग भरू लागले तर दुसऱ्या भागात आपद्ग्रस्त कुटुंबांना ठेवावे लागले. ही व्यवस्था शाळा-चालक व विद्यार्थी या दोघांच्याही दृष्टीने अत्यंत गैरसोईची होती. परंतु केंद्रे बंद करून शैक्षणिक संस्था मोकळ्या करावयाच्या तर तात्पुरत्या निवाऱ्याची सोय करणे अपरिहार्य होते. म्हणून बांबूच्या तट्ट्यांचे मंडप आणि पत्र्याच्या अर्धगोलाकृती झोपड्या यांसारखी तात्पुरत्या स्वरुपाची आश्रयस्थाने बांधण्याचे काम ऑक्टोबर-अखेर हाती घेण्यात आले. नोव्हेंबरच्या मध्यास यांपैकी काही झोपड्या बांधून झाल्या व त्यांमध्ये आपद्ग्रस्त कुटुंबांस जागा देण्यात आली. नवीन जागा जसजशी उपलब्ध होत गेली, तसतशी केंद्रांवरील कुटुंबसंख्या कमी झाली. १५ ऑगस्ट ते १५ नोव्हेंबर या अवधीत फक्त १० केंद्रेच पूर्णपणे बंद झाली. १५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या अवधीत मात्र बहुतेक केंद्रे बंद झाली आणि डिसेंबरअखेर म्हणजे आपत्तीनंतर सुमारे सहा महिन्यांनी सर्व मदत-केंद्रे बंद झाली.

मदत-केंद्रांचे काम सरासरी ११५ दिवस चालले. यांपैकी महाविद्यालयातील केंद्रे फक्त २९ दिवसच चालू होती. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सर्वांत जास्त दिवस म्हणजे सरासरी १४१ दिवस केंद्रे चालू राहिली. नवीन ३२ मदत-केंद्रे सरासरी १०७ दिवस चालू होती.

### मदत-केंद्रावरील जीवन

आपत्तीनंतरचे एक-दोन दिवस केंद्रांवरील परिस्थिती गोंधळाची होती. मदत-केंद्रांवर पहिले दोन दिवस निव्वळ राहण्याची कशीबशी सोय झाली होती. अन्नपाण्याच्या मदतीची रीतसर व्यवस्था झाली नव्हती. काही केंद्रांवर दानशूर व्यक्ती व लोकोपकारी संस्था यांनी शिजवलेले अन्न पाठविले. परंतु अनेकदा अन्न वेळेवर न पोहोचल्याने अथवा वाटपाची व्यवस्था त्वरित होऊ न शकल्यामुळे ते खराब होऊन गेले. १५ जुलैपासून केंद्रांना सरकारी मान्यता मिळाल्यावर धान्याचा पुरवठा व इतर आवश्यक माल विकत घेण्याची तरतूद झाली. अन्यत्र निवाऱ्याची सोय होणे दुरापास्त असल्याने पुनर्वसनाची इतर काही व्यवस्था होईपर्यंत केंद्रांवर राहणे क्रमप्राप्त आहे याची आपद्ग्रस्तांना जाणीव झाली. तसेच संस्था-चालकांनीही केंद्रांच्या व्यवस्थापनाचे काम स्वीकारले. त्यामुळे आपत्ती-नंतर आठवड्याभरात केंद्रांवरील दिनक्रम सुरळीतपणे सुरू झाला. केंद्रांवर पाण्याची टंचाई असल्यामुळे दिनचर्येपुरते पाणी मिळविण्यासाठी कुटुंबांना सकाळपासूनच धावपळ करावी लागे. आधीच अपुरे असलेले पाणी सर्वांना वाटून देताना व्यवस्थापकांची त्रेधा उडून जाई. ज्या संस्थांच्या आवारात विहिरी होत्या त्यांनी विहिरीचे पाणी खेचण्याची व्यवस्था करून पाण्याची टंचाई काही अंशी दूर केली. अंघोळ, कपडे धुणे यांसाठी सर्वसाधारणपणे नदीवर जावे लागे.

पाण्याच्या अभावामुळे केंद्रांवर स्वच्छता राखणे फार कठीण झाले होते. मोऱ्या, संडास यांच्या सोई फार अपुऱ्या पडल्या आणि आजूबाजूच्या मोकळ्या जागेचा वापर लोकांनी करावयास सुरुवात केली. त्यामुळे आवतीभोवती दुर्गंधी पसरावयास सुरुवात झाली होती.पुढे महानगरपालिकेच्या

अधिकाऱ्यांनी चराचे संडास खणून देण्याची व्यवस्था केली आणि संडास, मोऱ्या स्वच्छ राखण्याचीही व्यवस्था केली.

वीजपुरवठा बंद असल्यामुळे व इतर कोणतीही व्यवस्था मोठ्या प्रमाणात करणे शक्य नसल्यामुळे रात्री केंद्रांवर अंधाराचेच साम्राज्य निर्माण होई. पण चोरीमारीचे अथवा अन्य गैरप्रकार झाल्याचे आढळले नाही.

केंद्रांवरील विशेष जबाबदारीचे काम म्हणजे जेवण तयार करणे व त्याच्या वाटपाची व्यवस्था करणे. सरकारकडून सहा वर्षांवरील व्यक्तीस प्रत्येकी सहा छटाक आणि सहा वर्षांखालील प्रत्येकास तीन छटाक याप्रमाणे शिधा मिळत असे. स्वयंपाकास लागणारे इतर पदार्थ खरेदी करण्यासाठीही सरकारकडून अनुदान मिळत असे. स्वयंपाक करण्यास पगारी आचारी नेमावे लागले. कारण या कामात मदत करण्यास आपद्ग्रस्त लोक तयार नव्हते. भात, पोळी किंवा भाकरी व आमटी एवढे पदार्थ जेवणात असत. मुलांना भुकटीचे दूध देण्याची व्यवस्था केलेली होती. काही केंद्रांवर खाजगी संस्थांच्याद्वारे शिजवलेले अन्न वाटले जाई.

## भोजन-केंद्रे

काही लोकोपकारी व सामाजिक संस्थांनी आपद्ग्रस्तांना भोजन पुरविण्याची व्यवस्था आपत्ती-नंतर तातडीने केली. या संस्थांना निवाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देणे शक्य नव्हते, तेव्हा त्यांनी आपल्या आवारात दोन वेळा जेवण देण्याची व्यवस्था केली. ज्या कुटुंबांना अन्नधान्याच्या अगर इतर वस्तूंच्या अभावी स्वतःच्या घरी स्वयंपाक करणे शक्य नव्हते, त्यांची गैरसोय या भोजनकेंद्रांमुळे दूर झाली. या केंद्रांना सरकारकडून भोजनकेंद्रे म्हणून मान्यता मिळाली व सरकारतर्फे माणशी ठराविक शिधा त्यांस मिळू लागला. याव्यतिरिक्त खाद्यपदार्थांच्या स्वरुपात खाजगी देणग्या येत त्यामुळे भोजनकेंद्रांवरील जेवणात विविधता असे. तसेच संस्थांच्या चालकांनाही फक्त अन्न शिज-विण्याची जबाबदारी घ्यावी लागत असल्यामुळे अन्नाचा दर्जा चांगला राखला जाई.

सरकारतर्फे ज्यांस शिधा व अनुदान पुरविले जात होते अशी २१ भोजन-केंद्रे शहराच्या निरनिराळ्या भागांत विखुरलेली होती. यांपैकी नऊ कसबा-सोमवार-मंगळवार भागांत होती. ११ शनिवार-नारायण-सदाशिव या भागांत होती आणि शिवाजीनगरमध्ये एक भोजन-केंद्र होते. याशिवाय लोकोपयोगी संस्थांनी सरकारी मदतीशिवाय चालविलेली तीन भोजन-केंद्रे होती.

धर्मशाळा, देवळे, मंगल कार्यालये, रुग्णालये, व्यायामशाळा, वगैरे संस्थांनी भोजन-केंद्रे चालविली होती. बहुतेक भोजन-केंद्रांवर जेवण घेणाऱ्यांची संख्या प्रत्येकी सुमारे २०० पासून ८०० पर्यंत होती. फक्त दोन भोजन-केंद्रांवर प्रत्येकी हजारापेक्षाही जास्त लोक जेवण घेत होते. भोजन-केंद्रे सरासरी २५ दिवस चालू होती.

## केंद्रावरील खर्च

मदत-केंद्रे व भोजन-केंद्रे यांना शिधा आणि अनुदान या स्वरुपात जी मदत देण्यात आली त्याविषयीची माहिती जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयातून मिळाली. वस्तुरूपात जी मदत देण्यात आली त्यावरील खर्च काढण्यासाठी त्या वेळच्या बाजारभावांचा उपयोग करण्यात आला. सरकारकडे देणगी स्वरूपात जे धान्य जमा झाले होते, त्यांतून केंद्राकडे शिधा पाठविला जाई. त्याशिवाय सरकारने, १,२९,८०० किलोग्रॅम तांदूळ केंद्रांना पुरविण्यासाठी खरेदी केला. केंद्रांवर

पाठविलेल्या धान्याची एकूण किंमत ३,७८,४०० रुपये होती. त्यामध्ये २६ टक्के तांदूळ, ४६ टक्के ज्वारी, १४ टक्के आटा व १४ टक्के गहू, मका व बाजरी अशी विभागणी आढळली.

स्वयंपाकासाठी आवश्यक असणारे इतर पदार्थ उदा. डाळी, तेल, मसाला, भाजीपाला इत्यादी खरीदण्यासाठी व केंद्रावरील इतर खर्च उदा. नोकरांचे पगार, जळण व किरकोळ खर्च भागविण्यासाठी सरकारतर्फे अनुदान देण्यात आले. यासाठी एकूण १०,३९,१०० रुपये रक्कम लागली.

अनुदानापैकी सुमारे ४१ टक्के रक्कम खाद्यपदार्थांवर खर्ची पडली. उरलेली रक्कम, जळण (१८ टक्के), आचाऱ्यांचा पगार (२७ टक्के), झाडूवाल्यांचा पगार (७ टक्के) आणि स्वयंपाकाची भांडी, दिवाबत्ती, दूरध्वनी, इत्यादीचे भाडे, दळण (सात टक्के) वगैरे गोष्टींवर खर्च करण्यात आली. याशिवाय अनेक लोकोपकारी व समाजकार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांजकडून दुधाची भुकटी, साखर, चहा, तेल, भाजीपाला, डाळी, भेळ, पोहे, वगैरे पदार्थ केंद्रांवर आपद्ग्रस्तांना वाटण्यासाठी पोचविण्यात आले. या सर्वांची अंदाजे किंमत २,१०,००० रुपये झाली. यापैकी ९२ टक्के किंमत दुधाच्या भुकटीची होती.

केंद्रावर वापरण्यात आलेल्या एकूण धान्यापैकी ८० टक्के धान्य देणगी म्हणून मिळाले होते. दुधापैकी ९३ टक्के, खाद्यपदार्थांपैकी ४५ टक्के, चहा-साखरेपैकी १८ टक्के आणि डाळी, तूप व मसाला यांपैकी ३ ते ४ टक्के माल देणगीच्या स्वरुपात मिळाला. म्हणजेच वापरात आलेल्या एकूण पदार्थांच्या किंमतीपैकी ५० टक्के भाग देणगी म्हणून मिळाला होता. सारांश सहा महिने मदत-केंद्रे चालविण्यास जो खर्च आला त्यापैकी निम्मा भाग समाजकार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांनी उचलला आणि उरलेला निम्मा भाग सरकारने उचलला. केंद्रे चालविण्यास एकूण देणगीस्वरुपात मिळालेल्या वस्तू हिशेबात धरून अंदाजे १६,२८,००० रुपये खर्च आला व त्यांपैकी १०,१०,८०० रुपये अन्न व खाद्यपदार्थ यांचा पुरवठा करण्याच्या कामी खर्ची पडले. एकूण खर्चामधील निरनिराळ्या पदार्थांवर झालेल्या खर्चाचे प्रतिशतता विभाजन सारणी क्र. ४.३ मध्ये दिले आहे.

सारणी क्र. ४·३ : मदत-केंद्रांवर वापरलेल्या एकूण वस्तूंवरील खर्चाचे प्रतिशतता विभाजन

| वस्तू | प्रतिशतता विभाजन | वस्तू | प्रतिशतता विभाजन |
|---|---|---|---|
| धान्ये | ३७.४ | चहा व साखर | ०.९ |
| डाळी | ६.५ | दूध | २०.५ |
| तूप | ४.० | तेल व मसाल्याचे पदार्थ | १७.९ |
| भाजी | १०.८ | इतर | २.० |
| | | एकूण | १००.० |

केंद्रांच्या व्यवस्थापनाचे काम शाळा व महाविद्यालयांतील शिक्षक, प्राध्यापक व इतर नोकरवर्ग यांनी सांभाळले होते. केंद्रे बंद झाल्यावर व्यवस्थापकांना मानधन देण्याचे सरकारने ठरविले. प्रत्येक आपद्ग्रस्त व्यक्तीमागे दर आठवड्यास १० पैसे असे मानधनाचे प्रमाण धरून एकूण मानधनाची रक्कम काढण्यात आली.

केंद्रांवर आश्रय घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमागे सरासरी किती खर्च आला हे पाहण्यासाठी प्रथम केंद्रे किती दिवस चालू होती व केंद्रांवर माणसांची संख्या किती होती हे लक्षात घेतले पाहिजे. यासंबंधीची माहिती केंद्र चालकांकडून गोळा केली होती. त्यावरून केंद्रांवरील एकूण भोजन-दिनांचा अंदाज काढला. भोजन-दिन एकूण २५,७८,००० आढळले. म्हणजे दर व्यक्तीमागे दर आठवड्यास ४·५२ रुपये अथवा दरमाणशी दिवसाचा खर्च ०·६५ रुपये येतो. हा खर्च निरनिराळ्या वस्तूंवर कोणत्या प्रमाणांत वाटला गेला हे सारणी क्र. ४·४ मध्ये दिले आहे.

सारणी क्र. ४·४ : मदत-केंद्रांवर दरमाणशी केलेल्या खर्चाचे वस्तूनुसार विभाजन

| वस्तू | दरमाणशी दर आठवड्यास झालेला खर्च (रु.) | खर्चाची प्रतिशतता |
|---|---|---|
| धान्ये | १·०३ | २२·८ |
| दूध | ०·५७ | १२·६ |
| इतर खाद्यपदार्थ | १·१४ | २५·२ |
| खाद्यपदार्थांवरील एकूण खर्च | २·७४ | ६०·६ |
| सेवा | १·०७ | २३·७ |
| जळण | ०·५० | ११·१ |
| इतर | ०·२१ | ४·६ |
| एकूण इतर खर्च | १·७८ | ३९·४ |
| एकूण खर्च | ४·५२ | १००·० |

शाळा आणि महाविद्यालयांमधील वर्ग व इतर खोल्या निवासासाठी वापरल्यामुळे बऱ्याच खराब झाल्या होत्या. त्यांस रंग देण्यासाठी तसेच आवारे स्वच्छ करण्यासाठी प्रत्येक संस्थेला सरकारतर्फे २०० ते १००० रुपयांपर्यंत रकमा देण्यात आल्या. निवाऱ्याची सोय जवळजवळ विनामूल्य झाल्याने व केंद्रांवरील व्यवस्थापनाचे काम अत्यल्प खर्चात झाल्याने केंद्रांचा एकूण खर्च बेताचा झाला.

**केंद्रांचे व्यवस्थापन**

केंद्रांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी शाळांतील व महाविद्यालयांमधील शिक्षक आणि इतर नोकरवर्ग यांनी पतकरली होती. त्यांची मुख्ये कामे म्हणजे स्वयंपाकासाठी लागणारे पदार्थ खरेदी करणे, स्वयंपाकाची व्यवस्था करणे आणि अन्नवाटपावर देखरेख ठेवणे, आपद्ग्रस्तांना नियमांचे पालन करावयास लावणे, त्यांच्यामधील तंटे मिटविणे, खोडसाळपणाला प्रतिबंध घालणे, बाहेरील लोकांना ढवळाढवळ करू न देणे, स्वच्छतेचे पालन करावयास लावणे, हरप्रकारच्या सरकारी नियमांचा व हुकुमांचा खुलासा करणे, केंद्रांवर देणगीदाखल येणारे पदार्थ, कपडे व इतर वस्तू यांचे योग्य वाटप करणे वगैरे.

केंद्रांच्या व्यवस्थापनाबाबत माहिती मिळविण्यासाठी आणि केंद्रचालकांच्या अडीअडचणी समजावून घेण्यासाठी शहराच्या निरनिराळ्या भागांतील ३० केंद्रांची पाहणी करण्यात आली व

केंद्रांसंबंधीची माहिती केंद्र-चालकांकडून प्रश्नावलीत भरून घेतली.[२] चोवीस केंद्रांमधून आवश्यक ती माहिती मिळविणे शक्य झाले.

व्यवस्थापकांपुढे मुख्यतः दोन प्रकारचे प्रश्न किंवा अडचणी उभ्या राहिल्या. आपद्ग्रस्तांच्या वागणुकीमुळे निर्माण झालेल्या अडचणी व बाहेरील लोकांनी कामात ढवळाढवळ केल्यामुळे आलेल्या अडचणी. आपद्ग्रस्तांच्या वागणुकीमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत २४ केंद्रांच्या व्यवस्थापकांनी जे मतप्रदर्शन केले त्यावरून असे दिसून येते, की यांपैकी फक्त पाच केंद्रांच्या व्यवस्थापकांना बऱ्याच अडचणी आल्या. आठ केंद्रांवर त्यामानाने थोड्या आणि नऊ केंद्रांवर या प्रकारच्या अडचणी अजिबात आल्या नाहीत. दोन केंद्रचालकांनी याबाबत मतप्रदर्शन केले नाही. अस्वच्छता व सहकार्याचा अभाव ही अडचण विशेष अडचणी नमूद केलेल्या पाचही केंद्रांवर जाणवली. केंद्रांवर स्वच्छता राखली जात नसे, याला पाण्याचा अभाव आणि संडास, मोरी वगैरे सोईंचा अपुरेपणा या गोष्टीही कारणीभूत होत्या. अडचणींचा उल्लेख स्पष्टपणे ज्या १३ केंद्रचालकांनी केला त्यांमध्ये अस्वच्छतेचा उल्लेख नऊ वेळा, सहकार्याचा अभाव चार वेळा आणि आडमुठेपणा व गैरशिस्त यांचा उल्लेख अनुक्रमे पाच व चार वेळा केलेला आढळला. अस्वच्छता आणि गैरशिस्त यांमुळे व्यवस्थापकांवरील कामाचा बोजा वाढला यात शंका नाही.

आपद्ग्रस्त आडमुठेपणाने वागले किंवा त्यांनी नीट सहकार्य दिले नाही तर ते क्षम्य होय, असे मत दोन केंद्रांवरील व्यवस्थापकांनी व्यक्त केले. स्वतःचा कोणताही अपराध नसता कोसळलेल्या आपत्तीमुळे तसेच भविष्यातील अनिश्चिततेमुळे मनोवृत्ती प्रक्षोभी व संशयी बनणे स्वाभाविक होते असे त्यांचे मत पडले. काही व्यवस्थापकांच्या मते आपत्तीनंतर काही दिवस शैक्षणिक संस्था, कारखाने, दुकाने वगैरे बंद असल्यामुळे पुष्कळ लोक निरुद्योगी होते; त्यामुळे भांडखोर वृत्ती आणि गैरशिस्तपणा वाढला.

ज्या केंद्रांवर व्यवस्थापक व आपद्ग्रस्त एकाच भागातील असल्यामुळे एकमेकांस सर्वसाधारणपणे परिचित होते, अशा ठिकाणी व्यवस्थापकांचे काम बरेचसे सुकर झाल्याचे आढळून आले. जेथे आपद्ग्रस्त व व्यवस्थापक यांचे संबंध विद्यार्थी-शिक्षक या स्वरुपाचे होते किंवा जेथे दोघेही एकाच सामाजिक स्तरातील होते तेथे ही गोष्ट विशेषत्वाने आढळून आली. नऊ केंद्रांवरील व्यवस्थापकांनी सांगितले, की आपद्ग्रस्तांनी योग्य तो समजुतदारपणा दाखवून सहकार्य दिले आणि व्यवस्थापकांना फारशा अडचणींना तोंड द्यावे लागले नाही. एका केंद्रचालकांनी असेही सांगितले, की पाण्याचा अभाव, इतर सोयींचा अपुरेपणा, अन्नाची कमतरता वगैरे अडचणी असूनही आपद्ग्रस्त कुटुंबे अत्यंत समजूतदारपणे वागली व व्यवस्थापन सुलभ झाले. दोन केंद्रांवर परस्परसंबंध इतके दृढ झाले होते, की तेथे भजनी मंडळ, चित्रपट, खेळ, वगैरे करमणुकीचे कार्यक्रम आखणे शक्य झाले. एका केंद्रावर आपद्ग्रस्तांच्या समित्या स्थापन करून त्यांच्याकडून अनेक कामे करून घेतल्यामुळे वादाचे फारसे प्रसंग ओढवले नाहीत, असे सांगण्यात आले.

केंद्राबाहेरील लोकांनी व्यवस्थापनात ढवळाढवळ केल्यामुळेही अडचणी निर्माण झाल्याचे पाच केंद्रांच्या व्यवस्थापकांनी सांगितले. असा त्रास मुख्यतः राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून झाला. केंद्रांवर सभा भरविणे, मदतीचे वाटप स्वतः करण्याचा आग्रह धरणे, इत्यादी गोष्टींमुळे

२. प्रश्नावलीचा नमुना परिशिष्ट 'आ' मध्ये दिला आहे.

व्यवस्थापनात अडथळा आल्याचे केंद्र-चालकांनी सांगितले. याशिवाय सरकारकडून शिधा पुरविण्यात दिरंगाई होत असे अशी तक्रार दोन केंद्र-चालकांनी केली. सरकारकडून देण्यात येणाऱ्या सूचना किंवा पुरविण्यात येणारी माहिती कधीकधी परस्परविरोधी असल्यामुळे काही बाबी आपद्ग्रस्तांना पटवून देणे किंवा त्यांचा गैरसमज दूर करणे कठीण होई; या अडचणींचा दोन केंद्र-चालकांनी उल्लेख केला.

केंद्र-चालकांच्या अडचणी समजावून घेण्यासाठी शैक्षणिक संस्थांच्या प्रमुखांची एक समिती सरकारतर्फे नेमण्यात आली होती. पण या समितीच्या सभा फारशा झाल्या नाहीत. अडचणींची दाद लावण्याच्या दृष्टीने त्यांनी निश्चित काय काम केले याविषयी माहिती मिळू शकली नाही. आपद्ग्रस्तांच्या गाऱ्हाण्यांची दाद लागावी म्हणून काही प्रमुख नागरिकांचीही एक समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या सभासदांनी मधून मधून केंद्रांना भेट दिली, वेळोवेळी सरकारी सूचना आपद्ग्रस्तांना समजावून सांगितल्या आणि आपद्ग्रस्त व केंद्र-चालक यांमधील संबंध सलोख्याचे राहावेत म्हणून प्रयत्न केले.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर आपद्ग्रस्तांसाठी मदत-केंद्रे चालविण्याचा पुणेकरांवरील हा पहिलाच प्रसंग होता. केंद्र-चालकांना व आपद्ग्रस्तांना हा अनुभव नवीन होता आणि आपत्काली नेमके काय करावयास पाहिजे याची कोणालाच फारशी कल्पना नव्हती. त्यांतच जीवनावश्यक वस्तूंची अतीव टंचाई आणि बाहेरच्या लोकांची निष्कारण मधे पडण्याची प्रवृत्ती या गोष्टींनाही व्यवस्थापकांना तोंड द्यावे लागले. या सर्व अडचणी लक्षात घेता मदत-केंद्रांचे कामकाज बरेच सुरळीतपणे पार पडले असे म्हणावयास हरकत नाही.

**इतर मदतींचे वाटप**

पुण्यावरील आपत्तीची वार्ता पसरताच सर्व बाजूंनी मदतीचा ओघ पुण्याकडे वाहू लागला. आपत्तीनंतर लवकरच काही लोकोपकारी संस्थांनी व व्यक्तींनी तयार अन्न व इतर खाद्यपदार्थ आणि धान्य जमा करून त्यांचे वाटप सुरू केले. तसेच १४ जुलै १९६१ पासून खाजगी संस्था आणि अनेक दातृत्वशील व्यक्ती यांच्याकडून देणगीच्या स्वरुपात पैसे जमा होऊ लागले. या सर्व देणग्या एकत्र करून त्यांचा योग्य विनियोग करण्यासाठी सरकारी व निमसरकारी सभासदांची एक समिती —मुख्यमंत्र्यांची आपत्ती-निवारण निधी समिती[३]—स्थापन करण्यात आली. या निधीत जमा होणाऱ्या पैशांचा विनियोग केवळ पानशेत आपत्तीपुरता मर्यादित न ठेवता महाराष्ट्रात कोठेही येणाऱ्या आपत्तीचे निवारण करण्यासाठी या निधीतून मदत देण्याचे ठरविण्यात आले.

आपत्तीनिवारणार्थ राज्य-सरकार, मुख्यमंत्रि-निधी तसेच निरनिराळ्या लोकोपयोगी संस्था यांच्यामार्फत निरनिराळ्या योजना आखण्यात येऊन आपद्ग्रस्तांना विविध तऱ्हेचे साहाय्य देण्याची तरतूद करण्यात आली.

सरकार व मुख्यमंत्रि-निधी यांच्यातर्फे तीन प्रकारच्या मदत-योजना ताबडतोब हाती घेण्यात आल्या : आपद्ग्रस्त कुटुंबांना तात्कालिक स्वरुपाची मदत, कारागीर आणि छोटे कारखानदार

---

३. मुख्य मंत्र्यांच्या आपत्ती-निवारण निधी समितीचा यापुढे मुख्यमंत्रि-निधी म्हणून उल्लेख केला आहे.

यांस आर्थिक पुनर्वसनासाठी मदत आणि निरनिराळ्या संस्थांना, त्यांचे कार्य पुनश्च सुरू करण्यासाठी मदत.

### आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी मदतीच्या योजना

*धान्य वाटप :* मदत-केंद्रांवर आश्रय घेतलेल्या आपद्ग्रस्त कुटुंबांची जेवणाखाण्याची व्यवस्था केंद्रांवर होत होती. परंतु अनेक कुटुंबांनी केंद्रांचा आश्रय घेतला नव्हता. त्यांच्या अन्नपाण्याचा मोठाच प्रश्न होता. अनेकांचे सर्व सामान वाहून गेले असल्यामुळे घरात अन्नधान्य शिल्लक राहिले नव्हते व तातडीने धान्य खरेदी करण्यास कित्येकांच्या हाती पैसा नव्हता. अशा कुटुंबांची तात्कालिक अडचण दूर करण्यासाठी तातडीने धान्य पुरविण्याचे ठरले व हे काम नागरिकांच्या विभागीय समित्यांमार्फत पार पाडण्यात आले. शहरातील निरनिराळ्या आपद्ग्रस्त विभागांतील प्रमुख नागरिकांनी एकत्र येऊन प्रत्येक आपद्ग्रस्त विभागासाठी एक विभागीय समिती स्थापन केली. आपत्तीनंतर थोड्याच दिवसांत आपद्ग्रस्त विभागांत पुढील सहा समित्या काम करू लागल्या : (१) सोमवार, मंगळवार व उपनगरीय क्षेत्र, (२) कसबा, बुधवार, रविवार, गणेश या पेठा, (३) सदाशिव पेठ, (४) शनिवार व नारायण या पेठा, (५) एरंडवणे, (६) शिवाजीनगर.

त्या त्या विभागांच्या प्रातिनिधिक समित्या म्हणून सरकारतर्फे या समित्यांना मान्यता देण्यात आली. शासनयंत्रणा आणि आपद्ग्रस्त कुटुंबे यांमधील दुवा जोडण्याचे काम या समित्यांनी बजावले असे म्हणता येईल. आपद्ग्रस्त कुटुंबांची नावे, पत्ते आणि इतर माहिती नोंदवून कुटुंबांच्या याद्या करण्याचे काम या समित्यांनी केले. मिळालेल्या माहितीचा खरेपणा पडताळून पाहण्यासाठी काही समित्यांच्या सभासदांनी व स्वयंसेवकांनी कुटुंबांच्या राहत्या जागेला भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थिती अजमावली, तर इतर समित्यांनी काही माहितगार लोकांकडून आपद्ग्रस्त कुटुंबांसंबंधी माहिती जमविली. आपापल्या विभागांतील मदत-केंद्रांबाहेरील आपद्ग्रस्त कुटुंबांच्या संख्येविषयीचे अंदाज या सर्व समित्यांनी सरकारला कळविले. आपद्ग्रस्त कुटुंबांना सुमारे १० दिवस पुरेल अशा दृष्टीने सहा वर्षांवरील व्यक्तीस पाच शेर व सहा वर्षांखालील व्यक्तीस अडीच शेर धान्य असे प्रमाण सरकारने ठरवून दिले होते. आपद्ग्रस्त माणसांच्या संख्येनुसार प्रत्येक समितीकडे वरील प्रमाणात धान्य पाठविण्यात आले. सर्वसाधारणपणे ज्वारी, गहू आणि तांदूळ ही धान्ये ३ : १ : १ या प्रमाणात वाटण्यात आली. काही ठिकाणी आटाही पुरविण्यात आला. ८२३ पोती तांदूळ, ६९१ पोती गहू, ११५४ पोती ज्वारी आणि ११२ पोती आटा एवढे धान्य वाटण्यात आले. मदत-केंद्रांचा आश्रय न घेतलेल्या सुमारे ९५०० कुटुंबांना या धान्य-वाटपाचा फायदा मिळाला.

*रोख मदतीचे वाटप :* धान्य-वाटपाप्रमाणे रोख मदतही तात्कालिक गरजा भागविण्याच्या दृष्टीने देण्यात आली. मदत केंद्रांवर राहणाऱ्या कुटुंबांची निवाऱ्याची व अन्नाची सोय झालेली असल्यामुळे त्यांना रोख मदत देण्यात आली नाही. मदत-केंद्रांचा आश्रय न घेतलेल्या कुटुंबांना दर माणशी १० रुपये परंतु एक कुटुंबास जास्तीतजास्त ५० रुपये, अशा प्रमाणात रोख मदत देण्याचे ठरले.

रोख मदत देण्यापूर्वी मदत घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला आपली संपूर्ण माहिती एका अर्जावर भरून द्यावी लागे. आपत्तीपूर्वीचा पत्ता, कुटुंबातील माणसांची संख्या, हानीचे स्वरूप, राहावयास गेलेल्या जागेचा पत्ता वगैरे माहितीचा अर्जात समावेश होता. सरकारने आपद्ग्रस्त घरक्रमांकांची जी एक यादी तयार केली होती, त्या यादीत आपद्ग्रस्त कुटुंबांनी दिलेले गृहक्रमांक आहेत की नाहीत

हे मदत देण्यापूर्वी तपासले जाई. रोख मदतीचे वाटप १७ जुलै १९६१ पासून शहरात निरनिराळ्या सात ठिकाणी सुरू करण्यात आले. एकूण ६,१२,८०५ रुपये रोख मदत देण्यात आली व सुमारे १६,४५० कुटुंबांना या मदतीचा फायदा मिळाला.

*कापडाचे वाटप :* घरांतील सामानसुमान वाहून गेल्यामुळे अनेकांना कपडयालत्त्यांची वाण पडली होती. धान्य, पैसे आणि इतर वस्तूंप्रमाणेच कापड, नवे-जुने कपडे अनेकांनी देणगीदाखल पाठविले होते. सरकारकडे जे कापड व कपडे देणगी म्हणून जमा झाले होते त्यांचे वाटप सरकारतर्फे १८ जुलैपासून मदत-केंद्रांवर सुरू करण्यात आले. याशिवाय मुख्यमंत्रि-निधीच्या साहाय्याने कापड-वाटपाची एक योजना आखण्यात आली. कुटुंबातील प्रत्येक माणसाला कपडयाचा एक संपूर्ण संच तयार करता येईल इतके कापड व एक सुती घोंगडी आणि एक सतरंजी किंवा गरम घोंगडी देण्याचे ठरले.

सरकारतर्फे आणि मुख्यमंत्रि-निधीतर्फे मंजूर करण्यात आलेल्या रकमेमधून खालीलप्रमाणे कापड खरेदी करण्यात आले : १३,५०० घोंगडया, २४,०२२ सतरंज्या, ५,४०० साडया ५१,१५७ वार पांढरे कापड, १०,३३० वार खाकी कापड, ९,५३१ वार चीट, २,५६० चादरी आणि ६,४४० धोतरे. या वस्तू खरेदी करण्यासाठी सरकारतर्फे २,९३,३१८ रुपये आणि मुख्यमंत्रि-निधीतर्फे १६,५४२ रुपये खर्च करण्यात आले. वरील सर्व कापड व कपडे मदत-केंद्रांचा ज्यांनी आश्रय घेतला होता अशा कुटुंबांना देण्यात आले.

विकत घेतलेले कापड सर्व आपद्‌ग्रस्त कुटुंबांना देण्यास पुरेसे नव्हते. म्हणून केंद्रांवर राहणाऱ्या कुटुंबांना कापड देण्यात आले. आणि इतर कुटुंबांना त्या ऐवजी खालील प्रमाणात रोख मदत देण्याचे ठरले :

| | |
|---|---|
| १२ वर्षांवरील मुले व पुरुषांस प्रत्येकी | १५ रुपये |
| १२ वर्षांवरील मुली व स्त्रियांस प्रत्येकी | १८ रुपये |
| ३ ते १२ या वयोमर्यादेतील मुलांमुलींना प्रत्येकी | १२ रुपये |
| ३ वर्षांखालील मुलांमुलींना प्रत्येकी | २ रुपये |

तीन वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीमागे १० रुपये व त्याखालील मुलामागे दोन रुपये याप्रमाणे सरकारने खर्च दिला आणि उरलेला खर्च मुख्यमंत्रि-निधीतून करण्यात आला.

*भांडयांचे वाटप :* आपद्‌ग्रस्त कुटुंबांना तवा, पातेली, थाळया, फुलपात्रे, वाटया, चमचे, बादल्या वगैरे भांडी मदत म्हणून द्यावी अशीही एक योजना आखण्यात आली. पण एवढया मोठया प्रमाणावर एकदम भांडी विकत घेणे शक्य नसल्याने थोडया कुटुंबांनाच प्रत्यक्ष भांडी देणे शक्य झाले. बाकीच्या कुटुंबांना त्याऐवजी रोख मदत पुढील प्रमाणात देण्यात आली :

| | |
|---|---|
| ३ व्यक्तींपेक्षा जास्त संख्या नसलेल्या कुटुंबास | ३० रुपये |
| ४ व्यक्ती असलेल्या कुटुंबास | ३५ रुपये |
| ५ व्यक्ती असलेल्या कुटुंबास | ४० रुपये |
| ६ व्यक्ती असलेल्या कुटुंबास | ४५ रुपये |
| ७ किंवा अधिक व्यक्ती असलेल्या कुटुंबास | ५० रुपये |

भांडी घेण्यासाठी प्रत्येक व्यक्तीमागे सरकारतर्फे पाच रुपये मंजूर करण्यात आले आणि उरलेला खर्च मुख्यमंत्रि-निधीतून देण्यात आला.

२६,२६४ आपद्ग्रस्त कुटुंबांनी कपडे आणि भांडी यांसाठी मदत घेतली असे अधिकृतरीत्या सांगण्यात आले. यांपैकी १९,४३१ कुटुंबांनी मदत-केंद्रांबाहेर आश्रय घेतला होता आणि ६,८३३ कुटुंबे मदत-केंद्रांवर राहणारी होती. सरकार आणि मुख्यमंत्रि-निधीतर्फे कपडे आणि भांडी यांसाठी एकूण जी रक्कम खर्च करण्यात आली त्यांपैकी मदत-केंद्रांचा आश्रय न घेतलेल्या कुटुंबांना मदत देण्यासाठी खालीलप्रमाणे रक्कम खर्च करण्यात आली :

| कापड व कपडे | | भांडी | |
|---|---|---|---|
| सरकार | मुख्यमंत्रि-निधी | सरकार | मुख्यमंत्रि-निधी |
| रु. ४,१४,०८८ | रु. २,६०,७३० | रु. १,८३,०५८ | रु. २,३१,१२१ |

सर्व आपद्ग्रस्त कुटुंबांना कपडे व भांडी पुरविण्यासाठी एकूण १५,७५,७४० रुपये सरकार आणि मुख्यमंत्रि-निधी यांच्यातर्फे खर्च झाले. यांतील ६२ टक्के मदत सरकारतर्फे व उरलेली मुख्यमंत्रि-निधीतर्फे देण्यात आली.

*संकीर्ण मदतीचे वाटप :* आपद्ग्रस्त कुटुंबांना कपडे व भांडी यांशिवाय इतर संसारोपयोगी वस्तू घेणे शक्य व्हावे या दृष्टीने संकीर्ण मदत-योजना आखण्यात आली. ५०० रुपयांपर्यंत मासिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांपुरती ही योजना मर्यादित केली होती. प्रत्येक कुटुंबाला त्याच्या मासिक उत्पन्नाएवढी परंतु १०० रुपयांच्या कमाल मर्यादेपर्यंत ही मदत दिली गेली. मदत देतेवेळी प्रत्येक कुटुंबाला इतर योजनांमार्फत किती मदत मिळाली आहे हे पाहून या मदतीचे प्रमाण ठरविण्यात यावे असे ठरले होते. एकूण २६,२०६ कुटुंबांना ही मदत मिळाली असे अधिकृतरीत्या सांगण्यात आले. यांपैकी १९,१६७ कुटुंबे केंद्राबाहेर राहात होती आणि ७०३९ कुटुंबांनी केंद्रांवर आश्रय घेतला होता. एकूण १६,३६,४५६ रुपये संकीर्ण मदत म्हणून वाटण्यात आले. या रकमेपैकी ४,३०,५७४ रुपये केंद्रांवर आश्रय घेतलेल्या कुटुंबांना वाटण्यात आले.

आपत्तीमुळे ज्या कुटुंबात मृत्यू घडला अशा कुटुंबांना मुख्यमंत्रि-निधीतून मदत देण्याचे ठरले. मिळवती व्यक्ती मृत्यू पावली असेल तर कुटुंबांतील दर व्यक्तिगणिक १०० रुपये अन्यथा व्यक्तिगणिक ५० रुपये याप्रमाणे मदत देण्यात आली. यासाठी मुख्यमंत्रि-निधीतून २९ आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी १२,००० रुपये मंजूर करण्यात आले.

आपत्तीमध्ये नष्ट झालेल्या मालमत्तेवर ज्यांचे जीवन प्रत्यक्ष अवलंबून होते अथवा कर्ता पुरुष आपत्तीत मृत्यूमुखी पडल्यामुळे जी कुटुंबे निराधार झाली अशांसाठी द्रव्यसाहाय्याची आणखी एक स्वतंत्र योजना आखण्यात आली. या योजनेनुसार प्रत्येक कुटुंबास जास्तीत जास्त दहा वर्षांकरिता दरमहा ५० रुपयांपर्यंत मदत देण्याचे ठरविण्यात आले. याप्रमाणे ८० कुटुंबांना मदत मंजूर करण्यात आली, आणि ऑगस्ट १९६२ पर्यंत ३०,८७६ रुपये खर्ची पडले. शिवाय या कुटुंबांमधील मुलांसाठी मोफत शिक्षणाची सोय करण्यात आली.

*शैक्षणिक मदत :* आपद्ग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि परीक्षा शुल्क भागविण्यासाठी मुख्यमंत्रि-निधीतून मदत देण्यात आली. तसेच त्यांना पुस्तके, वह्या, कागद, आणि इतर साधने घेता यावीत

या उद्देशानेही साहाय्य देण्यात आले. आपद्ग्रस्त विद्यार्थ्यांची संख्या आणि त्यांच्या गरजा, अजमाविण्यासाठी शाळा व महाविद्यालये यांच्या चालकांची एक समिती नेमण्यात आली. साधारणपणे ज्या आपद्ग्रस्त कुटुंबांचे मासिक उत्पन्न ५०० रुपयांपेक्षा जास्त नव्हते अशा कुटुंबांतील विद्यार्थ्यांस हे साहाय्य देण्याचे ठरले. वरील समितीने या मदतीचे अंदाज सरकारला सादर केले व त्यानुसार मदतीची रक्कम प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या हवाली करण्यात आली. लेखनसामग्री व इतर साधने यांसाठी प्रत्येक शालेय विद्यार्थ्यास पाच रुपये व पुस्तके घेण्यासाठी प्रत्येकी १० ते २० रुपयांपर्यंत इयत्तेनुसार चढत्या प्रमाणात रक्कम देण्यात आली. या योजनेनुसार एकूण २४,७७० विद्यार्थ्यांस मदत मिळाली. विद्यार्थ्यांस हे साहाय्य देण्यासाठी ९,४१,५०६ रुपये रक्कम खर्ची पडली.

मुख्यमंत्रि-निधीतून विद्यार्थ्यांना मदत म्हणून दिलेल्या एकूण रकमेपैकी ७१ टक्के रक्कम शैक्षणिक व परीक्षा शुल्क याप्रीत्यर्थ खर्च झाली. उरलेली रक्कम पुस्तके, शालोपयोगी इतर सामान व साधने घेण्यासाठी दिली. प्रत्येक महाविद्यालयीन विद्यार्थ्यास सरासरी १३० रुपये आणि शालेय विद्यार्थ्यास सरासरी ५० रुपये शैक्षणिक शुल्क म्हणून मदत देण्यात आली. पुस्तके व इतर साधने घण्यासाठी प्रत्येकी अनुक्रमे २३ व १२ रुपये देण्यात आले.

पानशेत आपत्तीत पुण्यातील अनेक विद्वज्जनांचे, साहित्यिकांचे व कलावंतांचे अपरिमित नुकसान झाले. हस्तलिखिते, दुर्मिळ कागदपत्रे व कलाकृती याच्या हानीचे तर मूल्यमापनही करणे अशक्य आहे. त्याशिवाय इतर सामानसुमानाचे नुकसान झाले ते निराळेच. साहित्यिक, कलावंत व विद्वान यांना मदत मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेने पुढाकार घेतला. परिषदेने अशा आपद्ग्रस्तांची एक यादी सरकारला सादर करून त्यांना मदत देण्याविषयी विनंती केली. मुख्यमंत्रि-निधीतून त्यांना मदत देण्यात आली. चौदा संशोधक, सहा साहित्यिक आणि सात कलावंत यांना निधीतून एकूण ४४,३०० रुपये मदत देण्यात आली.

*संस्थांना मदत :* आपत्तीमुळे अनेक खाजगी आणि सार्वजनिक संस्थांच्या मालमत्तेची हानी झाली होती. त्यांच्या हानीचे मूल्यमापन करून त्यांना मुख्यमंत्रि-निधीतून मदत द्यावी असे ठरविण्यात आले. काही संस्थांनी अधिक मदतीसाठी सरकारकडे अर्ज केले व त्यांपैकी काहींना सरकारकडून जादा मदत देण्यात आली. ज्या संस्थांना मुख्यमंत्रि-निधीतून ही मदत देण्यात आली, त्यांचे स्वरूप, संख्या आणि त्यांना दिलेली एकूण मदत सारणी क्र. ४.५ मध्ये दिली आहे.

देवळांच्या बाबतीत मदतीचे प्रमाण त्यांच्या एकूण हानीच्या १८ टक्के पडले. शाळा आणि महाविद्यालये यांना त्यांच्या हानीच्या ११ टक्के मदत मिळाली. खाजगी वर्गांच्या हानीचे प्रमाण त्या मानाने कमी असल्यामुळे त्यांना देण्यात आलेली मदत त्यांच्या हानीच्या ३० टक्के भरली. अनाथालयांना त्यांच्या हानीच्या ४२ टक्के आणि तालमी इत्यादींना सात टक्के अशा प्रमाणात मदत दिली गेली.

ज्या संस्थांनी अधिक मदतीसाठी सरकारकडे अर्ज केले होते त्यांना सरकारतर्फे एकूण ४६,००० रुपये मंजूर करण्यात आले. याशिवाय दोन प्रकाशन संस्थांना प्रत्येकी अनुक्रमे १६,००० व १०,००० रुपये देण्यात आले. एका सामाजिक संस्थेने आपद्ग्रस्त महिलांना रोजगार मिळावा म्हणून काही व्यवसाय चालू करण्याची योजना आखली होती. या संस्थेस मुख्यमंत्रि-निधीतून १५,००० रुपये मदत देण्यात आली. तसेच एका आंतरराष्ट्रीय मंडळाच्या पुणे शाखेने आपद्ग्रस्तांच्या नवीन

सारणी क्र. ४.५ : मदत मिळालेल्या संस्थांची संख्या व मदतीची रक्कम

| संस्थांचे स्वरूप | संख्या | एकूण मदतीची रक्कम (रु.) |
|---|---|---|
| देवळे | ७३ | १,३५,५१२ |
| मशिदी | १३ | २५,३३५ |
| अनाथालये | २ | १५,००० |
| रुग्णालय | १ | ३६,००० |
| शाळा आणि महाविद्यालये | १० | ४८,२०० |
| तांत्रिक विद्यालये | २ | १२,५०० |
| खाजगी वर्ग व बालकमंदिरे | १४ | ७,२५० |
| कला आणि गायन संस्था | ५ | १,२०० |
| सार्वजनिक विश्वस्त संस्था | ४ | १३,००० |
| पुस्तक भांडार | १ | १५,००० |
| तालमी, व्यायाम मंडळे इ. | ३९ | २१,३२७ |
| एकूण | १६४ | ३,३०,३२४ |

वसाहतीत एक रुग्णालय चालू करण्याचे ठरविले. त्यास मदत म्हणन मुख्यमंत्रि-निधीतून ६०,००० रुपये देण्यात आले.

### अशासकीय मदत

शहरातील आणि शहराबाहेरील अनेक सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय संस्थांमार्फत आपद्‌ग्रस्तांना बहुविध प्रकारे मदत झाली. या संस्थांनी कोणत्या स्वरुपात व किती मदत दिली यासंबंधी माहिती या संस्थांकडून गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे गोळा करण्यात आली.[४] तथापि तपशीलवार माहिती थोड्याच संस्था पुरवू शकल्या. या संस्थांकडे देणगी म्हणून वस्तुरूपांतही बरीच मदत जमा झाली होती. या मदतीचे मूल्यमापन त्या वेळचे बाजारभाव विचारात घेऊन करण्यात आले. आठ लोकोपकारी संस्था, चार व्यापारी संघ, सहा सामाजिक संस्था, तीन खाजगी निधी, चार राजकीय पक्ष, मुंबईमधील दोन लोकोपकारी संस्था यांजकडून याबाबत माहिती मिळाली. इतरही अनेक दानशूर व्यक्तींनी व्यक्तिशः मदतीचे वाटप केले होते. परंतु नेमकी किती मदत याप्रकारे दिली गेली व किती आपद्‌ग्रस्तांना या मदतीचा फायदा मिळाला ही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

आपद्‌ग्रस्तांना विविध मार्गांनी अशासकीय मदत देण्यात आली. उदाहरणार्थ, भोजनकेंद्रे चालविणे, रोख पैसे, कापड, धान्य, भांडी, औषधे आणि दुधाची भुकटी यांचे वाटप करणे, पुस्तके, शालोपयोगी सामान आणि गणवेश देणे, आर्थिक पुनर्वसनासाठी कर्जे देण्याची अधिकोषांमार्फत व्यवस्था करणे, कामधंदा उपलब्ध करून देणे.

अशासकीय संस्थांनी १३ भोजनकेंद्रे चालविली होती. एका संस्थेने सुमारे ६० विद्यार्थ्यांची जेवणाची महिनाभर मोफत सोय केली. संस्थांमार्फत एकूण १,८६,८०० शेर धान्याचे वाटप करण्यात

४. माहिती गोळा करण्यासाठी वापरलेली प्रश्नपत्रिका परिशिष्ट 'आ'मध्ये दिली आहे.

आले. यापैकी १२,२०० शेर धान्य पुण्याबाहेरून देणगी म्हणून आले होते. वाटप केलेल्या एकूण धान्याची किमत ८८,५०० रुपये होती. याशिवाय दुधाची भुकटी, बिस्किटे, यांसारखे जिन्नस वाटण्यात आले. त्यांची किंमत अंदाजे ५४,८०० रुपये होती.

पुण्यातील संस्थांतर्फे २,१४,७०० रुपये किंमतीचे कापड व कपडे आपद्ग्रस्तांस पुरविण्यात आले. एकूण १०,००० आपद्ग्रस्तांस या मदतीचा फायदा मिळाला. याशिवाय मुंबईमधील एका लोकोपकारी संस्थेने मोठ्या प्रमाणात कापड पुरविले. विभागीय समित्यांमार्फत या कापडाचे वाटप करण्यात आले. आपद्ग्रस्त कुटुंबास कमीतकमी एक धोतर, तीन वार पांढरे कापड, तीन वार सदऱ्याचे कापड, एका पोलक्याचे कापड, एक साडी आणि एक चादर इतक्या जिनसा मिळाव्या असे वाटपाचे सर्वसाधारण प्रमाण होते. एकूण ९,६७० वार पॉपलीन, १८,३९५ वार हुरक, ५,६३७ धोतरे, साडीसाठी ४२,१७४ वार वायल व ४,४५७ घोंगड्या व चादरी वाटण्यात आल्या. वरील कापडाची अंदाजे किंमत १,२६,९८२ रुपये होती, आणि ३,९०० आपद्ग्रस्त कुटुंबांना हे कापड देण्यात आले. याशिवाय या संस्थेकडून ९,८७२ रुपयांची भांडीही आपद्ग्रस्तांस देण्यात आली.

जुने कपडेसुद्धा मोठ्या प्रमाणात जमा झालेले होते. हे कपडे मुख्यत: मदत-केंद्रांवर राहाणाऱ्या कुटुंबांना देण्यात आले. काही कुटुंबांनी जुने कपडे स्वीकारण्यास नकार दिला असे कळते.

याव्यतिरिक्त आपद्ग्रस्त कुटुंबांना अनेक संस्थांनी भांड्यांचे संच पुरविले. एकूण १,०५,७०० रुपयांची भांडी खरेदी करण्यात आली आणि सुमारे ५,००० आपद्ग्रस्त कुटुंबांना ती देण्यात आली. मुंबईतील दुसऱ्या एका संस्थेने निरनिराळ्या संसारोपयोगी वस्तू एकत्र करून त्यांचे संच आपद्ग्रस्तांना दिले. यांमध्ये कापड व कपडे, पादत्राणे, भांडी वगैरे सामान एकत्र देण्यात आले होते. १,११८ कुटुंबांना या स्वरुपाची मदत मिळाली. त्यासाठी एकूण १,७७,७०० रुपये खर्च झाले. याशिवाय २९,३०५ रुपये रोख देण्यात आले.

औषधे, प्रसाधने, पादत्राणे, कंदील यांसारख्या वस्तूंचे वाटपही निरनिराळ्या संस्थांकडून करण्यात आले. या वस्तूंची अंदाजे किंमत १४,८०० रुपये झाली. विद्यार्थ्यांना पुस्तके, शालोपयोगी सामान वगैरे स्वरुपात जी मदत देण्यात आली तिची किंमत अंदाजे १३,००० रुपये झाली. याशिवाय १२,८०० रुपयांची पुस्तके विकत घेऊन एक पुस्तकपेढी चालू करण्यात आली.

एका सांस्कृतिक संस्थेने प्राध्यापक, पत्रकार, लेखक, संशोधक, कलावंत आदी ३६ आपद्ग्रस्तांना एकूण १०,२०० रुपयांची मदत दिली. प्रत्येकी २०० ते ५०० रुपये रक्कम देण्यात आली.

याशिवाय काही संस्थांनी कलावंत, साहित्यिक, व्यावसायिक, पुरोहित यांना एकूण १,९३,२०० रुपयांची रोख मदत दिली.

याप्रमाणे अशासकीय संस्थांकडून एकंदर १०,४१,२५० रुपयांची मदत वाटण्यात आली. (सारणी क्र. ४.६) यापैकी एकतृतीयांश मदत मुंबईमधील दोन संस्थांकडून आली होती व बाकीची पुण्यामधील सुमारे २५ संस्थांकडून जमा करण्यात आली होती. पुण्यातील संस्थांमध्ये सामाजिक व लोकोपकारी संस्थांनी यापैकी १९.८ टक्के मदत जमविली होती. १८.८ टक्के मदत खास आपद्ग्रस्तांसाठी उभारण्यात आलेल्या निधींमार्फत जमा झाली व राजकीय पक्षांकडून ६.२ टक्के मदत जमा झाली. अशासकीय मदतीची पदश: विभागणी अशी: ४५ टक्के कापड, २१ टक्के रोख, १५ टक्के भांडी आणि १९ टक्के इतर.

सारणी क्र. ४.६ : निरनिराळ्या संस्थांनी दिलेल्या साहाय्याचे स्वरूप व रक्कम

| यंत्रणा | संस्थांची संख्या | धान्य (रु.) | इतर खाद्य-पदार्थ (रु.) | कापड व कपडे (रु.) | भांडी (रु.) | शैक्षणिक मदत (रु.) | रोख पैसे (रु.) | इतर मदत (रु.) | एकूण मदत (रु.) | प्रतिशतता साहाय्य | सरासरी मदत (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लोकोपकारी संस्था | ८ | ५५४०० | ४३९०० | ४४६०० | १७४०० | २००० | ४१६०० | | २०४९०० | १९.७ | २५६१२ |
| राजकीय पक्ष | ४ | ५६०० | ३४०० | १०२०० | २४३०० | ६००० | १२४०० | ३००० | ६४९०० | ६.२ | १६२२५ |
| सामाजिक संस्था | ६ | ४८०० | ३००० | ५४३०० | ९८०० | ९५०० | १६९०० | ७००० | १०५३०० | १०.१ | १७५५० |
| विशेष निधी | ३ | १०००० | ४५०० | १०१६०० | ५४२०० | ८३०० | १२५०० | ४६०० | १९५७०० | १८.८ | ६५२३३ |
| कर्मचारी व व्यापारी यांच्या संघटना | ४ | १२७०० | – | ४००० | – | – | १०९८०० | २०० | १२६७०० | १२.२ | ३१६७५ |
| पुण्यातील एकूण संस्था | २५ | ८८५०० | ५४८०० | २१४७०० | १०५७०० | २५८०० | १९३२०० | १४८०० | ६९७५०० | ६७.० | २७९०० |
| मुंबईतील संस्था | २ | – | – | २५६८१० | ४८९६६ | – | २९३०५ | ८६६८ | ३४३७४९ | ३३.० | १७१८७५ |
| एकूण | २७ | ८८५०० | ५४८०० | ४७१५१० | १५४६६६ | २५८०० | २२२५०५ | २३४६८ | १०४१२४९ | – | ३८५६५ |
| प्रतिशतता साहाय्य | | ८.५ | ५.२ | ४५.३ | १४.९ | २.५ | २१.४ | २.२ | – | १००.० | |

आपद्ग्रस्तांना मदत देण्यासाठी निरनिराळ्या संस्थांनी आपले सभासद आणि हितचिंतक यांजकडुन देणग्या गोळा केल्या. सभा, संमेलने यासाठी राखून ठेवलेले पैसे काही संस्थांनी या मदतीसाठी वापरले. मोठ्या प्रमाणावर देणग्या गोळा करण्यासाठी मुंबईमध्ये मिरवणुका काढण्यात आल्या. परदेशांतूनही काही लोकांनी येथील संस्थांकडे पैसे पाठविले.

प्रत्येक संस्थेची मदत-वाटपाची व मदतीसाठी अर्ज मागविण्याची पद्धत वेगवेगळी होती. राजकीय पक्षांनी कार्यकर्त्यांच्या शिफारशीनुसार मदत-वाटप केले. युवक मंडळांनी आपापले सभासद, स्वयंसेवक व अधिकारी यांच्याकडून आलेल्या शिफारशीनुसार मदत दिली. काही सामाजिक संस्थांनी विद्यार्थी अथवा कामगार अशा विशिष्ट वर्गांतील आपद्ग्रस्तांना मदत दिली तर काहींनी जे मदत मागतील त्यांचे घर कोठे आहे एवढीच चौकशी करून मदत दिली. एका संस्थेने आपले स्वयंसेवक आपद्ग्रस्त विभागात पाठवून आपद्ग्रस्त कुटुंबांची यादी तयार करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या एका संस्थेने आपले सभासद, अधिकारी किंवा प्रतिष्ठित नागरिक यांची सही ज्यांनी अर्जावर मिळविली असेल अशा कुटुंबांनाच मदत दिली. आणखी एका संस्थेने प्रत्यक्ष आपद्ग्रस्त विभागांत आपल्या सभासदांना पाठवून मदत-वाटपाचे काम जागेवरच पार पाडले.

अनेक संस्था एकसमयावच्छेदे मदत वाटप करीत राहिल्यामुळे परस्परांमध्ये समन्वय साधणे कठीण झाले. कुटुंबे खरोखरच आपद्ग्रस्त आहेत की नाही हे योग्य रीतीने पडताळून न पाहिल्यामुळे काही मदत अनाठायी दिली गेली तर काही मदतीचा दुरुपयोग करण्यात आल्याचेही समजले. काही संस्थांनी सुरू केलेल्या मदतकार्यास योग्य ती प्रसिद्धी न मिळाल्यामुळे त्यांनी जमविलेली मदत सर्वांना पोहोचू शकली नाही. त्यामुळे ज्या कुटुंबांस मदतीची अत्यंत गरज होती त्यांना अग्रक्रम देणे नेहमीच शक्य झाले असे म्हणता येणार नाही.

या सर्व संस्थांव्यतिरिक्त आपद्ग्रस्तांचे मित्र व नातेवाईक यांनी आपद्ग्रस्तांना वैयक्तिकरीत्या बहुमोल मदत केली. अनेक आपद्ग्रस्त कुटुंबांना त्यांचे मित्र आणि नातेवाईक यांनी केवळ आसरा दिला एवढेच नव्हे तर अन्न-धान्ये व इतर आवश्यक जिन्नसही पुरविले. काही आपद्ग्रस्त कुटुंबांना आपले नातेवाईक व मित्र यांच्याकडे सहासहा महिने राहावे लागले. अर्थात या सर्व मदतीचे पैशाच्या परिभाषेत मूल्यमापन करणे अतिशय अवघड आहे. ज्या असंख्य लोकांनी याप्रकारचे साहाय्य आपखुशीने दिले त्या सर्वांना भेटून त्यांच्याकडून माहिती घेणे अशक्यप्राय होते. त्यांच्या संख्येबद्दल अंदाज करणेही कठीण आहे. अनेक लोकांकडून अशा प्रकारचे साहाय्य झाले व आपद्ग्रस्त लोकांच्या दृष्टीने ते अमूल्य ठरले एवढेच त्याबाबत म्हणता येईल.

आपद्ग्रस्त कुटुंबांना एकूण किती मदत दिली गेली हे सारांशरूपाने सारणी क्र. ४.७ मध्ये दिले आहे. एकूण सुमारे ७३.५ लाख रुपयांची मदत वाटली गेली. त्यातील निम्मी शासकीय यंत्रणेमार्फत व उरलेली अशासकीय संस्थांतर्फे वाटण्यात आली. प्रत्येक आपद्ग्रस्त कुटुंबास मदत म्हणून सरासरी २७५ रुपये अथवा कुटुंबांच्या सरासरी हानीच्या २५ टक्के मदत मिळाली असे म्हणता येईल. यामध्ये मित्र आणि नातेवाईक यांच्याकडून निवारा व अन्नधान्ये या स्वरुपांत जी मदत मिळाली तिचा अंतर्भाव केलेला नाही.

मदत पुरेशी होती की नाही हे प्रत्येकाची किती हानी झाली यावर अवलंबून असणार हे उघड आहे. जेमतेम पोट भरण्याइतकेच ज्यांचे उत्पन्न आहे, बचत करणे ज्यांना शक्यच नाही व त्यामुळे

सारणी क्र. ४.७ : शासकीय व अशासकीय यंत्रणांद्वारे देण्यात आलेल्या मदतीचे स्वरूपानुसार विभाजन

| यंत्रणा | शिजलेले अन्न (रु.) | धान्य (रु.) | इतर खाद्य-पदार्थ (रु.) | कापड, कपडे (रु.) | भांडी (रु.) | शैक्षणिक मदत (रु.) | रोख पैसे (रु.) | इतर वस्तू (रु.) | निवृत्ति-वेतन (रु.) | एकूण मदत (रु.) | प्रतिशतता साहाय्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शासकीय | – | ७६५०० | ४२२४०० | ७०७४०६ | २७२१९२ | – | २२४९२६१ | – | ३०८७६ | ३७५८६३५ | ५१.१ |
| मुख्यमंत्रि-निधी | – | – | – | २७७२७२ | ३१८८७१ | ९८५८०० | – | १५१२५ | १२००० | १६०९०६८ | २१.९ |
| खाजगी संस्थांनी जमविलेले निधी | ८१५०० | ८८५०० | ५४८०० | ४७१५१० | १५४६६६ | २५८०० | २२२५०५ | २३४६८ | – | ११२२७४९ | १५.३ |
| सरकारकडे जमा झालेल्या देणग्या | – | ४७०००० | २१०००० | १८४००० | – | – | – | – | – | ८६४००० | ११.७ |
| एकूण अशासकीय | ८१५०० | ५५८५०० | २६४८०० | ९३२७८२ | ४७३५३७ | १०११६०० | २२२५०५ | ३८५९३ | १२००० | ३५९५८१७ | ४८.९ |
| एकूण | ८१५०० | ६३५००० | ६८७२०० | १६४०१८८ | ७४५७२९ | १०११६०० | २४७१७६६ | ३८५९३ | ४२८७६ | ७३५४४५२ | |
| प्रतिशतता साहाय्य | १.१ | ८.६ | ९.४ | २२.३ | १०.१ | १३.८ | ३३.६ | ०.५ | ०.६ | – | १००.० |

ज्यांच्याजवळ नुकसान होण्यासारखी फारशी चीजवस्तूच नाही अशा कुटुंबांच्या बाबतीत त्यांच्या तात्कालिक गरजा भागविण्याच्या दृष्टीने २७५ रुपये ही रक्कम अपुरी म्हणता येणार नाही. याउलट सालोसालच्या कमाईतून जमविलेली सारी चीजवस्तू अनेकांना गमवावी लागली. अशा कुटुंबांना त्यांच्या तात्कालिक गरजा भागविण्याच्या दृष्टीने मदतीचा उपयोग झाला असला, तरी त्यामुळे पूर्वीची सांपत्तिक स्थिती त्यांना प्राप्त होणे शक्यच नव्हते. विशेषत: ज्यांची घरे पडली त्यांची परिस्थिती फार बिकट झाली. कारण घर पडले म्हणजे केवळ त्यांची चीजवस्तू व निवारा गेला एवढेच नव्हे, तर त्यांचे उत्पन्नाचे एक साधनही नाहीसे झाले. अशा कुटुंबांना अनेक पूर्वनियोजित गोष्टी पार पाडणे अशक्य होऊन त्यांच्या संसाराची घडी कायमची विसकटण्याचा धोका निर्माण झाला.

### व्यावसायिक पुनर्वसन

व्यापारी, कारागीर, कारखानदार आणि व्यावसायिक यांच्या आर्थिक पुनर्वसनासाठी राज्य-सरकार व मुख्यमंत्रि-निधी, अधिकोष व व्यापारी संघटना यांच्यातर्फे निरनिराळ्या योजना आखण्यात आल्या.

*मुख्यमंत्रि-निधीतर्फे दिलेले साहाय्य :* मुख्यमंत्रि-निधीतर्फे मदत देण्यासाठी आपद्ग्रस्त कारागीर आणि व्यापारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात आले. त्यामध्ये अर्जदाराचा पत्ता, शिक्षण, व्यवसायाचे स्वरूप, वार्षिक नफा, आवश्यक साधन-सामग्री यांबद्दल माहिती विचारलेली होती. महाराष्ट्र सरकारच्या उद्योग संचालनालयाने पुण्यामध्ये एक स्वतंत्र कचेरी उघडून हे अर्ज स्वीकारले व त्यांची तपासणी केली. व्यावसायिकांची प्रत्यक्ष हानी किती झाली, याची पाहणी संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी जागेवर जाऊन केली व तदनंतर मदतीसंबंधी शिफारस केली. या शिफारशीनुसार ज्या कारागीर, दुकानदार व व्यापारी यांस २०० रुपयांहून कमी रकमेची आवश्यकता होती त्यांस मुख्यमंत्रि-निधीतून रोख मदत देण्यात आली.

या योजनेनुसार निरनिराळ्या ७४ प्रकारच्या व्यावसायिकांस मदत देण्यात आली व ३,१०७ व्यावसायिकांना तिचा फायदा मिळाला. यासाठी एकूण ३,७१,००५ रुपयांचा विनियोग करण्यात आला. ही मदत पुढील व्यावसायिकांना प्रामुख्याने मिळाली : केरसुण्या करणारे, दोर वळणारे, धोबी, शिंपी, न्हावी, चांभार, गंवडी, सुतार आणि लोहार. प्रत्येकास सरासरी १२० रुपये रोख मदत देण्यात आली. ही मदत त्यांच्या सरासरी नुकसानीच्या ८८ टक्के होते.

*सरकारतर्फे दिलेले साहाय्य :* ज्या व्यावसायिकांना २०० रुपयांहून अधिक मदतीची आवश्यकता होती त्यांना उद्योग संचालनालयातर्फे प्रत्येकी २०० ते ५०० रुपयांपर्यंत रोख मदत देण्याचे ठरले. यासाठी व्यावसायिकांकडून औद्योगिक आयुक्त यांच्या कार्यालयात अर्ज स्वीकारण्यात आले व अर्जांची छाननी व तत्संबंधी चौकशी महसूल अधिकाऱ्यांनी केली. एकूण ३३२ व्यावसायिकांना १,२१,८५० रुपये मदत मिळाली. यांच्यामध्ये सुतार, तांब्यापितळेची भांडी घडविणारे, दुचाकी दुरुस्त करणारे, न्हावी, शिंपी, इत्यादी व्यावसायिकांचा प्रामुख्याने समावेश होता. ही मदत सरासरी प्रत्येकी ३६७ रुपये भरली.

उद्योग संचालनालयाने काही आपद्ग्रस्त उद्योगांस कर्जे देण्याची एक योजना आखली. दिलेल्या कर्जापैकी एकचतुर्थांश किंवा प्रत्येकी जास्तीतजास्त १००० रुपये इतकी रक्कम सरकारतर्फे मदत म्हणून द्यावयाची असे ठरले. या योजनेनुसार ४४ व्यावसायिकांस १,११,११५ रुपयांची कर्जे देण्यात

आली. या कर्जांच्या रकमेपैकी २८,००० रुपये रक्कम मदत म्हणून दिली होती. म्हणजेच प्रत्येकी सरासरी १,८८८ रुपये कर्जरूपाने आणि प्रत्येकी सरासरी ६३६ रुपये मदत म्हणून मिळाली. काही छोटया उद्योगधंद्यांनाही उद्योग संचालनालयाच्या शिफारशीनुसार सरकारतर्फे रोख मदत व कर्जे देण्यात आली. दोन छापखान्यांना प्रत्येकी ७५० रुपयांची रोख मदत मिळाली. विडया तयार करणे, खाद्यपदार्थ तयार करणे, अशा इतर सहा उद्योगधंद्यांना १३,७०० रुपयांची कर्जे देण्यात आली. या रकमेपैकी ३,८७५ रुपये रक्कम मदत म्हणून दिली होती. अर्जदाराची जास्तीतजास्त गरज ही मदतीची कमाल मर्यादा धरण्यात आली होती. मदत मंजूर करताना, अर्जदाराची गरज, सरकारी अधिकाऱ्यांनी केलेल्या शिफारशी, तसेच अर्जदारास इतर ठिकाणांहून मिळालेली मदत या सर्व गोष्टी विचारात घेण्यात आल्या.

*अधिकोषांमार्फत देण्यात आलेले साहाय्य :* सहकारी आणि वाणिज्य अधिकोषांमार्फत कर्जे देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येकी ३००० रुपयांपर्यंत कर्ज देण्याची तयारी सहकारी अधिकोषांनी दर्शविली व प्रत्येकी ३००० ते १०,००० रुपयांपर्यंत कर्जे देण्याची जबाबदारी वाणिज्य अधिकोषाने स्वीकारली. एकूण चार नागरी सहकारी अधिकोष, एक मध्यवर्ती सहकारी अधिकोष आणि एक वाणिज्य अधिकोष यांनी कर्जरूपाने मदत दिली. सरकार, मुख्यमंत्रि-निधी आणि काही व्यापारी संघटना यांनी आखलेल्या कर्जे देण्याच्या योजना अधिकोषांमार्फत पार पाडण्यात आल्या.

नागरी सहकारी अधिकोषांनी कर्जरूपाने मदत देण्यासाठी स्वतःच्या स्वतंत्र योजना आखल्या होत्या. आपल्या आपद्ग्रस्त खातेदारास याबाबत त्यांनी अग्रहक्क दिलेला होता. या योजनांनुसार एकूण १७५ व्यावसायिकांना ८३,७८६ रुपयांची कर्जे मिळाली.

मुंबई येथील काही व्यापारी संघटनांनी नागरी सहकारी अधिकोषांमार्फत कर्जे देण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी द. सा. द. शे. पाच रुपये व्याजाने १,२५,००० रुपयांच्या ठेवी या अधिकोषांमध्ये ठेवल्या. या योजनेखाली २९० व्यावसायिकांस एकूण ५,४४,८४० रुपयांची कर्जे दिली गेली. कर्जांच्या परतफेडीमध्ये अधिकोषांना नुकसान सोसावे लागले तर त्याची भरपाई वरील ठेवीवरील व्याजातून करावयाची, आणि तेवढयाने नुकसानभरपाई होत नसेल तर त्या ठेवीच्या मूळ रकमेमधून ती करावी असे ठरले होते.

महाराष्ट्र सरकारच्या उद्योग संचालनालयाने सहकारी अधिकोषांच्या साहाय्याने कर्जे देण्याची एक योजना आखली होती. या योजनेनुसार देण्यात आलेल्या कर्जासाठी कर्जाऊ रकमेच्या दोन-तृतीयांशपर्यंत रकमेची सरकारकडून हमी घेण्यात आली होती. संचालनालयाच्या शिफारशीनुसार १४४ व्यावसायिकांना एकूण २,५४,६७५ रुपयांची कर्जे या योजनेखाली देण्यात आली.

वरील योजनेनुसार ज्या व्यावसायिकांना कर्जे मिळू शकली नाहीत अशांच्या कर्जांची सोय करण्यासाठी मुख्यमंत्रि-निधीतर्फे एक योजना सुचविण्यात आली होती. या योजनेनुसार प्रत्येकी ५०० ते ३००० रुपयांपर्यंत कर्जे मिळण्याची व्यवस्था सहकारी अधिकोषांमार्फत करण्यात आली. कर्जांच्या परतफेडीत अधिकोषांना तोटा सहन करावा लागल्यास त्यातील दोनतृतीयांश भागाची भरपाई निधीतून करण्यात येईल असे आश्वासन अधिकोषांना देण्यात आले होते. ही कर्जे देण्यासाठी तारण-ठेव म्हणून अधिकोषांकडे निधीकडून तीन लाख रुपये द. सा. द. शे. चार रुपये व्याजाने ठेवण्यात आले. मुख्यमंत्रि-निधीच्या या योजनेनुसार ७६ व्यावसायिकांस १,२७,३५० रुपयांची कर्जे देण्यात आली.

सहकारी अधिकोषांना कर्जे देण्यासाठी लागणारा द्रव्य-पुरवठा राज्य सहकारी अधिकोषाने केला. याशिवाय सहकारी अधिकोषांना या व्यवहारात जो तोटा येईल त्यापैकी ५० टक्के रकमेची भरपाई राज्य सहकारी अधिकोषाने आणि २५ टक्के मध्यवर्ती सहकारी अधिकोषाने करावयाची होती. कर्जाऊ रकमेपैकी जास्तीतजास्त १००० रुपयांपर्यंत रक्कम साहाय्य म्हणून द्यावयाचे सरकारने आश्वासन दिले. सरकारतर्फे साहाय्य म्हणून दिलेली रक्कम कर्जफेडीचा एक हप्ता म्हणन अधिकोषांकडे भरण्यात आली. शिवाय सहकारी अधिकोषांचा व्याजाचा दर (साडेसात टक्के) आणि बाजारातील चालू दर (साडेपाच टक्के) यांमधील तफावत भरून काढण्याची जबाबदारी सरकारने घेतली.

सहकारी अधिकोषांकडून निरनिराळ्या योजनांखाली कर्जे घेणाऱ्यांची संख्या व कर्जाची एकूण रक्कम यांबद्दलची माहिती सारणी क्र. ४.८ मध्ये एकत्रित देण्यात आली आहे.

सारणी क्र. ४.८ : सहकारी अधिकोषांमार्फत दिलेल्या कर्जांचा तपशील

| योजनांचे पुरस्कर्ते | ऋणकोंची संख्या | कर्जाची एकूण रक्कम (रु.) |
|---|---|---|
| सहकारी अधिकोष | १७५ | ८३,७८६ |
| व्यापारी संघटना | २९० | ५,४४,८४० |
| उद्योग संचालनालय | १४४ | २,५४,६७५ |
| मुख्यमंत्रि-निधी | ७६ | १,२७,३५० |
| एकूण | ६८५ | १०,१०,६५१ |

वरील योजनांनुसार व्यावसायिकांना प्रत्येकी सरासरी १४७५ रुपये कर्ज म्हणून मिळाले. ही रक्कम त्यांनी नमूद केलेल्या सरासरी हानीच्या ४० टक्के भरली.

*वाणिज्य अधिकोषाकडून देण्यात आलेले साहाय्य :* आपद्ग्रस्त व्यावसायिकांस कर्जे देण्याची एक योजना वाणिज्य अधिकोषाने हाती घेतली व या योजनेनुसार २०३ व्यावसायिकांस १,२२,२०० रुपयांची कर्जे दिली. याशिवाय आणखी कर्जे मिळण्याची सोय व्हावी म्हणून मुख्यमंत्रि-निधीतर्फे या अधिकोषाकडे ५,५०,००० रुपये पाच वर्षांसाठी ठेव म्हणून ठेवण्यात आले. कर्जवसुलीमध्ये तोटा आल्यास त्यापैकी दोनतृतीयांश रकमेची भरपाई करण्याची तयारीही मुख्यमंत्रि-निधीने दर्शविली होती. या योजनेनुसार ३६७ व्यावसायिकांस १९,५९,२०० रुपयांची कर्जे देण्यात आली. शहरातील काही व्यापारी आणि औद्योगिक संघटनांनी १,३०,३८० रुपये अधिकोषाकडे ठेवी म्हणून ठेवल्या आणि संघटनांनी शिफारस केलेल्या व्यावसायिकांस कर्जे देण्याची सोय करण्यात आली. या योजनेनुसार १९४ व्यावसायिकांस ६,५१,४०० रुपयांची कर्जे मिळाली. अशाच प्रकारची सोय काही लोकोपकारी संस्थांनीही केली होती. त्यांनी अधिकोषाकडे ७२,००० रुपयांची ठेव ठेवली व या रकमेचे तारणावर १२५ व्यावसायिकांना २,९४,००० रुपयांची कर्जे दिली.

वाणिज्य अधिकोषांमार्फत वर उल्लेखिलेल्या निरनिराळ्या योजनांनुसार ज्यांस कर्जे देण्यात आली त्यांची संख्या आणि कर्जाची एकूण रक्कम सारणी क्र. ४.९ मध्ये देण्यात आली आहे.

सारणी क्र. ४.९ : वाणिज्य अधिकोषामार्फत दिलेल्या कर्जांचा तपशील

| योजनांचे पुरस्कर्ते | ऋणकोंची संख्या | कर्जाची एकूण रक्कम (रु.) |
|---|---|---|
| वाणिज्य अधिकोष | २०३ | १२,२२,००० |
| मुख्यमंत्रि-निधी | ३६७ | १९,५९,२०० |
| व्यापारी संघटना | १९४ | ६,५१,४०० |
| लोकोपकारी संस्था | १२५ | २,९४,००० |
| एकूण | ८८९ | ४१,२६,६०० |

कर्जे मिळविण्यासाठी अर्जदारांनी केलेल्या अर्जांत आपली हानी किती झाली याचे अंदाज नमूद केलेले होते. कर्ज मंजूर करण्यापूर्वी अधिकोषांच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन हानीचा अंदाज पडताळून पाहिला. प्रत्येकी सरासरी हानी ७१०० रुपये झाली आणि प्रत्येकी सरासरी ४६४० रुपये कर्ज मिळाले. म्हणजेच हानीच्या सरासरी ६५ टक्के कर्ज मिळाले.

कर्जफेडीच्या अटी सर्वसाधारणपणे प्रत्येक योजनेत समानच होत्या. कर्जफेडीची मुदत तीन ते पाच वर्षे होती आणि कर्ज मिळाल्यापासून तीन महिन्यांनी कर्जफेडीस सुरुवात होत होती. ज्या कर्जांची हमी देण्यात आली होती त्यांबाबत व्याजाचा दर साडेपाच टक्के होता व इतर कर्जांबाबत सहा टक्के होता. कर्ज देण्यापूर्वी वचन-पत्र लिहून घेण्यात येत असे. शक्य असेल त्याच्याकडून माल किंवा मिळकतीची हक्कपत्रे तारण म्हणून घेण्यात येत. कर्जाऊ रकमेपैकी जास्तीतजास्त १००० रुपयांपर्यंत रक्कम साहाय्य म्हणून द्यावयाचे सरकारने आश्वासन दिले. सरकारतर्फे साहाय्य म्हणून दिलेली रक्कम कर्जफेडीचा एक हप्ता म्हणून अधिकोषांकडे भरण्यात आली.

*राज्य वित्त निगमामार्फत देण्यात आलेले साहाय्य :* प्रत्येकी १०,००० ते १,००,००० रुपयांपर्यंत कर्जे देण्याची सोय राज्य वित्त निगमामार्फत करण्यात आली. उद्योग संचालनालयाच्या शिफारशी-नुसार निगमाने कर्जाची रक्कम मंजूर केली. कर्जवसुलीत निगमास काही तोटा आल्यास त्याची अंशतः भरपाई करण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. तसेच सरकारने प्रत्येक कर्जदारास १००० रुपयांपर्यंत रक्कम मदत म्हणून दिली.

संचालनालयाने एकूण ६६ अर्जदारांची शिफारस केली. अर्ज तपासणे, प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करणे ही कामेही संचालनालयातर्फे करण्यात आली. मार्च १९६२ अखेर निगमामार्फत ५३ अर्जदारांस १६,७३,००० रुपयांची कर्जे मंजूर केली गेली. यामध्ये धातुकाम, छपाई, रसायने इत्यादी उद्योगांचा समावेश होता. प्रत्येक उद्योगास सरासरी ३१,५०० रुपये कर्ज मिळाले.

निरनिराळ्या कर्ज आणि मदत योजनांविषयी माहिती मिळविल्यानंतर साहजिकच असा प्रश्न उपस्थित होतो, की ज्या व्यावसायिकांनी मदत स्वीकारली त्यांच्या आर्थिक पुनर्वसनास मदतीचा कितपत उपयोग झाला ? या बाबतीत अधिकोषांकडे चौकशी करता समजले की, कर्जे ज्यांनी घेतली त्यांपैकी बहुतेकांकडून व्यवस्थित परतफेड होत आहे. चार नागरी सहकारी अधिकोषांपैकी फक्त दोन अधिकोषांकडे कर्जाची थकबाकी असल्याचे आढळले. जून १९६४ पर्यंत एका अधिकोषा-

च्या बाबतीत आठ टक्के व दुसऱ्याच्या बाबतीत १६ टक्के ऋणकोंकडून कर्जफेड वेळेवर झाली नाही असे कळले. परंतु अंतिमतः त्यांच्याकडून पूर्ण कर्जफेड होईल असा विश्वास अधिकोषांच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. जून १९६४ अखेरीस या अधिकोषांकडे आपद्‌ग्रस्त व्यावसायिकांना दिलेल्या कर्जापैकी कोणतेही 'अप्राप्य ऋण' या वर्गात मोडत नसल्याचे सांगण्यात आले.

ज्यांनी वाणिज्य अधिकोषांकडून कर्ज घेतले त्यांच्यापैकी ११ टक्के व्यावसायिकांकडून परतफेड वेळेवर होत नाही असे कळले. तरीही केवळ तीन टक्के कर्जदारांची कर्जेच 'अप्राप्य ऋण' या सदरात मोडतील असे अधिकाऱ्यांचे मत पडले. या तीन टक्के कर्जदारांनी फेडावयाच्या रकमे-पैकी १६ टक्के रकमेची परतफेड केली होती आणि उरलेला भाग बहुतेक फेडला जाणार नाही असे अधिकाऱ्यांना वाटत होते. याप्रमाणे 'अप्राप्य ऋण' या सदरात एक लाख रुपयांहून थोड्या अधिक रकमेची कर्जे मोडत होती. बहुसंख्य कर्जदारांनी परतफेडीबाबत दिरंगाई केली नाही तेव्हा व्यावसायिकांच्या आर्थिक पुनर्वसनासाठी मदत उपयुक्त ठरली असे म्हणता येईल.

### ग्रामीण विभागास मदत

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या घरादाराची व सामानसुमानाची हानी झाली. शिवाय त्यांच्या शेतजमिनींनाही नुकसान पोचले. आपद्‌ग्रस्त शेतकरी व इतर ग्रामीण कुटुंबांना मदतीची मोठी आवश्यकता होती. ज्या कुटुंबांना ५०० रुपयांपर्यंत मदतीची आवश्यकता होती त्यांना रोख मदत देण्यात आली. याप्रमाणे ११४४ कुटुंबांना प्रत्येकी सरासरी १०० रुपये रोख दिले गेले. ज्यांस अधिक मदतीची गरज होती त्यांस मध्यवर्ती सहकारी अधिकोषांकडून कर्जे मिळण्याची व्यवस्था करण्यात आली. धुपलेल्या शेतजमिनी लागवडीयोग्य करण्यासाठी जो खर्च येईल त्यापैकी निम्मा खर्च देण्याचे मुख्यमंत्रि-निधी समितीने ठरविले. ६५० एकर जमिनीच्या सुधारासाठी मुख्यमंत्रि-निधीतून ३०,००० रुपये देण्यात आले व ३०० शेतकरी कुटुंबांना त्याचा फायदा मिळाला. उरलेला खर्च शेतकऱ्यांनी केला, आणि त्यासाठी सरकारकडून शेतकऱ्यास कर्जे देण्यात आली. याशिवाय मागासलेल्या जातीतील ज्या कुटुंबांच्या घरादाराचे नुकसान झाले होते त्यांस घरदुरुस्तीसाठी एकूण २४,००० रुपये देण्यात आले.

### आवश्यक मालाचा पुरवठा

उद्योगधंद्यांच्या पुनरुभारणीसाठी ज्यांच्या इमारतींची हानी झाली होती त्यांना बांधकामासाठी विटा, पोलाद, सिमेंट वगैरे पुरविणे आवश्यक होते. ज्यांच्या जागा पूररेषेत जात होत्या त्यांस धंदा पुन्हा सुरू करण्यासाठी इतरत्र जागा देणे जरूर होते. काही कारखान्यांची यंत्रसामग्री नादुरुस्त अथवा नष्ट झाली होती. विशेषतः परदेशांतून यंत्रसामग्री आयात करावयाची असेल तर कारखानदारांस त्वरित परवाना मिळवून देणे आवश्यक होते.

विटांचा कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ नये म्हणून शहरातील विटांचा साठा सरकारने गोठविला. आपद्‌ग्रस्त लोकांच्या गरजेची पाहणी करून त्याप्रमाणे त्यांस विटा पुरविण्यात आल्या. सिमेंट आणि पोलाद यांच्या पुरवठाव्यवस्थेत आपद्‌ग्रस्तांना अग्रहक्क देण्याचे ठरले. मालाअभावी धंदा बंद पडू नये म्हणून काही धंद्यास कच्च्या मालाचा तातडीने पुरवठा करण्यात आला. उदा. शहरातील वृत्त-पत्रांना त्यांचे कागदाचे साठे नष्ट झाल्यामुळे १८ टन वृत्तपत्र कागद तातडीने देण्यात आला.

औद्योगिक इमारतींच्या दुरुस्तीसाठी किंवा पुनर्बांधणीसाठीही कर्जे देण्यात आली. प्रत्येकी ५००० रुपयांपर्यंत कर्ज देण्याची सरकारने तयारी दर्शविली. हे कर्ज दोन हप्त्यांत व साडेपाच टक्के व्याजाने देण्यात आले. परतफेड एक वर्षानंतर सुरू होण्याची तरतूद होती. याप्रमाणे दहा अर्जदारांस एकूण २६,५०० रुपयांची कर्जे देण्यात आली.

आपद्ग्रस्त व्यावसायिकांस सवलत म्हणून त्यांजकडून विक्रीकर घेणे एक वर्ष स्थगित करण्यात आले. आयकर अधिकाऱ्यांनी झालेले नुकसान अजमाविले व करआकारणी करताना झालेली हानी विचारात घेण्याचे आश्वासन दिले.[५]

ज्यांची पूर्वीची धंद्याची जागा पूररेषेमध्ये येत असल्यामुळे निरुपयोगी ठरत होती अशा उद्योगांस नवीन जागा देण्याचे ठरले. यासाठी पुणे-सातारा रस्त्यावर, स्वारगेटापलीकडे १८ एकर जागा घेण्यात आली. या जागेचे एकूण ३४ भाग पाडण्यात आले. तसेच लघु-उद्योगांना भाड्याने देण्यासाठी २८ छपऱ्या बांधण्यात आल्या. शुक्रवार पेठेमध्ये प्रत्येकी ८० चौरस फुटांचे ६२ गाळे कारागिरांना भाड्याने देण्यासाठी बांधण्यात आले. उद्योगधंद्यांसाठी राखून ठेवलेल्या १८ एकर जागेतील प्रत्येक भागाचे मासिक भाडे दर १०० चौरस फुटांस १२.७५ रुपये होते. छपऱ्यांचे मासिक भाडे दर १०० चौरस फुटांस ३१ रुपये आणि गाळ्याचे मासिक भाडे २४ रुपये होते.

धंद्यासाठी जागा पाहिजे म्हणून सरकारकडे ६३८ अर्ज आले. जुलै १९६२ पर्यंत ३९० अर्जदार जागा मिळण्यास पात्र ठरले होते. परंतु स्वारगेटापलीकडे ज्या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या होत्या त्यांस किंमत किती द्यावयाची यावरून वाद निर्माण झाल्याने प्रकरण न्यायालयापुढे गेले आणि न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत जमीनसुधाराचे सर्व काम स्थगित करण्यात आले. जुलै १९६२ पर्यंत गाळ्यांची वाटणी झाली नव्हती. भाडे जास्त आहे म्हणून अनेक कारागीर गाळे घेण्यास फारसे राजी नव्हते.

आपद्ग्रस्तांसाठी ज्या नवीन वसाहती बांधल्या त्यांमध्ये आपद्ग्रस्त व्यावसायिकांसाठी काही जागा राखून ठेवली गेली. व्यावसायिकांनी जागा भाड्याने घेऊन छपरी उभारावी व दुकान काढावे अशी ही योजना होती. १९६२ अखेरपर्यंत सेनादत्त वसाहतीत चार, पांडवनगरामध्ये दोन, दत्तवाडीत तीन आणि भवानी पेठेत एक अशा १० जागा भाड्याने देण्यात आल्या. याशिवाय आपद्ग्रस्तांसाठी राहण्यासाठी जे गाळे भाड्याने घेतले त्यांमधील थोडी जागा त्यांनी स्वतःच्या व्यवसायासाठी वापरली. अशा प्रकारे सेनादत्त वसाहतीत नऊ, पांडवनगरात नऊ, दत्तवाडीत सहा आणि पर्वतीदर्शनमध्ये वीस दुकाने उघडली गेली.

### अशासकीय मदत

काही लोकोपकारी व व्यापारी संस्थांनीही व्यावसायिकांच्या पुनर्वसनास हातभार लावला. काही संघटनांनी अधिकोषांकडे ठेवी ठेवून कर्जाची सोय केली त्यांची माहिती यापूर्वी आलीच आहे. इतर काही संस्थांनी आपद्ग्रस्त व्यापारी व कारागीर यांना रोख पैशाची अथवा वस्तुरूपाने मदत दिली. यासाठी आपले सभासद व अधिकारी यांजकडून शिफारशी मागवून आपद्ग्रस्त व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायास उपयुक्त अशी सामग्री देण्यात आली. यामध्ये वाद्ये, छायाचित्रणाची सामग्री

५. संपदा: ऑगस्ट-सप्टेंबर १९६१, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रीज, पुणे.

आणि गवंडी, सुतार, शिंपी आदींना लागणारी सामग्री वगैरे वस्तूंचा समावेश होता. अशा प्रकारची एकूण १०,००० रुपयांची मदत देण्यात आली. मुंबईमधील एका संघटनेने १३ आपद्ग्रस्त व्यापाऱ्यांना ४०,००० रुपयांची कर्जे दिली.

व्यावसायिक पुनर्वसनासाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेता असे दिसून येते, की मुख्य-मंत्रि-निधी व व्यापारी संघटना यांच्यामार्फत अधिकोषांचे द्वारा सवलतीच्या अटींवर कर्जे मिळण्याबाबत जी व्यवस्था करण्यात आली ती व्यावसायिकांना त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने फार उपयुक्त ठरली. या मदतीमुळे आवश्यक माल विकत घेऊन थोड्या अवधीत धंदा पुन्हा सुरू करणे अनेकांना शक्य झाले. शहरातील उद्योगधंद्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने या योजना फायदेशीर ठरल्या असे म्हणण्यास हरकत नाही.

Y:4355:13. 23156.N714
K7
122810

# आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन

पानशेत आपत्तीमुळे जे अनक बिकट प्रश्न निर्माण झाले त्यांमध्ये बेघर कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रामुख्याने उल्लेख करावयास पाहिजे. महानगरपालिकेने केलेल्या अंदाजानुसार पानशेत आपत्तीत सुमारे १८०० घरांचे फार मोठे नुकसान झाले व यांपैकी निम्मी घरे तर पूर्णतया नामशेष झाली. राहण्याच्या जागेची टंचाई पुण्यात दुसऱ्या महायुद्धापासूनच जाणवू लागली होती, त्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात घरे नष्ट झाल्याने जागेचा प्रश्न अत्यंत उग्र झाला. शिवाय आपद्ग्रस्त विभागांचे पद्धतशीर पुनर्वसन करावयाचे म्हणजे तेथे पुन्हा पूर्वीसारखी गर्दीदाटीची राहणी वाढू देणे योग्य नव्हते. म्हणजेच या भागात राहणाऱ्या अनेक कुटुंबांना अन्यत्र वसाहतीसाठी जागा देणे आवश्यक होते. बेघर कुटुंबांचे पुनर्वसन करताना शहर संयोजनाचा विचार करून त्या चौकटीत नवीन योजना बसतील हे पाहणे जरुरीचे होते. अन्यथा शहराच्या भविष्यकालीन सुयोग्य विकासास अडचण निर्माण होण्याचा संभव होता.

बेघर कुटुंबांना एकूण किती आणि कोणत्या प्रकारची राहावयाची जागा लागेल याची अजमावणी करण्यासाठी गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे उपहत घरांची पाहणी डिसेंबर १९६१ मध्ये हाती घेण्यात आली. आपद्ग्रस्त घरांत प्रत्येकी किती खोल्या होत्या, त्यांपैकी किती खोल्यांचे नुकसान झाले, नुकसान कोणत्या स्वरुपाचे झाले, किती खोल्यांची दुरुस्ती करण्यात आली, उपहत घरांत आपत्तीसमयी किती कुटुंबे राहात होती, त्यांपैकी किती कुटुंबे घर सोडून अन्यत्र राहावयास गेली, किती परत आली, दुरुस्त केलेल्या भागांत नवीन कुटुंबे राहावयास आली काय, यासंबंधीची माहिती पाहणीद्वारे गोळा करण्यात आली.[1] वरील माहिती शक्यतो घरमालकांकडून किंवा त्यांच्या अनुपस्थितीत भाडेकऱ्यांकडून घेण्यात आली. घरमालकाची गाठ घेण्यासाठी अनुसंधात्यांना एका घरास अनेकदा भेट द्यावी लागली. मार्च १९६२ अखेर पाहणीचे बहुतेक काम पुरे झाले. त्यानंतर फेरतपासणीसाठी काही घरांना पुन्हा भेट द्यावी लागली.

महानगरपालिकेने तयार केलेली आपद्ग्रस्त गृहक्रमांकांची यादी पाहणीसाठी वापरण्यात आली. यामध्ये जवळजवळ १८०० गृहक्रमांक होते. परंतु नुकसान पोहोचलेली सर्व घरे या यादीमध्ये समाविष्ट झाली नव्हती असे आढळून आले. तेव्हा प्रत्यक्ष पाहणी करताना ज्या घरांचे नुकसान झालेले आढळले अशांचा या यादीमध्ये समावेश करण्यात आला. त्यामुळे पाहणीमध्ये समाविष्ट झालेल्या घरांची एकूण संख्या २३९१ भरली.

---

१. पाहणीसाठी वापरलेली प्रश्नपत्रिका परिशिष्ट 'आ'मध्ये दिली आहे.

पाहणीमध्ये मिळालेली माहिती महानगरपालिकेमधील मालमत्तेच्या नोंदीशी पडताळून पाहिली. आपद्ग्रस्त घरांमधील खोल्यांची एकूण संख्या निश्चित करण्याच्या दृष्टीने हा पडताळा पाहणे उपयुक्त ठरले. आपद्ग्रस्त घरांतील रहिवाशी कुटुंबांची नावे मदतीसाठी अर्ज केलेल्या कुटुंबांच्या नावांशी पडताळून पाहिली. ज्या ठिकाणी नावांमध्ये विसंगती आढळली त्या घरास पुन्हा भेट देऊन पडताळा घेण्यात आला.[२] फेरतपासणीचे हे काम मे १९६२ अखेर संपले.

ज्या घरांना विशेष दुरुस्तीची आवश्यकता होती अशी सर्व घरे पाहणीमध्ये समाविष्ट केली होतीं. किरकोळ दुरुस्तीची आवश्यकता असलेल्या घरांतून कुटुंबांना घर सोडून बाहेर पडावे लागले नाही, त्यामुळे ही घरे पाहणीतून वगळण्यात आली. शिवाजीनगर, मंगळवार पेठ आणि येरवडा व मुंढवे या भागांतील झोपडपट्ट्यांचा समावेश पाहणीमध्ये केलेला नाही. झोपड्यांबद्दलची माहिती महानगरपालिकेकडील नोंदीवरून घेण्यात आली. पाहणीमध्ये सर्व आपद्ग्रस्त घरांचा अंतर्भाव करण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न करण्यात आला असला तरी त्यातून काही घरे सुटली असणे अशक्य नाही. पण त्यामुळे पाहणीच्या सर्वसाधारण अनुमानांस बाध येईल असे वाटत नाही.

निरनिराळ्या घरांच्या आकारमानात खूप तफावत असल्यामुळे एकूण किती राहती जागा नष्ट झाली हे जाणून घेण्यासाठी उपहत घरांतील खोल्यांची संख्या विचारात घेणे आवश्यक आहे. २३९१ उपहत घरांमध्ये एकूण २३,१८७ खोल्या होत्या. घरांचे स्थान आणि त्यांची आपत्तीनंतरची स्थिती यानुसार घरांतील खोल्यांची संख्या सारणी क्र. ५.१ मध्ये दाखविली आहे. हानी झालेल्या घरांचे तीन वर्ग केले आहेत : (१) पूर्ण नष्ट झालेली घरे, (२) अंशतः नष्ट झालेली घरे, (३) पडझड झालेली घरे. हानी झालेल्या घरांतील एकूण २३,१८७ खोल्यांमध्ये १८,६२४ म्हणजे ८० टक्के उपहत खोल्या[३] आढळल्या. हानी झालेल्या खोल्यांची सर्वात जास्त संख्या शनिवार पेठेत असून नारायण-सदाशिव आणि कसबा या पेठांचे क्रमांक त्याखालोखाल लागतात. जवळजवळ एकोणीस हजार खोल्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे असंख्य कुटुंबांना आपल्या घरादारास मुकावे लागले. हानी झालेल्या घरांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांची एकूण संख्या १४,१६७ आढळली.

उपहत घरांत राहणाऱ्या कुटुंबांकडे आपत्तीपूर्वी किती जागा होती हे पाहता असे दिसते, की ६३ टक्के कुटुंबे एका खोलीच्या जागेत, २४ टक्के दोन खोल्यांच्या आणि फक्त १३ टक्के कुटुंबे दोनहून अधिक खोल्यांच्या जागेत राहात होती. प्रत्येक कुटुंबाकडे सरासरी १.६४ खोल्या होत्या.

आपद्ग्रस्त कुटुंबांचे उत्पन्न किती होते व त्यांस आपत्तीपूर्वी भाडे किती द्यावे लागत होते हे पाहिल्यास आपद्ग्रस्त कुटुंबे किती घरभाडे देऊ शकतील आणि कोणत्या प्रकारची जागा घेणे त्यांस परवडेल याची थोडीफार कल्पना येऊ शकेल. आपद्ग्रस्त कुटुंबांनी नवीन जागा मिळविण्यासाठी केलेल्या अर्जांवरून घरभाडे, उत्पन्न इत्यादींसंबंधीची माहिती मिळाली. जवळजवळ ५० टक्के कुटुंबे

---

२. ज्या कुटुंबांनी मदतीसाठी अर्ज केला होता अशा काही कुटुंबांची नोंद ती कुटुंबे पोटभाडेकरू किंवा भाडेकरूंचे नातेवाईक असल्यामुळे पाहणीमध्ये झाली नव्हती. काही ठिकाणी असेही आढळले, की मदत मागणारे कुटुंब दिलेल्या पत्त्यावर पूर्वी राहात होते, परंतु आपत्तीपूर्वी ते घर सोडून अन्यत्र राहावयास गेले होते.

३. उपहत खोल्यांमध्ये पूर्णतः किंवा अंशतः पडलेल्या व विशेष दुरुस्तीयोग्य खोल्यांचा समावेश केला आहे.

सारणी क्र. ५.१ : घरांची स्थिती व स्थान यांनुसार उपहत घरांतील खोल्यांचे विभाजन

| पेठ | घरांची स्थिती: पूर्णतः पडलेली | | | | | एकूण घरे | एकूण खोल्या | उपहत खोल्या* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पूर्णतः पडलेली | अंशतः पडलेली | | पडझड झालेली | | | | |
| | एकूण खोल्या | एकूण खोल्या | उपहत खोल्या | एकूण खोल्या | उपहत खोल्या | | | |
| मंगळवार | ५६३ | ८६२ | ८१९ | ८११ | ५८१ | ३४० | २२३६ | १९६३ |
| कसबा | ८०९ | १२५१ | ११५० | १९९६ | १३९३ | ४४९ | ४०५६ | ३३५२ |
| सोमवार व पूर्वेकडील इतर पेठा | ३९८ | १०४६ | ८९० | ९०९ | ४६७ | २२७ | २३५३ | १७५५ |
| शनिवार | १२९२ | २०९९ | १९५९ | ३१०३ | १७२८ | ४६१ | ६४९४ | ४९७९ |
| नारायण, सदाशिव | ११४० | १३९१ | १२९० | २२९६ | १२६१ | ४४७ | ४८२७ | ३६९१ |
| शिवाजीनगर, एरंडवणे | ११६० | ७७५ | ७५६ | १२८६ | ९६८ | ४६७ | ३२२१ | २८८४ |
| एकूण | ५३६२ | ७४२४ | ६८६४ | १०४०१ | ६३९८ | २३९१ | २३१८७ | १८६२४ |

* याशिवाय २८३० खोल्यांना किरकोळ दुरुस्तीची आवश्यकता होती.

महिना दहा रुपयांपेक्षाही कमी घरभाडे देत होती. २५ टक्के कुटुंबांना दरमहा दहा ते चौदा रुपये भाडे द्यावे लागत होते. सरासरी भाडे आणि कुटुंबांचे मासिक उत्पन्न यांचा परस्परसंबंध पाहता असे दिसते की १०० रुपयांहून कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना उत्पन्नाच्या १३ टक्के, १०० ते १९९ रुपये उत्पन्न असलेल्यांना उत्पन्नाच्या ९ टक्के, आणि ३०० रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्यांना उत्पन्नाच्या फक्त ५ टक्के घरभाडे पडत होते.

नवीन घर मिळाल्यास किती घरभाडे देण्याची कुटुंबांची तयारी होती ही माहितीही अर्जावर नोंदलेली होती. पूर्वीच्या भाड्याच्या सरासरी १.७ पट भाडे देण्याची आपद्ग्रस्त कुटुंबांची तयारी असल्याचे आढळले. जी कुटुंबे पूर्वी १० रुपयांहून कमी मासिक भाडे भरत होती त्यांनी पूर्वीच्या भाड्याच्या दुप्पट भाडे देण्याची तयारी दर्शविली. ज्या कुटुंबांना १० ते २० रुपये मासिक भाडे होते ती २५ टक्के अधिक भाडे देण्यास तयार होती. ज्यांचे पूर्वीचे भाडे २० रुपयांहून जास्त होते त्यांची मात्र पूर्वीच्या भाड्याहून अधिक भाडे देण्याची तयारी नव्हती. मासिक उत्पन्न शंभर रुपयांहून कमी असलेल्या कुटुंबांनी उत्पन्नाच्या वीस टक्क्यांपर्यंतही भाडे देण्याची तयारी दर्शविली.

### बेघर कुटुंबांच्या संख्येचा अंदाज

आपत्तीमुळे बेघर झालेल्या कुटुंबांपैकी काही कुटुंबांना घरांची किरकोळ दुरुस्ती, स्वच्छता वगैरे करून पूर्वीची जागा पुन्हा वापरणे शक्य झाले. उपहृत घरांत एकूण २३,१८७ खोल्या होत्या, त्यांपैकी ४,५६३ खोल्यांना फारशी हानी पोचली नव्हती. या खोल्यांची साफसफाई अथवा किरकोळ दुरुस्ती करून आपत्तीनंतर आठदहा दिवसांत २,८५० कुटुंबांना आपल्या पूर्वीच्या जागेत राहावयास जाणे शक्य झाले. याचा अर्थ उपहृत घरांतील एकूण १४,१६७ कुटुंबांपैकी ११,३१७ कुटुंबे बेघर राहिली. याशिवाय शिवाजीनगर, मंगळवार आणि कसबा या पेठांमधील झोपडपट्ट्यांतील सुमारे २,६२० कुटुंबे बेघर झाली होती ती वेगळीच. म्हणजे सुमारे १३,९३७ कुटुंबे बेघर झाली. पूर्वीच्या घरांची विशेष दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी केल्याशिवाय किंवा नवीन घरबांधणीच्या योजना हाती घेतल्या-शिवाय या कुटुंबांना जागा मिळणे शक्य नव्हते.

### हानी झालेल्या घरांची दुरुस्ती आणि पुनर्बांधणी

बेघर कुटुंबांना त्वरित जागा उपलब्ध व्हावी या दृष्टीने उपहृत घरांची दुरुस्ती व पुनर्बांधणी लवकर होणे आवश्यक होते. परंतु स्वतःचे बरेच नुकसान झाल्यामुळे आणि बांधकामाचा खर्चही भरमसाट वाढल्यामुळे बहुतेक घरमालकांना दुरुस्ती व बांधणी स्वखर्चाने करणे कठीण झाले होते. शिवाय जुन्याच भाडेकरूंना पूर्वीच्या कमी भाड्यात जागा द्यावी लागेल या भीतीने, ज्यांना शक्य होते ते घरमालकही आपल्या घराची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्यास फारसे राजी नव्हते. तेव्हा, घरमालक किंवा भाडेकरू घरांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यास उद्युक्त होतील अशा प्रकारचे साहाय्य त्यांना करणे जरूर होते.

भाडेकरूंची इच्छा असल्यास त्यांना स्वतःचे बिऱ्हाडाची जागा दुरुस्त करण्यास परवानगी देण्यात आली आणि त्यासाठी मुख्यमंत्रि-निधीतून प्रत्येकी २५० रुपये अनुदान देण्याची सोय करण्यात आली. यापेक्षा अधिक मदतीची आवश्यकता असल्यास प्रत्येकी २५० ते ५०० रुपयांपर्यंत अनुदान देण्याची सरकारकडून सोय करण्यात आली. यापेक्षाही अधिक मदत हवी असल्यास ती कर्जरूपाने प्रत्येकी १०,००० रुपयांपर्यंत मिळण्याची सोय होती. हे कर्ज द. सा. द. शे. चार रुपये व्याजाने व

जास्तीतजास्त २० वर्षे मुदतीसाठी मिळावयाचे होते. परतफेड करताना या कर्जामध्ये प्रत्येकी १००० रुपयांपर्यंत सूट मिळण्याचीही तरतूद करण्यात आली होती. अनुदान अथवा कर्ज मंजूर करताना मालक व भाडेकरू असा भेद करण्यात येत नव्हता. अनुदान म्हणून मुख्यमंत्रि-निधीतून एकूण १,२८,०११ रुपये देण्यात आले. सरकारने अनुदान म्हणून ३,९४,१७७ रुपये दिले व जुलै १९६२ अखेर ६७७ अर्जदारांना ३१,२३,६८५ रुपयांची कर्जे दिली.

घरबांधणीच्या दृष्टीने आर्थिक मदतीशिवाय इतर अनेक अडचणींतून मार्ग काढणे आवश्यक होते. सिमेंट, विटा, पोलाद, वगैरे मालाची टंचाई असल्यामुळे बांधकामास आवश्यक ती गती प्राप्त होत नव्हती. या मालाच्या पुरवठयाची व्यवस्था काळजीपूर्वक व अग्रहक्काने होणे जरूर होते. यासाठी सरकारने विटांचे साठे गोठविले आणि त्यांच्या वाटपावर नियंत्रणे घातली. वाटप करताना बेघर झालेले भाडेकरू आणि मालक यांस अग्रहक्क देण्यात आला. परंतु काही मालाची (विशेषत: सिमेंटची) इतकी टंचाई होती, की बेघर कुटुंबांना अग्रहक्क देण्याचे ठरले असले तरी त्यांना अनेकदा खोळंबून बसावे लागे. याशिवाय अर्जांची छाननी करणे, बांधकामास परवानगी देणे याबाबतच्या दिरंगाईमुळेही बांधकामास आवश्यक ती गती प्राप्त झाली नाही. सरकारी यंत्रणेच्या निरनिराळया घटकांमधील समन्वयाच्या आणि सहकार्याच्या अभावामुळेही बांधकामाच्या कार्यक्रमाची गती मंद राहिली.

### पूररेषेचा प्रश्न

आर्थिक अडचणी आणि मालाची टंचाई या दोन समस्यांशिवाय आणखी एका अगदी वेगळया समस्येला काही कुटुंबांना तोंड द्यावे लागले. नदीतीरापासून काही विवक्षित अंतरापर्यंत कोणतेही बांधकाम करण्यास सरकारने बंदी घालण्याचे ठरविल्यामुळ काही कुटुंबांपुढे जमिनीच्या उपलब्धतेचा प्रश्न उपस्थित झाला. महापुराचे पाणी सखल भागात शिरून नदीतीराच्या घरांना वरचेवर धोका निर्माण होतो, तो कायमचा टाळण्यासाठी "पूररेषा" आखण्याची योजना पुढे आली व त्यानुसार नदीकिनाऱ्यापासून पूररेषेपर्यंतच्या भागात नवीन बांधकामास बंदी घालण्याचे ठरले. परंतु आपली वाडवडिलार्जित जागा सोडावयास अनेक लोक तयार नव्हते. शिवाय शहराच्या मध्यवस्तीतील अत्यंत सोईस्कर जागी असलेली घरे सोडून शहराच्या सीमेवर राहणे अनेकांस त्रासदायक वाटत होते. पण तज्ज्ञ अभियंते व इतर अधिकारी यांचे मत मात्र महापुराचे संकट टाळण्यासाठी 'पूररेषा' असणे आवश्यक आहे असे होते. यासाठी सरकारने दोन ज्येष्ठ अभियंत्यांना आवश्यक ती पाहणी करून पूररेषा निश्चित करावयास सांगितले. ही रेषा दर्शविणारा नकाशा महानगरपालिकेने ११ ऑगस्ट १९६१ रोजी प्रसिद्ध केला. पूररेषा निश्चित करणारा कायदा ऑगस्ट १९६१ मध्ये विधिमंडळात मांडण्यात आला. विधिमंडळाने जवळजवळ एकमताने तो संमत केला व पूररेषेचे नियंत्रण करणे व ज्यांची घरे तीमध्ये येत आहेत अशा घरमालकांना अन्यत्र जागा देणे यासाठी पुणे मुठा नदी अधिकार-मंडळाची स्थापना केली.

या अधिकार-मंडळाने पूररेषेबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेतला. नदीच्या पात्राची रुंदी सर्वत्र सारखी म्हणजे ५०० फूट ठेवावी, या पात्रापलीकडे दोन्ही तीरांवर १५० फूट रुंदीचे दोन पट्टे पात्राला समांतर ठेवून या पट्टयांमध्ये कोणतेही बांधकाम करण्यास मनाई करावी आणि याहीपलीकडे दोन्ही बाजूंस ७५ फुटांपर्यंत काही विशिष्ट प्रकारच्या बांधणीसच परवानगी द्यावी. (१५० फुटांच्या पट्टयांची सीमा दर्शविणाऱ्या रेषेचा 'पूररेषा' आणि त्यापलीकडील ७५ फुटांच्या पट्टयाची सीमा

दर्शविणाऱ्या रेषेचा ' नियंत्रणरेषा ' असा यापुढे उल्लेख केला आहे.) नदीतीर ते पूररेषा या भागातील सुस्थितीत असणारी घरे ३१ जुलै १९६५ पर्यंत ताब्यात घेतली जाणार नाहीत आणि तोपर्यंत त्यांतील कुटुंबांना तेथे राहण्यास हरकत नाही असेही अधिकार-मंडळातर्फे जाहीर करण्यात आले. एवढेच नव्हे, तर पूररेषेच्या आतील जी घरे किरकोळ दुरुस्ती करून उपयोगात आणणे शक्य असेल त्यांस तात्पुरत्या स्वरुपाची दुरुस्ती करण्यासही परवानगी देण्यात आली. मोठी दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी यांस मात्र बंदी घालण्यात आली. ज्यांची घरे पूर्ण पडली होती किंवा राहावयास अयोग्य झाली होती, अशा कुटुंबांना अन्यत्र जागा देऊन त्यांची सोय करणे आवश्यक होते.

पूररेषेच्या आतील भागात एकूण ३६६ घरे येत होती. यांपैकी जवळजवळ ५२ टक्के घरे पूर्ण कोसळलेली होती आणि २५ टक्के घरांना बरीच हानी पोचली होती. पूररेषा व नियंत्रणरेषा यांच्या दरम्यान १७४ घरे होती, त्यांपैकी एकतृतियांश घरे नष्ट झाली आणि तितक्याच घरांची बरीच हानी झालेली आढळली. याशिवाय पूररेषा ते नदीकिनारा यामध्ये ९१ आणि पूररेषा ते नियंत्रण-रेषा यामध्ये २५ मोकळ्या जागा होत्या.

अधिकार-मंडळाच्या निर्णयाप्रमाणे ज्या घरमालकांची घरे पूररेषेच्या आत असतील त्यांस कमीतकमी १८०० चौ. फूट किंवा मूळ बांधलेल्या जागेच्या तिप्पट जागा अन्यत्र द्यावयाची होती. ज्यावर कसलेही बांधकाम नाही असा जमिनीचा तुकडा जर पूररेषेमध्ये येत असला तर त्या जमिनीच्या क्षेत्रफळाइतकी जमीन घरमालकांस अन्यत्र मिळणार होती. जागा विकसित स्वरुपात मिळेल असेही जाहीर करण्यात आले होते. ज्यांस बदली जमीन नको असेल, त्यांस १९४८ च्या जमिनीच्या किमतीनुसार रोख नुकसानभरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ज्यांची जागा पूररेषेत जात होती अशा घरमालकांना पर्यायी जागा देण्यासाठी सुमारे ५० एकर जमीन अन्यत्र उपलब्ध होणे जरूर होते.

## बेघर कुटुंबांची निवासाची सोय

उपहत घरांची दुरुस्ती करून अथवा पुनर्बांधणी करून आपत्तीनंतर सुमारे आठ महिन्यांत बऱ्याच कुटुंबांना आपल्या पूर्वीच्या जागेत राहावयास जाता आले. सारणी क्र. ५.२ मध्ये मार्च १९६६ अखेर किती खोल्या उपयोगात आणल्या व त्यायोगे किती कुटुंबांची सोय झाली हे दाखविले आहे. उपहत घरातील एकूण १२,३४५ खोल्यांमधून कुटुंबे पुन्हा राहावयास गेली. यांपैकी ४५६३ खोल्या साफसफाई अथवा किरकोळ दुरुस्ती करून आपत्तीनंतर थोड्याच दिवसात वापरता आल्या होत्या, हे पूर्वी आलेच आहे. ६१३६ खोल्यांची विशेष दुरुस्ती करून, १४६० तात्पुरत्या स्वरुपाच्या खोल्या बांधून आणि १८६ खोल्या तर पडझड झालेल्या स्थितीतच दुरुस्ती न करता वापरात आल्या. या खोल्यांमधून एकूण ७०६५ कुटुंब राहावयास गेली. यांपैकी ६६४२ कुटुंबे पूर्वी त्याच जागी राहात असत आणि ४२३ भाडेकरू नवीन होते. नवीन भाडेकरूंपैकी ३६८ आपद्ग्रस्त होते व ५५ आपद्ग्रस्त नसलेली कुटुंबे होती. याप्रमाणे खाजगीरीत्या जी घरे दुरुस्त करण्यात आली त्यांमध्ये एकूण ७०१० आपद्ग्रस्त कुटुंबांची राहावयाची सोय झाली. परंतु यांपैकी १००० कुटुंबे पूर्वीच्या जागी केवळ तात्पुरती सोय करून राहात होती. म्हणजेच त्यांचे कायम स्वरुपाचे पुनर्वसन झाले असे म्हणता येत नाही. पानशेत आपत्तीत एकूण बेघर झालेल्या कुटुंबांपैकी सुमारे ११,००० कुटुंबांना कायम स्वरुपाची जागा पुरविणे आवश्यक होते.

## सारणी क्र. ५.२ : उपहत घरांमधील दुरुस्त केलेल्या खोल्यांची आणि त्यांतील कुटुंबांची पेठवार संख्या

| पेठ | दुरुस्त केलेल्या किंवा पुन्हा बांधलेल्या खोल्यांची संख्या | | | राहावयास योग्य खोल्यांची एकूण संख्या | वापरात आलेल्या खोल्यांची संख्या | उपहत घरांतील कुटुंबांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किरकोळ दुरुस्ती किंवा साफसफाई | तात्पुरती दुरुस्ती | पुनर्बांधणी | | | पूर्वी राहात असलेली | नव्याने आलेली | एकूण कुटुंबे |
| मंगळवार | २७३ | १३६ | ५९१ | १००० | १०६० | ६८४ | ७७ | ७६१ |
| कसबा | ७०४ | ३४६ | १२१३ | २२६३ | २२९९ | १२०१ | ७१ | १२७२ |
| सोमवार व पूर्वेकडील इतर पेठा | ५९८ | १६६ | ६३८ | १४०२ | १४४८ | ८९० | ४६ | ९३६ |
| शनिवार | १५१५ | ४७० | १६३१ | ३६१६ | ३६३७ | १७१० | १०० | १८१० |
| नारायण, सदाशिव | ११३६ | १६८ | ११८९ | २४९३ | २४९७ | १२५३ | ८१ | १३३४ |
| शिवाजीनगर, एरंडवणे | ३३७ | १७४ | ८७४ | १३८५ | १४०४ | ९०४ | ४८ | ९५२ |
| एकूण | ४५६३ | १४६० | ६१३६ | १२१५९ | १२३४५ | ६६४२ | ४२३ | ७०६५ |

कायम स्वरूपाची जागा मिळणे ताबडतोब शक्य नसल्यामुळे यापैकी बहुतेक कुटुंबांनी मदत-केंद्रे किंवा स्वतःचे मित्र व नातेवाईक यांजकडे आसरा घेतला होता. त्यांची जागेची निकड लक्षात घेऊन नवीन घरबांधणीच्या योजना राज्य-सरकारने कार्यवाहीत आणल्या. महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळ, पुणे महानगरपालिका, केंद्र-सरकार, वगैरेतर्फेही घरबांधणीच्या योजना आखण्यात आल्या. याशिवाय बेघर कुटुंबांनी सहकारी घरबांधणी संस्था स्थापाव्या म्हणून त्यांस सरकारने उत्तेजन दिले. येथे निरनिराळ्या घरबांधणी योजनांचा तपशीलवार विचार करून आपद्ग्रस्तांच्या पुनर्वसनास त्यामुळे किती हातभार लागला हे पाहणे उचित होईल.

*निस्सेन झोपड्या* : आपद्ग्रस्तांसाठी अल्पावधीत राहावयाची जागा उपलब्ध व्हावी या हेतूने निस्सेन झोपड्या बांधावयाची योजना स्वीकारण्यात आली. सरकारच्या विनंतीवरून लष्कराने १०० निस्सेन झोपड्या उभारण्याचे काम पार पाडले. शहरातील मुख्य वस्तीच्या नजीक, सदाशिव पेठेतील शेतजमीन यासाठी ताब्यात घेण्यात आली. निस्सेन झोपडी अर्धगोल पत्र्यांच्या साहाय्याने उभारली असून ३६·२५ फूट लांब व १४ फूट रुंद आहे. झोपडीच्या मधोमध उभे पत्रे लावून तिचे दोन भाग पाडले आहेत व प्रत्येक भागात एका कुटुंबाची राहण्याची सोय केली आहे. दोन झोपड्यांसाठी (चार कुटुंबांसाठी) दोन न्हाणीघरे आणि दोन संडास झोपड्यांजवळच वेगळे बांधण्यात आलेले आहेत. तसेच दहा कुटुंबांना दोन नळ देण्यात आले आहेत. निस्सेन झोपड्यांच्या या वसाहतीत भूमिगत मलवाहिनी आणि घरांत व रस्त्यांवर विजेच्या दिव्यांची सोय करण्यात आली आहे.

२७ जुलै १९६१ रोजी निस्सेन झोपड्यांच्या बांधकामास सुरुवात झाली व १७ ऑगस्टपर्यंत बांधणी पुरी झाली. रस्ते, पाण्याचे नळ वगैरे सोयी करण्यास आणखी सुमारे महिना लागला आणि सप्टेंबरअखेरीस या झोपड्या राहण्याच्या दृष्टीने तयार झाल्या.

नवीन बांधलेल्या घरांमध्ये जागा देण्यासाठी सप्टेंबरमध्ये सरकारने आपद्ग्रस्त कुटुंबांकडून अर्ज मागविले. कुटुंबांच्या उत्पन्नाच्या प्रमाणावर त्यांना कोणत्या प्रकारचे घर द्यावयाचे हे ठरविले जाणार होते. ज्यांचे मासिक उत्पन्न १७१ रुपये ते २५० रुपये आहे त्यांस निस्सेन झोपड्या द्यावयाचे सरकारने ठरविले. एकूण १९६ कुटुंबांना निस्सेन झोपड्यांत जागा देण्यात आली. तात्पुरत्या स्वरूपाच्या म्हणून बांधलेल्या या झोपड्या आता कायम स्वरूपाची घरे म्हणून वापरल्या जात आहेत.

*शेजघरे* : शहरातील निरनिराळ्या ठिकाणी १२५ शेजघरे बांधून २००० आपद्ग्रस्त कुटुंबांच्या निवाऱ्याची सोय करण्याची योजना सरकारतर्फे आखण्यात आली. ही शेजघरे पुढील जागी बांधण्यात आली : पर्वती टेकडीजवळ ८७, एरंडवण्यास २०, आणि फर्ग्युसन टेकडीजवळ १८. प्रत्येक शेजघर ९४·२५ फूट लांब व २६.७५ फूट रुंद असून त्यामध्ये १६ कुटुंबांची सोय आहे. शेजघरांमध्ये प्रत्येक कुटुंबासाठी १२ फूट लांब व ११·५ फूट रुंद या आकाराच्या खोल्या काढण्यात आल्या आहेत. प्रत्येक खोलीला जोडून बाहेरच्या बाजूस लहानशी मोरी बांधलेली आहे. १६ कुटुंबांमध्ये चार संडास व दोन नळ यांची सोय केली आहे. शेजघरांच्या वसाहतींमध्ये रस्ते, भूमिगत मलवाहिनी आणि रस्त्यांवर व खोल्यांमधून वीज या सोयी पुरविण्यात आल्या आहेत.

शेजघरांच्या बांधकामास २८ जुलै १९६१ रोजी सुरुवात करण्यात आली. शेजघरांच्या भिंती प्रथम अर्ध्या विटांच्या व अर्ध्या बांबूच्या तट्टयांनी बांधावयाचे ठरले होते व त्याप्रमाणे काम सुरू झाले. परंतु नंतर या योजनेत बदल होऊन बाहेरच्या भिंती संपूर्ण विटांच्याच बांधण्याचे ठरले. ऑक्टोबर १९६१ अखेर पुष्कळशा शेजघरांचे बांधकाम पूर्ण झाल्याने त्यांतील खोल्यांचे वाटप करण्यास प्रारंभ

झाला. ज्यांचे उत्पन्न महिना १०१ ते १७० रुपयांपर्यंत आहे अशा आपद्ग्रस्त कुटुंबांना शेजघरांतील खोल्या देण्याचे ठरले. नोव्हेंबर अखेरपर्यंत १६८० कुटुंबांना शेजघरांत जागा मिळाली. जुलै १९६२ पर्यंत १९८८ खोल्यांपैकी १९६१ खोल्यांमध्ये आपद्ग्रस्त कुटुंबे राहू लागली.

*ओटघावरील घरे* : ओटे बांधून आपद्ग्रस्त कुटुंबास जागा द्यावयाची आणि त्यावर खोपटे उभारण्यास प्रत्येक कुटुंबास १५० रुपये आर्थिक साहाय्य द्यावयाचे अशी प्रथम योजना होती. मुख्यमंत्रि-निधीने दर कुटुंबास १५० रुपयांऐवजी २५० रुपये देण्याची तरतूद केली. पुढे दोन खाजगी निधींनी या योजनेसाठी आर्थिक साहाय्य देण्याची तयारी दर्शविल्याने मूळ योजनेत बदल करण्यात येऊन सरकारनेच ओटघांवर खोल्या बांधून देण्याचे ठरविले. तसेच ओटघांची संख्या प्रथम ४६० ठरली होती ती वाढवून ७१० करण्यात आली.

ओटे शहरात पुढील ठिकाणी बांधण्यात आले : आंबील ओढ्याजवळ १४८, एरंडवण्यास ४५, भवानी पेठेत ४१ आणि पर्वती टेकडीजवळ २८. प्रत्येक ओटा २६ फूट लांब व २३ फूट रुंद आहे. प्रथम दगड आणि माती वापरून हे ओटे बांधले होते. पण पावसाळ्यात त्यांचा टिकाव न लागल्यामुळे नंतर त्यांचे बांधकाम दगड आणि चुन्यामध्ये करण्यात आले. विटांच्या भिंती आणि ॲस्बेस्टॉस पत्र्याचे छप्पर वापरून दर ओटघावर दोन खोल्या बांधण्यात आल्या. खोली ११ फूट रुंद व १२.५ फूट लांब या आकाराची असून तिच्यापुढे ६ फूट लांबीची आच्छादित पडवी आहे. प्रत्येक ओटघावर दोन कुटुंबांची सोय करण्यात आली आहे. ओटघापाठीमागे दोन कुटुंबांना मिळून एक संडास आणि दोन मोऱ्या बांधल्या आहेत. ओटघांच्या वसाहतींत रस्ते, भूमिगत मलवाहिनी व वीज या सोयी आहेत. खोल्यांमध्ये मात्र वीज नाही. ज्यांचे मासिक उत्पन्न १०० रुपयांपर्यंतच आहे अशा आपद्ग्रस्त कुटुंबांना ओटघावरील घरे देण्याचे ठरले. ओटघांवरील घरांच्या योजनेत सतत बदल होत राहिल्याने त्यांचे बांधकाम पूर्ण होण्यास अधिक अवधी लागला. मार्च १९६२ मध्ये जागेचे वाटप सुरू करण्यात आले. परंतु तोपर्यंत सर्व घरे बांधून तयार नव्हती. जून १९६२ च्या सुमारास सर्व घरे तयार झाली आणि जुलै १९६२ पर्यंत एकूण १४२० खोल्यांपैकी १४०४ खोल्यांमधून कुटुंबे राहू लागली.

*तात्पुरती घरबांधणी योजना* : निस्सेन झोपड्या व शेजघरे यांमध्ये सुमारे २००० बेघर कुटुंबांना जागा देणे शक्य होते. म्हणजे मदत-केंद्रावरील सुमारे २५०० कुटुंबांचा जागेचा प्रश्न राहिला. मदत-केंद्रे लवकर बंद करण्याची निकड होती, पण कायम स्वरुपाची अधिक घरे लवकर तयार होणे कठीण होते. म्हणून पावसाळा संपल्यानंतर आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी तात्पुरत्या स्वरुपाची घरे बांधण्याची योजना हाती घेण्यात आली.

*गोल घरे* : एकूण ९७ गोल घरे शहरात निरनिराळ्या ठिकाणी बांधण्यात आली. यांपैकी ६२ पर्वतीजवळ, २० एरंडवण्यास आणि १५ फर्ग्युसन टेकडीजवळ बांधण्यात आली. गोल घरांचा आकार २४ फूट लांब व १८ फूट रुंद असून निस्सेन झोपड्यांप्रमाणे ती अर्धगोल पत्र्याच्या साहाय्याने बांधली आहेत. प्रत्येक घराचे चार भाग पाडून एकेका भागात एकेका कुटुंबाची सोय केली आहे. या वसाहतींमध्ये घरांचे संडास व सार्वजनिक नळ पुरविले आहेत.

ऑक्टोबर १९६१ मध्ये गोल घरांच्या बांधणीचे काम हाती घेण्यात आले. नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत ती बांधून तयार झाली आणि मदत-केंद्रांवरून कुटुंबांना त्यामध्ये हलविण्यात आले. ज्या कुटुंबांचे उत्पन्न महिना १०० रुपयांपेक्षा कमी आहे अशांना गोल घरांत जागा देण्यात

आली आणि त्यांमध्ये एकूण ३८८ आपद्ग्रस्त कुटुंबांची सोय करण्यात आली. प्रथम जरी ही घरे तात्पुरत्या स्वरुपाची समजण्यात आली तरी अजूनही तेथे आपद्ग्रस्त कुटुंबे राहात आहेत.

*तट्टयांची घरे* : पाषाणजवळ १०४, चतु:शृंगीजवळ १५६ आणि एरंडवण्यास ८३ अशाप्रमाणे तट्टयांची घरे बांधली होती. याशिवाय ठिकठिकाणी बांधलेल्या ओटयांवरही ही तात्पुरती घरे उभारण्यात आली. त्यांची विभागणी पुढीलप्रमाणे होती : पर्वतीजवळ २०, वेताळ टेकडीजवळ ३६, आंबील ओढयाशेजारी १३२, भवानी पेठेत २० आणि एरंडवण्यास २२.

प्रत्येक झोपडी २४ फूट लांब व २४ फूट रुंद असून भिंती व छपरे तट्टयांची होती. तट्टयांचो पडदी घालून झोपडीचे चार भाग पाडले होते व प्रत्येक झोपडीत चार कुटुंबांची सोय केली होती. या वसाहतीत चरांचे संडास व सार्वजनिक नळ यांची सोय केली होती.

ऑक्टोबर ते डिसेंबर १९६१ पर्यंत या झोपडयांची उभारणी पूर्ण झाली आणि जसजशा झोपडया तयार होतील त्याप्रमाणे मदत-केंद्रांतील कुटुंबांना तेथे हलविण्यात आले. एकूण २२९२ कुटुंबांना तेथे तात्पुरता आश्रय देण्यात आला होता. या कुटुंबांना कायम स्वरुपाच्या घरात जून १९६२ पर्यंत हलविण्यात आले आणि मग या झोपडया काढून टाकण्यात आल्या.

*महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळाने पुरविलेली जागा :* महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळाने बेघर कुटुंबांसाठी निरनिराळया योजनांनुसार जागा पुरविण्याची जबाबदारी घेतली. कनिष्ट-उत्पन्न-वर्गातील लोकांसाठी बांधलेल्या घरबांधणी योजनेनुसार ४०० गाळे आपद्ग्रस्तांसाठी बांधावयाचे मंडळाने कबूल केले व ह्या इमारती सदाशिव पेठेत बांधावयास घेतल्या. इमारती तीन मजली असून यांमध्ये दोन प्रकारचे गाळे आहेत. दोन्ही प्रकारच्या गाळयांमध्ये दोन खोल्या, एक व्हरांडा व स्वतंत्र संडास व न्हाणीघर उपलब्ध आहे. परंतु 'अ' प्रकारच्या गाळयाचे क्षेत्रफळ ३४९ चौ. फूट तर 'ब' प्रकारच्या गाळयाचे क्षेत्रफळ २८७ चौ. फूट आहे. हे गाळे अखेरीस रहिवासी कुटुंबांच्या मालकीचे होणार असल्याने भाडयाऐवजी गाळयाची संपूर्ण किंमत कुटुंबांकडून मासिक हप्त्यांनी वसूल केली जाते.

गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेखालील २५०० गाळे पर्वतीजवळ बांधण्याची योजना आखण्यात आली. या योजनेत प्रत्येक कुटुंबास ११६ चौ. फुटाची एक खोली, ८६ चौ. फुटाचे स्वयंपाकघर आणि स्वतंत्र संडास व न्हाणीघर देण्याची तरतूद आहे. याशिवाय औद्योगिक-कामगार-गृहयोजनेखाली येरवडयास २०० गाळे पुरविण्याचे ठरले. मंडळाच्या सर्व वसाहतींतून भूमिगत मलवाहिनी, वीज, वगैरे सोयी आहेत.

गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेनुसार बांधण्यात येणारे गाळे ज्यांचे मासिक उत्पन्न १०१ ते १७० रुपयांपर्यंत आहे अशा कुटुंबांना देण्याचे ठरले, आणि कमी उत्पन्नाच्या कुटुंबांसाठी बांधलेली घरे ज्यांचे मासिक उत्पन्न २५० ते ५०० रुपये आहे अशा कुटुंबांना देण्याचे ठरले. औद्योगिक कामगारांसाठी बांधलेले गाळे आपद्ग्रस्त कामगारांच्या कुटुंबांना देण्यात आले.

सिमेंट, विटा, पोलाद यांच्या टंचाईमुळे मंडळाच्या बांधकामाच्या कार्यक्रमात दिरंगाई झाली आणि मार्च १९६२ पर्यंत गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेखालील ३०० आणि औद्योगिक-कामगार-गृहयोजनेखालील ६८ एवढेच गाळे बांधून तयार झाले. कनिष्ठ-उत्पन्न-वर्गाच्या कुटुंबांसाठी ३१० गाळे जुलै १९६२ पर्यंत तयार झाले, पण बऱ्याच आपद्ग्रस्त कुटुंबांना त्यांचे हप्ते परवडण्यासारखे नसल्याने त्यांपैकी फक्त १४० गाळयांतून कुटुंबे राहू लागली. गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेनुसार

मंडळाने २५०० ऐवजी १३०० गाळेच बांधण्याचे नंतर ठरविले. जागा तयार होईल त्याप्रमाणे आपद्ग्रस्त कुटुंबांचे तात्कालिक आश्रयस्थानातून कायमच्या घरांमध्ये स्थलांतर करण्यात आले.

सारणी क्र. ५.३ : राज्य-सरकारच्या घरबांधणी योजनांद्वारे ऑगस्ट १९६२ पर्यंत बेघर कुटुंबांना मिळालेली जागा

| घराचा प्रकार | उपलब्ध जागा | भरलेल्या जागा | कुटुंबे कोठून राहावयास आली | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गोल घरे | तट्टचाची घरे | ओटयांवरील घरे | शेजघरे | मदत-केंद्रे | इतरत्र |
| शेजघरे | १९८८ | १९६१ | १ | २४५ | – | – | १४६३ | २५२ |
| ओटयांवरील घरे | १४२० | १४०४ | ८९ | १२५८ | – | – | – | ५७ |
| गोल घरे | ३८८ | ३७४ | १६५ | २०९ | – | – | – | – |
| निस्सेन झोपडया | १९८ | १९६ | – | – | – | २ | – | १९४ |
| गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील घरे | ११०४ | ८५५ | ९१ | ४७५ | ५ | १७५ | – | १०९ |
| कनिष्ठ-उत्पन्न-वर्ग-गृहयोजनेतील घरे | ३१० | १४० | – | – | – | – | – | १४० |
| औद्योगिक-कामगार-गृहयोजनेतील घरे | १३२ | ३१ | – | १ | – | – | – | ३० |

*केंद्र-सरकारतर्फे आखलेली योजना* : केंद्र-सरकारच्या आपद्ग्रस्त नोकरवर्गासाठी केंद्र-सरकारने २१६ घरे बांधण्याची एक योजना आखली. स्वारगेटापलीकडे मुकुंदनगर वसाहतीत एका खोलीचे, दोन खोल्यांचे व तीन खोल्यांचे असे गाळे बांधण्यात आले. यापैकी पहिल्या दोन प्रकारच्या गाळयांना संडास आणि न्हाणीघर दोन कुटुंबांमध्ये सामायिक आहे आणि तीन खोल्यांच्या गाळयांना स्वतंत्र संडास व न्हाणीघराची सोय आहे. जून १९६२ पर्यंत सर्व गाळे बांधून झाले व त्यांमध्ये आपद्ग्रस्त कुटुंबे राहू लागली.

*पुणे महानगरपालिकेने आखलेल्या योजना* : आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी शेजघरे आणि ओटयांवरील घरे बांधण्याचे महानगरपालिकेने ठरविले. ही जागा मुख्यतः महानगरपालिकेच्या आपद्ग्रस्त कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांसाठी बांधण्यात आली. महानगरपालिकेच्या आंबील ओढा वसाहतीत पत्र्याच्या भिंती व छप्पर असलेले एका खोलीचे १२० गाळे आणि अशाच प्रकारचे ८० गाळे चतुःशृंगीजवळ बांधण्याचे ठरले. याशिवाय चतुःशृंगीजवळ ८६ फूट लांब व २६ फूट रुंद या आकाराचे चार ओटे बांधून प्रत्येक ओटयावर १८ याप्रमाणे एकूण ७२ कुटुंबांची सोय करण्याची योजना आखली. ओटे बांधण्यासाठी मुख्यमंत्रि-निधीने दोन लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज दिले आणि प्रत्येक कुटुंबास झोपडी बांधण्यासाठी २५० रुपये दिले.

मार्च १९६२ पर्यंत चार ओटे बांधून तयार झाले. शिवाय त्याच जागेवर असलेले, पूर्वी बांधलेले दोन ओटेही आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी देण्यात आले. ओटयांवर एकूण १०८ कुटुंबांना जागा मिळाली. आंबील ओढा वसाहतीतील पत्र्याचे गाळे जुलै १९६२ पर्यंत तयार झाले आणि त्यांत कुटुंबे राहू लागली.

आयुर्विमा निगमामार्फत गृहबांधणीची एक योजना आखण्यात आली होती, पण ती प्रत्यक्षात उतरली नाही.

### घरभाड्याचा प्रश्न

१३ ऑगस्ट १९६१ रोजी निरनिराळया योजनांखाली बांधलेल्या घरांतील जागेची भाडी सरकारने जाहीर केली. निस्सेन झोपडयांचे दरमहा एकूण भाडे ३० रुपये, शेजघराचे २० रुपये आणि कनिष्ट-उत्पन्न-वर्ग-गृहयोजनेतील अ व ब प्रकारच्या जागेची अनुक्रमे ७० रुपये व ६० रुपये अशी भाडी मुक्रर करण्यात आली.

बहुसंख्य आपद्ग्रस्त कुटुंबांचे मासिक उत्पन्न १०० ते २०० रुपयांच्या दरम्यान होते. आपत्तीपूर्वी ही कुटुंबे पाच ते दहा रुपये महिना भाडे देत असत. त्या मानाने नवीन घरांची ही ' आर्थिक भाडी ' फारच जास्त होती. शिवाय नवीन वसाहती शहराच्या सीमेवर असल्याने शहरात जाण्यायेण्याच्या खर्चातही वाढ होत होती. आपत्तीमुळे अतिशय नुकसान झालेल्या परिस्थितीत तर ही भाडी मुळीच परवडण्याजोगी नाहीत म्हणून आपद्ग्रस्त कुटुंबांमार्फत ही भाडी कमी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. लवकरच या गाऱ्हाण्यांना सार्वजनिक चळवळीचे स्वरूप आले आणि सरकारी कार्यालये व विधानसभा यांच्यापुढे त्यासाठी निदर्शनेही झाली.

पुनर्वसनाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सरकारने एक समिती नेमली होती. त्याच समितीकडे घरभाडी ठरविण्याबाबत शिफारशी करण्याचे कार्य सोपविण्यात आले. २६ ते ३१ ऑगस्ट १९६१ या काळात समितीने पुण्यामध्ये अनेक सरकारी व पुनर्वसनाच्या प्रश्नाशी संबंधित इतर कार्यकर्ते यांच्या साक्षी घेतल्या व चर्चा केली आणि आपल्या शिफारशी जाहीर केल्या.

समितीने सर्व प्रकारच्या घरांतील जागेच्या भाडयासंबंधाने सवलती सुचविल्या. शेजघरे व निस्सेन झोपडया यांच्या बाबतीत जागा मिळाल्यापासून पहिली तीन वर्षे मूळ भाडयाच्या ६६·६६ टक्के आणि पुढील दोन वर्षे ८३·३३ टक्के भाडे पडेल, आणि गृहनिर्माण मंडळाच्या अ आणि ब प्रकारच्या घरांच्या भाडयांमध्ये पहिली तीन वर्षे २५ टक्के आणि पुढील तीन वर्षे १६·६६ टक्के सूट मिळेल असे जाहीर करण्यात आले. पाच वर्षे झाल्यानंतर पूर्ण भाडे वसूल करावे असे समितीने सुचविले. सरकारने या शिफारशी स्वीकारल्या. त्यानुसार ठरलेल्या भाडयाचे दरपत्रक सारणी क्र. ५.४ मध्ये दिले आहे.

सरकारी घरबांधणी योजनांसाठी केलेल्या एकूण खर्चाच्या ३३·३३ टक्के खर्च द्यावयाचे केन्द्र-सरकारने कबूल केल्यामुळे पाच वर्षांनंतर सवलतीची भाडी रद्द करून आर्थिक भाडी आकारण्याची गरज उरली नाही. यामुळे सवलतीची भाडी कायम करण्यात आली.

### सहकारी संस्थांचा घरबांधणी कार्यक्रम

सरकारी योजनांखाली बांधण्यात आलेली घरे तसेच पडीक घरांची दुरुस्ती जमेस धरूनही सुमारे ४००० आपद्ग्रस्त कुटुंबांना जागा मिळावयाची राहिली होती. या कुटुंबांना सहकारी घरबांधणी

सारणी क्र. ५.४ : आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी बांधलेल्या घरांची सवलतीची भाडी

| घराचा प्रकार | मासिक भाडे (रु.) | मासिक सेवाभार (रु.) |
|---|---|---|
| निस्सेन झोपड्या | १७.४० | ३.६० |
| शेजघरे | ११.७५ | २.२५ |
| कनिष्ठ-उत्पन्न-वर्ग-गृहयोजना | | |
| अ प्रकारची जागा | ५२.५० | ५.०० |
| ब प्रकारची जागा | ४५.०० | ५.०० |
| औद्योगिक-कामगार-गृहयोजनेतील घरे | १६.०० | ४.२५ |
| गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील घरे | १४.०० | ४.५० |
| ओट्यांवरील घरे | ३.७५ | १.२५ |
| गोल घरे | २.७५ | – |
| तट्ट्यांची घरे | २.५० | – |

कार्यक्रम हाती घेण्यास उत्तेजन देण्यात आले आणि त्यांनी अशा सहकारी संघटना उभारल्यास सरकारकडून त्यांस सरकारी जमीन किंवा खाजगी जमीन ताब्यात घेऊन ती सुधारून देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. याशिवाय सहकारी संस्थांच्या सभासदांना घरे बांधण्यासाठी दीर्घ मुदतीची कर्जे देण्याचेही सरकारने कबूल केले.

संस्थांना ९९ वर्षांच्या कराराने सरकार जमीन देणार होते. सहकारी घरबांधणी संस्थेच्या सभासदास प्रत्येकी ३६०० चौ. फू. क्षेत्रफळाची जमीन मिळाली पाहिजे असे महानगरपालिकेचे बंधन असले तरी पुण्यातील जागेची टंचाई लक्षात घेऊन ही मर्यादा २००० चौ. फुटांपर्यंत खाली आणण्यात आली. जमिनीची सुधारणा करण्यासाठी आणि प्रत्यक्ष घर बांधण्यासाठी लागणारा पैसा या संस्थांच्या सभासदांजवळ असणे शक्य नव्हते. तेव्हा महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेमार्फत २५ लाख रुपयांची तरतूद करून त्यांतून दीर्घ मुदतीची कर्जे देण्याची व्यवस्था करण्याचे ठरले. प्रत्येक कुटुंबास जास्तीतजास्त ८००० रुपये द. सा. द. शे. साडेपाच रुपये व्याजाने व वीस वर्षे मुदतीने मिळण्याची तरतूद होती. परतफेडीचा हप्ता घरासाठी झालेल्या बांधणीखर्चावर अवलंबून ठेवण्यात आला होता.

ज्या कुटुंबांची घरे पूररेषेमध्ये जात असतील त्यांना घरबांधणी खर्चाच्या एक-चतुर्थांश किंवा जास्तीतजास्त हजार रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला. ज्यांच्या घरांना तीन हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च येणार नाही अशा कुटुंबांना प्रत्येकी २५० रुपये रोख देण्याचे मुख्यमंत्रि-निधीने ठरविले. मागासलेल्या वर्गातील कुटुंबांच्या सहकारी संस्थांना सरकारकडून विकसित जमीन व घरबांधणीसाठी ४६०० रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले.

शिवाय त्यांना प्रत्येकी १००० रुपयांपर्यंत आर्थिक मदतही (कर्जफेडीच्या रकमेत वजा करून) देण्यात येणार होती.

सप्टेंबर १९६१ अखेर एकूण १३३ सहकारी घरबांधणी संस्था स्थापन झाल्या. मार्च १९६२ अखेर यांपैकी ११७ संस्था सरकारकडे नोंदविण्यात आल्या. सहकारी संस्थांना देण्यासाठी खाजगी मालकीच्या जमिनी ताब्यात घेण्यास सरकारने सप्टेंबर १९६१ मध्ये सुरुवात केली. सरकारच्या मालकीच्या काही जमिनीही सहकारी संस्थांना द्यावयाचे ठरले. यासाठी एकूण २७६·५० एकर जमिनीची आवश्यकता होती. सहकारी संस्थांना देण्यासाठी सरकारी व खाजगी मिळून पुढील ठिकाणी जागा मुक्रर करण्यात आल्या : पर्वतीजवळ १९६·२५ एकर, पुणे-सातारा रस्त्यालगत २८ एकर, भवानी पेठेत ८·५० एकर, चतुःश्रृंगीजवळ ३६·४५ एकर आणि एरंडवण्यास ७·३० एकर.

सहकारी संस्थांना विकसित जमीन देण्याचे सरकारने आश्वासन दिले होते. परंतु नोव्हेंबर १९६१ मध्ये सर्व संस्थांनी दर सभासदामागे १२०० रुपये सुधारणाखर्च भरावा असे परिपत्रक सरकारतर्फे पाठविण्यात आले. बहुतेक संस्थांच्या सभासदांना इतका पैसा एकदम उभा करणे शक्य नसल्यामुळे या संस्थांनी ताबडतोब पैसे भरणे अशक्य असल्याचे सरकारला कळविले. संस्थांनी स्वतःची संघटना बनवून सरकारकडे एक शिष्टमंडळ पाठविले. शिष्टमंडळाशी झालेल्या वाटाघाटीत पैसे भरण्याची मुदत वाढवून देण्याचे ठरले. संस्थांना जेवढे पैसे ताबडतोब भरणे शक्य आहे तेवढे त्यांनी सरकारकडे भरावे म्हणजे सुधारणाकामाला त्वरित सुरुवात करता येईल असेही सरकारतर्फे सांगण्यात आले.

फेब्रुवारी १९६२ पर्यंत जमीनवाटणीचा आराखडा तयार झाला व निरनिराळ्या संस्थांना जमिनी नेमून देण्याचे काम मार्चमध्ये सुरू झाले. मार्चअखेरीस जमीनसुधारणेच्या कामास शासकीय मंजुरीही मिळाली. सुधारणेचा खर्च दर एकरी १३,५०० रुपये येईल असा अंदाज होता. सरकारी इमारत व बांधकाम खात्याने जमीनसुधारणा कामास सुरुवात केली.

नोंदलेल्या सहकारी संस्थांची संख्या जून १९६२ पावेतो १२२ झाली होती आणि सभासदांची संख्या ३३०० वर पोचली होती. या सहकारी संस्थांपैकी २८ संस्था मागासलेल्या वर्गातील कुटुंबांच्या होत्या व त्यांची सभासदसंख्या जवळजवळ ७०० होती. जमीनसुधारणेच्या कामासाठी ५० संस्थांनी एकूण १,८५,००० रुपये सरकारकडे भरले होते. सुधारणाकामाचे पैसे सभासदांना भरणे शक्य व्हावे म्हणून महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेने प्रत्येक सभासदास ६०० रुपयांपर्यंत कर्ज मंजूर केले. या संस्थेने एकूण ३,७३,००० रुपयांची कर्जे ६० संस्थांच्या सभासदांना दिली. २७ मागासलेल्या वर्गाच्या संस्थांना सरकारतर्फे १६,७४,००० रुपयांची बिनव्याजी कर्जेही देण्यात आली.

सहकारी संस्थांना देण्यासाठी ज्या खाजगी मालकीच्या जमिनी सरकारने घेतल्या त्यांची किंमत दर एकरी ६००० रुपये (१९४८ मधील किंमतीनुसार) ठरविली होती. ही किंमत जमिनीच्या मालकांना मान्य नसल्यामुळे त्यांनी सरकारविरुद्ध न्यायालयात दावा दाखल केला. मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयाने सरकारला "जैसे थे" ची सूचना दिली. यामुळे खाजगी मालकीच्या जमिनींवर चालू असलेले सुधारणाकाम थांबवावे असा हुकूम सरकारने काढला. वरिष्ठ न्यायालयाचा निर्णय सरकार-विरुद्ध गेला. त्यानंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागितली, पण सर्वोच्च न्यायालयाने वरिष्ठ न्यायालयाचा निर्णय कायम केला. या निर्णयामुळे ज्यांना घरबांधणीसाठी खाजगी मालकीच्या जमिनी सरकारने दिल्या होत्या अशा ७१ सहकारी संस्थांच्या बांधणीकार्यक्रमास पायबंद बसला. अन्यत्र जमीन उपलब्ध नसल्याने त्यांचा घरबांधणी कार्यक्रम बेमुदत पुढे ढकलला गेला.

ज्यांना सरकारी मालकीची जमीन मिळाली होती त्यांचे बांधकाम सुरू होऊ शकले. जानेवारी १९६३ मध्ये मागासलेल्या वर्गाच्या २३ सहकारी संस्थांच्या ५८३ घरांचे बांधकाम चालू होते. यांपैकी १६ संस्थांची ३७८ घरे बांधून पूर्ण झाली होती. यांपैकी ९२ घरांमध्ये कुटुंबे राहावयास आली होती. इतर २० संस्थांच्या २९५ घरांचे बांधकाम चालू होते. यांपैकी १४ संस्थांची १७४ घरे पूर्ण झाली होती. या १७४ घरांपैकी ९४ घरांमध्ये कुटुंबे राहावयास आली होती.

त्यानंतर अडीच वर्षांनी म्हणजे जुलै १९६५ मध्ये बांधकामाची परिस्थिती पुढीलप्रमाणे होती : मागासलेल्या वर्गांच्या संस्थांच्या ५८३ घरांपैकी ४५६ घरे बांधून तयार झाली होती. पण त्यांपैकी फक्त ११० घरांमध्ये कुटुंबे प्रत्यक्ष राहू लागली होती. इतर घरांमध्ये पाणी, वीज इत्यादी सोयींच्या अभावी कुटुंबे राहावयास गेली नव्हती. इतर संस्थांच्या कार्यक्रमामधील ३१३ घरांचे बांधकाम चालू होते व यांपैकी ३१० घरे बांधून पूर्ण झाली होती, आणि २५० घरांमध्ये कुटुंबे राहावयास गेली होती.

सहकारी घरबांधणी कार्यक्रमाची प्रगती फारच मंद गतीने झालेली दिसते. आपत्तीनंतर चार वर्षे उलटून गेली तरी एकूण ३३०० कुटुंबांपैकी फक्त ३६० कुटुंबांची राहण्याची सोय झाली. जानेवारी १९६३ ते जून १९६५ या कालात मागासलेल्या वर्गातील कुटुंबांच्या संस्थांची ७८ आणि इतर संस्थांची १३६ घरे बांधून पूर्ण झाली. घरांचे नकाशे तयार करणे, बांधकामाची परवानगी मिळणे, बांधकामास लागणारे साहित्य उपलब्ध होणे या सर्व गोष्टींस विलंब लागत असल्याने बांधकाम रेंगाळले.[५]

न्यायालयाचा निर्णय सरकारविरुद्ध गेल्याने ७१ संस्थांचा घरबांधणी कार्यक्रम बंद पडला होता याचा उल्लेख वर आलाच आहे. या बाबतीत असे कळते, की पुणे-सातारा रस्त्यालगत अरण्येश्वर-जवळ सरकार १२० एकर जागा विकत घेत आहे. ही जमीन चालू बाजारभावाप्रमाणे म्हणजे एकरी ३६,००० रुपये या दराने घेतली जाणार आहे. पण ही जागा पुरेशी नाही, म्हणून प्रत्येक सभासदास २००० चौ. फूटांचा स्वतंत्र तुकडा देण्याऐवजी चारआठ बिऱ्हांडासाठी मिळून दोनतीन मजली घरे बांधावीत अशी सूचना सरकारने संस्थांना दिलेली आहे. कमीतकमी किंमतीत जमीन ताब्यात घेण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचा परिणाम एवढाच झाला, की आता सहा पट किंमत देऊन जमीन घ्यावी लागत आहे. शिवाय पाच वर्षे असंख्य कुटुंबांना घर न मिळाल्यामुळे हलाखीत दिवस काढावे लागले ते वेगळेच.

### घरबांधणीचे अशासकीय प्रयत्न

मुंबई येथील एका सार्वजनिक संस्थेने पुण्यातील काही शिक्षण संस्थांच्या सहकार्याने एक घर-बांधणी कार्यक्रम पार पाडला. घरे बांधण्यासाठी शिक्षणसंस्थांनी जागा दिली व बांधणीचा खर्च

---

५. घरे बांधून पूर्ण झाली तरी फारच थोडी आपद्ग्रस्त कुटुंबे तेथे राहताना आढळतात. याचे एक कारण म्हणजे सहकारी वसाहती शहरापासून दूर (सुमारे चार मैल) असल्यामुळे व वाहतुकीची सोय चांगली नसल्यामुळे दूरवर राहण्यास अनेक कुटुंबे तयार नाहीत. पुण्यामधील जागेच्या सार्वत्रिक टंचाईमुळे ही नवीन घरे भाड्याने द्यावयास आपद्ग्रस्त कुटुंबांना परवानगी देण्यात आली. काहींनी आपली घरे संपूर्णतः अथवा भागशः भाड्याने दिली आहेत आणि आपद्ग्रस्त कुटुंबे जुन्या जागीच जागा दुरुस्त करून राहात आहेत असे समजले.

मुंबईच्या संस्थेने केला. या घरामध्ये दर कुटुंबास दोन खोल्या दिलेल्या आहेत. प्रत्येक बिऱ्हाडात वीज आणि स्वतंत्र नळ आहे पण संडास व न्हाणीघरे मात्र सामायिक आहेत. दोन विद्यालयांच्या आवारात प्रत्येकी २४ आणि एका शारीरिक शिक्षण संस्थेच्या आवारात आठ असे एकूण ५६ गाळे बांधले आहेत. जुलै १९६२ पर्यंत गाळ्यांचे बांधकाम पूर्ण होऊन त्यांमध्ये कुटुंबे राहू लागली. या योजनेस एकूण २,३५,८७२ रुपये खर्च आला.

या घरांमध्ये जागा देण्यासाठी आपद्ग्रस्त कुटुंबांकडून अर्ज मागविण्यात आले. त्या अर्जांचा विचार मुंबईच्या संस्थेचे प्रतिनिधी व पुण्यातील शिक्षणसंस्थांचे प्रमुख यांच्या समितीने केला. काही गाळे शिक्षणसंस्थांच्या नोकरवर्गातील आपद्ग्रस्त कुटुंबांना देण्यासाठी राखून ठेवण्याचे ठरले. या योजनेला मिळावी तितकी प्रसिद्धी न मिळाल्यामुळे या संस्थांशी संबंधित अशांना बहुतेककरून ही जागा मिळविणे सोपे गेले. ही जागा पाच वर्षांसाठी आपद्ग्रस्तांना राहण्यास दिलेली आहे. पाच वर्षांनंतर आपद्ग्रस्त कुटुंबांनी अन्यत्र व्यवस्था पाहावी आणि या इमारती शिक्षणसंस्थांना त्यांच्या वसतिगृहांसाठी कायमच्या देण्यात याव्या अशी तरतूद या योजनेत आहे.

सारांश, पानशेत आपत्तीमध्ये सुमारे १४,००० कुटुंबे बेघर झाली. त्यांपैकी ३१०० कुटुंबे मार्च १९६२पर्यंत आपल्या पूर्वीच्या जागा दुरुस्त करून अथवा नव्याने बांधून तेथे राहावयास गेली. १००० कुटुंबांनी पूर्वीच्याच जागी मंडप, छपरी वगैरे उभारून आपली तात्पुरती सोय करून घेतली. निरनिराळ्या सरकारी व इतर घरबांधणी योजनांद्वारे सुमारे ६००० बेघर कुटुंबांची राहण्याची सोय झाली. सहकारी गृहबांधणी संस्थांचे जे सभासद झाले परंतु जागेअभावी ज्यांना घरे बांधता आली नाहीत ती कुटुंबे तात्पुरती सोय करून कोठेतरी राहात असणार; अशा अंदाजे २००० कुटुंबांची कायम स्वरुपाची सोय व्हावयाची आहे. याशिवाय काही कुटुंबे तात्पुरत्या स्वरुपाच्या छपऱ्या, पत्रीक घरे अथवा झोपड्या यांमध्ये राहात आहेत. परंतु अशा कुटुंबांची संख्या निश्चित करणे कठीण असल्याने अजूनही एकूण किती कुटुंबांचे कायम स्वरुपाचे पुनर्वसन व्हावयाचे आहे याचा अंदाज बांधणे कठीण आहे. परंतु किमान २००० कुटुंबांची तरी कायमची राहण्याची सोय व्हावयाची आहे असे म्हणावयास हरकत नाही.

# सिंहावलोकन

पानशेत आपत्तीमुळे पुण्यामध्ये अल्पकालीन आणि दीर्घकालीन बहुविध प्रश्न निर्माण झाले. आपत्तीमुळे बेघर झालेल्या हजारो कुटुंबांची मोठ्या प्रमाणावर निवाऱ्याची सोय करणे ही अत्यंत निकडीची बाब होती. त्याचप्रमाणे आपद्ग्रस्तांना त्वरित हरप्रकारचे साहाय्य उपलब्ध करून देणे आवश्यक होते. आपदानिवारणाचे प्रश्न एकंदरीने कशा रीतीने हाताळले गेले, ते सोडविताना कोणत्या अडचणी आल्या आणि ते सोडविण्यासाठी उभारलेली यंत्रणा कितपत कार्यक्षम ठरली, या गोष्टींचा विचार प्रस्तुत प्रकरणात केला आहे. आपत्तीनंतर निर्माण झालेले काही प्रश्न, उदा. पाणीपुरवठा, बेघर कुटुंबांचे पुनर्वसन आणि आपत्तीत उद्ध्वस्त झालेल्या विभागांची पुनर्रचना, अल्पावधीत सोडविणे शक्य नव्हते. पानशेत आणि खडकवासला धरणांची दुरुस्ती आणि पुनर्बांधणी झाल्याशिवाय पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटणे शक्य नव्हते. बेघर झालेल्या कुटुंबांना घरे देण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शहराच्या जवळपास आवश्यक तितकी जमीन उपलब्ध होऊन घरे बांधण्यासाठी भांडवलाची योग्य व्यवस्था झाली तरच आपद्ग्रस्तांना परवडेल अशी जागा पुरविणे शक्य होणार होते. तसेच आपद्ग्रस्त विभागांची योग्य तऱ्हेने पुनर्रचना करणे ही गोष्ट शहराच्या विकासाची व्यापक योजना आखल्याशिवाय समाधानकारकरीत्या होणे शक्य नव्हते. आपदा-निवारणाबरोबरच आणखी एक प्रश्नही महत्त्वाचा होता. धरणे का फुटली, त्यामुळे झालेल्या अपरिमित हानीस जबाबदार कोण या प्रश्नाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे असे सर्वांनाच वाटले आणि म्हणूनच याबाबत न्यायालयीन चौकशीची मागणी जोराने मांडली गेली. धरणफुटीची कारणे व त्यानंतर संरक्षणार्थ पुण्यामध्ये केलेली उपाययोजना यासंबंधी न्यायालयीन चौकशी करण्यात आली, त्याचाही ऊहापोह या प्रकरणात केला आहे.

### तातडीची मदत

पानशेत आपत्तीत हजारो कुटुंबांच्या संसाराची धूळधाण झाली. त्यांना तातडीची मदत फार मोठ्या प्रमाणावर पोहोचविणे आवश्यक होते. अन्न, वस्त्र, निवारा अशा जीवनावश्यक गोष्टींना हजारो लोक मुकले असल्यामुळे ह्या गोष्टी पुरविण्याचे काम तात्काळ हाती घेणे जरूर होते. भोजन-केंद्रे उघडणे आणि अन्नवाटपाची सोय करणे, निर्वासितांसाठी निवाऱ्याची सोय करणे यांसारखी कामे आपत्तीनंतर दोनतीन दिवसांच्या अवधीत हाती घेण्यात आली. पहिले दोन दिवस मात्र

परिस्थिती गोंधळाची होती. आपत्तीची वार्ता सर्वत्र पसरताच अवळपासच्या भागातून धान्य व तयार अन्न पुण्याकडे पाठविले जाऊ लागले. या अन्नाचे पद्धतशीर वाटप करणे मात्र शक्य झाले नाही. ज्यांनी अन्न शहरात आणले त्यांनीच आपद्ग्रस्त विभागात जाऊन ते वाटले. तथापि तातडीने वाटप होऊ न शकल्यामुळे काही लोकांनी आणलेले अन्न वायाही गेले.

अन्नपुरवठ्याप्रमाणे निवाऱ्याचा प्रश्न तितकाच निकडीचा होता. शहरात पाणी चढू लागल्यावर आपद्ग्रस्त कुटुंबांनी शाळा अथवा अन्य संस्थांच्या इमारतीत तात्पुरता आसरा घेतला. पाणी ओसरल्यानंतर घरी येऊन पाहता अनेक कुटुंबांना आपली घरेदारे उद्ध्वस्त झाल्याचेच दृश्य दिसले. दुसरा कोणताही मार्ग नसल्याने ही कुटुंबे शाळा व इतर संस्थांमध्ये निवासासाठी परत गेली. अशा रीतीने निवासाचा प्रश्न त्याबाबत आगाऊ विचार किंवा प्रयत्न न होता आपोआपच सुटला. विशेषत: पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे तंबू अथवा तट्ट्यांचे मांडव यासारख्या तात्पुरत्या सोई करणे कठीण व मोठे खर्चाचे झाले असते. शाळा व इतर संस्थामध्ये आपद्ग्रस्तांनी आश्रय घेतल्यामुळे निवाऱ्याची तरतूद तातडीने तर झालीच, शिवाय ही सोय विनामूल्य उपलब्ध झाली. आपत्तीनंतर दोन दिवसांनी या आश्रयकेंद्रांना अधिकृत मदत-केंद्रे म्हणून मान्यता मिळाली आणि त्यांस सरकारतर्फे धान्य-पुरवठा सुरू झाला. प्रत्येक केंद्रातून अन्न शिजविण्याची व्यवस्था होऊन अन्नाचे पद्धतशीर वाटप सुरू झाले.

शाळा, महाविद्यालये यांसारख्या ठिकाणी कुटुंबांना स्वत:चे अन्न शिजविण्याची व्यवस्था करणे शक्य नव्हते. त्यामुळे तेथील अन्नवाटप मात्र दीर्घकाल चालू ठेवावे लागले. याचा एक परिणाम म्हणजे सरकारने सर्व प्रकारे आपणांस मदत केली पाहिजे अशा प्रकारची काहीशी हक्काची भावना आपद्-ग्रस्तांमध्ये दृग्गोचर होऊ लागली. तसेच तात्कालिक मदत मिळत असली तरी भविष्यकालीन पुनर्वसनाबाबत अनिश्चितता असल्यामुळे आपद्ग्रस्तांमध्ये वैफल्याची भावना पसरू लागली. त्या-मुळे आपद्ग्रस्त कुटुंबे आणि सरकारी अधिकारी यांच्या संबंधात कडवटपणा निर्माण झाला.

ज्या कुटुंबांनी मदत-केंद्रांमध्ये आश्रय घेतला नव्हता, त्यांना धान्य, पैसे, आणि कापड या वस्तूंचे वाटप आपत्तीनंतर सुमारे एक आठवड्यातच सुरू करण्यात आले. याप्रमाणे तातडीच्या मदतीचे वाटप ज्या क्रमाने व्हावयास पाहिजे होते तो क्रम सर्वसाधारणपणे पाळण्यात आला. मात्र आपद्-ग्रस्त कुटुंबांना ओळखपत्रे देण्याचे काम मदत-वाटप बहुतेक पुरे झाल्यानंतर हाती घेण्यात आले. वास्तविक मदतीचे वाटप होण्यापूर्वी ओळखपत्रे देणे आवश्यक होते, म्हणजे आपद्ग्रस्त कुटुंबांनाच मदत पोहोचते हे पाहणे शक्य झाले असते.

ओळखपत्रे देण्याचे काम ऑगस्टअखेर सुरू झाले. हे काम अननुभवी लोकांकडे सोपविण्यात आल्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांनी या नोंदणीच्या विश्वसनीयतेबाबत शंका व्यक्त केल्या. काही फसवेगिरीचे प्रकार नंतर उघडकीस आले. त्यामुळे मदत काहीशी अयोग्य प्रकारे व विषम प्रमाणात वाटली गेली आणि असमाधान निर्माण झाले.

संकटानंतरच्या बिकट दिवसांत अन्न, वस्त्र आणि पैसा यांची तात्कालिक मदत दिल्यानंतर उप-जीविकेच्या साधनांची काहीतरी सोय करणे आवश्यक होते. अन्यथा आपद्ग्रस्तांचे संसार सावरले गेले नसते आणि जीवनोपयोगी वस्तूंची कितीही मदत केली असती तरी ती पुरी पडली नसती. या दृष्टीने आपद्ग्रस्त कुटुंबांना उद्योगधंद्यासाठी दिलेली कर्जे व मदत त्यांचे परावलंबित्व कमी करण्यास उपयुक्त ठरली. वास्तविक प्रत्येक कुटुंबाच्या गरजेचा विचार करून त्यास आवश्यक ती मदत करणे

इष्ट असले तरी प्रत्येकाच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजा भागविणे सोपे नव्हते. अशा प्रकारे वैयक्तिक गरजा भागविण्याच्या दृष्टीने मदत-वाटपासाठी जी यंत्रणा लागते, ती सरकार किंवा कोणतीही खाजगी संस्था यांच्याकडे नव्हती. त्यातल्यात्यात मुख्यमंत्रि-निधीने वैयक्तिक गरजांच्या संदर्भात मदत-वाटपाचे तत्त्व अंमलात आणण्याचा काहीसा प्रयत्न केला असे म्हणता येईल. मुख्यमंत्रि-निधीमार्फत व्यावसायिक पुनर्वसनासाठी निरनिराळ्या योजना आखल्या गेल्या आणि त्या सहकारी व वाणिज्य अधिकोष यांच्या सहकार्याने पार पडल्या. या योजनांद्वारे आपद्ग्रस्त व्यापारी, कारागीर, छोटे कारखानदार यांना दीर्घ मुदतीने व माफक व्याजाच्या दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात आले. या योजनांमध्ये तारणाबाबत कोणत्याही अडचणीच्या अटी नसल्याने सर्व आपद्ग्रस्तांना त्यांचा फायदा घेता आला. सरकारमार्फतही व्यावसायिकांना ठराविक रोख रक्कम साहाय्य म्हणून देण्यात आली व कारखानदारांना कर्जे देण्याची व्यवस्था करण्यात आली. ज्या अधिकोषांमार्फत कर्जे देण्यात आली त्यांच्याकडे चौकशी करता असे कळले, की बहुतेक कर्जांची परतफेड व्यवस्थित चालू आहे. यावरून असे म्हणावयास हरकत नाही, की धंद्यांच्या उभारणीस ही कर्जे उपयोगी ठरली.

एवंच महाराष्ट्रातील अनेक संस्था व नागरिक यांच्या उत्स्फूर्त साहाय्यामुळे आपत्तीनंतर निर्माण झालेल्या तात्कालिक प्रश्नांना तोंड देणे सुकर झाले. तातडीने मदत पोहोचवावयाची म्हणजे धान्य, कपडे व इतर आवश्यक वस्तू चटकन उपलब्ध होणे जरूर होते. वैयक्तिकरीत्या व संस्थांकडून या आवश्यक वस्तू मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या व त्यांच्या वाटपाची जबाबदारी नागरी समित्यांनी घेतली. त्यामुळे आपद्ग्रस्तांना त्वरेने मदत देणे शक्य झाले. निवासाचाही प्रश्न शाळा व इतर संस्थांमध्ये मदत-केंद्रे निघाल्याने तात्काळ सुटला. तसेच ही मदत-केंद्रे चालविण्याची जबाबदारी या संस्थांमार्फत झाल्याने मदत-केंद्रे चालविणे सुकर झाले व त्यासाठी खर्चही अल्प आला.

## आपत्कालीन शासनयंत्रणा

आपत्तीनंतर निर्माण झालेल्या बहुविध समस्या सोडविण्याच्या कामात सरकारी यंत्रणेने मोठा वाटा उचलणे अपरिहार्य होते. नेहमीची सरकारी यंत्रणा या कार्यास पुरी पडणे शक्य नसल्याने काही पुरवणी-यंत्रणा निर्माण करण्यात आली. चालू सरकारी यंत्रणेला या पुरवणी-यंत्रणेची काही ठिकाणी जोड देण्यात आली तर काही ठिकाणी चालू यंत्रणेत थोडेफार बदल करण्यात आले. संकटकाळच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी स्वयंपूर्ण व स्वतंत्र अधिकार असलेली यंत्रणा निर्माण करण्यापेक्षा सल्लागारी स्वरुपाची आणि समन्वय साधणारी पूरक यंत्रणा निर्माण करण्यावर सरकारने भर दिला.

मुलकी अधिकाऱ्यांना सल्ला देण्यासाठी व मदत करण्यासाठी आय्. ए. एस्. दर्जाचे एक खास अधिकारी नेमलेले होते. तथापि सल्ला देण्याऐवजी मुलकी अधिकाऱ्यांनी जे निर्णय घेतले त्यांची अंमलबजावणी करण्यासाठीच या खास अधिकाऱ्यास मुख्यतः राबविण्यात आले. निरनिराळ्या मुलकी खात्यांकडे सुपुर्द केलेल्या कामांमध्ये समन्वय राहावा म्हणून विभाग प्रमुखांची एक समन्वयी समिती स्थापिली होती. या समितीचे अध्यक्ष म्हणून आय्. सी. एस्. नोकरीतून निवृत्त झालेल्या एका अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. या समितीमार्फत आपद्ग्रस्त भागाची साफ-सफाई, दळणवळण व इतर सुविधांची दुरुस्ती, नवीन घरबांधणी कार्यक्रमाची सुरुवात, अशा कामांना चालना मिळाली. ही कामे नेहमीपेक्षा निराळी व अनेक खात्यांनी एकत्र येऊन करावी लागत असल्याने गुंतागुंतीची होती, त्यासाठी समन्वयी समितीची गरज होती. परंतु निरनिराळ्या खात्यांकडून झटपट आणि योग्य ती कारवाई करून घेण्याची जबाबदारी मुख्यतः खास

अधिकाऱ्यावरच पडली. समन्वयी समितीचे अध्यक्षांवर, मुख्यमंत्र्यांचे खास प्रतिनिधी या नात्याने जनतेचे प्रतिनिधी आणि सरकारी अधिकारी यांमध्ये संपर्क साधण्याची जबाबदारी होती. साहजिकच अनेक आपद्ग्रस्तांनी आपली गाऱ्हाणी त्यांच्याकडे नेली. पण प्रमुख बाबींसंबंधाने निर्णय घेण्याचे काम या समितीने कितपत पार पाडले याविषयी संदेह आहे. कारण काही वेळा असे घडले, की समितीच्या अध्यक्षांनी अमुक एक गोष्ट जाहीर करावी आणि समितीचे सभासद व इतर मुलकी अधिकारी यांनी समितीमध्ये अशी कोणतीही गोष्ट ठरली नाही असे जाहीर करून अध्यक्षांचे निवेदन खोडून काढावे. याबाबत वस्तुस्थिती अशी दिसते की प्रमुख निर्णय मुलकी अधिकाऱ्यांनी स्वतःच्या अखत्यारीत स्वतंत्रपणे घेतले. समितीचे अध्यक्ष हे सरकारी अधिकारी नसल्यामुळे मुलकी अधिकाऱ्यांकडून कोणतीही गोष्ट करून घेण्याचा अधिकार त्यांना नव्हता. त्यामुळे समन्वयाचे कार्य या समितीस कितपत करता आले हे सांगणे कठीण आहे.

आपदानिवारणाच्या कामात मोठा भाग घेतलेली दुसरी यंत्रणा म्हणजे मुख्यमंत्रि-निधी समिती. या समितीकडून सुसूत्र व व्यवस्थितरीतीने आपदानिवारणाचे काम पार पडू शकले. एका विशिष्ट कार्यापुरतीच या समितीची स्थापना करण्यात आली होती. आणि ते कार्य पार पाडण्यास आवश्यक ते अधिकार या समितीस सुपुर्द करण्यात आलेले होते. समितीचे अध्यक्ष पुणे विभागाचे विभागीय अधिकारी असल्याने समितीने घेतलेले निर्णय अमलात आणण्यासाठी आवश्यक ते अधिकार त्यांना होते. समितीचे इतर सदस्य बिनसरकारी असल्यामुळे कोणताही दबाव न पत्करता कार्य करणे त्यांस शक्य होते. त्यामुळे या समितीकडून महत्त्वाचे निर्णय झटपट घेतले गेले आणि समितीने योग्य वेळी मदत देऊ केल्यामुळे इतर संस्थांनाही समितीच्या सहकार्याने निरनिराळ्या योजना त्वरीत कार्यवाहीत आणणे शक्य झाले.

आपद्ग्रस्त कुटुंबाना तातडीने धान्यवाटप करण्यासाठी शहरात स्थापन झालेल्या विभागीय समित्या उपयुक्त ठरल्या. या समित्या नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन उभ्या केल्या असल्याने बिनसरकारी प्रातिनिधिक समित्या असे त्यांचे स्वरूप होते. त्यामुळे आपद्ग्रस्तांचा विश्वास त्यांस संपादन करता आला. जनता व अधिकारी यांमध्ये संपर्क साधण्याचे कार्य या समित्यांनी केले.

अशासकीय आणि केवळ सल्लागारी स्वरूपाच्याही काही यंत्रणा निर्माण केलेल्या होत्या. आपद्ग्रस्त लोकांची प्रातिनिधिक म्हणून एक नागरिक समिती नेमण्यात आलेली होती. नागरिक समितीमध्ये निरनिराळ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते प्रामुख्याने असल्याने जनतेची गाऱ्हाणी वेशीवर टांगण्याचे काम या समितीने केले. मदत-केंद्रांना भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी करण्यासाठीही एक बिनसरकारी समिती नेमली होती. मात्र तेथील परिस्थिती सुधारण्यात ही समिती किती यशस्वी ठरली याबाबत निश्चित काही सांगणे कठीण आहे. याशिवाय अनेक संस्थांनी निधी उभारले अथवा खाजगीरीत्या मदत गोळा केली, ती वाटण्यासाठी आपापल्या स्वतंत्र यंत्रणा त्यांनी निर्माण केल्या.

अशा रीतीने आपत्तीनंतरचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि विशेषतः मदतीचे वाटप करण्यासाठी अनेक सरकारी व बिनसरकारी यंत्रणा व खास सरकारी खाती राबविली गेली. तथापि या सर्वांच्या कामात सुसूत्रता ठेवणे अशक्य झाले. त्यामुळे मदत-वाटप कोठे दुबार झाले, तर कोठे दुर्लक्ष झाले. शासकीय यंत्रणांच्या विभिन्नतेमुळे मदतीची सर्वंकष अशी एक योजना तयार होऊ शकली नाही.

### चौकशी आयोगाचा निवाडा

पानशेत धरणफुटीनंतर सरकारी अधिकाऱ्यांनी पुण्यातील नागरिकांचे जीवित आणि मालमत्ता यांच्या संरक्षणार्थ योग्य उपाय योजण्यात कुचराई केली असा सर्वसाधारण नागरिकांचा समज झालेला

होता. त्यामुळे पानशेत आपत्ती का व कशी कोसळली याची न्यायालयीन जाहीर चौकशी व्हावी अशी मागणी प्रक्षोभित नागरिकांनी केली. या मागणीनुसार श्री. आर. एस्. बावडेकर, आय्. सी. एस्. (निवृत्त) या न्यायाधीशांची दि. २४ जुलै १९६१ रोजी "चौकशी आयोग" म्हणून सरकारने नियुक्ती केली. धरणे का फुटली आणि ती फुटल्यानंतर आपत्ती टळावी किंवा नुकसान होऊ नये यासाठी अधिकाऱ्यांनी योग्य व पुरेसे उपाय योजले की नाही या प्रश्नांची चौकशी करावी, असे त्यांस सांगण्यात आले. पण आयोगाचे कामकाज सुरू झाल्यानंतर लवकरच श्री. बावडेकर यांस दु:खद रीतीने मृत्यू आला. आयोगाकडे चौकशीसाठी सुपुर्द करण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये काही ठिकाणी बदल व खाडाखोड केल्याची तक्रार कै. बावडेकरांनी सरकारकडे केली होती अशी बातमी त्यांच्या मृत्यूपूर्वी प्रसिद्ध झाली होती. कै. बावडेकरांवर सरकारमार्फत दडपण आणण्याचा प्रयत्न झाला असा एक समज त्यामुळे फैलावला.

श्री. बावडेकरांच्या मृत्यूनंतर दि. ३ नोव्हेंबर १९६१ रोजी सरकारने न्यायमूर्ती नाईक यांची चौकशीच्या कामावर नेमणूक केली. ९ डिसेंबर १९६१ पासून नाईक आयोगाचे कामकाज सुरू झाले. आयोगास मदत करण्यासाठी दोन तज्ज्ञ अभियंते, एक कायदा सल्लागार आणि चार साहाय्यक वकील यांची नेमणूक केलेली होती. सरकारी अधिकारी आणि इतर अनेक व्यक्ती यांच्या आयोगापुढे साक्षी झाल्या. ५ जानेवारी १९६३ रोजी आयोगाने आपले इतिवृत्त सरकारला सादर केले आणि सप्टेंबर १९६३ मध्ये विधिमंडळापुढे ते चर्चेला आले.

अधिकाऱ्यांनी कुचराई केली या जनतेच्या आरोपात बरेच तथ्य असल्याचे आयोगाच्या निवाड्यावरून दिसून येते. योग्य ती खबरदारी न घेतल्यामुळे मुलकी आणि पोलीस अधिकाऱ्यांना आयोगाने दोष दिला आहे. लोकांना सावध करणे, तज्ज्ञांचा सल्ला घेऊन धरणे फुटली तर शहरात पाणी किती पसरेल याचा अंदाज घेणे, लोकांना सुरक्षित स्थळी हलविणे व लोकांची मालमत्ता वाचविणे यासाठी सर्व साधनांची सिद्धता ठेवणे या गोष्टी अधिकाऱ्यांनी जबाबदारीने पार पाडल्या नाहीत असे आयोगाने म्हटले आहे. "पानशेत धरण अगदी फुटण्याच्या बेतात आहे ही माहिती मिळाल्यावरसुद्धा मुलकी प्राधिकाऱ्यांनी (केवळ लष्करी मदतीची व्यवस्था करण्याखेरीज) काहीही उपाययोजना केली नाही."[१] "वेगवेगळ्या सरकारी संस्थांत एकसूत्रता नव्हती. आपला अंदाज संपूर्णपणे चुकल्यामुळे मोठमोठ्या हुद्यांवरील अधिकारी हतबल झाले."[२] ". . . . पानशेत धरण फुटल्यामुळे १२ जुलैच्या सकाळी जी परिस्थिती प्रत्यक्षत: उद्‌भवली तिला तोंड देण्यास मुलकी प्राधिकारी सज्ज नव्हते."[३]

आपत्तीचे भयानक परिणाम आटोक्यात आणण्यासाठी योग्य ती उपाययोजना न केल्याबद्दल आयोगाने मुलकी अधिकाऱ्यांना जबाबदार धरल्यामुळे, सरकार योग्य ती कारवाई करील अशी अपेक्षा होती. खुद्द न्यायमूर्ती नाईकांनीही चौकशीचे काम चालू असताना त्याच अधिकाऱ्यांना आपापल्या जागांवर राहू दिल्याबद्दल सखेदाश्चर्य व्यक्त केले आहे. पण या अधिकाऱ्यांविरुद्ध उपाययोजना करण्याऐवजी सरकारने आयोगाच्या अहवालाचा अर्थ लावण्यासाठी आणि कोणती

---

१. पानशेत आणि खडकवासला धरणफुटीच्या चौकशीकरिता नेमलेल्या चौकशी कमिशनचा अहवाल, भाग २, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६३, पान ४६६.

२. तत्रैव, पान ४१९.

३. तत्रैव, पान ४६८.

उपाययोजना करावी हे सुचविण्यासाठी एका अधिकाऱ्याची नेमणूक केली. उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यास त्यांच्या सहकाऱ्यांच्या वर्तनात आक्षेपार्ह असे काही आढळलेले दिसत नाही व हे प्रकरण येथेच मिटल्यासारखे दिसते. सरकारच्या या अजब कारवाईमुळे न्यायालयीन चौकशी केली तरी कशाला असा प्रश्न उद्‌भवतो. या चौकशीपायी सात-आठ लाख रुपये खर्च झाले. तो खर्च वाया गेला असेच म्हटले पाहिजे. सरकार जनतेच्या मताची यत्किंचित कदर करीत नाही, एवढेच नव्हे तर न्यायासनासही योग्य तो मान देत नाही असा आरोप सरकारवर केला गेला असल्यास नवल नाही.[४]

**पाणी पुरवठ्याचा प्रश्न**

पानशेत व खडकवासला येथील धरणे कोसळल्यामुळे त्वरित पाणीपुरवठा कोठून करता येईल याविषयी विचार सुरू झाला. कात्रज तलाव आणि पावसामुळे भरून वाहणारे ओढे यांच्या साहाय्याने पुणे शहरास काही दिवसांपुरते थोडेफार पाणी पुरविणे शक्य झाले. दरम्यान खडकवासला धरण दुरुस्त करून त्याला बळकटी आणता येईल का या प्रश्नावर विचार चालू होता. पानशेत आणि खडकवासला धरणाची बांधणी कशी करावी यावर सल्ला देण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमण्यात आली होती. पानशेत येथे मातीचे धरण बांधण्यास तांत्रिकदृष्ट्या प्रत्यवाय नाही, असे या समितीचे मत पडले. खडकवासला धरणास मध्यभागी पडलेले खिंडार बुजविण्यापेक्षा त्या खिंडारावर आच्छादन घालणारी एक भिंत बांधावी असे मत समितीने व्यक्त केले.

नाईक आयोगाच्या अभियंत्यांनी फेब्रुवारी १९६२ मध्ये खडकवासला धरणाची पाहणी केली आणि नंतर दुरुस्तीचे काम सुरू करण्यास आयोगाने परवानगी दिली. त्याप्रमाणे दुरुस्तीचे काम सुरू झाले. हे काम १९६२ च्या पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल असा अंदाज होता. त्यामुळे ऑक्टोबर १९६१ ते जून १९६२ या कालात पुण्यास पाणी पुरविण्यासंबंधी इतर योजनांचा विचार चालू होता. पुण्याच्या पश्चिमेकडे २६ मैलांवर असलेल्या मुळशी तलावातून पुण्याकडे पाणी आणण्याची योजना मान्य करण्यात आली. ऑगस्ट १९६१ मध्ये मुळशी योजनेचे काम सुरू झाले. दुरुस्त झालेल्या खडकवासला धरणातून जून १९६२ नंतर पाणी मिळू लागेल असा अंदाज होता. तोपर्यंत मुळशी धरणातून पाणी घ्यावयाचे ठरले. या तात्पुरत्या योजनेस सव्वा कोट रुपये खर्च येत होता. मुळशी धरणापासून पुण्यापर्यंत पाणी आणण्याची व्यवस्था नोव्हेंबर १९६१ पर्यंत पूर्ण होऊन डिसेंबरमध्ये मुळशी तलावाचे पाणी पुण्यास मिळू लागले. धरणे फुटण्यापूर्वी मिळणाऱ्या पाण्याच्या जवळजवळ ७५ टक्के पाणी मुळशी योजनेपासून पुण्याला मिळू लागले. त्यामुळे काही कालापुरता तरी पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटला. मुळशी योजनेमुळे पाण्याची तात्पुरती सोय झाल्याने कायम स्वरूपाची पुरवठा योजना कार्यवाहीत आणण्याची मात्र फारशी निकड वाटेनाशी झाली.

खडकवासला येथील भिंत बांधण्याच्या योजनेविषयी फेरविचार सुरू झाला असे वृत्त ११ मार्च १९६२ रोजी प्रसिद्ध झाले, आणि या योजनेचे काम पावसाळा सुरू होण्याच्या आत संपेल अशी चिन्हे दिसत नसल्याने ते बेमुदत थांबविण्यात आले. त्यामुळे १९६२ सालीसुद्धा पावसाळ्यात ओढे, कात्रज तलाव आणि नदी यांतून पाणी घेण्यात आले. पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोबर ते जून १९६२ या कालात पुरवठा करण्यास मुळशी योजना हाताशी होतीच.

---

४. सप्टेंबर १९६६ मध्ये महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले की उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्याचा अहवाल हाती आला असून सरकार त्याचा विचार करीत आहे.

तज्ज्ञांच्या समितीने जरी पानशेत येथे मातीच्या धरणाची पुनर्बांधणी करावी आणि खडकवासला येथे दुरुस्ती करावी असे म्हटले असले तरी पूर्णपणे सुरक्षित अशीच धरणयोजना स्वीकारावयाची असा सरकारचा आता आग्रह दिसला. त्यामुळे पावसाळा संपल्यानंतर खडकवासल्यास भिंत बांधण्याचे काम हाती घेण्यात आले नाही व नंतर अर्धवट झालेले बांधकाम तसेच सोडून देऊन ती योजनाच रद्द ठरविण्यात आली.

कोणत्या प्रकारची धरणे बांधावीत याचा विचार उच्च पातळीवर चालूच राहिला. कै. कन्नमवार यांच्या मंत्रिमंडळाने दि. १६ जानेवारी १९६३ रोजी खडकवासला येथे नवीनच धरण बांधण्याचा निर्णय जाहीर केला. नवीन धरण लहान, फक्त ५०० दशलक्ष घनफूट पाणी साठवू शकणारे व सिमेंट कॉंक्रिटमध्ये बांधले जाणार होते. या धरणास ३३५ लाख रु. खर्च येत होता व हे धरण चार वर्षांत बांधून होणार होते. खडकवासला धरणाची दुरुस्ती करण्यातील धोका (?) पतकरण्यापेक्षा नवीन धरण बांधण्याचा निर्णय केवळ सुरक्षिततेसाठी घेतला गेला. परंतु पानशेत येथे मात्र मातीच्या धरणाची पुनर्बांधणी करण्याचा निर्णय कायम करण्यात आल्याचे वृत्त फेब्रुवारी १९६३ मध्ये प्रसिद्ध झाले.

नवीन धरणाची योजना स्वीकारल्यामुळे पुण्यास पूर्ववत पाणीपुरवठा लवकर सुरू होण्याची आशा राहिली नाही. शिवाय नवीन धरण कॉंक्रिटमध्ये बांधण्याचा खर्च आणि चार वर्षे मुळशीसारखी खर्चिक पाणीपुरवठा योजना चालू ठेवण्याचा खर्च याचा बोजा उचलावा लागणार हेही उघड झाले. त्याशिवाय शेतीचे नुकसान दरवर्षी होत जाणार ते निराळेच. 'सुरक्षित' धरणे बांधण्याचा आग्रह अधिकाधिक खर्चिक ठरत चालला होता. त्यामुळे कमी खर्चाच्या आणि कमी वेळात पुऱ्या होतील अशा योजना हाती घ्याव्या म्हणून सरकारकडे प्रातिनिधिक मंडळांनी आग्रहाने मागणी केली. खडकवासला धरण दुरुस्त करावे आणि त्याला बळकटी आणावी, किंवा खडकवासला येथे उन्नयनवार बांधावे अशी शिफारस डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनने केली. यामुळे खर्च आणि वेळ दोन्हीही वाचून पुण्यास पाणी लवकर मिळाले असते. सरकारने फेरविचाराचे आश्वासन दिले. पण अखेर खडकवासल्यास कॉंक्रिटच्या धरणाऐवजी चिरेबंदी धरण बांधावे एवढाच आपल्या निर्णयात बदल केल्याचे सरकारने मार्चमध्ये जाहीर केले. जून १९६३ मध्ये डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनने १४५० दशलक्ष घनफूट पाण्याचा साठा करण्याच्या दृष्टीने खडकवासला धरण दुरुस्त करावे व त्यास बळकटी आणावी अशी सूचना केली. या योजनेस एकूण एक कोटी रुपये म्हणजे सरकारी योजनेपेक्षा दोन कोटी रुपये कमी खर्च येत होता. १४ जुलै १९६३ रोजी मुख्य मंत्र्यांनी असोसिएशनचे प्रतिनिधी आणि इतर संबंधित लोक यांची भेट घेतली व असोसिएशनच्या सूचनेचा विचार करण्याचे आश्वासन दिले. पण सप्टेंबर १९६३ मध्ये खडकवासला येथे चिरेबंदी धरण तीन वर्षांत बांधून पूर्ण करण्याचा आपला निर्णय कायम केल्याचे सरकारने जाहीर केले.

सरकारच्या आग्रही धोरणामुळे लवकर पाणीपुरवठा ज्यामुळे चालू होईल अशा योजनांचा विचार होईना म्हणून जनतेच्या शिष्टमंडळांनी व प्रातिनिधिक संस्थांनी सरकारचा पाठपुरावा चालू ठेवला. शेवटी मार्च १९६४ मध्ये नवीन मुख्यमंत्री श्री. नाईक यांनी खडकवासला धरणाला मध्यभागी पडलेले भगदाड ४५ फूट उंचीपर्यंत पावसाळ्यापूर्वी बुजविण्यात येईल असा निर्णय जाहीर केला. धरणास मातीचे भराव देऊन बळकटी आणण्याची सूचनाही सरकारने स्वीकारली. ४ मार्च १९६४ रोजी भगदाड बुजविण्याचे काम सुरू झाले आणि जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ते पूर्ण झाले. या कामास सुमारे १५ लाख रुपये खर्च आला. पावसाळा संपल्यानंतर उरलेले भगदाड बुजविण्याचे काम

करण्यात येऊन ते जून १९६५ पर्यंत पूर्ण झाले. जी गोष्ट आपत्तीनंतर लगेच करता आली असती ती करण्यात धरसोडपणामुळे अक्षम्य दिरंगाई झाली. खडकवासल्याची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यास पुरेसे धैर्य येण्यास सरकारला तीन वर्षे लागली. धरणाच्या ज्या भागात स्वयंचलित दारे होती त्या भागाची दुरुस्ती अजून व्हावयाची होती. स्वयंचलित दरवाज्याची नवीन संकल्पचित्रे तयार करून हे काम १९६५ साली नोव्हेंबर महिन्यात सुरू करण्यात आले. धरणास मजबुती आणण्याचे कामही हाती घेण्यात आले. खडकवासला धरणाच्या एकूण दुरुस्तीच्या कामास अंदाजे १.५ कोटी रुपये खर्च येईल. खडकवासला येथील पाण्याचा साठा पूर्ववत होण्यास धरणफुटीनंतर सहा वर्षांचा कालावधी लागणार असे एकूण दिसते.

पानशेत येथील धरणाचे बांधकाम नोव्हेंबर १९६५ मध्ये सुरू झाले. धरणाचे काम मुख्यतः मातीचे (६७ दशलक्ष घनफूट) व काही अंशी (४ दशलक्ष घनफूट) चिरेबंदी करण्यात येणार आहे. तसेच मूळच्या मातीच्या बंधाऱ्याच्या डागडुजीचे कामही करावे लागणार आहे. या सर्व कामास सुमारे ३.५ कोटी रुपये खर्च येईल व धरण १९७० साली तयार होईल असा अंदाज आहे. पानशेत येथील धरण पूर्वयोजनेप्रमाणे १९६२ साली पूर्ण न करता त्यात फेरबदल करून ते १९६१ साली पूर्ण करण्याच्या प्रयत्नात अखेर ते १९७० साली पूर्ण होण्याची वेळ आली. योजनेच्या मूळच्या खर्चामध्ये ४ कोटी रुपयांहून अधिक खर्चाची भर पडली. पुणेकर व आसमंतातील ग्रामीण जनतेस मोठे हाल व अपरिमित नुकसान सोसावे लागले. धरणाच्या कामातील घिसाडघाईमुळे एवढी संकट-परंपरा निर्माण झाली.

## पुनर्वसन

आपद्ग्रस्त कुटुंबांना मदत-केंद्रातून हलवून त्यांच्यासाठी बांधलेल्या तात्पुरत्या किंवा कायम स्वरूपाच्या बिऱ्हाडात नेण्यास सुरुवात झाली, त्या वेळी तातडीच्या मदतीची आवश्यकता संपून पुनर्वसनाच्या टप्प्यास प्रारंभ झाला असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल.

पुनर्वसनाचा प्रश्नही खंबीरपणे व योजनापूर्वक हाताळला गेल्याचे दिसत नाही. आपद्ग्रस्त कुटुंबांना नवीन वसाहतीत जागा देताना फक्त त्यांचे उत्पन्न लक्षात घेतले गेले. आपद्ग्रस्त कुटुंबांचे पूर्वीचे राहण्याचे ठिकाण किंवा त्यांच्या उद्योगधंद्यांचे ठिकाण या गोष्टींचा विचार झाला नाही. अशा प्रकारे काही महत्त्वाच्या सामाजिक बाबींचा विचार न झाल्यामुळे संघर्षाचे प्रसंग निर्माण झाले.

आपद्ग्रस्तांसाठी ज्या नवीन वसाहती वसविल्या गेल्या त्यांची आखणी योजनापूर्वक झाली नाही. पुनर्वसनाच्या समस्येचे स्वरूप जोखून, पुनर्वसनाची एक सर्वांगीण योजना आखावयास हवी होती. त्याऐवजी प्रत्येक छोट्याछोट्या योजनांचा स्वतंत्रपणे विचार झाला व त्या स्वतंत्रपणे कार्यवाहीत आल्या. परिस्थितीनुरूप योजनांमध्ये बदल करण्यात आल्यामुळे त्या प्रत्यक्षात उतरण्यास विलंब झाला. पक्की घरे वेळेवर तयार होऊ न शकल्यामुळे तात्पुरत्या स्वरुपाची सोय करण्याचा सुमारे पाच लाख रुपये खर्च सरकारला करावा लागला.

सरकारतर्फे अंमलात येणाऱ्या घरबांधणी योजनांमध्ये सर्व आपद्ग्रस्तांना जागा मिळणे शक्य नव्हते. त्यामुळे सहकारी घरबांधणी संस्था उभारण्यास सरकारने उत्तेजन दिले आणि सुमारे ३००० कुटुंबे अशा संस्थांमध्ये सहभागी झाली. पण यापैकी दोनतृतीयांश संस्थांना घरे बांधण्यास जमीन देणे सरकारला शक्य झाले नाही. घरबांधणीसाठी शहराजवळच्या खाजगी मालकीच्या जमिनी ताब्यात घ्यावयाच्या असे ठरवून सरकारने १९४८ सालच्या किमतीस जमिनी ताब्यात घेण्यास सुरुवात

केली. पण जमीनमालकांस किंमत न पटून त्यांनी न्यायालयाकडे दाद मागितली. न्यायालयाने सरकारविरुद्ध निर्णय दिल्याने १९६१ सालच्या किंमतीस जमिनी घेण्याची सरकारने तयारी दर्शविली. पण १९६१ नंतर जमिनीच्या किंमतीत भरमसाट वाढ झालेली असल्याने त्या वेळच्या किंमतीत जमिनी देण्यासही मालक तयार होईनात. शेवटी १९६५ च्या किंमतीत जमिनी घेण्याशिवाय सरकारला तरणोपाय राहिला नाही. म्हणजे पूर्वी द्यावी लागली असती त्याच्या सहा पट किंमत सरकारला द्यावी लागणार आहे. शिवाय न्यायालयीन वादामध्ये चार वर्षे निघून गेल्याने ज्या आपद्ग्रस्त कुटुंबांना जागा मिळाली नाही अशांना अतिशय अडचणीत व हलाखीत दिवस काढावे लागले.

ज्या संस्थांना सरकारी मालकीची जागा दिली त्यांच्यावर या वसाहतीची मांडणी कशा पद्धतीने व्हावी घरे कोणत्या प्रकारची असावीत या बाबतीत कोणत्याही तऱ्हेचे बंधन न घालता प्रत्येक कुटुंबास जमिनीचा स्वतंत्र तुकडा देण्यात आला. सहकारी संस्थांमार्फत सुटी, स्वतंत्र घरे बांधण्याऐवजी ओळीने एकमेकांस लागून घरे बांधली असती किंवा दुमजली इमारती बांधल्या असत्या तर जागेची मोठी बचत झाली असती. शिवाय बांधकामाचा खर्चही कमी आला असता आणि जागेच्या अभावी ज्या अनेक कुटुंबांना चार वर्षे हाल सोसावे लागले त्यांची सोय उपलब्ध जागेत करता आली असती.

काही किरकोळ बाबींतही निश्चित धोरणाचा अभाव दिसून आला. आपद्ग्रस्त विभागांतील जी घरे कोसळली किंवा वाहून गेली त्यांच्या बांधकामातील पुष्कळसे लाकूड सरकारतर्फे गोळा करण्यात आले. या लाकडाचा उपयोग घरबांधणीच्या योजनेत करावा किंवा दुरुस्तीच्या कामात करावा अशी मागणी सरकारकडे करण्यात आली. पण या सूचनेचा कधी विचारच झाला नाही. हे लाकूड नुसते रचून ठेवण्यात आले व उन्हापावसाने त्याची खराबी होत राहिली. जनतेच्या मालकीचे हजारो घनफूट लाकूड, की ज्याची किंमत आज लाखांनी होईल, केवळ सरकारी धोरणाच्या अभावामुळे वाया चालले आहे.

पुनर्वसनाच्या प्रयत्नांतून आणखीही काही समस्या निर्माण झाल्या. उदाहरणार्थ, भाडेवसुली आणि पोटभाडेकरू. सरकारने भाड्याच्या दरांमध्ये सवलत जाहीर करूनही अनेक कुटुंबांनी भाडे देण्याची असमर्थता व्यक्त केली. आपत्तीमुळे या कुटुंबांना महान संकटास तोंड द्यावे लागले. तेव्हा त्यांनी भाडे न दिल्यास त्यांस जागा सोडावयास लावणे अयोग्य आहे असे प्रतिपादिले जाऊ लागले. शिवाय ज्या कुटुंबांना पुनर्वसन योजनेमध्ये जागा मिळाली होती, त्यांपैकी काही कुटुंबांनी स्वतःची पूर्वीची जागा दुरुस्त करून ती वापरण्यास सुरुवात केली व सरकारकडून मिळालेल्या जागेत पोटभाडेकरू ठेवले. भाड्याची वसुली आणि पोटभाडेकरूंचा प्रश्न फारच गुंतागुंतीचे झाले आहेत. सरकारने हाती घेतलेल्या घरबांधणी योजनेमध्ये हे प्रश्न उद्भविण्याची शक्यता जास्त. विशेषतः गरीब कुटुंबांसाठी किंवा ज्या कुटुंबांना निर्वाहाचे निश्चित साधन नाही अशांसाठी घरे बांधली तर या प्रश्नास कसे तोंड द्यावयाचे याचा विचार होणे आवश्यक आहे.

## शहराची पुनर्रचना

शहराच्या पुनर्रचनेचा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा होता व त्यासाठी अनेक बाबींचा साकल्याने विचार होणे आवश्यक होते. शहराची संभाव्य वाढ लक्षात घेऊन योजना आखणे अगत्याचे होते. नदीतीरालगतचा भाग जवळजवळ उद्ध्वस्त झाला होता. त्यामुळे या भागाची योजनापूर्वक आखणी करण्याची संधी आली होती.

पुराचा त्रास वरचेवर होतो म्हणून पूरनियंत्रणाच्या दृष्टीने काही उपाययोजना करण्याची कल्पना पुढे आली. त्यासाठी नदीकाठाने दोन्ही बाजूंस प्रत्येकी १५० फूट रुंदीची जागा सोडण्याची योजना मांडण्यात आली. या जागेचा शहरविकासाच्या सर्वांगीण योजनेनुसार उपयोग करणे अगत्याचे होते. आपद्ग्रस्त विभागांची पुन्हा उभारणी करण्याची व्यवस्थित योजना आखून त्यामध्ये पुरापासून लोकवस्तीचे संरक्षण करण्यासाठी उपाय योजणे, घरांची रचना व बांधणी ठरविणे, मोकळी मैदाने, बाजार यांसाठी जागा ठरवून देणे वगैरे गोष्टी अंतर्भूत करून नदीकाठी जी ३०० फूट मोकळी जागा राखून ठेवण्यात येणार होती तिचा उपयोग रस्ते, वाहने उभी करावयाची जागा, खेळण्याची मैदाने, वगैरे गोष्टींसाठी करता आला असता. अशा प्रकारची योजना आखण्यासाठी पुरेसे अधिकार असलेले एक स्वतंत्र नगररचना व्यवस्थापन निर्माण करावे अशा सूचना सरकारला वेळोवेळी करण्यात आल्या. याऐवजी सरकारने अत्यंत मर्यादित अधिकाराचे व्यवस्थापन निर्माण केले. ज्यांची घरे पूररेषेमध्ये येत आहेत अशा घरमालकांना अन्यत्र जागा देणे एवढेच या व्यवस्थापनाचे कार्यक्षेत्र ठरविण्यात आले. परंतु जमिनींच्या किंमतीचा प्रश्न वादग्रस्त झाल्याने सरकारला आवश्यक त्या जागा ताब्यात घेता आल्या नाहीत.

मुठा-नदी-परिसर-विकास-कायदा १९६१ मध्ये जेव्हा संमत करण्यात आला, तेव्हा त्याचा प्रमुख उद्देश पुराचा धोका टाळण्याच्या दृष्टीने नदीकाठालगत कोणत्याही प्रकारच्या बांधकामास मनाई करावी असा होता. परंतु नदीकाठालगतच्या प्रदेशाचा विकास करण्याची निश्चित योजना कधीच तयार करण्यात आली नाही. त्यातच पुनर्वसनासाठी ज्या योजना आखलेल्या होत्या त्यांमध्ये सर्व कुटुंबाची सोय होत नाही हेही उघड झाले. परिणामी नदीकाठालगत काही एका विशिष्ट मुदतीपर्यंत तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम करण्यास आपद्ग्रस्त कुटुंबांना महानगरपालिकेला परवानगी द्यावी लागली. पूररेषेबाबतच्या सरकारी चालढकलीमुळे अनेकांनी परवानगीशिवायही घरे उभारली. परिणामतः या विभागाची पुनर्रचना होण्याऐवजी तेथे पूर्वीपेक्षाही गोंधळाची स्थिती निर्माण झालेली आहे.

पूररेषेमध्ये ज्यांची घरे गेली अशांचे पुनर्वसन करण्यास सरकार असमर्थ आहे असे दिसून येताच, पूररेषेचा कायदाच रद्द करावा म्हणून सरकारवर अधिकाधिक दडपण येत गेले. या वेळी मात्र पूररेषा रद्द करा, ही जनतेची मागणी मान्य करण्यास सरकारला जड गेले नाही. ( १९६१ साली पूररेषा अत्यंत आवश्यक आहे, केवळ लोकांच्या मागणीसाठी ती रद्द करण्यात येणार नाही असा सरकारचा दृष्टिकोन होता.) १९६५ मध्ये पूररेषेचा कायदा अखेर रद्द करण्यात आला. मुठा नदीच्या परिसराचा विकास करण्यास सरकारजवळ पुरेसे वित्तबळ नसल्यामुळे याबाबतची आपली जबाबदारी झटकून मोकळे कसे होता येईल याची संधीच जणू सरकार शोधीत होते. चार वर्षेपर्यंत चालढकल करून व आपद्ग्रस्तांना अनिश्चिततेच्या विवंचनेत दिवस काढावयास लावून सरकारने शेवटी हा प्रश्न तसाच अनिर्णित ठेवला.

शहरातील अनेक गलिच्छ वस्त्या नदीकाठाने वसलेल्या होत्या, त्या पाण्याच्या लोंढ्याबरोबर वाहून गेल्या. या वस्त्या पूररेषेच्या आत येत असल्याने त्यांची पुन्हा त्याच जागेवर उभारणी होण्यास पायबंद बसला. त्यांच्यासाठी इतरत्र अधिक चांगल्या प्रकारची व्यवस्था करून गलिच्छ वस्त्यांचा प्रश्न काही प्रमाणात सोडविण्याची शक्यता निर्माण झाली. परंतु गलिच्छ वस्त्यातील लोकांचे कोठे व कशा रीतीने पुनर्वसन करावे याचा संकलितपणे विचार झाला नाही. पूररेषेचा प्रश्न वादग्रस्त झाल्याने नदीकाठालगत हळूहळू तात्पुरत्या स्वरुपाची घरे व झोपड्या बांधण्यास प्रारंभ झाला.

चार वर्षाच्या अवधीत पूर्वीच्या जागा पुन्हा गलिच्छ वस्त्यांनी व्यापल्या आणि शहरातील मध्यवर्ती भागातील गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करण्याची संधी पूर्णतया हातची गेली.

पुनर्वसनाच्या बहुतेक योजना आखताना किंवा अंमलात आणताना जनतेच्या सहकार्याची फारशी अपेक्षा होती असे दिसून येत नाही. एक तर योजना आखणे आणि अंमलात आणणे या गोष्टी ज्यांच्या हातात होत्या, त्या अधिकाऱ्यांना जनता दोषी समजत असल्याने त्यांना जनतेचा विश्वास संपादन करणे अशक्य होते. दुसरे म्हणजे योजनांची आखणी व अंमलबजावणी ज्या पद्धतीने झाली त्यावरून असे दिसते, की हे काम सुयोग्य रीतीने करण्यापेक्षा जबाबदारी एकदाची आटपून जनतेच्या रोषापासून दूर कसे जाता येईल याच विवंचनेत वरिष्ठ अधिकारीवर्ग असावा. त्यामुळे जनतेला पुनर्वसनाच्या कार्यात सहभागी करून घेण्यास भाग पाडील असे प्रभावी नेतृत्व सरकारी यंत्रणेकडून प्राप्त झाले नाही. एवढेच नव्हे तर बिनसरकारी, सामाजिक नेतृत्वाची उणीवही आपत्तीनंतरच्या कठीण प्रसंगात तीव्रतेने भासली. त्यामुळे पुनर्वसनाच्या कार्यात जनता उदासीनच राहिली.

अशा गोंधळाच्या परिस्थितीमध्ये शहराची नवीन रीतीने शास्त्रशुद्ध पायावर पुन्हा उभारणी करण्याचा विचार होईल ही अपेक्षा करणे धाष्टर्याचे ठरेल. शहरातील कित्येक भागांचे विशेषत: नदीतीराचे पुनर्वसन तर झाले नाहीच, परंतु त्यास आपत्तीपूर्व स्थितीपेक्षा अधिक अवनत स्थिती प्राप्त झाली आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

सारांश, शहराच्या भावी विकासावर पुनर्वसनाच्या योजनांचा कोणता परिणाम होईल याचा विचार करून नवीन योजना आखण्यात अथवा पार पाडण्यात आल्या नाहीत. नदीकाठाचा परिसर आणि शहराचा पुष्कळसा मध्यवर्ती भाग यांची पुनर्रचना करण्याची संधी चालून आली होती ती वाया घालविण्यात आली. घरबांधणीसाठी जागा मुक्रर करताना आणि घरांची मांडणी ठरविताना उपलब्ध जमिनीचा अनुकूलतम उपयोग करण्याच्या दृष्टीने विचार करण्यात आला नाही. यामुळे शहरात आधीच दुर्मिळ असलेल्या जागेची उधळमाधळ झाली. नवीन वस्ती बहुतेक शहराच्या सीमेवर अथवा सीमेबाहेर करावी लागल्याने असंख्य लोकांना शहरात नेण्या-आणण्यासाठी वाहतुकीचा प्रश्न उपस्थित झाला. घाईघाईने आणि सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार न करता विविध योजना आखल्या गेल्या. त्यामुळे आपत्तीची परिणती अशी झाली, की शहरातील लोकवस्तीची दाटी, जागेची टंचाई, निकृष्ट घरे, गलिच्छ वस्त्या, जमिनीचा अनिर्बंध वापर, वगैरे प्रश्नांनी अधिकच उग्र स्वरूप धारण केले.

# पुण्यातील गृहनिर्मितीची समस्या

पानशेत आपत्तीमुळे पुणे शहरातील मुठा नदीच्या काठालगतचा फार मोठा भाग उद्‌ध्वस्त झाला. अनेक घरे नाश पावली आणि असंख्य कुटुंबे आपल्या घरादारांस मुकली. त्यामुळे शहरातील घरांच्या टंचाईचा प्रश्न अधिकच गंभीर झाला. या महान आपत्तीत शहरातील अत्यंत दाट लोकवस्तीचे, जुनीपुराणी घरे असलेले काही भाग नष्ट झाल्याने त्यांची पुनर्रचना करण्याची संधी मात्र अनायासे चालून आली होती. परंतु गृहहीन कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी घरबांधणीच्या ज्या योजना सरकारने अंमलात आणल्या, त्यांचा नगरविकासावर काय परिणाम होईल याचा विचार झाला नाही. परिणामतः नवीन घरबांधणीमुळे गृहहीन कुटुंबांच्या जागेचा प्रश्न जरी बऱ्याच अंशी सुटला असला, तरी इतर अनेक उपप्रश्न निर्माण झाले. शहराची वाढ अनिर्बंध आणि विस्कळीतपणे होऊ दिली म्हणजे असे प्रश्न निर्माण होणे अपरिहार्य ठरते. अशा काही प्रश्नांचा विचार प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

## पुणे शहराचा विकास

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पुण्याच्या परिसरात सुरक्षा व इतर पूरक उद्योग, लष्करी ठेकेदारी आणि तत्सम कामे यासारखे अनेक उद्योगधंदे सुरू झाल्याने पुण्याच्या विकासास एकदम गती मिळाली. १९४१ ते १९५१ या दहा वर्षाच्या कालात पुण्याच्या लोकसंख्येत ७० टक्के वाढ झाली. १९५५ पासून पुण्याच्या परिसरात औद्योगिक विकासाचे नवे पर्व सुरू झाले. पिंपरी येथे पेनिसिलीन निर्मितीचा सरकारी कारखाना निघाल्याने शहराच्या उत्तर दिशेस विकासास प्रारंभ झाला. वीज आणि पाणी यांची उपलब्धता आणि मुंबई-पुणे हमरस्ता व लोहमार्ग यांचे सान्निध्य यामुळे पिंपरी आणि चिंचवड यामधील प्रदेश कारखानदारीच्या विकासास अनुकूल बनला. हडपसरला पुणे महानगरपालिकेने औद्योगिक वसाहतीसाठी जागा उपलब्ध केल्याने १९५६ सालापासून शहराच्या आग्नेय भागात कारखाने उभे राहू लागले. अहमदनगर रस्ता आणि कोथरूड या विभागातही १९६० सालापासून कारखाने निघण्यास सुरुवात झाली. कारखानदारीच्या वाढीमुळे दुय्यम आणि पूरक उद्योगधंद्यांच्या विकासासही चालना मिळाली. १९६४ साली २०० किंवा अधिक कामगार असलेले ५७, २० ते २०० कामगार असलेले ४२५ व वीसापेक्षा कमी कामगार असलेले ६४४ उद्योगधंदे पुणे व त्याच्या परिसरात आढळून येत होते.[1]

---

१. *The Poona Labour Market* (*A Pilot Study*), The Directorate of Employment, Govt. of Maharashtra, Bombay, 1965, Ch.I, p.l (mimeographed).

औद्योगिक विकासाबरोबर शहरातील व्यापारी चलनवलनाचा पसाराही दिवसेदिवस वाढत गेला.[२] लोकसंख्या आणि उद्योगधंदे या दोहोंची वाढ झाल्याने विकसित जागेची टंचाई, दळणवळणाच्या साधनांचा अपुरेपणा, राहत्या जागेची टंचाई आणि पाण्यासारख्या अत्यावश्यक गोष्टींची चणचण प्रकर्षाने जाणवू लागली. जेथे नवनवीन कारखाने उभे राहात आहेत अशा शहरसीमेवरील भागात नळाचे पाणी, मलप्रवाह पद्धती व दळणवळणाची पुरेशी साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे या परिसरात नवीन निवासस्थाने वसविणे कठीण झाले आहे. खाजगी कारखान्यांनी कामगारांसाठी घराची सोय फारशी केलेली नाही.[३] त्यामुळे पुणे शहरातच घर शोधणे कामगारांना भाग पडते. पुण्याच्या परिसरातील कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांपैकी ७२ टक्के कामगार पुण्याचे रहिवासी आहेत,[४] हे पाहिले म्हणजे खुद्द शहरविभागावर वाढत्या उद्योगांमुळे केवढा ताण पडत आहे हे लक्षात येईल. दररोज सुमारे ६५०० कामगार पुण्याहून पिंपरी आणि चिंचवड येथील कारखान्यांत कामास जातात, तर दापोडी व खडकी विभागात कामास जाणाऱ्या कामगारांची संख्या २५,००० हून अधिक आहे.[५]

अशा रीतीने पुण्याच्या परिसरातील वाढत्या औद्योगिक विकासामुळे शहरातील गर्दीदाटी दिवसेदिवस वाढत आहे. १९४१ साली पुणे शहरामध्ये लोकसंख्येचे प्रमाण दर एकरी १४० माणसे इतके होते आणि बहुतेक पेठांमध्ये दर एकरी १५० हून कमी माणसे राहात होती. १९५१ साली हेच प्रमाण दर एकरी २०० माणसे असे आढळले आणि १९६१ मध्ये तर दर एकरी २५० माणसे इतकी लोकसंख्येची दाटी झाली. कसबा, रविवार, बुधवार, गणेश आणि गुरुवार या पेठांतून तर दाटी अतोनात वाढली व दर एकरी ४०० हून अधिक माणसे इतके लोकसंख्येचे प्रमाण झाले. पुणे महानगरपालिकेच्या अधिकारक्षेत्राखाली येणाऱ्या एकूण क्षेत्रफळापैकी शहराच्या मध्यवर्ती विभागाचे क्षेत्रफळ केवळ पाच टक्केच आहे, पण या पाच टक्के जागेत बृहत पुण्याच्या लोकसंख्येपैकी ७० टक्के लोक १९६१मध्ये राहात होते. याउलट उरलेल्या ९५ टक्के जागेत केवळ ३० टक्केच लोक राहात होते व या भागात लोकसंख्येचे प्रमाण दर एकरी केवळ ६ माणसे होते; यावरून बृहत पुण्याच्या एकूण क्षेत्रात लोकसंख्येची विभागणी किती विषम आहे हे दिसून येईल. शहराच्या मध्यवर्ती विभागातील लोकसंख्येचे प्रमाण कमी करून इतर विभागांत त्यांची सोय करणे आवश्यक आहे. परंतु या विभागांत वीज, पाणी, रस्ते वगैरे किमान सुविधा उपलब्ध करून दिल्याशिवाय राहणीची नवीन केंद्रे वसविली जाऊन मध्यवर्ती विभागावरील ताण कमी होणे कठीण आहे.

---

२. १९३७ साली पुण्यात ५००० दुकाने होती, तर १९६३ मध्ये त्यांची संख्या १३,३०० झाली. बुधवार, रविवार, शुक्रवार या मध्यभागातील पेठांमधील दुकानांची संख्या २३०० वरून ४४०० वर पोचली. छोटे उद्योगधंदे व व्यवसाय यांची संख्या १९३७ साली १८०० होती ती १९६३ मध्ये २६०० झाली.

३. १९६४ साली गोखले अर्थशास्त्र संस्थेने पुणे शहर व परिसर यांमधील कारखान्यांची पाहणी केली. त्यात आढळले की ७ कारखान्यांनी स्वतःच्या जागेत किंवा आसपास सुमारे १८० कुटुंबांची राहण्याची सोय केलेली आहे. याशिवाय कारखानदारांनी अधिकाऱ्यांसाठी बंगले बांधलेले आहेत, व काहींनी महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळाच्या औद्योगिक-कामगार-गृहयोजनेसाठी अंशतः भांडवल पुरविले आहे.

४. *The Poona Labour Market (A Pilot Study)*, *op. cit.*, Ch. IV, pp. 4, 5.

५. तत्रैव.

अत्यंत दाट राहणी आणि राहत्या जागेची टंचाई यामुळे गलिच्छ वस्त्यांचा विस्तार होणे क्रमप्राप्तच होते. १९४० सालानंतर नोकरीच्या आशेने ग्रामीण विभागाकडून शहराकडे मोठ्या प्रमाणात लोक आकर्षिले गेल्याने शहरांची लोकसंख्या भरमसाट वाढली. यातील बहुसंख्य स्थलांतरित बिनकसबी होते आणि बहुतेकांचे पोट हातावरच अवलंबून होते. एकदा शहरात आल्यावर स्वकष्टाने घर बांधणे कठीण, आणि भाड्याने घर घेणे हे अनेकांना गरीबीमुळे शक्यच नव्हते. त्यामुळे तुटपुंज्या उत्पन्नात पत्र्याचे किंवा तट्टयाचे खुराडे बांधणे एवढेच त्यांना शक्य होते. अशा झोपड्यांच्या रांगा लागल्या म्हणजे गलिच्छ वस्तीचा प्रादुर्भाव होण्यास उशीर काय ? शहरात गलिच्छ वस्त्यांचा प्रादुर्भाव होतो, याचा अर्थ गरीबांस परवडेल अशा किंमतीची घरे उपलब्ध करून देण्यास शहर असमर्थ आहे. नवनवीन गलिच्छ वस्त्या निर्माण होतात, कारण त्या स्वरुपातही त्यांची उपयुक्तता नाकारता येत नाही. आणि जुन्यांचे उच्चाटन होत नाही कारण त्यापेक्षा स्वस्त घरे उपलब्ध होऊ शकत नाहीत. शहराच्या अवास्तव व बेसुमार वाढीस आळा घातला तरच नवीन गलिच्छ वस्त्यांच्या निर्मितीस पायबंद बसेल. गलिच्छ वस्त्यांच्या निर्मूलनाची योजना नगरविकास आणि प्रादेशिक विकासाच्या व्यापक योजनेत अंतर्भूत केली तरच हे साधणे शक्य आहे.

## राहत्या जागेच्या टंचाईचे स्वरूप

शहराच्या अनिबंध विकसनामुळे जे काही प्रश्न निर्माण होतात त्यांमध्ये राहत्या जागेच्या टंचाईचा प्रश्न मूलभूत होय. राहती जागा आणि सभोवतालची परिस्थिती यांचा तेथील रहिवाशांच्या शारीरिक आणि मानसिक घडणीवर साहजिकच परिणाम होतो. घर मानवी राहणीस योग्य नसेल, काही प्राथमिक सुविधांचीही तरतूद घरात नसेल, घराभोवतालचा भाग गलिच्छ असेल तर निकृष्ट आरोग्य, बाल-गुन्हेगारी आणि इतर सामाजिक समस्या उग्रतर होतात ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे.

पुणे शहरात घरांची टंचाई गेल्या २० वर्षांत भासू लागली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात शहराची लोकसंख्या जेव्हा झपाट्याने वाढू लागली त्या वेळेपासून ही टंचाई अधिकाधिक जाणवू लागली, व सालोसाल राहत्या जागेच्या टंचाईचा प्रश्न उग्र होत गेला. नवीन घरबांधणीचा वेग लोकसंख्येच्या वाढीच्या वेगापेक्षा फार कमी पडला. घरबांधणीचा वेग मंदावण्याचे प्रमुख कारण म्हणजे बांधकामाच्या मालाची महायुद्धकालीन तीव्र टंचाई. युद्धसमाप्तीनंतरही या परिस्थितीत फार बदल झाला नाही. मालाच्या टंचाईप्रमाणेच भांडवलाच्या उपलब्धतेचा प्रश्नही बिकट झाला. विशेषत: देशात नियोजनास प्रारंभ झाल्यावर इतर अनेक क्षेत्रांत भांडवल गुंतविण्याची संधी चालून आली. या उलट घरबांधणीत पैसा गुंतवावयाचा झाल्यास घरांवरील वाढते कर, भाडे-नियंत्रण कायदा अशा अनेक अडचणींना तोंड देणे भाग पडते. त्यामुळे भाड्याने घरे देण्यासाठी गृहबांधणीत पैसे गुंतविणे विशेष फायद्याचे राहिले नाही. पुणे शहरात सरकारने आपल्या नोकरांसाठी बांधलेली घरे वगळून अलीकडे जी घरबांधणी झाली ती प्रामुख्याने ·उच्चमध्यम वर्गीयांसाठी झाली आणि त्यायोगे समाजातील एका अल्पसंख्य वर्गाच्या गरजा भागविल्या गेल्या. घराच्या टंचाईमुळे मिळेल त्या जागेत दाटीवाटीने व गैरसोय करून घेऊन राहण्याशिवाय मध्यमवर्गीयांस तरणोपाय उरला नाही; कारण त्यांना परवडतील अशा किमतीत नवीन घरे उपलब्धच होत नव्हती. त्यांचे उत्पन्न मुख्यत: पगारावर अवलंबून असल्याने वाढत्या राहणी खर्चाच्या बरोबरीने उत्पन्नवाढ होऊ शकली नाही आणि चढती भाडी देऊन नवी जागा घेणे कठीण बनले. त्यामुळे उपलब्ध खोल्यांची विभागणी करून अधिकाधिक कुटुंबांना तेवढ्याच जागेत सामावण्यात येऊ लागले व जुन्या घरांत नवीन तकलुपी बांधणीची भर पडू लागली.

या गर्दीदाटीमुळे नागरी सुविधांवरही अधिकाधिक ताण पडू लागला. जुन्या घरांचा वापर जास्त होत असल्याने आणि दुरुस्तीचा खर्च वाढल्यामुळे जुन्या घरांची स्थितीही खालावत चालली. कनिष्ठ उत्पन्न-वर्गातील कुटुंबांना तर अशा टंचाईच्या परिस्थितीत राहती जागा मिळविणे अशक्यप्राय होऊ लागले. त्यांना पत्र्याच्या किंवा मातीच्या खोपटात राहण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. त्यामुळे गलिच्छ वस्त्यांमध्ये भर पडत चालली.

पुण्यातील घरबांधणीस पायबंद बसण्यास दुसरीही गोष्ट कारणीभूत झाली आहे. शहराच्या सर्व दिशांना लष्करी ठाणी, लष्करी शिक्षण व संशोधन संस्था पसरलेल्या आहेत. घरबांधणीस अत्यंत सोयीच्या अशा अनेक जागा लष्कराने व्यापलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर पुण्याच्या आसपासची जागा अजूनही लष्करासाठी ताब्यात घेतली जात आहे व लष्करी ठाणी व इमारती यांच्यात प्रत्यही भरच पडत आहे. पुणे महानगरपालिका, पुणे व खडकी लष्कर विभाग यांच्या हद्दीतील सुमारे एकतृतीयांश जागा लष्कराने व्यापली आहे. नगरविकास आणि शहरवासियांच्या गरजा याकडे डोळेझाक करून लष्करासाठी जागा ताब्यात घेतली जात असल्याने नगरविकासास मोठीच खीळ बसली आहे.

गेल्या पंचवीस वर्षांत पुणे शहरात जागेची टंचाई कशी अधिकाधिक जाणवू लागली आहे हे पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होईल. गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे १९३७ आणि १९५४ मध्ये पुणे शहराची पाहणी करण्यात आली. या पाहणीमधून उपलब्ध झालेली माहिती आणि १९६१ सालच्या खानेसुमारीतून मिळालेली माहिती यांचा उपयोग करून परिस्थिती कशी बिकट होत गेली हे पाहता येईल. वरील सर्वेक्षणामध्ये वापरलेली न्यादर्श पद्धती भिन्न असली तरी परिस्थितीतील बदल समजण्यास ही माहिती उपयुक्त ठरेल.

१९३७ सालच्या पुण्याच्या पाहणीत उपलब्ध झालेल्या माहितीवरून त्या साली पुण्यात राहत्या खोल्यांची संख्या किती होती याचा अंदाज बांधता येतो. १९३७ मध्ये पुण्यात सुमारे ११,८०० घरे होती. पाहणीत समाविष्ट केलेल्या घरांमध्ये सरासरी ७ खोल्या होत्या. हेच प्रमाण सर्व घरांना लागू करता एकूण खोल्यांची संख्या ८२,६०० होते.

या संख्येत पुढील पंचवीस वर्षांत म्हणजे १९६१ अखेर किती वाढ झाली याचा अंदाज पुणे महा-नगरपालिकेकडील जिंदगी तपासणी-पुस्तकातील माहितीवरून बांधला आहे. या पुस्तकात शहरातील प्रत्येक घर आणि त्यातील खोल्यांची संख्या यांची नोंद असते. यावरून असे आढळले, की १९६१ साली पुणे शहरात १६,०५० घरे होती व त्यांमध्ये १,३९,५०० खोल्या होत्या. म्हणजे २५ वर्षांच्या काळात सुमारे ५६,९०० खोल्यांची भर पडली. या काळात लोकसंख्या १३४ टक्के वाढली तर खोल्यांची संख्या फक्त ६९ टक्के वाढली. या दोहोंच्या वाढीत किती तफावत पडली ही गोष्ट वरील आकड्यांवरून स्पष्ट होईल. १९३७ मध्ये एका खोलीमागे सरासरी २·२२ माणसे राहात होती, तर १९५४ मध्ये ते प्रमाण २·४९ झाले आणि १९६१ मध्ये तर ते २·९६ पर्यंत वाढले. एका खोलीत राहणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १९३७ साली ५६ टक्के होते तर १९६१ साली ते सुमारे ६० टक्के झाले. एका खोलीच्या जागेत १९३७ साली खोलीमागे सरासरी ३·२२ माणसे असे प्रमाण होते, तर १९६१ साली ते ४·४४ पर्यंत वाढले.

राहत्या जागेची उपलब्धता १९३७ सालच्या पातळीवर ठेवायची म्हटले तरी १९६१ साली पुणे शहर व लष्करविभाग मिळून २,६०,००० खोल्या उपलब्ध व्हावयास हव्या होत्या. प्रत्यक्षत:

मात्र सुमारे १,७०,००० खोल्या उपलब्ध झाल्या म्हणजे ९०,००० खोल्या कमी पडल्या. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणात राहती जागा उपलब्ध न झाल्यामुळे जुन्या घरातून दाटी वाढली. दर घरात राहणाऱ्या माणसांची सरासरी संख्या १९३७ साली १५ होती तर १९६१ मध्ये ती २४ झाली.

राहत्या जागेच्या टंचाईचा प्रश्न उग्र झाल्यामुळे पाण्याचे नळ, न्हाणीघरे, संडास यांचा अपुरेपणा अधिकाधिक जाणवू लागला. पाण्याचे नळ आणि संडास यांच्या उपलब्धतेविषयीची १९३७ व १९५४ सालातील तौलनिक माहिती पाहता असे दिसून येते, की या कालात ज्यांस नळाचे पाणी अजिबात उपलब्ध नव्हते अशा कुटुंबांचे प्रमाण कमी झाले आहे. संडासाच्या बाबतीत शहरविभागात सुधारणा दिसली तरी एकूण महानगरपालिका हद्दीत ज्या कुटुंबांना संडासांची सोय उपलब्ध नाही त्यांचे प्रमाण बरेच मोठे (१९ टक्के) असल्याचे दिसते. १९३७ ते १९५४ या काळात स्वतंत्र नळ उपलब्ध असणाऱ्या कुटुंबाच्या संख्येत बरीच वाढ झालेली आहे. अनेक नवीन घरांमध्ये दर गाळ्यासाठी सुविधांची स्वतंत्र सोय केल्यामुळे ही वाढ झालेली आढळते. ज्या कुटुंबांना सुविधांचा सामायिक वापर करावा लागतो, अशा कुटुंबाची स्थिती मात्र अधिकच बिकट झाल्याचे आढळते. त्यांना पूर्वीपेक्षा अधिक कुटुंबांबरोबर सुविधांचा सामायिक वापर करावा लागतो. याचे कारण म्हणजे घरामध्ये नवीन खोल्यांची जेव्हा भर पडते तेव्हा वरील सुविधांची भर पडतेच असे नाही. १९३७ मध्ये एका नळावर सरासरी दोन कुटुंबे अवलंबून होती, तर एक संडास सामायिक वापरणाऱ्या कुटुंबांची सरासरी संख्या तीन होती. १९५४ मध्ये हे प्रमाण नळ व संडास या दोन्हीबाबत पाचपर्यंत वाढलेले आढळले. म्हणजेच सरासरी पंचवीस माणसांना एक नळ किंवा संडास यांचा वापर करावा लागे. अशा परिस्थितीत कुटुंबाची किती गैरसोय होत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

पुण्यातील जागेचा प्रश्न दिवसेदिवस कसा उग्र होत चालला आहे हे आणखीही एका गोष्टीवरून दिसून येते. ज्या कुटुंबांना कायम स्वरूपाची राहती जागा मिळत नाही व त्यामुळे ज्यांना कामचलाऊ घरांत राहावे लागते, अशांच्या संख्येत उत्तरोत्तर वाढ होत चालली आहे. १९३७ साली खोपटांतून राहणाऱ्या लोकांची संख्या सुमारे ५००० होती. ती १९५१ मध्ये ३६,७०० झाली असे पुणे महानगरपालिकेने घेतलेल्या गणनेवरून दिसते. त्यामध्ये आणखी वाढ होऊन १९६५ मध्ये ६५,००० लोक खोपटांत राहात होते असा महानगरपालिकेने अंदाज केला आहे.

जशी नवीन घरे बांधण्याची आज निकड आहे, तशीच जुन्या मोडकळीस आलेल्या घरांची पुनर्बांधणी करण्याचीही नितांत आवश्यकता आहे. १९६० साली पुणे महानगरपालिकेने पुण्यातील घरांची न्यादर्श पाहणी केली. पाहणी केलेल्या घरांपैकी १६ टक्के घरांची आयुर्मर्यादा पाच वर्षाहूनही कमी आहे, आणि ६५ टक्के घरांची अपेक्षित आयुर्मर्यादा ५ ते २० वर्षेच आहे असे आढळले. बहुसंख्य घरांची आयुर्मर्यादा इतकी कमी आहे ही गोष्ट लक्षात घेतल्यावर राहत्या जागेच्या टंचाईची तीव्रता अधिकच जाणवते.

### भविष्यकालीन गरजांचे स्वरूप

राहत्या जागेच्या भविष्यकालीन गरजांचे स्वरूप जाणून घेण्यासाठी पुण्याच्या लोकसंख्येत किती वाढ होईल हे प्रथम पाहिले पाहिजे. १९८१ सालच्या पुण्याच्या लोकसंख्येच्या प्रक्षेपानुसार त्या साली पुण्याची लोकसंख्या अंदाजे १२,२०,६०० होईल.[६]

---

६. Dandekar, Mrs. K. and Phatak, M. V.; *Model for a Growth of a City*, Gokhale Institute of Politics and Economics, Poona, ( unpublished paper ).

कुटुंबांची संख्या काढण्यासाठी १९६१ च्या जनगणनेत आढळलेले कुटुंबप्रमुखांचे प्रमाण (२५ वर्षा-हून अधिक वयाच्या दर पुरुषामागे कुटुंबांची संख्या) वापरण्यात आले आहे. १९६१ साली कुटुंबांची संख्या १,४५,२२० होती व कुटुंबप्रमुखांचे प्रमाण ०.८७ होते. हे प्रमाण वापरले असता १९८१ साली पुण्यामध्ये सुमारे २,५३,८२० कुटुंबे असतील असे आढळते. म्हणजेच २० वर्षांत १,०८,६०० किंवा दरवर्षी ५,४३० इतकी भर कुटुंबांच्या संख्येत पडण्याचा संभव आहे व तितक्या कुटुंबांना राहती जागा पुरवावी लागणार आहे हे उघड आहे.

१९६१ ते १९८१ या वीस वर्षात एकूण किती जागेची गरज निर्माण होईल हे वर पाहिले. याबरोबरच विभिन्न उत्पन्न-वर्गातील कुटुंबांना परवडण्याजोगे निरनिराळ्या प्रकारचे गाळे किती प्रमाणात लागतील हे जाणून घेणेही आवश्यक आहे. यासाठी कुटुंबे किती भाडे देऊ शकतील हे पाहिले पाहिजे. परंतु याबाबत आवश्यक ती माहिती उपलब्ध नव्हती. कुटुंबास किती भाडे देणे परवडेल हे कुटुंबाच्या उत्पन्नावर अवलंबून असते. म्हणून कुटुंबाचा उत्पन्नाविषयीचा आधार घेण्याचे ठरविले. १९५४ साली गोखले अर्थशास्त्र संस्थेने पुणे शहराची पुन्हा पाहणी केली. त्यात समाविष्ट केलेल्या कुटुंबांच्या उत्पन्नासंबंधी माहिती उपलब्ध आहे. त्याहून अलीकडील माहिती उपलब्ध नसल्याने १९५४ सालातील माहितीचा उपयोग केला आहे.

पुण्यातील कुटुंबांच्या उत्पन्नाप्रमाणे केलेल्या वर्गीकरणाची १९५४ सालची माहिती सारणी क्र. ७.१ मध्ये दिली आहे. निरनिराळ्या उत्पन्न-वर्गातील कुटुंबांची सापेक्ष समर्थता कायम राहील व

सारणी क्रमांक ७.१ : पुण्यातील न्यादर्श कुटुंबांचे उत्पन्नानुसार विभाजन (१९५४)

| वार्षिक उत्पन्न (रु.) | कुटुंबाची प्रतिशतता | भाडे देण्याची कमाल क्षमता | |
|---|---|---|---|
| | | वार्षिक (रु.) | मासिक (रु.) |
| ०– २४९ | ४.७४ | २५.०० | २.०८ |
| २५०– ४९९ | ९.७२ | ७५.०० | ६.२५ |
| ५००– ७४९ | १३.५९ | १२५.०० | १०.४२ |
| ७५०– ९९९ | १७.४२ | १७५.०० | १४.५८ |
| १०००–१२४९ | १२.३६ | २२५.०० | १८.७५ |
| १२५०–१४९९ | ६.८१ | २७५.०० | २२.९२ |
| १५००–१७४९ | ७.०५ | ३२५.०० | २७.०८ |
| १७५०–१९९९ | ५.८० | ३७५.०० | ३१.२५ |
| २०००–२२४९ | ४.०३ | ४२५.०० | ३५.४२ |
| २२५०–२४९९ | ३.१६ | ४७५.०० | ३९.५८ |
| २५००–२७४९ | २.६६ | ५२५.०० | ४३.७५ |
| २७५०–२९९९ | १.२८ | ५७५.०० | ४७.९२ |
| ३०००–३९९९ | ४.८३ | ७००.०० | ५८.३३ |
| ४०००–४९९९ | २.६८ | ९००.०० | ७५.०० |
| ५०००–९९९९ | ३.०० | १५००.०० | १२५.०० |
| १०,००० आणि अधिक | ०.८७ | – | – |
| एकूण | १००.०० | – | – |

(गोखले अर्थशास्त्र संस्थेने १९५४ साली केलेल्या पुणे शहराच्या पुनर्पाहणीवर आधारित)

उत्पन्न व बांधणी-खर्च यांमधील वाढ १९५४ ते १९८१ या काळात साधारण समप्रमाणात होईल असे मानले, तर १९५४ मधील माहितीचा पुढील कालासाठी उपयोग करून घेता येईल.

१९५४ सालच्या बांधकामाच्या खर्चासंबंधीच्या उपलब्ध माहितीवरून असे आढळले, की कमीत-कमी जागेचे म्हणजे १०० चौ.फू.जागा आणि सुविधांचा सामायिक वापर अशा सोयी असलेल्या जागेचे, आर्थिक भाडे दरमहा १४ रुपये पडत होते. कुटुंबांच्या उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम ही कुटुंबाची भाडे देण्याची कमाल क्षमता[७] धरल्यास असे आढळते, की ज्यांचे वार्षिक उत्पन्न ७५० रुपयांहून कमी होते, अशा २८ टक्के कुटुंबांना नवीन बांधलेल्या एका खोलीच्या गाळ्याचे आर्थिक भाडे (रु. १४) देणे परवडण्याजोगे नव्हते. एकूण कुटुंबसंख्येच्या ३६ टक्के किंवा ज्यांचे वार्षिक उत्पन्न ७५० ते १५०० रुपये होते अशा कुटुंबांना एका खोलीचे किंवा एक खोली व स्वयंपाकघर इतकी जागा असलेले गाळे भाड्याने घेणे शक्य होते. ज्यांचे वार्षिक उत्पन्न १५०० रुपयांहून अधिक होते अशा कुटुंबांचा तिसरा गट होतो. या कुटुंबांची संख्या एकूण कुटुंबांच्या ३६ टक्के असून त्यांस दोन किंवा अधिक खोल्यांच्या गाळ्याचे आर्थिक भाडे देणे शक्य होते. संभाव्य मागणीचे स्वरूप याप्रमाणे असेल असे येथे गृहीत धरले आहे.

यानंतर पुरवठा किती होईल याचा अंदाज बांधणे आवश्यक आहे. सध्याची परिस्थिती कायम राहिली व गृहनिर्मितीसाठी विशेष कोणत्या प्रकारचे प्रयत्न झाले नाहीत तर १९८१ पर्यंत किती जागा उपलब्ध होईल याचा अंदाज बांधण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडे १९५६ ते १९६५ या कालात झालेल्या घरबांधणीची जी नोंद आहे तिचा उपयोग केला आहे.[८] १९५६ ते १९६५ या कालात दरवर्षी सरासरी ३०० घरे बांधली गेली, किंवा दरवर्षी सरासरी २००० खोल्या बांधण्यात आल्या. यामध्ये नवीन बांधलेल्या खोल्या आणि जुन्या घरांना जोड देऊन बांधलेल्या खोल्यांचा समावेश होतो. १९६२–६५ या कालात घरबांधणीचा वेग वाढल्याचे आढळते, आणि हाच वेग कायम राहिला तर दरवर्षी ३८०० खोल्या बांधून तयार होतील अशी अपेक्षा करता येईल. नवीन घर-बांधणीतील हे गाळे मुख्यतः दोन किंवा तीन खोल्यांचेच बांधले जात आहेत. त्यामुळे उच्च व मध्यम-वर्गीयांचीच गरज प्रामुख्याने भागविली जाणार. दरकुटुंबी दोन खोल्या असे प्रमाण धरल्यास सुमारे १९०० कुटंबांची सोय प्रतिवर्षी होईल. दरवर्षी एकूण ५४०० गाळ्यांची गरज आहे हे

---

७. पानशेत आपत्तीमध्ये बेघर झालेल्या कुटुंबांना नवीन जागेसाठी किती भाडे देण्याची त्यांची तयारी आहे असे विचारले होते. उत्पन्नाच्या जास्तीतजास्त २० टक्के भाडे देण्याची त्यांनी तयारी दर्शविली होती. ती येथे कमाल मर्यादा धरली आहे.

८. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये तात्पुरती किंवा कायम स्वरूपाची दुरुस्ती, फेरफार किंवा नवीन बांधणी करावयाची असल्यास महानगरपालिकेची परवानगी घ्यावी लागते. महानगर-पालिकेतील नोंदीमध्ये जमिनीचे व जोत्याचे क्षेत्रफळ, बांधणीचा तपशील, काम सुरू झाल्याची व संपल्याची तारीख वगैरे सर्व माहिती मिळते. यावरून चालू घरबांधणीचे आकारमान व दरवर्षी किती बांधकाम झाले हे काढता येते. वरील माहितीचा उपयोग करून गेल्या दहा वर्षातील नवीन बांधणी आणि जुन्याला दिलेली जोड यांचा अंदाज बांधला आहे. जुनी जागा पाडून केलेल्या बांधणीचा येथे समावेश केलेला नाही. तात्पुरत्या छपऱ्या राहण्यासाठी योग्य नसल्याने त्याही वगळल्या आहेत. खाजगी व सहकारीरीत्या झालेल्या सर्व बांधणीचा समावेश केलेला आहे.

लक्षात घेतले म्हणजे सुमारे ३५०० कुटुंबांना खाजगीरीत्या किंवा सहकारी पद्धतीवर होणाऱ्या घरबांधणीमार्फत राहती जागा मिळण्याची शक्यता नाही असे दिसते.

अशा प्रकारच्या उपकल्पित परिगणनेचा उपयोग मर्यादित असला तरी त्यावरून भविष्यकालीन परिस्थितीचे आकलन होण्यास मदत होईल. ज्याअर्थी इतक्या मोठ्या प्रमाणात राहत्या जागेचा तुटवडा पडण्याचा संभव आहे त्याअर्थी सरकारी प्रयत्नांची किती आवश्यकता आहे हे वरील आकड्यांवरून स्पष्ट होईल.

### घरबांधणीचे शासकीय प्रयत्न

१९५२ सालापर्यंत शासकीय घरबांधणीची व्याप्ती मुख्यतः सरकारी कर्मचाऱ्यांपुरतीच मर्यादित होती. १९५२ साली केंद्रीय बांधकाम, घरबांधणी व पुरवठा मंत्रालयाची स्थापना झाली आणि पंचवार्षिक योजनांनुसार घरबांधणीचे जे धोरण आखण्यात आले त्याची अंमलबजावणी या मंत्रालयाकडे सोपविण्यात आली. या मंत्रालयामार्फत औद्योगिक-कामगार-गृहयोजना (१९५२), कनिष्ठ-उत्पन्न-वर्ग-गृहयोजना (१९५२), गलिच्छ-वस्ती-निर्मूलन व सुधार-योजना (१९५६) आणि मध्यम-उत्पन्न-वर्ग-गृहयोजना (१९५९) अशा योजना तयार करण्यात आल्या.

इतर प्रमुख शहरांप्रमाणे पुण्यामध्ये शासनातर्फे जी थोडीफार घरबांधणी झालेली आहे ती निरनिराळ्या विभागातील कर्मचाऱ्यांसाठीच प्रामुख्याने झालेली आहे. मध्य रेल्वे, पोलीस खाते हिन्दुस्थान अॅन्टिबायोटिक्स, महाराष्ट्र राज्य परिवहन निगम, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा यांनी आपापल्या कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधली आहेत. गेल्या दहा वर्षात वरील कारखाने व विभागांनी सुमारे २५०० गाळ्यांची सोय केलेली असून त्यामध्ये भर घालण्याचा काहींचा विचार आहे.

महाराष्ट्र सरकारच्या गृहनिर्माण मंडळाने विविध वर्गीयांसाठी घरबांधणीच्या योजना आखलेल्या आहेत. औद्योगिक-कामगार-गृहयोजनेखाली ७३२ गाळे, गलिच्छ-वस्ती-निर्मूलन योजनेखाली १८०० गाळे, कनिष्ठ-उत्पन्न-वर्ग-गृहयोजनेखाली ९०१ व माध्यम-उत्पन्न-वर्ग-गृहयोजनेखाली २४ असे गाळे पुण्यात मंडळातर्फे बांधण्यात आलेले आहेत. म्हणजे गेल्या दहा वर्षात एकूण ३४५७ गाळे बांधलेले आहेत. परंतु त्यांपैकी सुमारे २००० गाळे पानशेत अनर्थात बेघर झालेल्या कुटुंबांसाठी बांधलेले होते. म्हणजे सुमारे १४५० गाळ्यांचीच निव्वळ भर पडली आहे असे म्हणता येईल.

या व्यतिरिक्त पुणे महानगरपालिकेने कनिष्ठ-उत्पन्न-वर्ग-गृहयोजना व आपल्या स्वतःच्या योजना याद्वारे १३५० कुटुंबाची सोय केलेली आहे.

शहरातील गरजांचा विचार केला तर आतापर्यंत झालेले शासकीय प्रयत्न किती अपुरे आहेत हे दिसून येईल. शिवाय शासनातर्फे बांधलेल्या बहुतेक गाळ्यांचे भाडे अगदी कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना परवडण्याजोगे नाही. शहरातील राहत्या जागेच्या टंचाईचे उग्र स्वरूप पाहता जास्तीत-जास्त कुटुंबांना किमान जागा उपलब्ध करून देता येईल असा घरबांधणीचा कार्यक्रम हाती घेणे अत्यावश्यक आहे.

अशा तऱ्हेचा कार्यक्रम हाती घेताना कोणत्या स्वरुपाच्या घरबांधणी योजना अंमलात आणणे श्रेयस्कर होईल याचा विचार केला पाहिजे. या संबंधात पानशेत आपत्तीमधील गृहहीन कुटुंबांच्या

पुनर्वसनासाठी आखलेल्या घरबांधणीच्या योजनांतील प्रत्यक्ष अनुभवाचा विचार करणे अप्रस्तुत होणार नाही.

## पानशेत आपत्तीनंतर कार्यवाहीत आणलेल्या घरबांधणी योजना

निरनिराळ्या सरकारी योजनांद्वारा बांधण्यात आलेल्या घरांपैकी काही घरे तात्पुरत्या स्वरुपाची तर काही कायम स्वरुपाची होती. म्हणून घरांचा दर्जा आणि उपलब्ध सोई विचारात घेऊन घरबांधणीस आलेल्या खर्चाची तुलना केली आहे. घरबांधणीचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी कोणत्या प्रकारची घरे बांधणे योग्य आहे याची काहीशी कल्पना येण्यास पुढील विवेचन उपयुक्त ठरेल.

सरकारमार्फत पुऱ्या केलेल्या निरनिराळ्या योजनांची तुलना करता असे आढळते, की प्रत्येक कुटुंबाला देण्यात आलेल्या जागेचे क्षेत्रफळ निस्सेन झोपडी आणि गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील गाळे यांमध्ये जवळजवळ सारखे आहे आणि ओटयावरील घरे व शेजघरे यांचे क्षेत्रफळ सारखे आहे. निरनिराळ्या घरांच्या बांधणी-खर्चात मात्र बरीच तफावत आढळून येते (सारणी क्र. ७.२). शेजघरांना ओटयावरील घरांपेक्षा खर्च कमी आला कारण शेजघरांमध्ये बांधणीसाठी कमी दर्जाचा माल वापरण्यात आला आणि त्यामध्ये संडास-न्हाणीघराची सोय सामायिक आहे. निस्सेन झोपडयांची बांधणी तात्पुरत्या स्वरुपाची आहे. याउलट गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील गाळयांची बांधणी पक्क्या स्वरुपाची असूनही निस्सेन झोपडयांचा बांधणी-खर्च गाळयांच्या खर्चाहून अधिक झाला हे लक्षात घेण्याजोगे आहे. गोल घरे व तट्टयांची घरे यांचे बांधकाम कच्च्या स्वरुपाचे असल्याने बांधणी-खर्च साहजिकच बराच कमी आहे.

सारणी क्र. ७.२ : नवीन बांधलेल्या घरांचे क्षेत्रफळ, उपलब्ध सोयी आणि खर्च

| जागेचे स्वरूप | एकूण बिऱ्हाडे | दरकुटुंबी | | सुविधा वापरणाऱ्या कुटुंबांची संख्या | | | दरकुटुंबी बांधकाम खर्च (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ओटयाचे क्षेत्रफळ (चौ.फू.) | राहती जागा (चौ.फू.) | नळ | न्हाणीघर | संडास | |
| शेजघरे | १९८८ | १७८ | १३८ | ८ | १ | ४ | १६७० |
| ओटयावरील घरे | १४२० | २४३ | १८१ | २ | १ | २ | २११० |
| निस्सेन झोपडया | १९८ | २७३ | २५२ | ५ | २ | २ | ४०२० |
| गोल घरे | ३८८ | १०८ | १०८ | – | – | – | २७० |
| तट्टयांची घरे | १३७२ | १४४ | १४४ | – | – | – | १७५ |
| गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील घरे | १८०० | २७३ | २०२ | १ | १ | १ | ३०५० |

घरांच्या दर्जामध्ये बरीच तफावत असल्याने निरनिराळ्या घरांची आयुर्मर्यादा किती आहे हे विचारात घेणे आवश्यक आहे. घरबांधणीमध्ये वापरलेल्या मालाचा दर्जा आणि कारागिरी यावरून प्रत्येक घराची आयुर्मर्यादा किती होईल याविषयी अंदाज बांधण्यात आला. सारणी क्र. ७.३ मध्ये प्रत्येक घराचा दरकुटुंबी खर्च दाखविण्यात आला आहे. घराचे नाशरक्षण मूल्य शून्य धरून

आणि व्याजाचा दर सहा टक्के मानून वार्षिक खर्च काढण्यात आला आहे. हा खर्च काढताना संधारण खर्च भांडवली खर्चाच्या दोन टक्के धरण्यात आला आहे.

सारणी क्र. ७.३ : नवीन गृहयोजना – आयुर्मान आणि खर्च

| जागेचे स्वरूप | आयुर्मान (वर्षे) | दरकुटुंबी वार्षिक खर्च (रु.) | संधारण खर्चासहित वार्षिक खर्च (रु.) |
|---|---|---|---|
| शेजघरे | २५ | १३३.८० | १६७.२० |
| ओटयावरील घरे | ३० | १५३.२५ | १९५.४० |
| निस्सेन झोपड्या | १५ | ४१४.८० | ४९५.३५ |
| गोल घरे | ५ | ६४.१० | ६९.५० |
| तट्टयांची घरे | १ | १८५.५० | १८९.०० |
| गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील घरे | ५० | २०२.६० | २६१.७५ |

राहत्या जागेच्या दर चौरस फुटास किती खर्च येतो हे पाहिले तर शेजघरे, ओटयावरील घरे आणि गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील गाळे यांच्या बाबतीत खर्च जवळजवळ सारखा म्हणजे अनुक्रमे १२ रुपये, ११ रुपये आणि १३ रुपये आढळतो. निस्सेन झोपडयांचा खर्च मात्र बराच जास्त म्हणजे १९.६ रुपये आढळला. भांडवली खर्च आणि वार्षिक खर्च या दोहोंचा विचार करता ज्यामध्ये किमान सुविधा ( म्हणजे कुटुंबी एक खोली आणि सामायिक संडास-मोरी ) उपलब्ध आहेत अशा शेजघरांचा खर्च सर्वात कमी आढळतो. गोल घरे व तट्टयांची घरे यासारख्या तात्पुरत्या स्वरुपाच्या घरांचा भांडवली खर्च अर्थातच फार कमी आहे. पण वार्षिक खर्चाचा विचार करता तट्टयांची घरे खर्चिक ठरतात. निकृष्ट दर्जाची बांधणी व त्यामुळे अत्यंत कमी आयुर्मर्यादा असल्याने अशी घरे केवळ आपत्कालात बांधणेच समर्थनीय ठरेल. आवश्यकतेनुसार आयुर्मर्यादा कमी अधिक करणे शक्य असल्यामुळे तात्कालिक उपाय म्हणूनही गोल घरांची योजना अधिक सरस ठरते. या घरांची आयुर्मर्यादा पाच वर्षे धरली तर वार्षिक खर्च फक्त ६९.५० रुपये येतो. अशा वसाहतीमध्ये कायम स्वरूपाच्या व सार्वजनिक संडास-मोऱ्यांची (आयुर्मर्यादा सुमारे २५ वर्षे) सोय केली तर दर कुटुंबामागे वार्षिक खर्च ९२ रुपये येईल. गोल घरांचे कायम स्वरुपाच्या घरात रूपांतर केल्यानंतरही या सोईचा उपयोग होईल. गोल घरे व संडास-मोरीची सामुदायिक सोय उपलब्ध करून दिल्यास दर कुटुंबामागे प्राथमिक भांडवली खर्च फक्त ५०० रुपये म्हणजे गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील घरांच्या एकषष्ठांश इतकाच खर्च येईल.

निरनिराळी घरे बांधताना जमिनीचा योग्य वापर केला गेला आहे की नाही, नवीन योजनांमध्ये दरएकरी किती इमारती बांधल्या व त्यामध्ये किती कुटुंबाची सोय झाली हे सारणी क्र. ७.४ मध्ये दिले आहे. निस्सेन झोपडयांसाठी शहराच्या मध्य भागास जवळ असलेल्या जमिनीचा एक मोठा तुकडा वापरण्यात आला. झोपडीच्या विशिष्ट आकारामुळे एकरी फक्त १८ कुटुंबांची व्यवस्था करणे शक्य झाली. याच जागेत दोन किंवा तीन मजल्यांच्या इमारतींची रचना केली असती, तर या

सोईस्कर जागी अधिक कुटुंबांची राहण्याची सोय करता आली असती व अनेक कुटुंबांवर शहरापासून दूरच्या भागात राहण्याची पाळी आली नसती. शेजघरे आणि ओटचावरील घरे बांधण्यापूर्वी जमिनीचा योग्य वापर करण्याचा प्रश्न विचारात न घेता जागेवर बसतील तशी त्यांची मांडणी केलेली आहे. शेजघरांच्या वसाहतीत दरएकरी ३८ कुटुंबांची व्यवस्था केलेली आहे. ओटचावरील घरांच्या बाबतीत दरएकरी कुटुंबे वीसच आहेत. परंतु मोकळी जागा घरांच्या मधे विखुरलेली असल्याने तिचा चांगला उपयोग होऊ शकत नाही. जमिनीच्या योग्य वापराच्या दृष्टीने गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील घरांची मांडणी अधिक योग्य आहे. गाळे एकाला एक लागून रांगेत बांधले असल्यामुळे जागेचीच नव्हे तर बांधकामाचीही बचत झालेली आहे आणि मोकळी जागा सलग सोडण्यात आल्याने तिचा क्रीडांगण म्हणून किंवा इतर उपयोगासाठी वापर करणे शक्य आहे. पानशेत आपत्तीनंतर अंमलात आलेल्या घरबांधणी कार्यक्रमाची प्रथम योजनाबद्ध आखणी केली असती तर बांधकामाचा खर्च कमी करणे व चांगल्या प्रकारची व कायम स्वरुपाची जागा अधिक कुटुंबांना देणे शक्य झाले असते. निरनिराळ्या योजना त्रुटित स्वरुपात अंमलात आल्यामुळे ही गोष्ट शक्य झाली नाही.

सारणी क्र. ७.४ : नवीन गृहयोजनांद्वारा उपलब्ध झालेली जागा आणि जमिनीचा वापर

| जागेचे स्वरूप | इमारतींची संख्या | एकूण जागा | बांधकामासाठी वापरलेली जमीन (एकर) | दरएकरी इमारतींची संख्या | दरएकरी कुटुंबांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| शेजघरे | १२५ | २००० | ५१ | २·४ | ३८ |
| ओटचावरील घरे | ७१० | १४२० | ७१ | १०·०० | २० |
| निस्सेन झोपडया | १०० | २०० | ११ | ९·०० | १८ |
| गोल घरे | ९७ | ३८८ | * | * | * |
| तट्टयांची घरे | ३४३ | १३७२ | ४२ | ८·०० | ३२ |
| गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील घरे | १८३ | १८०० | ८७·५ | २·१ | १७ |

(* माहिती उपलब्ध नाही.)

सारांश, भांडवली खर्च, आयुर्मर्यादा आणि जमिनीचा वापर या सर्वांचा विचार करता निस्सेन झोपडयांची योजना अतिशय खर्चिक व अवास्तव वाटते. शेजघरे आणि ओटचावरील घरे यांचा भांडवली खर्च कमी आहे पण त्यांची मांडणी मात्र अधिक चांगल्या तऱ्हेने करणे शक्य होते. गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील गाळ्यांना स्वतंत्र संडास-मोरीची जोड न देता, सामायिक सुविधांची तरतूद केली तर त्यांचा खर्च आणखी कमी होऊ शकेल. गोल घरांची योजना कमी खर्चाची असल्याने गलिच्छ-वस्ती-निर्मूलनासाठी ती घरे उपयुक्त ठरू शकतील. विशेषतः देशात भांडवल व इतर साधनसामग्रीची टंचाई भासत असताना गोल घरांसारख्या ज्या गृहयोजनांना भांडवलीखर्च कमी येतो अशा योजना विकसनाच्या प्रारंभीच्या कालात योग्य ठरतील.

## गृहनिर्मितीच्या मूलभूत गरजा

घरबांधणीच्या व्यापक कार्यक्रमाची मूलभूत गरज म्हणजे जमिनीची. परंतु जमिनीच्या उपलब्धतेचा प्रश्न पुण्यात अनेक कारणांमुळे अतिशय गुंतागुंतीचा झाला आहे. पानशेत आपत्तीमुळे तर ही परिस्थिती अधिकच बिकट झाली. आपत्तीनंतर जमिनीच्या किंमती भराभर चढू लागल्या व गेल्या पाच वर्षात त्यामध्ये ३०० ते ४०० टक्के वाढ झालेली आहे. या प्रचंड भाववाढीमुळे घरबांधणी कार्यक्रमासाठी जागा ताब्यात घेणे किंवा ज्यांची घरे पूररेषेत जात आहेत अशा घरमालकांना जागा देणे किंवा सहकारी संस्थांसाठी जागा उपलब्ध करून घेणे या गोष्टी सरकारला जवळजवळ अशक्यप्राय झाल्या आहेत. या भाववाढीस आळा घालण्यासाठी परिणामकारक उपाय योजले नाहीत तर ही वाढ अशीच चालू राहील. शहराची लोकसंख्या दिवसेदिवस वाढत आहे. घरांची टंचाई प्रखर होत आहे आणि राहत्या जागेस वाढती मागणी आहे. शिवाय चलनवाढीच्या काळात जमिनीसारखे विश्वासार्ह संपत्तिसाधन नाही, कारण ह्या काळात जमिनीचे अवमूल्यन होण्याची भीती नाही. यामुळे जमिनीच्या व्यवहारात सट्टेबाजी वाढू लागली आहे. बिनशेतीच्या मोकळ्या जमिनीवर महानगरपालिकेचा करही अत्यंत अल्प आहे. सट्टेबाजीस त्यामुळे रान मोकळे मिळते. सट्टेबाजीस आळा घालण्यासाठी जमिनीच्या मोकळ्या तुकड्यावर योग्य कर बसविले पाहिजेत. सुधारणाकराचा अवलंब ह्याही एक उत्तम मार्ग होय. व्यापक स्वरूपाची योजना कार्यवाहीत आणावयाची म्हणजे सुधारणाकराची आकारणी आणि जमीन ताब्यात घेण्यासाठी द्यावयाची भरपाई यामध्ये समतोल राखणे जरूर आहे. यासाठी कर-आकारणी आणि भरपाईची आकारणी योग्य पायावर व्हावयास हवी. ठरलेल्या जागी आणि ठरलेल्या क्षेत्रफळाची जागा जर उपलब्ध झाली तरच गलिच्छ व अवनत भागांचे पुनर्वसन व विकास, जोडनगरांची उभारणी, कनिष्ठ उत्पन्न-वर्गातील कुटुंबांसाठी घरबांधणी योजना वगैरे गोष्टी साधता येतील. जमिनीच्या वापराचा सर्वांगीण आराखडा तयार असला म्हणजे घरबांधणी व इतर उपयोगासाठी निरनिराळ्या जागा मुक्रर करता येतील. निरनिराळ्या उत्पन्न-वर्गातील कुटुंबांसाठी घरबांधणी योजना न आखता फक्त कनिष्ठ उत्पन्नवर्गातील कुटुंबांसाठीच त्या आखल्या तर इतर वर्गांकडून जमीन व इतर सामग्री मिळविण्यामध्ये स्पर्धा निर्माण होऊन कनिष्ठ वर्गासाठी असलेल्या योजनांच्या कामात अडथळा होण्याचा संभव आहे. यासाठी सर्वंकष योजनांची आवश्यकता आहे व जमिनीच्या वापरावर शासन संस्थेचे पूर्ण नियंत्रण हवे; अन्यथा नियोजनपूर्वक कार्य पार पाडणे शक्य होणार नाही.

घरबांधणीसाठी बांधकामाचा माल उपलब्ध करणे हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. माल उपलब्ध होण्यात नेहमीच अडचणी येत असतील तर बांधकाम वेळेवर होणे शक्यच नाही. भांडवल आणि साधनसामग्री यांच्या टंचाईमुळे एकूण घरबांधणीस मर्यादा पडत असल्याने श्रीमंत कुटुंबांनी मोठमोठे इमले उठविणे म्हणजे ज्यांस घरांची अत्यंत आवश्यकता आहे अशा गरीब कुटुंबांना घरे पुरविण्यास प्रतिबंध करणे होय. याचा अर्थ असा, की दुर्मिळ साधनसामग्रीचा वापर करताना अत्यंत आवश्यक अशा घरबांधणी योजनांस अग्रहक्क देणे, दुर्मिळ मालाच्या वापरात बचत व्हावी म्हणून विशिष्ट प्रकारचा माल वापरण्यास उत्तेजन देणे, खर्च कमी करण्यासाठी विशिष्ट नमुन्याची घरे बांधणे आणि जे दुर्मिळ मालाचा प्रमाणाबाहेर उपयोग करतात त्यांवर कर आकारणे असे उपाय योग्य ठरतील. दुर्मिळ मालाऐवजी पर्यायी माल शोधून काढणे, स्थानिक मालाचा अधिक उपयोग करणे आणि ज्यामध्ये दुर्मिळ व किंमती माल कमीतकमी वापरता येईल अशा तऱ्हेच्या घरांचे आराखडे तयार करणे या बाबतीत सखोल संशोधन होणे जरूर आहे.

नवीन वस्त्यांची रचना कशी आणि कोठे करावयाची या प्रश्नांचाही काळजीपूर्वक विचार व्हाव-यास हवा. पुणे शहरातील जुन्या भागांची रचना बहुतेक कोणत्याही नियमांना किंवा योजनेस अनु-सरून झालेली नाही. बहुतेक उपलब्ध जागेचा बांधकामासाठी वापर केलेला आहे. घरे एकमेकांना खेटून बांधण्यात आलेली आहेत. अशी गजबजलेली बांधणी झाली असल्याने घरांमध्ये मोकळी हवा आणि प्रकाश येण्यास प्रतिबंध होतो. आणि घरातील वातावरण आरोग्यास हानीकारक ठरते. मोकळ्या जागा, क्रीडांगणे आणि इतर सुविधा यांची तरतूद करता येत नाही. १९३० नंतर ज्या नगररचना योजना अंमलात आल्या त्यांमध्ये मुख्यत: आरोग्य रक्षणाकडे लक्ष पुरविण्यात आले होते. त्यामुळे या नवीन भागात जुन्या शहराच्या नेमकी उलट परिस्थिती निर्माण झाली; म्हणजे घरबांधणी फार विखुरली गेली. नवीन नियमांप्रमाणे एकूण जागेपैकी फक्त एकतृतीयांश जागेवरच बांधकामास परवानगी देण्यात आली आणि तल-अवकाश निर्देशांक एक ठरविण्यात आला. घरासमोर व पाठीमागे अनुक्रमे १५ व २० फूट आणि दोन्ही बाजूला दहादहा फूट जागा मोकळी सोडण्याचे बंधन घालण्यात आले. त्यामुळे शहर सीमेवरील भागात विखुरलेली घरबांधणी झाली व जागेची अक्षम्य उधळपट्टी झाली. सार्वजनिक सुविधांसाठी मात्र जागेची तरतूद पुरेशा प्रमाणात करण्यात आली नाही. त्यामुळे नवीन वस्ती झालेल्या विभागात पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत.

घराच्या दोन्ही बाजूस दहादहा फूट मोकळी जागा सोडल्याने प्रत्येक घराच्या रस्ताभिमुख बाजूत फार वाढ होते. यामुळे रस्ता आणि पादचारी मार्ग यांची लांबी वाढते. तसेच पाण्याचे नळ, मलवाहिनी वीज व दूरध्वनीच्या तारा यांच्या लांबीतही वाढ होते. म्हणजेच या सर्व सोयी करण्यासाठी अधिक जागा लागते, जास्त खर्च येतो आणि त्या दुरुस्त राखण्याच्या खर्चातही वाढ होते. हे टाळण्यासाठी निरनिराळ्या जमिनीच्या तुकड्यात स्वतंत्र घरे न बांधता त्याऐवजी घरांची रचना गटागटाने करावयास पाहिजे. त्यायोगे जागा तर कमी लागेलच पण घरांच्या बांधणी-खर्चातही बचत होईल. कारण बाहेरील भिंतीचे क्षेत्रफळ कमी होईल आणि भिंतींच्या संख्येतही घट होईल. अशा घरांच्या संकल्पचित्रांमध्ये भिंतीच्या लांबीत कशी बचत होते हे सारणी क्र. ७.५ वरून कळून येईल.[९]

सारणी क्र. ७.५ : इमारतीतील गाळ्यांच्या संख्येनुरूप गाळ्यागणिक भिंतीची लांबी

| इमारतीतील गाळ्यांची संख्या | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गाळ्यागणिक भिंतीची लांबी[१०] (फूट) | ६०.० | ५०.० | ४५.६ | ४५.० | ४४.० | ४३.३ | ४३.० | ४२.५ | ४२.२ | ४२.० |

ओळीने चार किंवा पाच गाळे बांधल्यास भिंतीच्या लांबीमध्ये बरीच बचत होते असे वरील सारणी-वरून दिसून येते. पाच गाळे असलेल्या इमारतीमध्ये भिंतीच्या लांबीमध्ये २५ टक्के बचत होईल,

९ *Report of the Committee of Experts for Building Works,* Ministry of Works, Production and Supply, Govt. of India, New Delhi, 1960, p.19.

१० एक खोली व पडवी असा एकच गाळा बांधला, तर भिंतीची एकूण लांबी ६० फूट होईल. एक ते दहा असे गाळे असलेल्या इमारती बांधल्या तर भिंतीच्या लांबीत कशी बचत होते हे सारणीमध्ये दाखविले आहे.

आणि बांधकामाच्या एकूण खर्चात सुमारे १० टक्के बचत होईल. भिंतीचे बाह्यदर्शनी क्षेत्रफळ कमी झाल्याने वातावरणाशी ज्या भागाचा संयोग व्हावयाचा तो भाग कमी होऊन हवेतील फेरफारांचा उपसर्ग कमी पोहोचेल. नाहीतर छोटी, सुटीसुटी बांधलेली घरे उन्हात भट्टीसारखी तापतात आणि उन्हाळ्यात त्यात राहणे असह्य होते. प्रत्यक्ष घरांच्या बांधकामातील निरनिराळ्या बाबींमध्ये उदाहरणार्थ, जोत्याची रचना, खोलीची उंची इत्यादीमध्ये योग्य ते बदल केल्यास बांधकामाच्या खर्चात बचत होऊ शकेल. जोत्याची उंची जमिनीवर एक फुटापेक्षा जास्त नसली तरी चालण्यासारखे आहे.[११] अशा रीतीने बांधकामाचा खर्च कमीतकमी व्हावा म्हणून बांधकामाचे नियम आणि उपनियम व प्रमाप यांमध्ये योग्य ते बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

नवीन घरबांधणी योजना आखताना घरांच्या निरनिराळ्या समूहांची मिळून एकजिनसी वसाहत निर्माण व्हावी अशी दक्षता घेणे आवश्यक आहे. नवीन वसाहती एकसंध राहतील अशा योजना आखल्या म्हणजे बाजार, शाळा, दवाखाने, क्रीडांगणे अशांसारख्या सार्वजनिक सुविधा उपलब्ध करणे सोपे जाईल. तसेच पोलीस संरक्षण, टपाल व्यवस्था आणि सार्वजनिक परिवहन यांसाठीही खर्च कमी येईल आणि या सुविधा पुरविणे सुलभ होईल. एकसंध रचना शेजारधर्म व नागरी एकात्मता ह्यांच्या वाढीस पोषक ठरेल. सध्या रेल्वे, पोलिस यांसारख्या सरकारी यंत्रणा, तसेच निमसरकारी संस्था, कारखाने, संरक्षण दले वगैरे आपापल्या कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधत आहेत. जेथे जागा उपलब्ध होईल तेथे ती ताब्यात घेऊन तिचा स्वतंत्रपणे उपयोग केला जात आहे. त्यामुळे वसाहती आणि औद्योगिक विभाग यांचे मिश्रण झाले आहे. अशा स्वतंत्र गृहसमूहांना नागरी सुविधा उपलब्ध करून देणेही कठीण होते. जमिनीच्या वापराची एक सर्वांगीण योजना तयार केली आणि त्यानुसार निरनिराळ्या यंत्रणांना जागा नेमून दिली तर जागेचा अयोग्य वापर होणार नाही व नागरी सुविधांनी सुसज्ज आणि परस्परांशी संलग्न असलेल्या वसाहती निर्माण करणे शक्य होईल.

नवीन घरबांधणीप्रमाणेच उपलब्ध घरे तंदुरुस्तीमध्ये राखणेही महत्त्वाचे आहे. भाडे-नियंत्रण कायद्यान्वये महायुद्धापूर्वीच्या किंमतीशी भाड्याची सांगड घातली गेली, पण दुरुस्तीचा खर्च सतत वाढत राहिल्याने जुन्या भाड्याच्या रकमेत घरे सुस्थितीत ठेवणे घरमालकांना अशक्य झाले. जुन्या घरांच्या घरमालकांना काही प्रमाणात भाडेवाढ करण्याची मुभा दिली तर जुनी आणि अलीकडे बांधलेली घरे यांच्या भाड्यामधील तफावत कमी होईल आणि जुनी घरे सुस्थितीत राखण्यास मदत होईल. या संबंधात १९५६ सालच्या इंग्लिश भाडे-नियंत्रण कायद्याचे[१२] उदाहरण उद्बोधक ठरेल. भाडे-नियंत्रण क्रमाक्रमाने रद्द करण्याची तरतूद या कायद्यात आहे. या कायद्यान्वये घरांचे वर्गीकरण करण्यात आले असून निरनिराळ्या वर्गातील घरांना क्रमाक्रमाने नियंत्रणातून मुक्त करण्यात येते. विशिष्ट कालावधीत ज्या घरांना नियंत्रण लागू असेल त्यांच्या घरमालकांना चालू बाजारभावानुसार ठराविक मर्यादेपर्यंत भाडेवाढ करण्यास मुभा दिलेली आहे. याप्रमाणे खाजगी घरांच्या भाड्यात वाढ झाल्यामुळे नगरपालिकेस करापासून मिळणारे उत्पन्न वाढेल आणि त्याचा विनियोग विकासकार्याकडे करता येईल. सरकारच्या ताब्यातील इमारतींच्या भाड्यात अशा प्रकारे वाढ झाली तर या उत्पन्नातून योग्य दुरुस्ती आणि नवी बांधणी करण्यास मदत होईल.

---

११. तत्रैव, पान २४.

१२. Ashworth, H.; *Housing In Great Britain*, Thomas Skinners & Co, (Publishers) Ltd., London, 1957, p.58.

घरबांधणी कार्यक्रमातील सर्वात महत्त्वाचा पण जटिल असा प्रश्न म्हणजे गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन आणि तेथील रहिवाशांचे पुनर्वसन हा होय.

गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करण्यासाठी टप्प्याटप्प्याचा कार्यक्रम आखणे आवश्यक आहे. या कार्यक्रमातील पहिला टप्पा म्हणजे गलिच्छता कमी करण्यासाठी पाण्याचे नळ, काही ठिकाणी फरशी, मलवाहिनी वगैरे किमान सुविधांची सोय करून वस्त्यांची सुधारणा करावयास प्रारंभ करणे. गलिच्छ वस्त्यांच्या सुधारणेचे काम हाती घेताना अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात. विशेषत: गलिच्छ वस्त्यांच्या जमीनमालकांशी योग्य असा करार करणे मोठे जिकीरीचे ठरते. परंतु ते आवश्यक आहे. कारण जमिनी विकत घ्यावयाच्या म्हटल्या तर ते अत्यंत खर्चाचे होईल.

नवीन जागा निवडून तेथे पर्यायी घरांची सोय करणे हा दुसरा टप्पा होय. प्रारंभी घरे तात्पुरत्या स्वरुपाची असावीत. त्यायोगे घरांची भाडी कमी ठेवणे शक्य होईल. पाणी, संडास वगैरे सुविधांची तरतूद मात्र कायम स्वरुपाची करणे योग्य होईल. तात्पुरत्या गाळ्यांच्या जागी कायम स्वरुपाच्या गाळ्यांची तरतूद केल्यावर त्या सोयी उपयोगी पडतील. नवीन घरबांधणीसाठी पर्यायी जागा निवडताना ती वस्तीतील रहिवाशांच्या कामधंद्याच्या दृष्टीने सोयीची आहे की नाही हे पाहणे जरूर आहे. नाहीतर स्थलांतर करण्यासाठी रहिवाशांचे मन वळविणे जड जाईल. जागेची निवड करताना शहरातील एकूण जमिनीच्या वापराची योजना आणि सुविधा पुरविण्याचे सौकर्य विचारात घेणे आवश्यक आहे.

गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील तिसरा टप्पा म्हणजे कायम स्वरुपाची घरे बांधणे. प्रथम किमान जागेची तरतूद करून नंतर आवश्यकतेनुसार गाळ्याचे क्षेत्रफळ वाढविता येईल अशी सोय मूळ योजनेत असावी.

पर्यायी सोय न करता गलिच्छ वस्ती हलविण्याचे प्रयत्न अनेक वेळा होतात. यामुळे दुसऱ्या जागी झोपडपट्टी उभारण्याशिवाय त्या रहिवाशांस गत्यंतर उरत नाही. अशा रीतीने गलिच्छ वस्ती निर्मूलनाचा प्रश्न कधीच सुटणार नाही. पर्यायी जागा त्यांस सोईची नसेल किंवा तेथील भाडे जास्त असेल तर रहिवासी दुसरीकडे जाण्यास तयार होणार नाहीत. मूळ जागा सोडून नवीन वसाहतीत जाण्यास आणि थोडेफार अधिक भाडे देण्यास रहिवाशांना तयार करणे यासाठी जबाबदार नेतृत्वाची गरज आहे. वस्तीमध्ये स्वच्छता व आरोग्य यांचा दर्जा चांगला ठेवण्यासाठी रहिवाशांस शिक्षण देणे आवश्यक आहे. पाणी आणि इतर सुविधा जरी उपलब्ध असल्या तरी स्वच्छता राखली जाण्यास त्यांचा योग्य रीतीने वापर व्हावयास हवा. म्हणजेच गलिच्छ-वस्ती-निर्मूलनाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केवळ घरांचा दर्जा सुधारून भागणार नाही, तर आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या हा प्रश्न हाताळणे अत्यावश्यक आहे.

### घरबांधणीचा खर्च

पुण्यातील राहत्या जागेच्या टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी किमान घरबांधणी करावयाची तरी त्यासाठी किती मोठ्या रकमेची जरुरी पडेल याची कल्पना येण्याच्या दृष्टीने घरबांधणीच्या खर्चाचा स्थूल अंदाज पुढे बांधला आहे. पानशेत अनर्थानंतर अंमलात आलेल्या योजनांच्या खर्चाच्या आकड्यांवर पुढील अंदाज आधारले आहेत. येत्या २० वर्षांतील पुण्यातील लोकसंख्येची संभाव्य वाढ लक्षात घेता प्रतिवर्षी सुमारे ५४०० गाळे उपलब्ध करावे लागतील आणि खाजगी व सहकारीरीत्या सुमारे

१९०० कुटुंबांची सोय होईल याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. उरलेल्या कुटुंबांपैकी अंदाजे २००० कुटुंबांना एका खोलीचा गाळा, आर्थिक भाडे आकारल्यास परवडू शकेल. पण राहत्या जागेच्या टंचाईमुळे चालू भाड्याचे दर आर्थिक भाड्यापेक्षा जास्त आहेत. म्हणजेच सरकारने किंवा विनानफा घरबांधणी करणाऱ्या एखाद्या संस्थेने घरबांधणी कार्यक्रम हाती घेतला तर या कुटुंबांना आवश्यक ती जागा मिळू शकेल. उरलेल्या १५०० कुटुंबांची तर आर्थिक भाडे देण्याचीही कुवत असणार नाही. शेजघरांच्या स्वरुपाचे गाळे या कुटुंबांना दिले म्हणजे त्यांस द्याव्या लागणाऱ्या आर्थिक साहाय्याचे प्रमाण कमीतकमी ठेवता येईल.

पानशेत अनर्थानंतर अंमलात आणलेल्या शेजघरे आणि गलिच्छ-वस्ती-निर्मूलन-योजनेतील गाळ्यांना दरकुटुंबी अनुक्रमे १६७० रुपये व ३०५० रुपये खर्च आला. या प्रकारांचे गाळे अनुक्रमे २००० व १५०० कुटुंबांसाठी बांधावयाचे म्हणजे एकूण खर्च २५,००,००० व ६१,००,००० रुपये येईल. शिवाय गलिच्छ वस्तीतील रहिवाशांसाठी तात्पुरत्या स्वरुपाची घरे बांधण्याची तरतूद करावयास पाहिजे. या वस्तीतील ६५,००० रहिवाशांची दहा वर्षात सोय करावयाची म्हणजे दरवर्षी ६५०० लोक अथवा १३०० कुटुंबे यांच्यासाठी, गोल घरे व कायम स्वरुपाच्या सुविधा अशा प्रकारची सोय करावयाची म्हणजे दरकुटुंबी ५०० रुपये किंवा एकूण ६,५०,००० रुपये खर्च येईल.

दरम्यानच्या कालात गलिच्छ वस्त्या सुधारणेचेही काम हाती घ्यावयास पाहिजे. पुण्यातील बहुतेक गलिच्छ वस्त्या शहराच्या पूर्ण विकसित भागामध्येच असल्याने या वस्त्यापर्यंत सुविधा पोहोचल्या आहेत, परंतु या वस्त्यांमध्ये पाण्याचे नळ आणि मलवाहिनी पोहोचविणे आवश्यक आहे. पाच कुटुंबांमध्ये एक संडास व दहा कुटुंबांना एक नळ अशी तरतूद करण्यास दरडोई अंदाजे ५० रुपये खर्च येईल. यापैकी निम्मा खर्च पाण्याचे नळ व मलवाहिनी वस्तीमध्ये नेण्यास व निम्मा खर्च संडास आणि नळ यांची तरतूद करण्यास लागेल. दरवर्षी एकदशांश रहिवाशांसाठी किंवा १३०० कुटुंबांसाठी अशी सुधारणा करावयाची म्हटल्यास ३,२५,००० रुपये खर्च येईल.

दरवर्षी ३५०० कुटुंबांना नवीन जागा उपलब्ध करून द्यावयाची व सध्या गलिच्छ वस्तीत राहात असलेल्या कुटुंबांचे पुढील १० वर्षात पुनर्वसन करावयाचे म्हणजे प्रतिवर्षी सुमारे ९६ लाख रुपये खर्च येईल. हा अंदाज १९६१ सालच्या किंमतीवर आधारलेला आहे. गेल्या पाच वर्षात घरबांधणीच्या खर्चात बरीच वाढ झालेली आहे व अजूनही होत आहे. किंमती ज्या प्रमाणात चढतील त्या प्रमाणात एकूण खर्चात वाढ होईल.

वरील खर्चात जमिनीची किंमत धरलेली नाही. दरएकरी २५ कुटुंबे किंवा १२५ माणसे असे राहणीचे मान धरले तर पुढील दहा वर्षात नवीन घरबांधणीसाठी सुमारे २०० एकर जागा लागेल. शहरसीमेवरील भागात विकसित जमिनीची किंमत दर चौरस फुटास एक रुपया अथवा दरएकरी ४५००० रुपये धरल्यास जमिनीची एकूण किंमत ९० लाख रुपये होईल. याशिवाय गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी खाजगी मालकांबरोबर जमिनीबाबत करार करावे लागतील. जमिनीच्या किंमतीत होणाऱ्या वाढीस जर आळा घातला नाही तर आवश्यक ती जमीन मिळविणे अधिकाधिक दुरापास्त होईल.

पुण्यातील रहिवाशांसाठी राहत्या जागेची किमान तरतूद करण्यासाठी किती व्यापक कार्यक्रमाची निकड आहे आणि त्यासाठी भांडवल व जमीन यांची केवढ्या मोठ्या प्रमाणात तरतूद करावी लागेल

हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. जमिनीच्या वापरासंबंधी कणखर धोरण स्वीकारणे, नगर-विकासाची सर्वांगीण योजना आखणे व ती पार पाडणे यासाठी सरकार, महानगरपालिका, लष्कर, खाजगी कारखानदार व जमीनमालक यांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. सरकारने पुढाकार घेऊन व्यापक घरबांधणी कार्यक्रम आखला आणि घरबांधणी योजना कमी खर्चाच्या व वास्तववादी असल्या तरच राहत्या जागेच्या टंचाईचा प्रश्न काहीसा सुटू शकेल. समन्वयपूर्वक नियोजन झाले तर नाहक खर्चास आळा बसेल. शहराची अनिर्बंध व नियोजनरहित वाढ चालू राहिली तर मात्र परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची होऊन त्यातून मार्ग काढणे अशक्य होईल.

# परिशिष्ट अ

## आपद्ग्रस्त कुटुंबांच्या नोंदीसंबंधीचे टिपण

मदतीचे वाटप योग्य तऱ्हेने आणि पद्धतशीरपणे होण्यासाठी सर्व आपद्ग्रस्त कुटुंबांची नोंद होणे आवश्यक होते. मदत-वाटपाच्या प्रारंभी मात्र अशी नोंद तयार करण्यासाठी काहीच प्रयत्न करण्यात आले नाहीत. धान्य-वाटप करताना कुटुंबांची अगदी वरवर चौकशी करण्यात आली. काही विभागीय समित्यांनी ही चौकशी व्यवस्थित केली तर काहींनी फारशी चौकशी केलीच नाही. आपद्ग्रस्त कुटुंबांची यादी करण्याचा थोडाफार प्रयत्न रोख मदतीचे वाटप करताना केला गेला. पण हे काम अननुभवी स्वयंसेवकांच्या हातात दिलेले होते, त्यावर योग्य देखरेख नव्हती, किंवा योग्य मार्गदर्शन झाले नाही. त्यामुळे रोख मदत देण्यापूर्वी आपद्ग्रस्त कुटुंबांची व्यवस्थित यादी तयार झाली नाही. अशा परिस्थितीमुळे मदत केवळ आपद्ग्रस्त कुटुंबांनाच मिळत आहे अशी खबरदारी घेणे शक्य झाले नाही. रोख मदत देण्यापूर्वी नाही तरी निदान या मदतीचे वाटप सुरू असताना एकीकडे ओळख-पत्रे तयार करण्याचे काम चालू करावे असा सरकारला आग्रह करण्यात आला आणि हे कार्य करण्यास मदत उपलब्ध होऊ शकेल असेही सुचविण्यात आले. पण त्यावेळी सरकारी अधिकाऱ्यांनी या प्रश्नाकडे फारसे लक्ष दिले नाही. शेवटी ऑगस्ट १९६१ च्या अखेरीस महाराष्ट्र सरकारच्या अर्थ आणि सांख्यिकी केंद्राकडे सरकारने हे कार्य सोपविले. आपद्ग्रस्त कुटुंबांची माहिती व त्यांस मिळा-लेली मदत यांची रीतसर नोंद करण्यामागे उद्देश असा होता, की मदतीचे वाटप सुलभ व्हावे आणि फक्त आपद्ग्रस्त कुटुंबांनाच मदत पोहोचावी. परंतु मदत-वाटप बरेचसे होऊन गेल्यानंतर ही नोंद झाल्यामुळे हा उद्देश फारसा सफल झाला नाही.

आपद्ग्रस्त कुटुंबांच्या नोंदणीच्या कामासाठी राज्यातील सुमारे ५२ अव्वल कारकून नेमण्यात आले. नोंदींच्या कामासंबंधीचे प्राथमिक शिक्षण त्यांस देण्यात आले. देखरेखीच्या कामावर तीन मामलतदारांची नेमणूक करण्यात आली. नोंदणीच्या एकूण कामाची जबाबदारी महाराष्ट्र सरकार-च्या अर्थ व सांख्यिकी केंद्रावर होती. विभागीय समित्यांच्या कार्यालयांत आपद्ग्रस्त कुटुंबांनी आपला आपत्तीपूर्वीचा आणि नंतरचा पत्ता नोंदवावा अशी त्यांस सूचना देण्यात आली. आपद्ग्रस्त कुटुंबांनी दिलेली माहिती प्रत्येक कुटुंबाच्या नावे चिठ्ठी करून त्यावर घालण्यात आली. कुटुंबांनी नोंदविलेल्या आपत्तीनंतरच्या पत्त्यांवर जाऊन अव्वल कारकुनांनी त्यांची भेट घेतली व कुटुंबातील माणसांची संख्या, त्यांची वये, मिळालेली मदत, वगैरे माहिती ठराविक नमुन्याच्या कुटुंबपत्रकांमध्ये भरली.

कुटुंबांची नोंद करण्याचे काम ऑगस्ट १९६१ च्या शेवटच्या आठवड्यात सुरू झाले. २७ ते ३१ ऑगस्टपर्यंत १४,७९६ कुटुंबांची नोंद झाली. कुटुंबांनी दिलेल्या पत्त्यांवर जाऊन माहिती घेण्याचे कामही त्याच वेळी सुरू झाले. बऱ्याच चिठ्ठ्या (२१४९) रद्दबातल ठरल्या. कारण पुष्कळ वेळा एक कुटुंब दोनदा नोंदविले गेले होते किंवा काही आपद्ग्रस्त नसलेल्या कुटुंबांनीही आपली नावे नोंदविली होती. त्यामुळे १२,६४७ कुटुंबांसाठीच कुटुंबपत्रके करण्यात आली. सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांच्या शेवटी व नोव्हेंबरच्या सुरुवातीला पुन्हा काही दिवस नोंदणीचे काम झाले त्यावेळी अनुक्रमे ८५२०, ७११ आणि ३५० कुटुंबांनी नावे नोंदविली. सप्टेंबरच्या मध्यानंतर ज्या ९५८१ कुटुंबांनी नावे नोंदविली त्यांपैकी ६७८४ कुटुंबांची कुटुंबपत्रके तयार करण्यात आली. याप्रमाणे मदत-केंद्रांवर

ज्यांनी आश्रय घेतला नव्हता, अशा १९,४३१ आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी पत्रके करण्यात आली. याशिवाय केंद्रांवर आश्रय घेतलेल्या कुटुंबांपैकी ६७३२ कुटुंबांची पत्रके सप्टेंबरमध्ये भरण्यात आली व नोव्हेंबर १९६१ मध्ये आणखी १०१ कुटुंबांची पत्रके भरली गेली. याप्रमाणे २६,२६४ आपद्ग्रस्त कुटुंबांसाठी कुटुंबपत्रके तयार करण्यात आली.

कुटुंबांनी दिलेला घरक्रमांक आपद्ग्रस्त घरांच्या यादीत असेल तर ते कुटुंब आपद्ग्रस्त आहे असे मानण्यात आले. रोख मदत व धान्य यांचे वाटप करताना कुटुंबांकडून जे अर्ज भरून घेतलेले होते, त्यांवरील माहितीचा उपयोग करण्यात आला नाही. सरकार आणि इतर संस्था यांजकडून किती व कोणती मदत मिळाली याची नोंद कुटुंबपत्रकात केलेली होती. कुटुंबांनी या बाबतीत दिलेली माहिती पडताळून पाहण्यात आली नाही. कुटुंबांनी नोंदविलेल्या क्रमांकाचे घर खरोखरच आपद्ग्रस्त आहे की नाही, आणि जो भाग आपद्ग्रस्त आहे त्यामध्येच अर्जदार कुटुंब राहात होते की नाही, हे पाहण्यासाठी प्रत्यक्ष चौकशी फक्त काही कुटुंबांबाबतच केली गेली. त्यामुळे ज्या कुटुंबांचा अशा पाहणीत समावेश झाला नाही ती निश्चित आपद्ग्रस्त होती की नाही हे कळणे कठीण होते. याशिवाय गलिच्छ वस्त्यांतून राहणाऱ्या कुटुंबांच्या बाबतीत फारशी चौकशी करण्यात आली नाही. प्रत्यक्ष कुटुंबांची भेट न घेता अव्वल कारकुनांनी काही वेळा केवळ चिठ्ठ्यांवरूनच पत्रकांवर माहिती भरली असेही सांगण्यात आले.

सरकारने कुटुंबांची नोंद करण्याची जी पद्धत अनुसरली तीमध्ये अशा तऱ्हेच्या अनेक उणीवा राहून गेल्या. कुटुंबांनी दिलेले पत्ते नीट पडताळून पाहण्यात आले नसल्यामुळे खोटे पत्ते देऊन मदत मिळविणे आपद्ग्रस्त नसलेल्यांस अवघड नव्हते. असा दुरुपयोग होऊ नये म्हणून आपद्ग्रस्त कुटुंबांनी नगरपित्यांकडून प्रमाणपत्र आणावे असे ठरले. ही प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी वाममार्गांचाही अवलंब केला गेला असे समजते. मदत-वाटप अधिकाऱ्यांच्या मते सुमारे १२ ते १५ टक्के कुटुंबांनी खोटी माहिती देऊन व इतर गैरप्रकारांनी मदत मिळविली असावी. जेथे असे प्रकार उघडकीस आले तेथे वाटलेली मदत परत घेण्याचे धोरण सरकारने अवलंबिले. सुमारे शंभर कुटुंबांकडून मदत परत घेण्यात आली.

गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे आपद्ग्रस्त कुटुंबांसंबंधीची माहिती व्यापक स्वरूपात घेण्यात आली होती. सर्व मदत-केंद्रांना भेट देऊन मदत-केंद्रांवर राहणाऱ्या व भोजन-केंद्रांवर भोजन घेणाऱ्या कुटुंबांची माहिती संस्थेने जमविली होती. तसेच ज्यांना रोख मदत मिळाली अशा मदत-केंद्राबाहेरील कुटुंबांचीही यादी तयार करण्यात आली होती. आपद्ग्रस्त घरांच्या पाहणीच्या वेळी संस्थेच्या अनुसंधात्यांनी प्रत्येक घरास भेट देऊन ही माहिती पडताळून पाहिली.

मदत-केंद्रांबाहेरील ज्या कुटुंबांनी रोख मदत घेतली होती अशा १३,००० कुटुंबांनी भरलेले अर्ज पडताळून पाहता पुढील गोष्टी आढळल्या : ३५ कुटुंबांनी पूर्वीचा पत्ता म्हणून दिलेली जागा जुलै १९६१ पूर्वीच सोडलेली होती, म्हणजे १२ जुलै रोजी त्या आपद्ग्रस्त घरांतून ही कुटुंबे राहात नव्हती. १७५ कुटुंबे घरांचा जो भाग पाण्याच्या तडाख्यात सापडला नव्हता अशा भागात राहात होती. ३७५ कुटुंबांचा त्यांनी दिलेल्या पत्त्यांवर ठावठिकाणा लागला नाही. २५० कुटुंबांनी पूर्ण पत्ताच दिला नव्हता आणि १५० कुटुंबांनी दिलेले घर क्रमांकच सापडले नाहीत. १७० कुटुंबांनी जो पत्ता दिला होता त्या घरातून पाण्याची उंची इतकी कमी होती, की विशेष नुकसान होणे शक्य नव्हते. आणि २६५ कुटुंबांनी दोन ठिकाणी अर्ज भरून मदत नेल्याचे आढळून आले. याप्रमाणे १३,०००पैकी १२०० किंवा ९ टक्के कुटुंबांनी संशयास्पद मार्गाने मदत मिळविल्याचे आढळून आले. झोपडपट्टीतून राहणाऱ्या ३००० कुटुंबांविषयी मात्र चौकशी करणे शक्य झाले नाही.

याशिवाय केंद्रांवर आश्रय घेतलेल्या सर्व (झोपडपट्टीचे रहिवासी सोडून) कुटुंबांसंबंधीची माहिती-ही पडताळून पाहण्यात आली. पूर्ण पत्ता दिलेला नसल्याने किंवा पत्ता चुकीचा असल्याने २५० कुटुंबांनी दिलेला पत्ता सापडू शकला नाही. २१० कुटुंबांनी जो पत्ता दिला होता त्या घरात ती कुटुंबे राहात नव्हती असे आढळले. ४१ कुटुंबांनी जो पत्ता दिला होता ती घरे जुलैपूर्वीच त्यांनी सोडून दिलेली होती, तर १८ कुटुंबे घराच्या पाण्याच्या तडाख्यातून वाचलेल्या भागात राहात होती.

अशा प्रकारे माहिती पडताळून पाहिल्यावर असे आढळले की मदत घेणाऱ्या एकूण कुटुंबांपैकी सुमारे दहा टक्के कुटुंबे आपद्ग्रस्त नव्हती. म्हणजे जवळजवळ २६०० कुटुंबांनी मदतीच्या योजनांचा गैरफायदा घेतला.

नुकसान पोचलेल्या घरांतील कुटुंबे व ज्या घरात नुसते पाणी शिरले होते अशा घरांतील कुटुंबे यांच्या माहितीवरून आपद्ग्रस्त कुटुंबांच्या एकूण संख्येविषयी अंदाज बांधला असता आपद्ग्रस्त कुटुंबांची संख्या २६,२५० होते. ज्यांनी मदत घेतली अशा कुटुंबांची संख्या सुमारे २६,५०० होती, यांपैकी सुमारे २४,००० कुटुंबे आपद्ग्रस्त होती. म्हणजे एकूण आपद्ग्रस्त कुटुंबांपैकी सुमारे १० टक्के कुटुंबांनी मदत घेतली नाही असे म्हणता येईल.

## परिशिष्ट आ

**प्रश्नावली १ : आपद्ग्रस्तांसाठी चालविलेल्या मदत-केंद्रासंबंधीची पाहणी**

(१) मदत-केंद्र जेथे उघडले होते त्या संस्थेचे नाव :

(२) संस्थेचा पत्ता :

(३) केंद्र सुरू केल्याची तारीख :

(४) केंद्र बंद केल्याची तारीख :

(५) केंद्राचे व्यवस्थापन : व्यवस्थापक, साहाय्यक यांची संख्या :

(६) केंद्रावरील प्रारंभीची माणसांची संख्या :
पुरुष : स्त्रिया : मुले :

(७) केंद्रावरील माणसांची संख्या केव्हा व कसकशी बदलत गेली ?

(८) केंद्रावरील खाण्याची व्यवस्था : जेवण, चहा, खाणे, दूध व इतर :

(९) केंद्रावरील लोकांसाठी किती खोल्या, दिवाणखाने, इत्यादी वापरले ?

(१०) केंद्रावर पिण्याचे पाणी, धुणे, संडास यांची काय सोय होती ?

(११) केंद्रावर कोणत्या भागातील व कोणत्या वर्गातील लोक मुख्यतः होते ?

(१२) केंद्रावरील लोकांना कामे सांगण्यात येत होती काय ? कोणती ?

(१३) केंद्रावरील कोणकोणत्या कामासाठी पगारी नोकर नेमले ? त्यांची संख्या व रोजगाराचा दर :

(१४) केंद्रावर एकूण किती जेवणे झाली ?

जेवणाचा एकूण खर्च :

(१५) जेवणासाठी वापरलेल्या किराणाभुसार मालासाठी किती रक्कम खर्च केली ?

(१६) केंद्रावर केलेला इतर खर्च :

कोणत्या बाबीवर व किती :

(१७) केंद्रावर वस्तुरूपात सरकारकडून कोणकोणता माल आला ? किती माल आला ? मालाची अंदाजे किंमत :

(१८) केंद्राच्या खर्चासाठी सरकारकडून रोख रक्कम किती आली ?

(१९) केंद्रावर वैयक्तिक स्वरूपाची, रोख अथवा वस्तुरूपात मदत आली काय ? असल्यास कोणाकडून, कोणत्या प्रकारची (उदा. दूधपावडर, औषध) किती व त्याची अंदाजे किंमत :

(२०) केंद्रावर सरकारतर्फे आलेल्या मदतीचे वाटप केले काय ? असल्यास कोणत्या वस्तूंचे, किती, अंदाजे किंमत :

(२१) वस्तूंचे वाटप करताना माणसांची निवड कशी केली ? किती माणसांना वस्तू दिल्या ?

(अ) वस्तूचे नाव :

(आ) माणसांची संख्या :

(२२) केंद्र बंद झाल्यावर इमारत व आवार यांची सफाई करण्यास किती खर्च आला ? तो खर्च कोणी केला ?

(२३) केंद्र चालविण्यात आलेल्या अडचणी :

**प्रश्नावली २ : पुणे येथील आपद्ग्रस्त कुटुंबांना दिलेल्या मदतीसंबंधीची पाहणी**

( १ ) आपद्ग्रस्त कुटुंबांना मदत देणाऱ्या संस्थेचे नाव :

( २ ) मदत कोणत्या स्वरूपात दिली ?

( ३ ) किती कुटुंबांना मदत दिली ?

( ४ ) निरनिराळ्या कुटुंबांना एकूण किती मदत दिली ?

( ५ ) मदत देण्यासाठी कुटुंबांची निवड कशी केली ?

( ६ ) मदत देण्यासाठी रक्कम किंवा वस्तू कोठकोठून जमविल्या ?

( ७ ) दिलेल्या एकूण मदतीचा अंदाज :

( ८ ) मदत केव्हा दिली ?

( ९ ) मदत कोणामार्फत व कशी वाटली ?

(१०) टिपण :

**प्रश्नावली ३ : उपहत घरांची पाहणी**

(१) गृहक्रमांक व पेठ :

(२) घरमालकाचे नाव :

(३) घराची स्थिती (महानगरपालिकेच्या यादीत दर्शविलेली) :

(४) (अ) घरातील एकूण खोल्यांची संख्या :

(आ) आपत्तीत नुकसान झालेल्या खोल्यांची संख्या :

(इ) दुरुस्त केलेल्या खोल्यांची संख्या :

(५) माहिती देणाऱ्याचे नाव :

(६) माहिती देणारे : घरमालक । घरमालकांचे कुटुंबीय । भाडेकरू :

(७) आपत्तीपूर्वी घरात राहात असलेल्या भाडेकरूंविषयी माहिती :

(अ) भाडेकरूंची नावे :

(आ) पूर्वी त्यांच्याकडे असलेल्या खोल्यांची संख्या :

(इ) आपत्तीनंतर पूर्वीच्या घरात राहावयास आले काय ? की इतरत्र राहतात ?

(ई) पूर्वीच्या घरात राहावयास आले असल्यास, सध्या त्यांच्याकडे असलेल्या खोल्यांची संख्या :

(उ) आपत्तीनंतर लगेच कोठे राहावयास गेले ? मदत-केंद्र अथवा मदत-केंद्राबाहेर ? मदत–केंद्राबाहेर राहिले असल्यास कोठे ?

(ऊ) सहकारी गृहनिर्माण संस्था अथवा अन्य संस्था यांकडे जागेसाठी अर्ज केला आहे काय ?

(८) आपत्तीनंतर नव्याने आलेल्या भाडेकरूंविषयी माहिती :

(अ) भाडेकरूंची नावे :

(आ) आपत्तीपूर्वीचे राहण्याचे ठिकाण :

(इ) सध्या त्यांच्याकडे असलेल्या खोल्यांची संख्या :

(ई) आपद्ग्रस्त आहेत किंवा नाहीत ?

(९) टिपण :

# परिशिष्ट इ

## पारिभाषिक शब्दसूची

अधिकोष — Bank
अनुकूलतम — Optimum
अनुसंधाता — Investigator
अनुस्रोत — Down-stream
अप्राप्य ऋण — Bad debt
अभियंता — Engineer
आनुषंगिक — Appurtenance
आपात द्वारे — Emergency gates
आयोग — Commission
उच्छ्वास — Man-hole
उन्नयनवार — Pick-up-weir
उपकल्पित परिगणना — Hypothetical calculation
उपहृत — Damaged
ओसांड बंधारा — Waste weir
जलकर्षक — Water pump
जलग्रहण क्षेत्र — Catchment area
जलवाहक — Tanker
जलसंक्रम, प्रणाल — Aqueduct
तल-अवकाश निर्देशांक — Floor-space-index
नाशरक्षण मूल्य — Salvage value
निकुट्टन — Pitching
निगम — Corporation
निर्धारित किंमत — Assessed value
न्यादर्श — Sample
परिवहन — Transport
प्रकल्प — Project
प्रतिशतता — Percentage
प्रक्षेप — Projection
मलवाहिनी — Sewer
संधारण खर्च — Maintenance cost
संनाल — Conduit
सर्वेक्षण — Survey
सिंचन — Irrigation
सुविधा — Amenity
सेवा — Services